
जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
शनिवार, ६ सप्टेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष : ३१ | अंक : ३३ | मूल्य ४ रुपये | पृष्ठे ८+ ८ = १६ | जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध



## थोडक्यात महत्त्वाचे...



### बामखेडा महाविद्यालयात ‘श्रीं’चे विसर्जन

**शहादा :** ग्रामविकास संचलित बामखेडा त. त. (ता. शहादा) येथील कला व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यातर्फे ‘श्रीं’ची स्थापना केली होती. या सात दिवसांत विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम घेतले. यात वकृत्व, मेहंदी, रांगोळी, संगीत खुर्ची तसेच लेखक आपल्या भेटीला, यात तोरखेडा येथील प्रसिद्ध कवयित्री पूजा सोनार यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच वृक्ष लागवड असे पर्यावरण पूरक कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये पर्यावरण संरक्षण कसे करावे या गोष्टीचा संदेश काळात देण्यात आला व सातव्या दिवशी महाविद्यालयात पारंपरिक पद्धतीने श्रीचे विसर्जन करण्यात आले. प्राध्यापक, प्राध्यापकेतर व विद्यार्थी उपस्थित होते. हे कार्यक्रम प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

### चाळीसगावात सात लाखांचा गुटखा जप्त

**चाळीसगाव :** चाळीसगाव शहर पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या नागद रोड अवी रेखा पेट्रोल पंपासमोर पोलिसांनी लाखो रुपये किमतीचा गुटखा जप्त केला. पोलीस उपनिरीक्षक संदीप घुले, योगेश माडोळे, राजेश पाटील, नितीन आगोणे, ज्ञानेश्वर पाटोळ व सहकारी यांनी गाडी (एमएच-१९-सीवाय-६६५२) या मालवाहू टेम्पोची तपासणी केली असता त्यांना राज्यात प्रतिबंधित सुगंधित पान मसाला (गुटखा ) मिळाला. वाहनासह या मालाची किंमत ६ लाख ८३ हजार २४४ रुपये ऐवढी आहे. याबाबत चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमित मनेल यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक भारत चौधरी करीत आहेत

### भालचंद्र नगरचा राजाकडून व्यसनमुक्तीचा संदेश

**भुसावळ :** येथील प्रभाकर हॉल परिसरातील भालचंद्र नगरमध्ये गणेशोत्सवाच्या आरासमध्ये व्यसनमुक्ती वरील पोस्टर्सचे प्रदर्शन लावण्यात आले. नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य या संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या पोस्टर्स आणि बॅनर्सच्या माध्यमातून हे जनजागृतीचे कार्य साध्य होत आहे. यासाठी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य या संस्थेसाठी नाशिक विभागीय संघटकप्रमुख म्हणून कार्यरत असणारे डॉ. दयाघन राणे यांच्या माध्यमातून हे प्रदर्शन उपलब्ध करून दिले. गणेशोत्सवासाठी भालचंद्र नगरमधील रहिवासी प्रा. डॉ. गजानन जाधव, अशोक चौधरी, अशोक सरोदे, निखिल कोलते, चंद्रकांत चौधरी, तुषार चिंधडे, प्रमोद पाटील, बापू पाटील, पवन पाटील, जीवन पाटील, संदीप कोलते, दिलीप ढाकणे, राजेश जोशी, किशोर कांबळे, शिरीष पिंपळे, विजय महाजन, प्रा. आशिष महाजन, किशोर नारखेडे, अजय महाजन, डी. टी. किरंगे यांनी परिश्रम घेतले.



### मोहमांडली येथे जि. प. शाळेत पेन वाटप

**रावेर :** तालुक्यातील मोहमांडली येथे शिक्षक दिनानिमित्त जुम्मा तडवी (युवा स्वयंसेवक तथा ग्रामपंचायत सदस्य, मोहमांडली व भीम आर्मी रावेर तालुका उपाध्यक्ष) यांनी जिल्हा परिषद शाळा मोहमांडली येथे विद्यार्थी व शिक्षकांना पेन वाटप करून आपुलकीचा अनोखा सामाजिक उपक्रम राबविला. या वेळी मुख्याध्यापक विनोद बाविस्कर व शिक्षक विनोद पाचपोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

### ॲड. संतोष इंगळे यांची नोटरीपदी नियुक्ती



**मुक्ताईनगर :** येथील रहिवासी व दिवाणी व फौजदारी न्यायालयातील विधीज्ञ ॲड. संतोषकुमार इंगळे यांची विधी व न्याय विभाग भारत सरकारद्वारा प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवड यादीद्वारे त्यांची नोटरी पब्लिक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना नुकतेच व्यवसाय प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.



### जे. टी. महाजन स्कूलमध्ये ईद, शिक्षक दिन उत्साहात

**यावल :** येथील व्यास मंडळ संचलित जे. टी. महाजन इंग्लिश स्कूलमध्ये ४ सप्टेंबर रोजी ईद व शिक्षक दिन उत्साहात साजरे झाले. मुख्याध्यापिका रंजना महाजन अध्यक्षस्थानी होत्या. इंग्लिश मीडियमच्या प्राचार्या दीपाली धांडे व सेमीच्या पर्यवेक्षिका राजश्री लोखंडे व इंग्लिश मीडियमच्या पर्यवेक्षिका गौरी भिरूड उपस्थित होत्या. ईद-ए-मिलादविषयी रुचिता पाटील यांनी माहिती सांगितली. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले व माहिती गायत्री सरोदे या विद्यार्थिनीने दिली. दहावीच्या विद्यार्थिनींनी प्राचार्या यांचे चरण पूजन केले. तसेच दिपाली धांडे यांनी शिक्षक दिनाबद्दल माहिती दिली. सर्व शिक्षकांचे-शिक्षकेतरांचे फुलगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आले. आभार प्रदर्शन वैष्णवी नाफडे या विद्यार्थिनीने केले.

## निधन वार्ता



### बाबुराव रावणे

**सोयगाव :** येथील बाबुराव माधवराव रावणे (वय ७०) यांचे ५ सप्टेंबर रोजी सकाळी ८:४५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात, पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. होमगार्ड विजय रावणे यांचे ते वडील होत.



### शरद पाटील; आज अंत्ययात्रा

**जळगाव :** धरणगाव तालुक्यातील सोनवद जवळील अहिरे बुद्रूक येथील प्रगतीशील शेतकरी व विकासो सोसायटी चेअरमन शरद पंढरीनाथ पाटील (वय ५५) यांचे शुक्रवारी (५ सप्टेंबर) रात्री ७.५० मिनिटांनी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी (.६ सप्टेंबर ) सकाळी १० वाजता अहिरे बुद्रूक येथील राहत्या घरून निघणार आहे. ते पत्रकार विजय पाटील यांचे वडील होत.

# ‘गिरणा’च्या ४ दरवाजांतून ५ हजार क्यूसेकचा विसर्ग

## धुळे जिल्ह्यात निम्न पांझरा प्रकल्पातून १८ हजार क्यूसेकचा विसर्ग

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

जिल्ह्यासह गिरणा प्रकल्प व नदी पाणलोट क्षेत्रात दमदार पावसामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात आवक झाली आहे. सद्यःस्थितीत गिरणा प्रकल्प शंभर टक्के भरला आहे. त्यामुळे प्रकल्पाचे तीन दरवाजे उघडून ४ हजार ८८४ क्यूसेकचा विसर्ग केला जात असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. दरम्यान, जळगावसह धुळे व नाशिक जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

जिल्ह्यात तीन मोठ्या प्रकल्पांपैकी गिरणा प्रकल्पात गुरुवारी ९६ टक्के पाणीसाठा झाल्याने प्रकल्पाचा एक दरवाजा उघडून ८१४ क्यूसेकचा विसर्ग केला जात होता. गिरणा नदी व प्रकल्प पाणलोट क्षेत्रात गेल्या २४ तासात ६ मिलीमीटर पाऊस झाला असून ३.७० दशलक्ष घनमीटर पाण्याची आवक झाली आहे. आवकेत होत असलेली वाढ पहाता शुक्रवारी गिरणा प्रकल्पाचे १, २, ५ आणि ६ असे चार दरवाजे प्रत्येकी तीस सेंटीमीटरने उघडून ४ हजार ८८४ क्यूसेकचा विसर्ग केला जात आहे. गिरणा नदी पाणीपातळीत विसर्गामुळे वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांना सावधतेचा इशारा देण्यात आला आहे.



**निम्न पांझरा प्रकल्पातून १८ हजार २७५ क्यूसेकचा विसर्ग**

धुळे जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे पांझरा नदी व प्रकल्प पाणलोट क्षेत्रात पाण्याची आवकेत वाढ झाली आहे. पांझरा, मालनगाव, व जामखेडी प्रकल्पातून विसर्ग सुरू असल्याने निम्न पांझरा अक्कलपाडा प्रकल्पातून १८ हजार २७५ क्यूसेकचा विसर्ग केला जात आहे. तसेच बुराई मध्यम प्रकल्प पूर्ण भरला असून प्रकल्प सांडव्यावरून २०९.९६ क्यूसेकचा विसर्ग होत असल्याचे जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे. बुराई नदी पात्र तसेच निम्न पांझरा अक्कलपाडा प्रकल्पातून होत असलेल्या विसर्गामुळे विसर्गामुळे नदी काठा नजीक गावातील नागरिकांना सावधतेचा इशारा धुळे जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

**गिरणा प्रकल्प भरण्याच्या मार्गावर**

गिरणा प्रकल्पाच्या वर असलेले हरणबारी, केळझर, नागासाक्या, माणिकपुंज, ठेंगोडा बंधारा असे प्रकल्प पूर्ण भरले असून चणकापूर ९५.५५, अर्जूनसागर ८९.४६ टक्के भरण्याच्या मार्गावर आहेत.

**हतनूर प्रकल्पातून विसर्ग**

हतनूर प्रकल्प पातळी ४०.७८ असून गेल्या २४ तासात २ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. तसेच ११.४४ दशलक्ष घनमीटर पाण्याची आवक झाली असून पाण्याची आवक पहाता प्रकल्पाचे १० दरवाजे पूर्ण उघडून ५६ हजार ९१६ क्यूसेकचा विसर्ग केला जात आहे.

**वाघूर प्रकल्प ८८ टक्क्यांवर**

जळगावकरांची तहान भागविणाऱ्या वाघूर प्रकल्पात गेल्या २४ तासात १.४७ दशलक्ष घनमीटर पाण्याची आवक झाली असून प्रकल्प पातळी ८८ टक्क्यांपर्यंत पोचली आहे.

**जिल्ह्यात ७२.५७ टक्के उपयुक्त साठा**

जिल्ह्यातील मध्यम- लघु प्रकल्पांपैकी अभोरा, मंगरूळ, सुकी, तोंडापूर, अंजनी, बोरी आणि मन्याड प्रकल्प १०० टक्के भरले. हिवरा ९३.२५, बहुळा ९०, मोर ८६.२७, अग्नावती ४०.६१, गुळ ६८.२९, भोकरबारी २२.५७ आणि शेळगाव ४.५१ असा ७२.५७ टक्के उपयुक्त जलसाठा आहे. दरम्यान, जळगावसह धुळे व नाशिक या जिल्ह्यांत अतिवृष्टी होईल, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.



# तापी पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ५ सप्टेंबर**

येथील तापी पब्लिक सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शुक्रवारी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांना भेट वस्तू देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्रिन्सिपल नीना कटलर ह्या होत्या. व्हाईस प्रिन्सिपल मनप्रीत कौर, श्रद्धाली घुले, कार्यालयीन अधीक्षक सविता सहजे, कमल नेहेते, वर्जिनिया बनार्ड, हर्षला चौधरी, मनीषा किरंगे, जयश्री मोरेस्कर, प्रतिभा काकडे, गायत्री घिर्णीकर, सोनाली शिवरामे, सविता सहजे, श्रद्धाली घुले, सोनाली मुजुमदार, स्मिता जाधव, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रिन्सिपल निना कटलर यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात केली. प्रसंगी प्रिन्सिपल निना कटलर यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्याबद्दल उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले. त्यानंतर शिक्षकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मन जिंकली. सूत्रसंचालन सोफिया पीबॉडी यांनी, तर आभार शेख कय्यूम यांनी मानले. सदर कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# किनगाव येथे श्री विसर्जन शांततेत

## क्षत्रिय माळी समाज पंच मंडळातर्फे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**डांभुर्णी (ता. यावल), ५ सप्टेंबर**

तालुक्यातील किनगाव येथील श्री गणरायांचे विसर्जन मिरवणूक सायंकाळी पाच वाजेपासून तर रात्री बारा वाजेपर्यंत वाजत गाजत झाली. विसर्जन मिरवणुकीचे स्वागत श्री क्षत्रिय माळी समाज सेवा मंडळ व श्री संत सावता माळी गणेशोत्सव मंडळ यांनी मुख्य चौकामध्ये केले. प्रत्येक गणेश मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांचे स्वागत सत्कार करून त्यांना श्री क्षत्रिय माळी समाज सेवा मंडळ च्या वतीने सन्मानचिन्ह देण्यात आले. यावर गणेश मंडळाचे युवा कार्यकर्ते कृष्णा माळी मयूर लखिचद माळी, बंटी महाजन, जीवन महाजन, जयेश महाजन आदी कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले.



याप्रसंगी माळी समाज पंच मंडळाचे सचिव महेंद्र नारायण माळी, प्रमोद शिवराम महाजन, अशोक आधार महाजन, रवींद्र उर्फ बापू छगन महाजन, जगन्नाथ रामभाऊ महाजन, युवा कार्यकर्ते रवी (रमेश) लक्ष्मण महाजन, गोपाळ महाजन, गणेश भागवत महाजन, श्यामकांत जनार्दन महाजन, विश्वनाथ महाजन, सुभाष शिवराम महाजन यांच्यासह समाज बांधव युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाचे गावातील सर्व गणेश मंडळांनी त्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच किनगाव बुद्रूक ग्रामपंचायतीचे सरपंच स्नेहल चौधरी, माजी सरपंच मिलिंद चौधरी, माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य आनंदा एकनाथ महाजन, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पाटील, पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्यासह ग्रामस्थांनी तोंड भरून कौतुक केले.

# भुसावळातील आरोग्य शिबिरात दीडशेवर रुग्ण तपासणी

**भुसावळ :** पावसाळ्याच्या दिवसात वातावरणात बदल झाल्याने अनेक व्याधी तयार होतात व त्यामुळे विनोद सोनवणे यांनी योग्य वेळ साधून आरोग्य शिबिराचे आयोजन केले असून हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी येथे काढले. शहरातील गोल्डन अवर हॉस्पीटल व समाजसेवक विनोद सोनवणे यांच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक २० मधील पंचशील नगरवासीयांसाठी आरोग्य शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. दरम्यान, शिबिरातदिडशेवर रुग्णांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आले.

याप्रसंगी मंत्री सावकारे, माजी प्रभारी नगराध्यक्ष विजय चौधरी, राज विजय चौधरी, समाजसेवक विनोद सोनवणे, नितीन धांडे, नॅशनल व्हाईस मीडिया फोरमचे दिनेश इखारे, समाजसेवक बंटी नरवाडे आदींची उपस्थिती होती. १५० रुग्णांची तपासणी व औषधोपचार मोफत आरोग्य शिबिरात गोल्डन अवर रुग्णालयाचे आरएमओ डॉ.आफताब खान, डॉ.तेहनीयत शेख, डॉ.ईरम शेख, नर्सिंग स्टाफ अश्विनी तावरे व बरखा केशनिया आदींनी सुमारे १५० नागरिकांसह महिला व मुलांचा रक्तदाब तपासण्यात आला तसेच रक्ताची चाचणी करण्यात आली व ईसीजी काढून आरोग्याविषयी जागरूकता करीत आहाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सूत्रसंचालन रुग्णालयाचे पीआरओ गणेश वाघ यांनी करून आभारही मानले.



**यांचे यशस्वीतेसाठी परिश्रम**

शिबिर यशस्वीतेसाठी विशाल नरवाडे, रवी दाभाडे, दीपक सोनवणे, भारत गोफणे, मयूर नरवाडे, बाळा इंगळे, रत्नदीप साळुंके, करन उमाळे, रत्नपाल नरवाडे, बंटी सपकाळे, गजानन निंबाळकर, विक्की इंधाटे, सम्यक सोनवणे, अस्लम पिंजारी,शब्बीर शेख,विक्रम वानखेडे,अल्ताफ शेख, संदीप मैराळे, आशिष उमाळे, समाधान इंगळे, राष्ट्रपाल खंडेराव, शुभम दाभाडे आदींनी परिश्रम घेतले.



# नाईक महाविद्यालयात एड्स जनजागृती कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**रावेर, ५ सप्टेंबर**

येथील रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व्ही.एस.नाईक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि रेड रिबन क्लब यांच्यातर्फे एच.आय.व्ही. एड्स जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. रावेर येथील ग्रामीण रुग्णालयातील आयसीटीसी विभागाच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पडला.

ग्रामीण रुग्णालय आयसीटीसी समुपदेशक महेंद्र सुरवाडे यांनी विद्यार्थ्यांना एच.आय.व्ही. एड्सविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी या रोगाची कारणे, लक्षणे, आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपायांवर मार्गदर्शन केले.यासोबतच, आयसीटीसी समुपदेशक सुनील महाजन यांनीही विद्यार्थ्यांना एड्सबाबत महत्वपूर्ण माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनातील विविध शंकांचे निरसन करून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये या विषयाबद्दलची जागरूकता अधिक वाढली. कार्यशाळा ही महाविद्यालयाचे प्राचार्य अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली गेली.उपप्राचार्य डॉ.एस. डी.. धापसे अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सागर महाजन आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी एल.एम. वळवी यांनी कार्यशाळेचे नियोजन केले.

# यावल-भुसावळ राज्य मार्गावरील रस्त्याची खड्ड्यांमुळे बिकट अवस्था

**तभा वृत्तसेवा**
**यावल ५ सप्टेंबर**

येथील शहरातून जाणाऱ्या भुसावळ पॉईंट ते जुना भुसावळ नाका व महाराष्ट्र ढाबा ते राजोरा फाटा आणि पाटचारी ते अंजाळे गावापर्यंतच्या रस्त्याची फारच बिकट अवस्था झाली आहे. याची गांभिर्याने दखल घेऊन उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

वाहनधारकांना आपले जीव मुठीत घेऊन वाहने चालवावी लागत आहेत.

या रस्त्याच्या गंभीर परिस्थितीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देऊन रस्ता कायमचा दुरुस्त करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे तालुका प्रा. मुकेश येवले यांनी केली आहे.

यावल ते भुसावळकडे जाणाऱ्या सुमारे १८ किलोमीटर राज्य मार्गावरील रस्त्यावर शहरातील भुसावळ पॉईंट ते जुना भुसावळ नाका दोन किलोमिटर तर महाराष्ट्र ढाबा ते राजोरा फाटा सहा किलो मिटर आणि पाटचारी ते अंजाळे दोन किलोमिटर अशा जवळपास नऊ ते दहा किलोमिटर रस्त्याच्या मध्यभागी ठीकठीकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांना खड्डे वाचवितांना अपघातास सामोरे जावे लागत आहे. याची दखल घेण्याची मागणी होत आहे.



# यावल महाविद्यालयात मराठी वाङ्‌मय मंडळाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**यावल, ५ सप्टेंबर**

जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित यावल येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागाच्या वतीने उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार यांच्या अध्यक्षतेखाली टाकरखेडा (ता. जामनेर) येथील प्रा. अर्जुन पाटील यांच्या हस्ते मराठी वाङ्‌मय मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले.

मराठी विभागप्रमुख प्रा रत्नाकर कोळी, मराठी विभागाचे प्रा. रामेश्वर निंबाळकर, प्रा. प्रशांत मोरे, प्रा. हेमंत पाटील आणि उर्दू विभागाचे प्रा. इम्रान खान उपस्थित होते.

दैनंदिन जीवनात आपली भाषा, रसाळ आणि मधाळ असेल तर लोकंही आपल्यासोबत प्रेमाने वागतील. आपण आरे केलं तर समोरचा कारे केल्याशिवाय राहणार नाही म्हणून भाषेत गोडवा असला पाहिजे, असेही प्रा. अर्जुन पाटील म्हणाले.

महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा.रत्नाकर कोळी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रामेश्वर निंबाळकर यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत मोरे यांनी केले.

तांत्रिक बाबी प्रा. इम्रान खान यांनी सांभाळल्या तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. हेमंत पाटील यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांसह इतर विषयाचे व इतर शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते.

## मूर्ती विसर्जनासाठी सावदा ते हतनूर धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था

**सावदा (ता. रावेर) :** ६ रोजी श्रीगणेश विसर्जन होणार असून सावदा व परिसरातील सर्वच घरगुती व सार्वजनिक मंडळे यांचे विसर्जन हे हतनूर धरण पात्रात करण्यात येत असते. रात्री उशिरापर्यंत मिरवणुका चालतात व रात्री १२ नंतर सार्वजनिक मंडळे ही विसर्जनासाठी हतनूर धरणाकडे रवाना होतात. विसर्जनाच्या दिवशी येथे मोठी वाहनांची वर्दळ असते मात्र असे असताना हा रस्ता मोठ्या प्रमाणात खराब झाला असून रस्त्याची मोठी दुरवस्था झाली आहे. यामुळे येथे विशेषतः मोठ्या मंडळांच्या मूर्ती नेताना प्रचंड अडचणी येण्याची शक्यता आहे. सावदा पोलीस स्टेशनतर्फे झालेल्या बैठकीत या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी विसर्जनाआधी या रस्त्याची दुरुस्ती करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र या रस्त्याची दुरुस्ती झाली नाही. यामुळे गणेश भक्तांना विसर्जनासाठी या रस्त्यावरून जाताना मोठ्या समस्या निर्माण होणार आहे.

# थायबॉक्सिंग स्पर्धेमध्ये सुवर्णाला ‘सुवर्णपदक’



**मुक्ताईनगर :** वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे २९ ते ३१ ऑगस्ट दरम्यान राष्ट्रीय थायबॉक्सिंग स्पर्धा घेण्यात आली. यात महाराष्ट्र संघ प्रथम आला. यात सुवर्णपदक पटकावणाऱ्या स्पर्धकांमध्ये ठाणे, मुंबई येथे हल्ली मुक्काम असलेली तसेच मूळ राहणार तरोडा, ता.मुक्ताईनगर येथील संजना हिवरकर या विद्यार्थिनीचा समावेश आहे. या स्पर्धेत संपूर्ण भारतातून १६ राज्य व ५०० हुन अधिक खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेत पिंपरी चिंचवड ( पुणे) येथील खेळाडूंनी उत्तम कामगिरी करून अनेक पदके पटकावले, त्यात असिफ शेख, सुवर्ण पदक पटकावित स्पर्धेचा उत्कृष्ट खेळाडू ठरला . तसेच संजना हिवरकर (सुवर्ण पदक) , इसक्की तेवर (सुवर्ण पदक), सुरज भोंडे (सुवर्ण पदक), अमिन आत्तार (सुवर्ण पदक), कृष्णा दिवेकर (सुवर्ण पदक),अजित जैस्वाल (सुवर्ण पदक) , तेजस वारूळकर (सुवर्ण पदक), अतिक शेख (सुवर्ण पदक) हेमंत सिंग (रौप्य पदक) यांनी पदक पटकावत महाराष्ट्र संघाचा प्रथम क्रमांक आणला. स्पर्धेचे प्रमुख पाहुणे अध्यक्ष राष्ट्रीय थायबॉक्सिंग असोशिएशन पी वाय आत्तार, मंत्री दया शंकर यांच्या हस्ते खेळाडूंना बक्षीस वितरण करण्यात आले.

घर असो वा शेत झेनिथ पाईप सेवेत...
भारतात प्रथम क्रमांकावर असलेले बिर्लांचे एक उत्पादन
झेनिथ
स्टील पाईप
जी.आय.पाईप
एम.एस.पाईप
ZENITH-BIRLA LIGHT
ZENITH-BIRLA MEDIUM
ZENITH-BIRLA HEAVY
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
‘केसर-कस्तुरी’ २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

जळगाव तरुण भारत tarunbharatlive.com CLASSIFIEDS

महाराष्ट्र चे सुप्रसिध्द ज्योतिषी
१५० वर्षाची परंपरा असलेले
श्रीभृगूज्योतिषकेंद्र
तुमच्या जिवनातल्या कोणत्याही कठिण समस्यांचे तुरंत १०१ % कायम स्वरुपी समाधान. जिथं समस्या आहेत, तिथ ‘‘निराकरण’’ ही आहे । गरज आहे, ती योग्य मार्ग दर्शनाची । समस्या, चिंता, निराशा, सोडा, एकदा येऊन प्रत्यक्ष भेटा. मंत्र-सिध्द रुद्राक्ष व रत्ने (खडे), मंत्रसिध्दसर्व यंत्र (अनुभव हिच खात्री) दादावाडी जळगाव
मो.९८२२७७४१५१,९८२३०४७८११

11th 12th CA & B.Com
All Subject Under One Roof
Accounts - CA Dinesh Lodha
Maths -Prof. Smita Sharma
Eco -CA CS Sneha Lodaya
OCM & SP - CA Rakhi & Adv. Aniket
3 Students Scored 100
PARSHWANATH COMMERCE ACADEMY
Near M. J. College, jalgaon
Mob - 8149-666-339

तरुण भारत’तर्फे लवकरच ज्येष्ठ नागरिक मंच
राष्ट्रीय विचारांच्या ‘जळगाव तरुण भारत’तर्फे लवकरच ‘ज्येष्ठ नागरिक मंच’ची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपली नोंदणी करावी.
संपर्क - ९७६४९०३७०१

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग,** डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com


सातपायरी घाटात दरड कोसळली; रस्ता बंद

वाचा पान ५ वर

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
शनिवार, ६ सप्टेंबर २०२५




## विचारपुष्प



शरीराच्या एकेका अंगाचा आकार, नाव आणि कार्य वेगवेगळे असले, तरी त्या सर्वांचे मिळून एकच जिवंत शरीर असते. शरीराच्या अंगांमध्ये उच्च-नीचतेचा भेद नाही. याचप्रमाणे आपण सारे एकाच हिंदू समाजाचे अंग आहोत. समान आहोत. आपल्यात कोणीही अस्पृश्य नाही.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## आज अनंत चतुर्दशी



## तरुण भारत
### उद्या अंक नाही

अनंत चतुर्दशीनिमित्त शनिवार, ६ सप्टेंबर रोजी 'जळगाव तरुण भारत' कार्यालयास सुटी आहे. यामुळे रविवार, ७ सप्टेंबरचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, विक्रेते, वितरक आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

– संपादक

## तरुण भारत
### आसमंत, आकांक्षा पुरवणी आज

अनंत चतुर्दशीनिमित्त शनिवार, ६ सप्टेंबर रोजी 'जळगाव तरुण भारत' कार्यालयास सुटी आहे. यामुळे शनिवारची 'आकांक्षा' तसेच रविवारी देण्यात येणारी 'आसमंत' या दोन्ही पुरवण्या आजच्या अंकासोबत देत आहोत. याची वाचक, विक्रेते, वितरक आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

– संपादक

आतील पानात...
गिरणाचे ४ दरवाजे उघडून ५ हजार क्यूसेकचा विसर्ग
अक्कलकुव्यात काँग्रेसला खिंडार; ७५ कार्यकर्ते भाजपमध्ये

खुशखबर! खुशखबर!! खुशखबर!!!
श्री क्षुधा शांती सेवा संस्था
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
सकाळी ९.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आपल्या सेवेत कार्यरत
सप्रेम नमस्कार
समस्त गणपती मंडळ-पदाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की.... गणपती विसर्जनाच्या दिवशी कार्यकर्त्यांकरिता जेवण पार्सल पाहिजे असल्यास आमच्याकडे अल्प दरात स्वादिष्ट, कळणाभाकर, ठेचा, सँडवीच भाकर, दशमी-चटणी, वरण, भात, पोळी, भाजीच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.
वरील सर्व मेनू उपलब्ध
: संपर्क :
श्री दत्तात्रय जैन
मो.नं. 8446731631
श्री.मच्छिंद्र पाटील
मो.नं.9372326460

# भारत-रशियाला आम्ही गमावले

## डोनाल्ड ट्रम्प यांचा सूर नरमला ● एससीओ शिखर परिषदेचे छायाचित्र केले पोस्ट

◆ **वॉशिंग्टन, ५ सप्टेंबर**

भारत आणि रशियासारख्या देशांना आम्ही गमावले आणि वसाहतवादी चीनशी जवळीक साधण्यात भाग पाडल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले असून, त्यांचा सूर आता नरमला आहे. समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी हा नरमाईचा सूर घेतला. भारत आणि रशियाला दीर्घ आणि समृद्ध भविष्य मिळो, अशा शुभेच्छा देतो असेही त्यांनी म्हटले आहे.

भारताविरोधात ५० टक्के टॅरिफ लादून द्विपक्षीय संबंधात तणाव निर्माण करणाऱ्या ट्रम्प यांनी चीनमधील तियानजिन येथे झालेल्या शांघाय सहकार्य संघटना अर्थात् एससीओ शिखर परिषदेतील पंतप्रधान मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचे एकत्र छायाचित्र पोस्ट केले. आपल्या निर्णयांवर पश्चात्ताप करताना त्यांनी पोस्टमध्ये म्हटले की, या छायाचित्रावरून मला असे दिसते की, आपण भारत आणि रशियाला चीनसारख्या वसाहतवादी राष्ट्राशी जवळीक साधण्यास भाग पाडले.

अमेरिकेने भारतासारखा विश्वासू आणि मजबूत संबंध असलेला मित्र गमावला. देव त्यांना दीर्घ आणि समृद्ध भविष्य देवो अशी प्रार्थना मी करतो. हा प्रकार टाळण्याचा मी खूप प्रयत्न केला, मात्र देशाची सुरक्षा, महसुलातील तूट आणि युक्रेनविरोधातील संघर्ष टाळण्यासाठी काही कठोर निर्णय घ्यावे लागले. मित्र राष्ट्रांनी आमच्यापासून दूर जावे असा हेतू यामागे नव्हता. भारताने सावध राहायला हवे, असा सल्ला ट्रम्प यांनी दिला.



### सेमीकंडक्टरवर शंभर टक्के टॅरिफ लावणार

ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये सेमीकंडक्टरच्या आयातीवर शंभर टक्के टॅरिफ लावणार असल्याची घोषणा केली. या क्षेत्रातील कंपन्यांनी अमेरिकेत प्रकल्प सुरू करावे हा टॅरिफचा उद्देश आहे. ज्या कंपन्या अमेरिकेत नाहीत, त्यांच्याकडून आयात केल्या जाणाऱ्या सेमीकंडक्टरच्या सुट्या भागांवरदेखील टॅरिफ लागू असेल.एखादी कंपनी अमेरिकेत कारखाना उभारण्यास तयार असेल, तर त्यांना शुल्कातून सूट मिळेल. ■

### अधिकृत माहिती नाही : रणधीर जयस्वाल



साप्ताहिक पत्रकार परिषदेत ट्रम्प यांच्या पोस्टबद्दल विचारले असता, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, भारतासंदर्भात त्यांनी केलेल्या पोस्टची मला कुठलीही अधिकृत माहिती नाही. यावेळी त्यांनी ट्रम्प यांचे सल्लागार पीटर नवारो यांनी भारताविरोधात केलेल्या टिप्पणीला प्रत्युत्तर देताना म्हटले की, त्यांनी ब्राह्मण समाजासंदर्भातील केलेले भाष्य आक्षेपार्ह आणि दिशाभूल करणारे आहे आणि आम्ही त्याचा निषेध करतो. अमेरिकेसोबतचे संबंध सरकारसाठी खूप महत्त्वाचे आहेत. ■

# शिक्षकांच्या योगदानाने देश होईल 'सुपर पॉवर'

## राज्यातील सहा शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार



डॉ. राधाकृष्णन् यांना अभिवादन करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शिक्षक दिनी महाराष्ट्रातील सहा शिक्षकांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना राष्ट्रपतींनी शिक्षकांचे योगदानच भारताला 'सुपर पॉवर' अर्थात् महासत्ता बनवेल, असे मत व्यक्त केले.

द्रौपदी मुर्मू यांनी येथील विज्ञान भवनात आयोजित एका शानदार कार्यक्रमात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मान केला. प्रमाणपत्र, रौप्य पदक व रोख ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

महाराष्ट्रातील ६ शिक्षकांनाही हा पुरस्कार मिळाला. त्यात नांदेडच्या अर्धापूर येथील जिल्हा परिषदेचे शिक्षक डॉ. शेख मोहम्मद वकिउद्दीन शेख हमीदोद्दीन, मुंबई स्थित एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २ च्या शिक्षिका सोनिया विकास कपूर, लातूरच्या दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स महाविद्यालयाचे शिक्षक डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे, मुंबई स्थित शाह अँण्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डॉ. नीलाक्षी जैन, बारामतीच्या एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँण्ड इंजिनीअरिंगचे प्रा. पुरुषोत्तम पवार यांचा समावेश आहे.

### नागपुरातील अनिल जिभकाटे यांचाही गौरव

संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशक अनिल जिभकाटे यांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत येणाऱ्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेमधील वेल्डर व्यवसायातून कौशल्याचार्य, शिक्षक पुरस्कार अनिल रामदास जिभकाटे यांना मिळाला. महाराष्ट्राला व नागपूर विभागाला या गटातील हा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार पहिल्यांदाच मिळाला.

# टॅरिफमधून मिळणार व्यावसायिकांना दिलासा

◆ **नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

केंद्र सरकार आता नवीन अमेरिकन टॅरिफमुळे त्रस्त निर्यातदारांसाठी दिलासा जाहीर करण्याची तयारी करीत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ५० टक्के टॅरिफमुळे प्रभावित झालेल्या कापड, रत्ने आणि दागिने यासारख्या क्षेत्रांना मदत करण्यासाठी लवकरच अनेक योजना सुरू केल्या जाणार आहेत. या पॅकेजमुळे लहान निर्यातदारांच्या अडचणी कमी होतील, नोकऱ्या वाचतील आणि नवीन बाजारपेठा शोधण्यास मदत होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार कोरोना दरम्यान लहान, लघु आणि मध्यम उद्योग यांना देण्यात आलेल्या मदतीच्या धर्तीवर हे मदत पॅकेज तयार करीत आहे. यासोबतच अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या निर्यात प्रोत्साहन मोहिमेची अंमलबजावणी जलद करण्यासाठी देखील प्रयत्न केले जात आहेत, जेणेकरून भारताचा जागतिक व्यापार अधिक मजबूत होणार आहे.

**या क्षेत्रांना दिलासा मिळेल?**

अमेरिकेने अलीकडेच भारतीय वस्तूंवर ५० टक्के कर लादला आहे, यापैकी २५ टक्के कर रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल दंड आहे. या कर आकारणीमुळे कापड, रत्ने आणि दागिने, चामडे, पादत्राणे, रसायने, अभियांत्रिकी वस्तू, कृषी आणि सागरी उत्पादने यासारख्या क्षेत्रांवर परिणाम झाला आहे. या उद्योगांमधील निर्यातदारांना त्यांची स्पर्धात्मकता टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. सरकारचे लक्ष लहान निर्यातदारांच्या रोख रकमेच्या तुटवड्यावर मात करणे, भांडवलाच्या समस्या कमी करणे आणि नोकऱ्या वाचवणे यावर असणार आहे. याशिवाय, नवीन बाजारपेठांचा शोध घेण्यासाठी आणि अडचणी न येता उत्पादन चालविण्यासाठी योजना आखल्या जात आहेत.



मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी राजभवनात गोपनीयतेची शपथ दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पगुच्छ देत त्यांना शुभेच्छा दिल्या

# हैदराबादमध्ये छापा; पाच हजार कोटींचे एमडी जप्त

◆ **मुंबई, ५ सप्टेंबर**

मीरा भाईंदर पोलिसांच्या गुन्हे शाखेने शुक्रवारी हैदराबादपासून २० किमी अंतरावरील रचकोंडा येथील चेरलापल्ली एमआयडीसीमधील एका कारखान्यावर छापा टाकून पाच हजार कोटींचे एमडी जप्त केले. कारवाईत मादक पदार्थ बनविण्यासाठी वापरण्यात येणारे उपकरणे आणि साहित्य जप्त करण्यात आले. कारखाना मालकाला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, काही दिवसांपूर्वी मादकपदार्थाची तस्करी करणाऱ्या टोळीला अटक करण्यात आली होती. आरोपींनी हैदराबाद येथील एका कारखान्यातून मादकपदार्थ आणल्याचे सांगितले होते. या माहितीच्या आधारे केलेल्या तपासानंतर एक पथक हैदराबादला गेले. त्यांनी कारखान्यावर पाळत ठेवली होती.

या कारखान्यातून एमडी पाठविला जात असल्याची पुष्टी झाल्यानंतर धाड टाकण्यात आली. गुन्हे शाखेच्या पथकाने कारखान्यातून पाच हजार कोटींचे एमडी आणि साहित्य जप्त केले. एमडी बनवणाऱ्या कारखाना मालकास पोलिसांनी अटक केली आहे.

# रशियाविरुद्ध २६ युरोपियन देश एकवटले

## इमॅन्युएल मॅक्राँ यांची घोषणा; युक्रेनला सुरक्षा हमी

**पॅरिस, ५ सप्टेंबर**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आणि युरोपियन नेत्यांनी गुरुवारी पॅरिसमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ यांच्याशी बैठक घेतली. यामध्ये युद्धग्रस्त युक्रेनसाठी सुरक्षा हमींवर चर्चा झाली. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी सुरक्षा हमी आणि २६ देशांचे सैन्य युक्रेनच्या सीमेवर तैनात करणार असल्याची घोषणा केल्याने रशियाविरोधात युरोपियन देशांनी दंड थोपटल्याचे स्पष्ट झाले आहे.

मॅक्राँ यांनी सांगितले की, बैठकीला युरोपियन युनियनसह ३५ देशांचे नेते उपस्थित होते. युक्रेनमध्ये आंतरराष्ट्रीय सैन्य तैनात करण्यावर २६ देशांचे एकमत झाले आहे. भविष्यात रशियाकडून होणारा हल्ला रोखण्यासाठी यामुळे मदत होईल. काही देश युक्रेनच्या सीमेवर सैन्य तैनात करणार आहे. युक्रेनियन सैन्याला प्रशिक्षण देणे आणि शस्त्रास्त्रे पुरवणे यावरदेखील एकमत झाले. सुरक्षा हमीमध्ये किती सैन्य सहभागी असेल याची माहिती त्यांनी दिलेली नाही. जर्मनीसारखे काही देश अजूनही निर्णय प्रक्रियेत असल्याने मदत देणाऱ्या देशांची संख्या वाढू शकते आणि अमेरिकेच्या सहभागाबाबत अंतिम निर्णय पुढील काही दिवसांत अपेक्षित असल्याचे मॅक्राँ म्हणाले.



### धडा शिकविण्याची हीच वेळ : झेलेन्स्की

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जियो मेलोनी यांनी युक्रेनमध्ये सैन्य पाठवणार नसल्याचे स्पष्ट केले. तथापि, त्यांनी सांगितले की इटली युद्धबंदीचे निरीक्षण करण्यास आणि देशाबाहेर युक्रेनियन सैन्याला प्रशिक्षण देण्यास तयार आहे. झेलेन्स्की यांनी या निर्णयाचे वर्णन ऐतिहासिक असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, युक्रेनच्या सुरक्षेसाठी हा उपक्रम खूप महत्त्वाचा आहे. सध्या रशियाकडून युद्ध संपवण्याचे कोणतेही संकेत दिसत नाही, त्यामुळे एकत्रितपणे त्यांना धडा शिकविण्याची वेळ आली आहे.

**शांतता अजूनही दूरचे स्वप्न**

युक्रेनमध्ये शांतता अजूनही दूरचे स्वप्न दिसते, परंतु युद्ध संपल्यानंतरही त्यांना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी तयार राहायचे आहे. या प्रयत्नातून आम्ही युक्रेनला पाठिंब्याची खात्री देऊ शकतो. कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि जपानदेखील बैठकीत सहभागी झाला. त्यांनी अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही.

# संघर्ष थांबवा, युद्धाचा काळ नाही

## भारताची संयुक्त राष्ट्र संघात भूमिका; निष्पापांची जीवितहानी अस्वीकारार्ह

**न्यू यॉर्क, ५ सप्टेंबर**

युक्रेन संघर्ष संपवण्यासाठी राजनैतिक प्रयत्नांना पाठिंबा देण्यास भारत तयार आहे. शाश्वत शांततेसाठी सर्व भागधारकांचा पूर्ण सहभाग आणि वचनबद्धता खूप महत्त्वाची आहे. भारत या दिशेने अलिकडच्या सकारात्मक घडामोडींचे स्वागत करतो. रशिया-युक्रेनमध्ये सुरू असलेला संघर्ष थांबविण्यासाठी संवादातून तोडगा काढायला हवा, हा युद्धाचा काळ नाही आणि निष्पापांची जीवितहानी आम्हाला नाही, अशी भूमिका संयुक्त राष्ट्र संघातील भारताचे राजदूत पार्वतनेनी हरीश यांनी गुरुवारी मांडली.

रशिया-युक्रेन संघर्षावर संयुक्त राष्ट्रांत आयोजित चर्चेत बोलताना हरीश म्हणाले, संघर्ष थांबावा आणि प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याच्या बाजूने भारताची भूमिका आहे. भारत युक्रेनमधील परिस्थितीबद्दल चिंतित आहे. निष्पाप नागरिकांचा मृत्यू आम्हाला अस्वीकारार्ह आहे. संघर्ष संपवण्यासाठी संवाद आणि राजनयिकता हाच एकमेव मार्ग आहे यावर भारताने सातत्याने भर दिला, हा मार्ग कितीही गुंतागुंतीचा किंवा कठीण वाटत असला तरी, त्याचा स्वीकार करावाच लागेल. परस्पर हिताच्या मुद्यांवर आणि युक्रेनमधील संघर्ष संपवण्याच्या प्रयत्नांवर भर द्यायला हवा. चिरस्थायी शांततेसाठी सर्व भागधारकांचा पूर्ण सहभाग आणि वचनबद्धता खूप महत्वाची आहे. भारत या दिशेने अलिकडच्या सकारात्मक घडामोडींचे स्वागत करतो.

**अलास्कामधील बैठकीचे स्वागत**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात अलास्काम ध्ये झालेल्या बैठकीचे स्वागत करतो. चर्चेतूनच संघर्षावर तोडगा निघणार आहे. पंतप्रधान मोदी सध्याच्या परिस्थितीवर राष्ट्राध्यक्ष पुतिन, राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की आणि युरोपीय नेतृत्वाच्या संपर्कात आहेत. आम्हाला विश्वास आहे की हे सर्व राजनैतिक प्रयत्न युक्रेनमध्ये सुरू असलेला संघर्ष संपवण्यास मदत करतील आणि कायमस्वरूपी शांततेच्या शक्यता निर्माण करतील.

**राजनैतिक प्रयत्नांना पाठिंबा**

संघर्षाचे इतर परिणाम जगभरातील देशांवर आणि विशेषत... दक्षिणेतील देशांवर परिणाम करत आहे. संघर्षाच्या परिणामांमध्ये इंधनाच्या वाढत्या

किमतींचाही समावेश आहे. युक्रेन संघर्षाकडे भारताचा दृष्टिकोन लोककेंद्रित आहे, युक्रेनला म ानवतावादी

मदत देणाऱ्या भागीदारांचे आम्ही स्वागत करतो. युक्रेनमधील संघर्ष लवकर संपवणे हे सवारच्या हिताचे आहे. भारत संघर्ष लवकर संपवण्यासाठी राजनैतिक प्रयत्नांना पाठिंबा देण्यास तयार आहे.

# जपानवरील शुल्क दहा टक्क्यांनी घटविले

## ट्रम्प यांची घोषणा, सर्व वस्तूंवर लागणार १५ टक्के आयात शुल्क

**वॉशिंग्टन, ५ सप्टेंबर**

अमेरिकेत आयात करण्यात येणाऱ्या जपानच्या वस्तूंवरील शुल्कात १० टक्क्यांनी कपात करण्यात आली असून, आता १५ टक्केच शुल्क या देशांवर लावण्यात येणार आहे, अशी घोषणा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी केली.

ट्रम्प यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, अमेरिका आणि जपानमध्ये व्यापार करार झाला आहे. या कराराअंतर्गत जपानी वाहनांवरील कर २५.५ टक्क्यांवरून १५ टक्केपयरत कमी करण्यात आला. जपान अमेरिकेकडून तांदूळ, म का, सोयाबीन, खते आणि बायोइथेनॉल यासारखी

८ अब्ज डॉलर्सची कृषी उत्पादने खरेदी करणार असून, अमेरिकेत ५५० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करेल. यात इक्विटी, कर्ज आणि सरकारी हमींचा समावेश आहे. ही गुंतवणूक अमेरिकन सरकारने निवडलेल्या प्रकल्पांमध्ये असेल. यासोबतच जपान १०० बोइंग विमाने खरेदी करेल आणि अमेरिकन कंपन्यांसोबत संरक्षण खर्च दरवर्षी १४ अब्ज डॉलर्सवरून १७ अब्ज डॉलर्सपयरत वाढवेल. अमेरिका जपानला सुरक्षेची हमी देणार आहे. या करारामुळे अमेरिकेची व्यापार तूट कमी करण्यास मदत होणार असल्याचे ट्रम्प यांनी पोस्टमध्ये नमूद केले.

# भारताची पाकिस्तानसोबत तुलना करू नका

## अमेरिकेच्या माजी उपपरराष्ट्र सचिवाने ट्रम्प यांना सुनावले

**वॉशिंग्टन, ५ सप्टेंबर**

भारतावर टॅरिफ लादून आणि राष्ट्राध्यक्ष टम्प यांनी मोठी घोडचूक केली आहे. त्यांनी भारताची तुलना पाकिस्तानसोबत करू नये. पाकिस्तानचा इतिहास जगजाहीर आहे आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणे आत्मघातकी ठरू शकते. भारताशी संबंध बिघडविणे अमेरिकेच्या हिताचे नाही, त्यामुळे तत्काळ टॅरिफचा निर्णय रद्द करून वाटाघाटीने तोडगा काढावा, असे अमेरिकेचे माजी उपपरराष्ट्र सचिव कर्ट एम. कॅम्पबेल यांनी म्हटले आहे.

वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत कॅम्पबेल यांनी इशारा दिला की, जर सध्याची परिस्थिती अशीच राहिली तर अमेरिका भारतासारखा महत्त्वाचा धोरणात्मक भागीदार गमावू शकतो आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात चीनला आघाडी मिळू शकते.

कॅम्पबेल म्हणाले, भारत-अमेरिका भागीदारीला दीर्घकाळापासून द्विपक्षीय पाठिंबा मिळत आला आणि या संबंधाने भारत-प्रशांत प्रदेशात चीनची आक्रमकता रोखण्यात यश आले.

शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत पंतप्रधान मोदी यांनी शी जिनपिंग आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी झालेल्या भेटीचा हवाला देत म्हटले की, जर ही परिस्थिती अशीच राहिली तर अमेरिका भारताला प्रतिस्पध्र्यारकडे ढकलेल.

पाकिस्तानची तुलना भारतासोबत करणे मोठी चूक आहे. भारत आणि अमेरिकेतील नवीन धोरणात्मक भागीदारी कराराच्या स्वरूपात असावी, जी अमेरिकन सिनेटने मंजूर केली पाहिजे. हा करार पाच प्रमुख स्तंभांवर आधारित असावा आणि त्याचे उद्दिष्ट दोन्ही देशांची सुरक्षा, समृद्धी आणि सामायिक मूल्ये म जबूत करणे असले पाहिजे.

## अग्रलेख...

# संतुलितच असावा विकास

विकास आणि विनाश यातील सीमारेषा खूप अस्पष्ट आणि पुसट आहे. विकास कुठे संपतो आणि विनाश कुठे सुरू होतो, हे सांगणे अवघड आहे. महत्त्वाचे म्हणजे यासाठी विकासाची निश्चित व्याख्या आम्हाला करावी लागेल. विकास कोणासाठी आणि कशासाठी करायचा हे विचारपूर्वक ठरवावे लागेल. त्यानंतर विकासाची गरज अधोरेखित करून त्या दिशेनेच विकासाची गाडी हळुवारपणे आणि योग्य मार्गावरून न्यावी लागेल. विकासाची गाडी भरधाव सोडली की होत्याचे नव्हते व्हायला वेळ लागत नाही. अतिरेकी आणि अनियंत्रित विकासामुळे पर्यावरणाची अपरिमित आणि कधीच भरून न निघणारी हानी होत आहे. विकासाचा हा भस्मासुर पर्यावरणासोबत आणि मानवी जीवनाचीही राखरांगोळी करत आहे. याचा अर्थ विकास हा करायचा नाही, विकासाची गरज नाही, असे नाही. पण विकास हा मानवाच्या भल्यासाठी, त्याचे जीवनमान उंचावण्यासाठी असला पाहिजे; त्याचा नाश करणारा नसावा. विकास हा नेहमीच संतुलित आणि मानवकेंद्रित असला पाहिजे. असंतुलित आणि मानवाचा नाश करणारा विकास हा एखाद्या नरभक्षकासारखा असतो. तो तुम्हाला कधी गिळंकृत करून टाकेल, याचा नेम नसतो. याचा अनुभव सध्या संपूर्ण उत्तर भारत घेत आहे. उत्तर भारतातील जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, पंजाब आणि हरयाणा या राज्यात जी नैसर्गिक आपत्ती आली आहे, त्याचे मूळ या दिशाहीन आणि पर्यावरणाची हानी करणाऱ्या आत्मघातकी विकासात दडले आहे. पर्यावरणाचा बळी देऊन होणारा विकास समस्त मानवजातीच्या मुळावर येत असतो.

विकासात पहिला बळी झाडांचा जात असतो. झाडे कापल्यानंतर अपरिहार्यपणे पर्यावरणाचा नाश होत असतो. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयालाही त्याची दखल घ्यावी लागली. बेकायदेशीरपणे झाडे तोडल्यामुळे निसर्ग कोपला, असे ताशेरे सर्वोच्च न्यायालयाने ओढले आहेत. झाडे तोडल्यामुळेच जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, पंजाब व हिमाचल प्रदेशमध्ये गंभीर पूरस्थिती उद्भवल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणाच्या मुद्यावर सरकारची कानउघाडणी करण्याची ही पहिली वेळ नाही. याआधी दोन-तीन वेळाही सरकारचे कान उपटले आहेत. पण हा प्रश्न फक्त केंद्र सरकारचा नाही तर राज्य सरकारचाही आहे. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारला एकत्रित प्रयत्न करावे लागतील. डोंगरावरील बेकायदेशीर वृक्षतोड हे या नैसर्गिक आपत्तीचे प्रमुख कारण आहे; खरं म्हणजे याला वृक्षतोड म्हणणेही योग्य नाही, तर ही वृक्षांची कत्तल म्हणायला पाहिजे. वृक्षांची बेकायदेशीर कत्तल होत असल्यामुळे निसर्ग सूड घेत असल्याचे अतिशय महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे. आतातरी सगळ्यांचे डोळे उघडले पाहिजे. आताही आमचे डोळे उघडत नसतील तर आमचे डोळे कायमस्वरूपी बंद व्हायला वेळ लागणार नाही. ही आपत्ती नैसर्गिक नाही तर मानवनिर्मिती म्हटली पाहिजे.

ग्लोबल वॉर्मिंगची चर्चा गेल्या काही वर्षांत सुरू झाली आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे हिमालयातील बर्फांचे पर्वत म्हणजे ग्लेशियर वितळू लागले आहे. याला आपण दैवी आणि नैसर्गिक आपत्ती म्हणू शकत नाही, तर ही मानवनिर्मित आपत्ती म्हणायला पाहिजे. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये दरड कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. नद्यांना अचानक पूर येऊ लागला आहे. ढगफुटीच्या घटनाही गेल्या काही वर्षांत वाढल्या आहेत. आम्ही जर निसर्गाची काळजी घेतली, पर्यावरणाचे रक्षण केले तर निसर्गही आमचे रक्षण करायला तयार आहे. निसर्गाने आपली सीमा आणि मर्यादा कधीच ओलांडली नाही. मात्र मानवाने लाजलज्जेसोबत मर्यादा सोडली आहे. त्याचे परिणाम वा दुष्परिणाम दरड कोसळण्याच्या घटना आणि गंभीर अशा पूरस्थितीतून जाणवत आहे. यामागचे खरं कारण वृक्षतोड हे आहे. हे एकमेव कारण नसले तरी एक कारण नक्की आहे. झाडांची मुळं ही जमिनीतील माती धरून ठेवतात, त्यामुळे दरड कोसळण्याच्या घटनांना आळा बसतो. पण मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी अनियंत्रित वृक्षतोड सुरू केली. काही वर्षांपूर्वी चंदन तस्कर वीरप्पनच्या नावाची खूप चर्चा होती. काही दशकं तो जंगलातील मौल्यवान अशी चंदनाची झाडे तोडत होता, त्याची तस्करी करत होतो. एक संघटित असे जाळे त्याने तयार केले होते. पोलिस, प्रशासन आणि राजकारण्यांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष साथ असल्याशिवाय कोणीही एवढ्या दीर्घकाळ चंदनाची तस्करीच काय, कोणताही गुन्हा करू शकत नाही, हे शेंबड्या पोरालाही समजते. विशेष म्हणजे वीरप्पन एका नाही तर तीन-चार राज्यातील पोलिसांना हुलकावणी देत होतो, असे म्हणण्यापेक्षा हप्ते देत असावा, असे म्हणायला हरकत नाही. गेल्या काही वर्षांत उन्हाळा अतिशय तापू लागला आहे. तापमान ५० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू लागले आहे. त्यामुळे वातानुकूलित यंत्राची म्हणजे एसीची मागणी वाढत आहे. एसीमध्ये जो गॅस वापरला जातो, त्याने पर्यावरणाची हानी होत असते. याला कारण म्हणजे खरे जंगल कमी होत आहे. शहरात सिमेंटचे जंगल वाढत आहे. हा कोणा एका देशासाठी नाही तर संपूर्ण जगासाठी आणि पर्यायाने मानवजातीसाठी धोक्याचा इशारा आहे. २० ते २५ वर्षांपूर्वी जसे पर्यावरण होते, तसे आता राहिले नाही. उन्हाळ्यात कोणत्याही शहरात सायंकाळी वा रात्री थंड वारे वाहात होते. आज थंड हवेची म्हणून जी ठिकाणे आहे, तेथील हवा गरम होऊ लागली आहे. यावर्षी संपूर्ण देशात अतिवृष्टी झाली, सगळ्या राज्यात पूरस्थिती होती आणि अजूनही आहे. विशेष म्हणजे पुरामुळे प्राणहानी आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणात होत असते. राजधानी दिल्लीही यातून सुटली नाही. राजधानी दिल्लीत यमुना नदी धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचली आहे. उत्तरेकडील राज्यातून पाणी सोडावे लागल्यामुळे राजधानी दिल्लीत यमुना नदी धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचली आहे. राजधानी दिल्लीत तासभरही मुसळधार पाऊस झाला तर रस्त्यावर पाणी साचून वाहतुकीची कोंडी होते. याला कारण आहे, नियोजनशून्य विकास. सिमेंटचे रस्ते आणि मोठमोठे उड्डाणपूल बांधले म्हणजे विकास झाला असे नसते. देशाच्या एका भागात पूरस्थिती असते, तर दुसऱ्या भागात कोरडा दुष्काळ. यावर नदी जोड प्रकल्पाचा पर्याय समोर आला होता. एका पट्ट्यातील नद्या एकमेकांना जोडायच्या. म्हणजे ज्या नदीतील पाण्याची पातळी वाढली, त्यातील पाणी ज्या नदीत पाणी कमी आहे, तेथे सोडायचे. मात्र या प्रकल्पाचा खर्च अमर्याद आहे. त्यामुळे तो प्रस्ताव बारगळला.

एखाद्या व्यक्तीचा एखादा पाय सुजला म्हणजे ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त झाली असे म्हणता येणार नाही. असा एक पाय सुजणे हे हत्तीरोगाचे लक्षण म्हटले पाहिजे. दोन्ही हात आणि दोन्ही पायांसोबत संपूर्ण शरीर विकसित झाले तर तो शारीरिकदृष्ट्या सक्षम आहे, असे म्हणता येऊ शकेल. विकासाचेही तसेच आहे. ग्लोबल वॉर्मिंगबाबत जागतिक स्तरावर अनेक परिषदा होतात, पण या परिषदात प्रस्ताव पारित करण्याशिवाय आणि उपस्थित नेत्यांचे सुहास्य मुद्रेतील छायाचित्र काढण्याशिवाय कोणतेही ठोस निर्णय होत नाही. आवश्यक उपाययोजना केल्या जात नाहीत. आज अनेक शहरात डोंगर कापून बिल्डर लोक मनमानी पद्धतीने बहुमजली इमारती बांधत आहेत. लोकांना सुविधा पुरविण्याच्या नावावर चारधाम यात्रेच्या मार्गावर सिमेंट काँक्रिटचे रस्ते बांधले जाते आहेत. विद्युत प्रकल्प उभारले जात आहे. हे करताना तेथील भौगालिक रचनेकडे आपण सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय सरकारची कानउघाडणी करत आहे. सरकारने आता तरी शहाणे झाले पाहिजे. विकासाच्या नावावर सुरू केलेल्या माकडचेष्टा थांबवल्या पाहिजे. विकास हा संतुलित आणि गरजेनुसार असला पाहिजे. पर्यावरणानुकूल जीवनशैलीचा अवलंब करण्याची आज खरी गरज आहे. कारण पर्यावरण टिकले तर मानवी जीवन राहणार आहे, पर्यावरणाचा नाश झाला तर मानवी जीवनाचा नाश व्हायला वेळ लागणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाचा हा शोध आणि बोध म्हटला पाहिजे.

---

## यंगिस्तान

### जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# लोकां सांगे ब्रह्मज्ञान...

भुवनेश्वरच्या खंदागिरीबारी परिसरात सुभद्रा आणि विश्वजित नावाचे नवविवाहित जोडपे राहत होते. सुभद्रा बँकेत नोकरी करायची, तर विश्वजित एका छोट्या फार्मसीचा मालक. त्यांचे आयुष्य साधे आणि शांत होते. पण एके दिवशी त्यांच्या आयुष्यात असा प्रसंग घडला ज्याने त्यांना धक्का बसला. विश्वजित दुपारी घरी परतले तेव्हा त्यांना मुख्य दाराचा उघडा दिसला आणि बेडरूममधील कपाटाचे टाळे तुटलेले आढळले. घरात चोरी झाली होती. ३०० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ५ लाख रुपये रोख चोरून नेले. नवविवाहित संसाराला नुकतीच सुरुवात केलेली. अशा परिस्थितीत घरात इतकी मोठी चोरी झाल्याने दोघंही खचून गेले. त्यांनी भारतपूर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपास सुरू केला. काही दिवसांतच त्यांना संशयित सापडला. पोलिसांनी त्याच्या हालचालींवर सुमारे एक आठवडा पाळत ठेवली आणि अखेरीस त्याला खंदागिरीबारी येथून अटक केली. त्याच्याकडून २०० ग्रॅम सोन्याचे दागिने, १ लाख रुपये रोख, चोरीसाठी वापरलेली मोटरसायकल आणि लोखंडी रॉड जप्त करण्यात आला. तपासात असे समोर आले की, त्याने केलेल्या ३०० ग्रॅम सोन्यापैकी ८२ ग्रॅम नयागड येथील आर्थिक संस्थेत ४.७३ लाख रुपये कर्ज घेण्यासाठी गहाण ठेवले होते. उर्वरित १०० ग्रॅम सोने आणि रोख रक्कम त्याच्याकडून जप्त करण्यात आली. पोलिसांनी सर्व चोरीचे सामान तक्रारदाराला परत केले.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल कोण होता तो चोर? तो होता मनोजकुमार सिंग, ४२ वर्षांचा यूट्यूबर, जो त्याच्या चॅनेलवर प्रेरणादायी व्हिडीओ बनवायचा. त्याच्या व्हिडीओमध्ये तो प्रामाणिकपणा आणि गुन्हेगारीपासून दूर राहण्याचा सल्ला देत असे. लोक त्याला प्रेरक वक्ता म्हणून ओळखत होते. मनोजवर यापूर्वीही भुवनेश्वर आणि नयागड येथे अनेक चोरीचे गुन्हे दाखल होते. तो रात्री बंद घरे शोधून, लोखंडी रॉडने दार तोडायचा आणि काही मिनिटांत चोरी करून पसार व्हायचा. त्याच्या यूट्यूब चॅनेलमुळे लोकांना वाटायचे की तो सुधारला आहे; खरे तर तो आपल्या गुन्ह्यांना यूट्यूबच्या आड लपवत होता. अटकेनंतर त्याच्या मुलीने त्याचे चॅनेल डिलीट केले. पोलिसांनी मनोजला न्यायालयात हजर केले, जिथे त्याला कोठडी सुनावण्यात आली. या घटनेने परिसरात खळबळ माजली. कारण एका प्रेरक वक्त्यामागचा खरा चोराचा चेहरा समोर आला होता. पोलिसांनी लोकांना सावध राहण्याचा आणि ऑनलाईन व्यक्तींच्या दाव्यांची पडताळणी करण्याचा सल्ला दिला.




पोलिस आयुक्त एस. देव दत्ता सिंग यांनी सांगितले की, मनोज हा एक सराईत चोर आहे, जो विशेषतः बंद घरे आणि स्वतंत्रपणे उभी असलेली घरे लक्ष्य करत असे. त्याच्यावर भुवनेश्वर आणि नयागड येथील विविध पोलिस स्टेशनांमध्ये १० हून अधिक चोरीच्या गुन्ह्यांची नोंद आहे. २०११ पासून त्याचा गुन्हेगारी इतिहास आहे आणि यापूर्वीही त्याला १० वेळा अटक झाली होती. या प्रकरणात तो जामिनावर बाहेर होता. मनोजची मॉडस ऑपरेंडी अशी होती की, तो मोटरसायकलवर लोखंडी रॉड घेऊन बंद घर शोधत असे. मुख्य दार आणि कपाट तोडून १० मिनिटांत चोरी करून पसार होत असे. त्याच्या यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून तो आपल्या गुन्हेगारी कारवायांपासून पोलिसांचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत होता, असे पोलिसांचे म्हणणे आहे. म्हणजे काय तर 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः मात्र कोरडे पाषाण' किंवा हिंदीत 'चोर मचाएं शोर' असेही म्हणता येईल. आता आपण जरा राजकारणाकडे वळुया. राहुल गांधी यांनी अलिकडेच निवडणुकीत 'मत चोरी' झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यासाठी त्यांनी आंदोलनही केले. राहुल गांधी यांच्यावर आणि काँग्रेस पक्षावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले आहेत. यापैकी सर्वात चर्चित आहे नॅशनल हेराल्ड प्रकरण. या प्रकरणात राहुल गांधी आणि त्यांच्या मातोश्री सोनिया गांधी यांच्यावर नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राशी संबंधित कंपनीच्या मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. २०१२ मध्ये सुब्रह्मण्यम स्वामी यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, काँग्रेस पक्षाने नॅशनल हेराल्डशी संबंधित असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडला मोठ्या प्रमाणात कर्ज दिले; जे नंतर यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या कंपनीद्वारे हस्तांतरित करण्यात आले. या कंपनीत राहुल आणि सोनिया गांधी यांचा मोठा हिस्सा आहे.

या प्रकरणात कथित आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्ड्रिंगचे आरोप असून प्रवर्तन संचालनालय (ईडी) याची चौकशी करत आहे. राहुल गांधी यांना या प्रकरणात अनेकदा समन्स बजावण्यात आले आहेत; तरीही ते स्वतःला निवडणूक प्रक्रियेचे रक्षक म्हणून पुढे करतात. राहुल गांधी यांच्यावरील आणखी एक गंभीर प्रकरण म्हणजे सात्यकी सावरकर यांनी दाखल केलेली बदनामीची केस.

काँग्रेस पक्षाचा भ्रष्टाचाराचा इतिहास नवीन नाही. १९७५ मध्ये इंदिरा गांधी यांना अलाहाबाद उच्च न्यायालयाने १९७१ च्या निवडणुकीत गैरप्रकार केल्याबद्दल दोषी ठरवले होते. यामुळे त्यांना सहा वर्षांसाठी राजकारणातून बंदी घालण्यात आली होती, ज्याला प्रत्युत्तर म्हणून त्यांनी देशात आणिबाणी लागू केली, असे म्हटले जाते. हा भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील सर्वात काळा कालखंड मानला जातो. म्हणजे 'मत चोरी' हा आरोप राहुल गांधी इतरांवर लावत असले, तरी अशा गोष्टी त्यांच्यासाठी नवीन नाहीत. याशिवाय, बोफोर्स घोटाळा हा राजीव गांधी यांच्या काळातील एक मोठा भ्रष्टाचाराचा मुद्दा होता, ज्यामध्ये स्वीडिश कंपनी बोफोर्सकडून तोफा खरेदीच्या व्यवहारात लाचखोरीचे आरोप झाले. या प्रकरणाने काँग्रेस पक्षाची प्रतिमा डागाळली आणि १९८९ च्या निवडणुकीत त्यांना सत्तेतून बाहेर पडावे लागले.

काँग्रेसच्या इतर नेत्यांवरही भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले आहेत. उदाहरणार्थ, २जी स्पेक्ट्रम घोटाळा, कोळसा घोटाळा आणि कॉमनवेल्थ गेम्स घोटाळ्यामध्ये काँग्रेसचे अनेक नेते अडकले होते, ज्यामुळे काहींना तुरुंगवासही भोगावा लागला. अशा पृष्ठभूमीवर राहुल गांधी यांचे 'मत चोरी'चे आरोप हास्यास्पद वाटतात. तुम्हाला काय वाटते? बरं, आता वरील मनोजकुमार सिंह या चोराचं, लोकांना चोरी करू नका, हे सांगणं आणि 'मत चोरी' या दोन्ही गोष्टींची तुम्ही सांगड घालत असाल तर तर ही तुमची जबाबदारी!

writerjayeshmestry@gmail.com

---

## मुंबई वार्तापत्र

### नागेश दाचेवार

# अखेर राज्यानेच दिले आरक्षण




मराठा आरक्षणाचा लढा हा गेल्या दोन-चार दिवसातला नाही; तो १९८१ पासून चालला आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाचे आंदोलन चालविले आहे. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले होते. कालांतराने नव्हे, दुर्दैवाने २०१९ ला तोंडाशी आलेला घास हिरावून घेत दगाबाजीने, गद्दारीने उद्धव ठाकरेंनी राजकीय दुश्मनांशी हातमिळवणी करून, स्वतः मुख्यमंत्री होण्याचे कटकारस्थान रचले. या कारस्थानाने आलेल्या कारस्थानी सरकारच्या काळात सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाविषयी राज्य सरकारच्या वतीने पाहिजे तसे प्रयत्न केले गेले नाहीत. त्यामुळे फडणवीसांनी दिलेले आरक्षण उद्धव ठाकरेंच्या सरकारने घालवले. घालविल्यानंतर मविआ सरकारने आरक्षण देणे राज्य सरकारच्या हाती नाही ते केंद्र सरकारच्या हाती असल्याची बोंब उठवली. आरक्षण केंद्र सरकारच देऊ शकतो, आमच्या हाती काही नाही, असे म्हणत मराठा आरक्षणाबाबत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मविआचे सर्वेसर्वा शरद पवार आणि मविआ सरकारने हात वर केले होते. मात्र, त्यानंतर मुख्यमंत्री झालेल्या एकनाथ शिंदे यांच्या मदतीने फडणवीसांनी पुन्हा मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले. तर, उर्वरित मागण्यांनादेखील न्याय राज्य सरकारच्या पातळीवरच त्यांनी दिला. केंद्र सरकारकडे बोट दाखवून आपली जबाबदारी झटकणाऱ्या उद्धव ठाकरे आणि शरद पवारांना दाखवून दिले की, हा विषय केंद्राच्या नव्हे, तर राज्य पातळीवरचा होता आणि तुम्ही तुमच्या सरकारच्या काळात हाताळू शकले नाही; नव्हे तर शरद पवारांनी आपल्या अख्ख्या राजकीय कारकीर्दीत मराठा समाजाला न्याय दिला नाही. मात्र, तोच न्याय मराठा समाजाच्या नेहमी टीकेचा धनी राहिलेल्या व्यक्तीने दिला, हे विशेष.

ओबीसी समाजाच्या बाबतीतदेखील मविआ सरकारची आणि त्यांच्या नेत्यांची भूमिका अशीच उदासीन राहिली आहे. न्यायालयाने 'ट्रिपल टेस्ट' करण्याचे आणि इम्पिरियल डेटा आणण्याचे सुचविल्यानंतर इम्पिरियल डेटा देणे राज्य सरकारचं काम नाही; ते केंद्र सरकारचं आहे, असे सांगून ओबीसी आरक्षणाचा विषयदेखील असाच चिघळवला. तेदेखील घालवले. मविआने ओबीसी आरक्षणात डबल-ट्रिपल ढोलकी वाजविण्याचे काम केले.

मराठा असो किंवा ओबीसी दोन्ही समाजासाठी कुठलीही ठोस भूमिका यांनी घेतली नाही आणि घेणार नाही. मुंबईत एवढे मराठे एकवटले, मुंबई कधी थांबणार नाहीची घोषणा नेहमी ऐकायला मिळते. पण यावेळी मुंबई थांबलेली आणि हतबल झालेली दिसली. मुंबई ही ठाकरेंची आहेची वल्गना करणारे यावेळी कुठे होते कळलेच नाही. सर्वसामान्य मुंबईकरांचे हाल होत होते. कामाला जाणं बंद, लोकल प्रवास कठीण, खाजगी उद्योग धंदे बंद, सरकारी नोकर, चाकरमान्यांचे हाल आणि ऐन गणेशोत्सवात बाजारपेठा बंद, एक, दीड, तीन, पाच दिवसांच्या गणपती विसर्जनाची गैरसोय, हे सगळं मुंबईकर सोसत होते. पण मुंबईच्या कैवाऱ्यांनी मोर्चेकऱ्यांची बाजू घेताना, मुंबईकरांना त्रास होईल असे वागू नका. रस्त्यावर नाचू नका, दळणवळणाला बाधा आणू नका, असे साधे आवाहन मोर्चेकऱ्यांना केले नाही. एरवी तर, लगेच मुंबई आणि मुंबईकर म्हणजे यांचीच मक्तेदारी असल्यागत अंगावर धावून येणाऱ्या या तथाकथित मुंबईवाद्यांची बोबडी यावेळी का वळली होती, असा प्रश्न आता सामान्य मुंबईकर विचारत आहेत. म्हणजे आरक्षणच नव्हे, तर मुंबईकरांच्या हिताच्या विषयातदेखील हे यांचा स्वार्थ बघतात, हे या आंदोलनाच्या माध्यमातून सिद्ध झाले. मुंबई मराठी माणसांची नाही का? मग मराठी माणूस आंदोलन कुठं करेल, असा प्रश्न विचारणाऱ्यांना आता लवकरच मुंबईकर उत्तर देतील तेव्हा मिळतील या प्रश्नांची उत्तरं, सोयीच्या भूमिका घेणाऱ्या डबल ढोलकी वादकांना.

**मुंबईकरांची बाजू घेणाऱ्या देवरांवरच उडाले**

खासदार असले, तरी सामान्य व्यक्तीप्रमाणे मिलिंद देवरांसारख्या व्यक्तीने राजकारण बाजूला सारत मुंबईकरांचे झालेले हाल बघता यावर काही निर्बंध असले पाहिजे, अशी ठोस भूमिका मांडली. तर, त्यांना लक्ष्य करण्यासाठी हे लबाड लांडगे चवताळून उठले. त्यांना धनिकांचे प्रतिनिधी म्हणून हिणवू लागले. मुळात देवरा यांनी मांडलेला मुद्दा या संधिसाधू लोकांसारखा अदानी-अंबानीचा नव्हता, तर तो हातावर आणून पानावर खाणाऱ्या सर्वसामान्य, गोरगरीब मुंबईकरांचा होता. आणि हो, यात उच्च न्यायालयाचे आदेशदेखील आहेत. आझाद मैदानावर आंदोलन करण्याची पाच हजारांची मर्यादा न्यायालयाने घालून दिली आहे. रात्री आंदोलन करता येणार नसल्याचं म्हटलं आहे. रस्त्यावर आंदोलन करण्याचा तर प्रयत्नच उद्भवत नाही. अशा परिस्थितीत एखाद्याने न्यायालयात याचिका दाखल केली तर तो घटनेला आणि न्यायालयाचा सन्मान करीत असल्याचे म्हणण्याऐवजी त्यालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करणं आणि जे कायदा, न्यायालयाचे निर्देश पायदळी तुडवत आहेत, त्यांच्या चुकीच्या कृत्याला समर्थन देण्याच्या प्रकाराला काय म्हणावे? तसेही संविधान-संविधान बचाव म्हणून छाती बडवणारी ही जमात नेहमी संवैधानिक संस्थांवर शरसंधान साधताना दिसते. यांना हवे तसे वागले तर ठीक अन्यथा सर्व आरोपीच्या पिंजऱ्यात असतात. यांनी याआधी अनेकदा आरोपीच्या पिंजऱ्यात न्यायालयाला उभं केलं असल्याचा इतिहास आहे. न्यायालयाचे निर्देश पाळण्याचा, घटनेनुरूप वागण्याचा यांचा दुरान्वये संबंध नाही. त्यामुळे यांच्याकडून न्यायिक वर्तणुकीची अपेक्षा करणेच मूर्खपणाचे आहे.

**टीकेचे धनी फडणवीसच!**

बरं, एवढं करूनदेखील देणाऱ्याच्या वाटेला काय आलं, तर मराठा आंदोलन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिलेल्या शब्दानुसार महिनाभरात सातारा गॅझेट लागू करावे, अन्यथा येत्या निवडणुकांत सरकारचा धुरळा उडवू आणि राज्यभरात एकाही नेत्याला रस्त्यावर फिरू देणार नसल्याची धमकी... म्हणजे ज्यांची दिशाभूल केली, न्याय दिला नाही, दिलेलं आरक्षणं घालवलं, आरक्षण देणं तर दूरच; साधं आम्ही समाधान करू, आरक्षण देण्याचे प्रयत्न करू देखील न म्हणणारे नामानिराळे राहिलेत, भले ठरलेत; आणि ज्यांनी आरक्षण दिले, देण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, त्यांचे धन्यवाद मानायचे तर सोडा; वाटेला काय तर शिव्याशाप...

९२७०३३३८८६

---

## वेध

### विजय कुळकर्णी

# पोलिसांचे कार्यक्षेत्र रुंदावतेय

'पोलिसांचा पूर्वी जनतेमध्ये दरारा होता; आजही आहे. कोणाच्या घरी जर पोलिस आले तर त्याची वेटाळातच नव्हे, तर गावभर चर्चा व्हायची. पोलिस गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठीच एखाद्याच्या घरी जातात, असा त्याकाळी समज होता. एखाद्या चौकात वाहतूक नियंत्रक पोलिस कर्तव्यावर असेल तर त्या चौकापासून २०० ते ३०० मीटर दूर सायकलवरून डबलसिट जाणाऱ्यांपैकी दुसऱ्या व्यक्ती उतरून पायी तो चौक पार करून पुढे १००-२०० मीटर गेल्यावर सायकलवर डबलसिट बसत असे. एवढा दरारा पोलिसांचा होता. आमचे घर पोलिस ठाण्याला लागूनच असल्याने गुन्हेगारांची धुलाई आम्ही नित्य पाहायचो. चोर, दरोडेखोर, खिसेकापू, दारूची अवैध विक्री करणारे, जुगार खेळणारे व खेळविणारे यांना पकडणे, शहरात शांतता व सुव्यवस्था कायम ठेवणे, सण-उत्सव काळात निघणाऱ्या मिरवणुका, जाहीरसभा, यात्रा, महोत्सवादरम्यान चोख बंदोबस्त ठेवून वरील सर्व आयोजन शांततेत पार पाडण्याची जबाबदारी पोलिसांची आहे, हे आपल्याला माहीत आहे. मात्र, यात आता बदल होऊन पोलिसांच्या कार्यकक्षा रुंदावत आहेत. पूर्वी पोलिस गुन्हेगार किंवा दोषी व्यक्तीला शोधून त्याला कठोर शिक्षा कशी होईल, याकडे लक्ष देत होते. म्हणजे झालेल्या आजारावर उपचार करीत होते. तर, आता ज्याप्रमाणे एखादा आजार होऊ नये म्हणून आपण लसीकरण करवून घेतो, त्याप्रमाणे पोलिस गुन्हे आणि गुन्हेगार निर्माण होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करताना दिसत आहेत. त्याचे उदाहरणच पाहायचे म्हटल्यास आमच्या बुलढाणा जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांनी 'मिशन परिवर्तन' या उपक्रमांतर्गत संपूर्ण जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत. त्यात व्यसनमुक्ती, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण इत्यादी कार्यक्रमांचा समावेश आहे. आजची तरुण पिढी धूम्रपान, तंबाखू, गुटखा सेवनाकडे आकृष्ट झाल्याचे दिसून येते. तर, मोठ्या शहरांमध्ये ड्रग्स, चरस, अफिम, गांजा, ब्राऊन शुगर इत्यादी अमली पदार्थांच्या आहारी युवक गेल्याचे दिसून येते. ड्रग्जचे व्यसन एवढे भयंकर आहे की, ते एकदा जडले की त्यातून बाहेर पडणे कठीण होते. ड्रग्जचा अंमल संपला की ठरावीक वेळेनंतर तो ड्रगिस्ट अस्वस्थ होतो. त्याचे हातपाय थरथर कापू लागतात. त्याला काहीच सुचत नाही. त्याला कोणत्याही परिस्थितीत ड्रग्ज हवे असते. त्यासाठी तो कोणतीही किंमत मोजायला तयार असतो. त्यातूनच मग गुन्हेगारी आणि गुन्हेगार जन्माला येतो. असे गुन्हेगार निर्माण होऊ नये म्हणून जिल्हा पोलिस अधीक्षकांनी व्यसनमुक्ती जनजागृती अभियानाच्या माध्यमातून व्यसनांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांचे पाऊल उचलले आहे. त्याचप्रमाणे रक्तदान शिबिरांचे आयोजन करून शासकीय रुग्णालयांची रक्तांची मागणी पूर्ण केली जात आहे. विज्ञानाच्या सहाय्याने मानवाने मोठी प्रगती केली असली, तरी पाणी आणि रक्त या दोन गोष्टी अजूनही मानवाला कृत्रिमरीत्या तयार करता आलेल्या नाहीत. बुलढाणा जिल्हा पोलिसांनी रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना आवाहन करून शासकीय रुग्णालयातील रक्तपेढींमधील रक्तांची मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरणाचा ढासळलेला समतोल राखण्याचा प्रयत्न पोलिस करीत आहेत. त्याचबरोबर कौटुंबिक हिंसाचारांच्या प्रकरणात पोलिस समुपदेशन केंद्रांच्या माध्यमातून अनेक मोडलेले संसार पुन्हा सुरळीत करण्याचे काम पोलिस करीत आहेत. यापूर्वी एखाद्या विवाहितेने पोलिसांकडे तक्रार केल्यास तिच्या सासरच्या मंडळीविरुद्ध शारीरिक छळवणूक, हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करून त्यांना कोठडीत डांबण्याचे काम करीत होते. पण, आता केवळ गुन्हेच दाखल करीत नाहीत तर तक्रारकर्ती, तिचा पती, तिच्या सासरच्या मंडळीला समुपदेशन केंद्रात बोलावून त्यांचे समुपदेशन केले जाते. दोन्हीकडील लोकांना समजावून सांगितले जाते. समजूत काढल्यावर त्यांचा संसार पुन्हा सुरळीत करून देण्याचे प्रयत्न पोलिस करीत आहेत. तसेच, गुन्हे आणि गुन्हेगारांचे बदललेले स्वरूप हे पोलिसांसमोरील नवे आव्हान आहे. एखाद्या घरात चोरी झाली तर, त्यातील आरोपींचा शोध लागू शकतो. 'सायबर क्राईम' या नावाचा नवीन गुन्हेगारी प्रकार आता सुरू झाला आहे. शेकडो कि.मी. लांब बसून इंटरनेटच्या साहाय्याने एखाद्याच्या बँक खात्यातील पैसे परस्पर काढून दुसऱ्याच्या खात्यात वळते केले जातात. यातील गुन्हेगार शोधणे ही जटिल समस्या पोलिसांसमोर उभी ठाकली आहे. त्याचे आव्हानही पोलिसांनी स्वीकारले असून सायबर गुन्ह्यांची उकल पोलिस करीत आहेत. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' असे पोलिसांचे ब्रीद आहे. पूर्वी खलनिग्रहण होत होते. पण, आता खलनिग्रहणायसोबतच सद्रक्षणाय व सदनिर्माणाचे कार्यदेखील पोलिस करीत आहेत. त्यावरून पोलिसांचे कार्यक्षेत्र रुंदावत असल्याचे दिसून येते.

८८०६००६१४९

---

## वाचक पत्रे

### प्रतिष्ठापना आणि विसर्जन

नुकत्याच श्री महालक्ष्मी सण आटोपून निरोप घेऊन गेलेल्या. महालक्ष्म्यांना निरोप असो की गणेश विसर्जन अशा वेळी लहान-मोठ्या साऱ्यांच्याच मनात असे भाव दाटून येतात. मनाच्या तारा जुळल्या की, मनातलं न बोलताच आपल्या प्रिय व्यक्तीला आपल्या मनातील भाव आपोआपच कळतात. जरी त्या दूर अंतरावर असतील तरीही अतींद्रिय शक्तीच्या आधारे ती जाणीव होते. असा अनुभवी अनेकांना आलेला असेलच. आजकाल या मनाच्या तारा जुळो न जुळो, पण मोबाईल आणि विशेषतः सोशल नेटवर्किंग साईट्सच्या तारा आपल्या मनाशी इतक्या जुळल्या आहेत की, या आंतरजालाच्या (नव्हे मायाजालाच्या) अतींद्रिय शक्तीचा प्रत्यय पदोपदी येत असतो. फेसबुक उघडले अन् समोरच एक पोस्ट दिसली... सावरकरांचे वाक्य म्हणून शेअर केलेली ती पोस्ट होती... 'खरं तर तो कुठेच जात नाही; इथेच असतो. प्रतिष्ठापना, विसर्जन हे आपल्या मनाचे खेळ. अनादी, अनंत आणि असीम अशा काळावर अधिराज्य गाजवणाऱ्यांना आपण काय बसवणार आणि विसर्जित करणार? विसर्जन माणसांचं असतं, तत्त्वं चिरंतन असतात..!' या चराचराला व्यापणाऱ्या ज्या निर्गुण निराकार तत्त्वांचं आपण विविध देवी-देवतांच्या रुपात पूजन करतो त्या मूळ तत्त्वांचं विसर्जन होतच नसतं... ही चिरंतन आहेत. बदलत्या काळानुसार प्रत्येकवेळी वेगवेगळी रूपं पालटून ही तत्त्व आपल्या अस्तित्वाची जाणीव करून असतात. मग दरवर्षीचं हे प्राणप्रतिष्ठापना आणि विसर्जन कशासाठी? एका कवीने महालक्ष्मी निरोप घेतेवेळी होणारी मनाची अवस्था अगदी नेमक्या शब्दात व्यक्त केली आहे. तो म्हणतो,

**गौराईचे वास्तव्य, चैतन्याची झळाळी...**
**दिस हा शुभंकर, सकाळ सोनसळी...**
**आली निरोपाची वेळ, जिवा हुरहूर दाटे...**
**ये ग पुन्हा तू माउली, माझ्या घरकुला वाटे..!!**

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी**

### ऋषितुल्य भाऊ...

ऋषिपंचमीला आपण संत श्री गजानन महाराजांची पुण्यतिथी साजरी केली आणि याच दिवशी अशाच एका ऋषितुल्य महानुभावाची शतकोत्तर रोप्य (१२५ वी) जयंतीसुद्धा होती; ती म्हणजे प.पू. भाऊंची. भाऊ म्हणजे प.पू प्रल्हाद महाराजांचे कनिष्ठ बंधू. साखरखेर्ड्याचे वे.शा.सं. पुरुषोत्तम मुकुंद काळे आपल्या मामांनाच दत्तक दिल्यामुळे ते पुरुषोत्तम त्र्यंबक किंबहुने झाले. प.पू. प्रल्हाद महाराज व आमचे भाऊ म्हणजे अगदी श्रीराम-लक्ष्मणाचीच जोडी होती. जगप्रसिद्ध मेहकरच्या श्री शारंगधराची पुजारी म्हणून नव्हे तर खऱ्या अर्थाने अर्चक म्हणून त्यांनी सुमारे पाच दशक सेवा केली. भाऊंनी मंदिरात संपूर्ण श्रावण महिन्यात श्री विष्णुसहस्रनाम पठनाचा सुरू केलेला उपक्रम आजही सुरू आहे तसेच जन्माष्टमीला श्रीमद्भगवद्गीतेच्या ११ व्या अध्यायाचे पठन त्यांनी सुरू केले, ते सुद्धा सुरू आहे. अखंड परमेश्वराच्या चिंतनात राहणे हा एकच ध्यास त्यांना होता. मार्गशीर्षातील उत्सवात दहा दिवस डोळ्याचे पारणे फिटणारा वाराप्रमाणे पोषाख करावा तो भाऊंनीच. भाऊंचे प्रस्थान त्रैयीचे वैदिक शिक्षण इंदूरला झाले होते. आम्हा बालगोपाळांवर त्यांनी केलेले संस्कार अजूनही आम्ही विसरलेलो नाही. आमचे भाऊ प्रखर राष्ट्रभक्त होते. ते उत्कृष्ट कवी होते. त्यांनी श्री बालाजीवर अनेक पदे, आरत्या, अष्टके केल्या आहेत. सात्त्विक आचरणाने समाजात त्यांच्याविषयी आदरयुक्त भीती होती. सामाजिक कार्यात ते अग्रेसर असत. त्यांचं घर म्हणजे जुन्या काळातील गुरुकुलच! प.पू. महाराजांचे ते उजवे हात होते. कोणतेही मोठे कार्य महाराज भाऊंवर सोपवित. आश्विन महिना हा या काळे कुटुंबाला घात महिना ठरला. याच महिन्यात महाराजांचे वडील, भाऊ आणि भाऊंच्या सौभाग्यवती श्रीराम चरणी लीन झाल्यात. अशा या १२५ वर्षांपूर्वी जन्मलेल्या ऋषींना विनम्र अभिवादन.

**अशोक पत्की**

### चारचाकी वाहनांचा अतिरेक

भारतात शैक्षणिक कर्जावरील व्याज दर हे चारचाकी गाडीच्या व्याज दरापेक्षा अधिक असून यातून राज्यकर्ते-सरकारमधील लोकांची बौद्धिक दिवाळखोरी प्रदर्शित होते. सगळीकडे चारचाकी गाड्यांचा सुळसुळाट असून ९० टक्के कार मालकांकडे पार्किंगची जागा नाही. चारचाकीही गरज नसून चैनीची वस्तू आहे. पण सरकारला ही बाब कळू नये? शिवाय आता जीएसटी २८ वरून १८ टक्के केल्यामुळे या मूर्खपणात अजून भर घातली आहे. यामुळे चारचाकींची संख्या वाढून वाहतूक कोंडी अजून भीषण होणार आहे, हे नक्की.

**अनिल वाटवे**

### प्रथा आणि परंपरा

भारतीयांची स्वतःची एक जीवन पद्धती आहे. जीवन तर सगळेच जगताच, पण त्याला धर्म आणि कर्तव्याची जोड हवी. धर्म आम्हाला जगण्यासाठी प्रेरित करतो. आहार पोषण देतो. धर्म आणि आहार यांचा स्वर्ण मध्य साधून आम्ही जगण्याचे बीज मनमनांत पेरत असतो. अंगणात तुळस आणि शिखरावर कळस हीच आपल्या संस्कृतीची ओळख. कपाळी कुंकू आणि डोक्यावर पदर ही सौभाग्याची ओळख. माणसात जपतो माणुसकी आणि नात्यात जपतो नाती. हीच आमच्या भारताची ओळख! आपल्या पूर्वजांनी सण आणि उत्सव यांची धार्मिक कार्याशी सांगड घालून भारतीय संस्कृतीला अनमोल अशी भेट प्रदान केली आहे. त्यामध्ये धार्मिक कार्याला विज्ञानाची सांगडसुद्धा पाहायला मिळते. असा हा भारत महान संस्कृती असलेला देश आहे.

**प्रा. वर्षा विलास कावरे**

## थोडक्यात महत्त्वाचे...



### पटेल फार्मसीत गणेशोत्सवात स्पर्धा रंगतदार

**शिरपूर :** आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात आयोजित गणेशोत्सवात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी घेऊन वारी, वारकरी आणि पंढरीचा विठुराया अशा पारंपरिक मखराच्या नेपथ्यात गणरायाची स्थापना केली. प्राचार्य डॉ. संजय सुराणा, प्राचार्य डॉ. नितीन हासवानी, उपप्राचार्य डॉ. अतुल शिरखेडकर आदींनी भविष्यात अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असे स्पष्ट केले. उत्सवात विद्यार्थ्यांसाठी गायन, वादविवाद, वक्तृत्व, चित्रकला, रांगोळी, रिल मेकिंग, मंगळागौर अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. फार्मसी प्रॅक्टिस विभागातर्फे नेत्रदान विषयावर समाज जागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले. शेवटच्या दिवशी विजेत्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. मनोजसिंग गिरासे, डॉ. आशिष गोरले, डॉ. सौरभ खडसे, रजिस्ट्रार जितेश जाधव, सांस्कृतिक प्रमुख प्रा. कमलेश माळी, डॉ. मोनिका ओला, प्रा. राहुल सरोदे, प्रा. योगेश सोनार, प्रा. सविता मदान, प्रा. स्वाती रायसिंग, प्रा. सचिन पाटील, प्रा. अतुल पाटील, प्रा. हर्षल पाटील, प्रा. अमोल पाटील, प्रा. रोशनी पाटील, प्रा. हर्षदा पाटील, प्रा. रुचिरा गजभये, प्रा. सोनाली शंभरकर, प्रा. मेघा जाधव, प्रा. प्रतीक्षा मारवडकर, प्रा. वैभव चोपडे, प्रा. दुर्गेश्वरी कलाल आदींनी प्रयत्न केले.



### समस्त ब्राह्मण पंचतर्फे वंदू भक्तिगीतांचा कार्यक्रम

**नंदुरबार :** येथील समस्त ब्राह्मण पंचतर्फे गणेशोत्सवानिमित्त समाजातील कलाकारांनी बसवलेला वंदू श्रीगणेशा हा भक्तिगीतांचा उत्साहात झाला. प्रमुख पाहुणे म्हणून वेदशास्त्री मधुकर जोशी उपसथित होते. समस्त ब्राह्मण पंचमंडळाचे अध्यक्ष पंकज पाठक यांनी प्रास्ताविकात कार्यक्रम आयोजनामागील भूमिका मांडली. मधुकर जोशी यांनी श्रीगणेश ही विद्या कला याची देवता आहे व गायन-वादन नृत्याने परमेश्वर नक्कीच प्रसन्न होतो. त्यामुळे असे उपक्रम नियमितपणे श्रीगणेशासमोर आयोजित करत राहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमात कस्तुरी दीक्षित, भार्गवी शास्त्री, विहान कुलकर्णी, स्वरा अग्निहोत्री, वरद व्यास, महेश भट, प्रसाद दीक्षित, भाविषा खेडकर, शलाका रोकडे-महाजन, प्रतिभा कुलकर्णी, रश्मीकांत त्रिवेदी, श्रीराम दाऊतखाने आदींनी एकाहून एक सुंदर गायन सादर केले. कलाकारांना तबल्यावर वरद व्यास, सारंग बुवा, प्रसाद दीक्षित यांनी, तर हार्मोनियमवर प्रसन्न दाऊतखाने, रश्मीकांत त्रिवेदी, दीपाली रोकडे, भाविशा कुलकर्णी, श्रीराम दाऊतखाने यांनी साथसंगत केली. डॉ. जयंती नीरज देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.



### महिला महाविद्यालयातर्फे विसर्जनस्थळी स्वच्छता

**शिरपूर :** एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककतर्फे प्राचार्या डॉ. शारदा शितोळे यांच्या मार्गदर्शनात अरुणावती नदीपात्रात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यानिमित्त १२२ स्वयंसेविकांच्या माध्यमातून निर्माल्य गोळा करण्याची मोहीम राबविण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना गटप्रमुख कोमल पारधी व स्वयंसेविका नंदिनी पाटील, कल्याणी पाटील यांच्यासमवेत स्वयंसेविकांनी अरुणावती नदीपात्रातील विसर्जित गणेशमूर्तींसह निर्माल्याची पालिका घंटागाडीच्या माध्यमातून विल्हेवाट लावली. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. एम. वाडिले, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीषा चौधरी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी भास्कर खैरनार यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.



### शिरपूरला अरुणावती नदीपात्रात स्वच्छता मोहीम

**शिरपूर :** आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभागातर्फे प्राचार्य डॉ. दीपक बाविस्कर यांच्या मार्गदर्शनात अरुणावती नदीपात्रात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. गणपती विसर्जन उत्सवानिमित्त नदीपात्रात विखुरलेले निर्माल्य एकत्र करून स्वच्छता करण्यात आली. पर्यावरण संरक्षण व संवर्धन हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश होता. विद्यार्थी प्रतिनिधी पृथ्वीराज पवार व अश्विनी राजपूत यांच्यासह विद्यार्थ्यांनी मोहीम यशस्वी केली. उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी ईश्वर बोरसे, विद्यार्थी विकास विभाग सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. गजानन खेकाडे, वैभव जाधव, तुषार शिवणेकर यांच्या नियोजनाखाली विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

### श्रावणी विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम

**नंदुरबार :** श्रावणी येथील श्री डी आणि जी माध्यमिक विद्यालयात शिक्षक



दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थी आयुष्य कोकणी, विशाल वसावे, कल्याणी वसावे, राखी कोकणी, प्रांजल कोकणी, आरती कोकणी, अप्सरा कोकणी, प्राची कोकणी, पूनम कोकणी व नयना कोकणी यांनी शिक्षकांची भूमिका साकारून अध्यापनाचे काम पाहिले. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार मुख्याध्यापक प्रभाकर नांद्रे यांच्या हस्ते उपशिक्षक तुषार बच्छाव यांना मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ व पेन देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी उपशिक्षक विजय येवले, अनिता बोरसे, नीलेश पाटील, जगदीश कोकणी, गोरख पवार यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी शिक्षक आयुष्य कोकणीने सूत्रसंचालन केले. प्रांजल कोकणी यांनी आभार मानले.

### शिरपूरला कुंभार समाजातर्फे उद्या गुणगौरव सोहळा

**धुळे :** शिरपूर तालुक्यातील संत श्री गोरोबाकाका कुंभार समाज विकास प्रजापती व शैक्षणिक संस्थेतर्फे रविवारी (७ सप्टेंबर) कुंभार समाज कौटुंबिक स्नेहसंमेलन मेळावा, समाजभूषण, जीवनगौरव, आदर्श माता, विद्युत चाकांचे वाटप तसेच विद्यार्थी गुणगौरव सोहळा होणार आहे, शिरपूर येथील वाघाडी रस्त्यावरील विठ्ठल लॉन्सवर रविवारी (७ सप्टेंबर) सकाळी दहाला तालुका कुंभार समाजातर्फे दहावी, बारावी व इतर परीक्षांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव व कौटुंबिक स्नेहसंमेलन होईल. कार्यक्रमाचे उद्घाटक माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल असतील. कुंभार समाज सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतीश दरेकर अध्यक्षस्थानी असतील. इलेक्ट्रिक चाकांचे वाटप आमदार काशिराम पावरा व भाजपचे वर्धा येथील नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष संजय गाते यांच्या हस्ते होईल. प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, शिरपूरचे माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, ज्येष्ठ नेते सुभाष कुलकर्णी, राजेंद्र देवरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तुषार रंधे, भाजप ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष श्यामकांत ईशी, शिरपूर बाजार समितीचे सभापती के. डी.पाटील, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष राहुल रंधे, दिलीप खांडेकर आदी उपस्थित राहतील. कार्यक्रमाला कुंभार बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक व शिरपूर तालुकाध्यक्ष गोकुळ कुंभार, विश्वास कुंभार, शिवदास कुंभार, जिल्हा युवाध्यक्ष भूषण कुंभार यांनी केले आहे.

# अक्कलकुव्यात काँग्रेसला खिंडार; ७५ कार्यकर्ते भाजपमध्ये

## खापर शहराध्यक्षांसह ग्रामपंचायत सदस्यांचा समावेश; प्रदेश महामंत्री विजय चौधरींकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ५ सप्टेंबर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवीत भाजपमध्ये शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश होत असून, शुक्रवारी (५ सप्टेंबर) भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांच्या हस्ते अक्कलकुवा तालुक्यातील काँग्रेसचे खापर येथील शहराध्यक्ष कांतिलाल पाडवी, ग्रामपंचायतीच्या सदस्या अरुणा पाडवी, वासुदेव पाडवी, तसेच कवली, सोजडान व राजमोही या गावांतील शेकडो काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

भाजपच्या विजयपर्व या जिल्हा कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यास जिल्हाध्यक्ष नीलेश माळी, आमदार राजेश पाडवी, जिल्हा सरचिटणीस सदानंद रघुवंशी, कैलास चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष विनोद कामे, शहराध्यक्ष नरेश कांकरिया, भीमसिंग राजपूत, अक्कलकुवा तालुकाध्यक्ष नितेश पाडवी, मंदार चौधरी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी विजय चौधरी यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण यांच्या विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण भाजपमध्ये आला आहात, त्याबद्दल मी तुमचे स्वागत करतो. राज्यातील जनतेला खऱ्या अर्थाने न्याय देणारा कुठला पक्ष असेल, तर तो भाजप आहे.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकांमध्ये भाजप शतप्रतिशत जिंकणार असून, जनतेलाही भाजपच्या कार्यकर्त्यांप्रति आदर निर्माण झाला आहे. भाजपचा कार्यकर्ता सतत कार्यशील असून, एक संकट सोबती म्हणून नेहमीच मदतीचा असल्याने आपण काळजी करू नका. जिल्ह्याचा सर्वांगीण विकासासाठी आपण भाजपमध्ये आला आहात, याबद्दल विजय चौधरी यांनी पक्षप्रवेश करणाऱ्या काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी ७५ कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

भाजपमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून सतत पक्षप्रवेश होत असून, हा विषय जिल्हाभर सध्या चर्चेत आला आहे. विरोधी पक्षांनीही यामुळे धसका घेतला आहे.

# सातपायरी घाटात दरड कोसळली; रस्ता बंद

## पर्यटकांना तोरणमाळ येथे न जाण्याचे प्रशासनाकडून आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ५ सप्टेंबर**

महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ येथे पावसाळ्यात निसर्गसौंदर्यात वाढ होऊन पर्यटकांची गर्दी वाढत असताना, शुक्रवारी (५ सप्टेंबर पहाटे सातपायरी घाटातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दरड कोसळल्याने तोरणमाळचा रस्ता बंद झाला आहे. रस्ता बंद झाल्याने पर्यटकांच्या आनंदाला विरजण आले असून रस्ता लवकरच मोकळा करण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे. रस्ता अवरुद्ध झाल्याने तूर्तास पर्यटकांनी तोरणमाळकडे जाऊ नये, असे प्रशासनाने म्हटले आहे.



यंदा पुरेशा प्रमाणात पाऊस झाल्याने तोरणमाळ या पर्यटनस्थळाचे निसर्गसौंदर्य उजळून निघाले आहे. येथील प्रत्येक स्थळ प्रेक्षणीय ठरत आहे. वातावरण नयनरम्य झाले असल्याने दिवसागणिक येथे पर्यटकांची गर्दी वाढत आहे. महाराष्ट्रासह जवळच्या मध्य प्रदेश व गुजरात राज्यातील पर्यटकही येथे हजेरी लावू लागले आहेत. दुचाकी, चारचाकी वाहनांनी येथे पर्यटक येत आहेत.

परिसरात गत काही काळापासून रोज पावसाची रिपरिप सुरू असून, काही वेळा पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. परिणामी काही प्रमाणात तोरणमाळच्या रस्त्यावर दगड-धोंडे पडण्याच्या घटना घडत असतात. मात्र, प्रशासनामार्फत ते तातडीने हटवून रस्ता मोकळा केला जातो. मात्र, गेल्या दोन ते तीन दिवसांपासून या भागात मुसळधार पाऊस कोसळत असल्याने दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढले आहे. गुरुवारी (४ सप्टेंबर) झालेल्या जोरदार पावसाने सातपायरी घाटाच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दरड कोसळली आहे. परिणामी तोरणमाळचा रस्ता अवरुद्ध झाला आहे. पाऊस जास्त असल्याने आणखी दरडी कोसळण्याची शक्यता आहे. रस्ता अवरुद्ध झाल्याने तूर्तास पर्यटकांनी तोरणामाळकडे जाऊ नये, असा इशारा देण्यात आला आहे.

धडगाव येथील तहसीलदारांनी दिलेल्या माहितीनुसार, तातडीने जेसीबी यंत्रणा घटनास्थळी रवाना करण्यात आली आहे. दरड हटवून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न प्रशासनाकडून सुरू आहेत. मात्र, पावसाचा जोर कायम असल्याने कामात अडथळे येत आहेत. रस्ता मोकळा झाल्यानंतरच पर्यटकांनी तोरणमाळकडे जावे, असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.



# शहाद्यात नऊ दिवसांच्या श्री गणरायाला निरोप!

## १४ सार्वजनिक, २१ खासगी मंडळांच्या मिरवणुका उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ५ सप्टेंबर**

शहरात मंगळवारी ढोल-ताशांच्या गजरात गुलालाची उधळण करीत तिसऱ्या टप्प्यात नऊ दिवसांच्या श्री गणरायास उत्साहात निरोप देण्यात आला. दुपारपासूनच श्रीमूर्ती विसर्जन मिरवणुका सुरू निघाल्या होत्या. १४ सार्वजनिक, तर २१ खासगी अशा सुमारे ३५ श्री गणेश मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेतला. गणेशभक्तांमध्ये कमालीचा उत्साह दिसून आला. रात्री उशिरापर्यंत मिरवणूक शांततेत सुरू होत्या.

सायंकाळपासूनच पावसाची रिपरिप सुरू झाली असली, तरी गणेशभक्तांच्या उत्साहाला कमी आलेली नव्हती. मिरवणूक रस्त्यांवर गुलालाचा चिखल साचला होता. गणेश मंडळांची संख्या बघता पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला होता. शहरातील भवानी गणेश मित्रमंडळ, जय शिवाजी गणेश मित्रमंडळ, संत सेना गणेश मित्रमंडळ, चौधरी गणेश मित्रमंडळ, शिव ग्रुप गणेश मित्रमंडळ, सिंधी राजा गणेश मित्रमंडळ, जय श्रीराम ग्रुप गणेश मित्रमंडळ, श्री राम राम गणेश मित्रमंडळ, हिंदुहृदयसम्राट गणेश मित्रमंडळ, श्री राम शैक्षणिक क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, राम राम गणेश मित्रमंडळ, नव यवक मित्रमंडळ यांनी मिरवणुकीत सहभाग घेतला.

जामा मशीद चौकात उपविभागीय पोलिस अधिकारी दत्ता पवार, तहसीलदार दीपक गिरासे, पोलिस निरीक्षक नीलेश देसले, राजन मोरे, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण सोनवणे, उपनिरीक्षक प्रदीप राजपूत, भूमेश मराठे, मुख्याधिकारी साजीद पिंजारी, शांतता समिती सदस्य उपस्थित होते. यंदा भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. मकरंद पाटील, बाजार समितीचे सभापती अभिजित पाटील, डॉ. कांतिलाल टाटिया, भाजप शहराध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी, उद्योगपती श्याम जाधव यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यंदा मात्र मशिदीसमोर कोणतीही मिरवणूक रेंगाळली नाही. प्रत्येक मिरवणूक मशिदीसमोरून शांततेने निघाली.शहरात नवव्या दिवशी म्हणजे अनंत चतुर्दशीच्या दिवशीही शेवटच्या चौथ्या टप्प्यात गणेश विसर्जन मिरवणुका निघणार आहेत.

### पालिकेतर्फे स्वच्छता

महात्मा गांधी पुतळा परिसर ते जामा मशिदीदरम्यान रस्त्यावर गुलालाचे थर साचले होते. त्यात पाऊस पडल्याने गुलालाचा चिखल झाला होता. दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच पालिकेच्या स्वच्छता विभागामार्फत स्वच्छता मोहीम राबविण्यास सुरुवात झाली होती. फावड्यांच्या सहाय्याने गुलालाचा चिखल गोळा करावा लागत होता. दुपारपर्यंत रस्ते धुण्याचे काम सुरू होते, तर लहान गणेशमूर्ती विसर्जनाच्या कृत्रिम तलावांचीही सफाई करण्यात येत होती.

# नंदुरबारमध्ये आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण

## नगरपालिका, महानगरपालिका शिक्षक संघातर्फे कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ५ सप्टेंबर**

नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाच्या जिल्हा शाखेतर्फे जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात झाला.

नंदुरबार पालिकेचे मुख्याधिकारी राहुल वाघ अध्यक्षस्थानी होते. पालिका प्रशासन अधिकारी भावेश सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून राज्य संघटक करणसिंग चव्हाण, नाशिक विभागीय कार्याध्यक्ष शिरीष पवार, नाशिक विभाग उपाध्यक्ष जमील मोमीन, केंद्रप्रमुख रणजित नाईक उपस्थित होते. प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.



भावेश सोनवणे यांनी हिऱ्यांतून हिरे निवडणे हे जिकिरीचे कार्य असल्याचे सांगितले. मुख्याधिकारी राहुल वाघ यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत दोनअंकी पटसंख्या असलेल्या शाळा तीनअंकी शाळेत आणणारे शिक्षक खरोखर कौतुकास पात्र आहेत. राष्ट्रनिर्माण आणि ज्ञानदानाचे पवित्र कार्य शिक्षक करीत असतात. त्यांना प्रेरणा पुरस्काराच्या स्वरूपात मिळत असते, असे सांगितले.

कार्यक्रमाला जिल्ह्यातील पदाधिकारी सचिव मयूरकुमार सूर्यवंशी, संजोगता वसावे, शगुफ़्ता खान, लिलेश गोसावी, संतोषकुमार सदाराव उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष सचिन आव्हाड यांनी प्रास्ताविक केले. संघटना तीन वर्षांपासून संबंधित उपक्रम राबवीत असून, कुठलाही प्रस्ताव न मागवता संघाद्वारे गठीत समिती आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी शिक्षकांची निवड करत असते. मुख्याधिकारी राहुल वाघ, प्रशासन अधिकारी भावेश सोनवणे व मान्यवरांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार वितरित करण्यात आले. संतोषकुमार सदाराव यांनी सूत्रसंचालन केले. मयूरकुमार सूर्यवंशी यांनी आभार मानले.

### असे आहेत पुरस्कारार्थी

नगरपालिका प्राथमिक शाळा क्रमांक ७ च्या उर्दू माध्यमातून काझी मुद्दस्सीर जईम अहमद यांना, मराठी माध्यमातून मनीषा काशिनाथ धनगर, नंदुरबार यांना तर गुजराती माध्यमातून नगरपालिका प्राथमिक शाळा क्रमांक ३चे प्रभारी मुख्याध्यापक फिलीप अर्जुनभाई मावची यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# गणित अध्यापक मंडळातर्फे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



सुनीता वाघ | वैशाली शिंदे | राहुल इंदवे | सतीश पाटील | सुनील चित्ते | चेतन पाटील | दीपक शेंडे

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ५ सप्टेंबर**

महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळ संचलित नंदुरबार जिल्हा गणित अध्यापक मंडळातर्फे नुकतेच जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आले.

जिल्हा गणित अध्यापक मंडळामार्फत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून जिल्ह्यातील सहाही तालुक्यांतून प्रत्येकी एक शिक्षक व शहादा शहर येथून एक शिक्षक, असे सात जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार, उच्च शैक्षणिक अर्हता, पुस्तक प्रकाशन, लेख प्रकाशन, तज्ज्ञ मार्गदर्शक, विज्ञान प्रदर्शन सहभाग, प्राप्त शासकीय निमशासकीय पुरस्कार, विद्या प्राधिकरण (पुणे) योगदान, अध्यापन विषयात विद्यार्थ्यांचे यश, गणित संबोध परीक्षा प्रविष्ट विद्यार्थी या नऊ निकषांवर आधारित मुलाखती घेऊन पारदर्शक पद्धतीने निवड समिती अध्यक्ष तथा जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे जिल्हाध्यक्ष योगेशकुमार गवते, शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. संजय शिंदे, महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक डॉ. उमेश शिंदे, नंदुरबार जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे सचिव दिलीप पाटील, सदस्य फरहान शेख आदींनी जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारार्थींची निवड केली.

शिक्षक दिनानिमित्त जाहीर झालेला हा पुरस्कार सोहळा लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार असून, पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात येईल. जिल्ह्यातील शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करणारा हा उपक्रम इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास जिल्हा गणित अध्यापक मंडळाने व्यक्त केला आहे.

**असे आहेत पुरस्कारार्थी**

पुरस्कारासाठी नंदुरबार तालुक्यातून डॉ. वैशाली शांताराम शिंदे (कमला नेहरू कन्या विद्यालय, नंदुरबार), नवापूर तालुक्यातून राहुल पंडित इंदवे (अनुदानित आदर्श माध्यमिक आश्रमशाळा, दापूर), शहादा शहरातून सतीश गणेश पाटील (शेठ व्ही. के. शाह विद्यामंदिर, शहादा), शहादा तालुक्यातून सुनीता सुरेश वाघ (श्रीमती लाडकोरबाई प्राथमिक व माध्यमिक विद्यामंदिर, कुकडेल), धडगाव तालुक्यातून सुनील शिवलाल चित्ते (जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा, जुने धडगाव), तळोदा तालुक्यातून डॉ. दीपक अंबालाल शेंडे (दुधाबाई पाडवी माध्यमिक विद्यालय, सोमावल बुद्रुक), तर अक्कलकुवा तालुक्यातून चेतन रमेश पाटील (श्री सातपुडा वैभव विद्यालय, वाण्याविहीर) यांची निवड करण्यात आली.



### रघुवंशी मित्रमंडळातर्फे गणेश मंडळांचा सत्कार

**नंदुरबार :** शहरात श्रींच्या विसर्जन मिरवणुकांमध्येसहभागी झालेल्या गणेश मंडळ व व्यायामशाळेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कार्याध्यक्ष व कार्यकर्ते तसेच गणेशभक्तांचा सत्कार शिवसेनेचे संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशी मित्रमंडळ, राम रहिम उत्सव समितीतर्फे करण्यात आला. गणपती मंदिर चौकात मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती. आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिवलाल सोनार यांच्या पालखीच्या मानाच्या गणपतीची आमदार रघुवंशी यांनी पूजाअर्चा करीत मंडळ पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. आमदार रघुवंशी यांनी ढोल-ताशांच्या ठेक्यावर नृत्य केल्याचे पाहायला मिळाले. या वेळी माजी उपनगराध्यक्ष कुणाल वसावे, माजी सभापती कैलास पाटील, माजी नगरसेवक गजेंद्र शिंपी आदी उपस्थित होते.



### महाराणा प्रतापसिंह गणेश युवक मंडळातर्फे रक्तदान

**नंदुरबार :** श्री महाराणा प्रतापसिंह गणेश युवक मंडळातर्फे आयोजित व मोहित मदन राजपूत यांच्या स्मरणार्थ शिबिरात ५१ जणांनी रक्तदान करून सामाजिक चळवळीत हातभार लावला. त्यामुळे राजपूत समाजबांधवांचे कौतुक होत आहे.

मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मोहिनीराज राजपूत, गणेश मंडळाचे अध्यक्ष पवन दिनेश राजपूत, जनकल्याण ब्लड सेंटरचे किशोर तांबोळी, रणजित राजपूत यांच्या परिश्रमाने आयोजित शिबिरात ५१ जणांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे मंडळातर्फे प्रथमच रक्तदान शिबिर घेण्यात आले. जनकल्याण ब्लड सेंटरतर्फे वर्षभरासाठी एक लाखाचा अपघाती विमा काढण्यात येणार आहे. शिबिरामध्ये भरपावसात राजपूत समाजाच्या कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. तसेच अन्य समाजबांधवांनीही रक्तदान केले. उपाध्यक्ष सुदर्शन राजपूत, उपेंद्र राजपूत, हंसराज मोहिनीराज राजपूत, सचिव प्रकाश राजपूत, खजिनदार सुधीर राजपूत, सदस्य सुनील चिंधू राजपूत, मनोज राजपूत, उपेंद्र राजपूत, राजेंद्र राजपूत, दर्शन राजपूत, योगेश राजपूत, चैतन्य राजपूत, नितीन राजपूत आदींनी परिश्रम घेतले. रक्तदात्यांचे संस्थापक अध्यक्ष मोहिनीराज राजपूत व पवन राजपूत यांनी आभार मानले. पदाधिकारी व रक्तदात्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. तेजस पाटील, रामचंद्र कोळी, अफजल पठाण, बैसाणे, कमलेश राजपूत आदींनी रक्तदान केले.

# नंदुरबार येथील झुलेलाल साई मंदिरात पोलिस अधीक्षकांच्या हस्ते महाआरती

**नंदुरबार :** शहरातील जुनी सिंधी कॉलनी परिसरातील झुलेलाल साई मंदिरात पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. कार्यक्रमात छप्पन भोग व महाप्रसाद वितरणासह दात्यांचा लकी ड्रॉ काढण्यात आला.

याप्रसंगी मंदिराचे पुरोहित गौतमभाई ठाकूर, मंदिर समितीचे अध्यक्ष श्यामलाल चंचलानी यांनी पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस यांचा सत्कार केला. सिंधी समाज लाल साई ग्रुपतर्फे स्थापित करण्यात आलेल्या झुलेलाल साई स्वरूपातील आकर्षक गणेशमूर्तीचे पूजन आणि आरती श्रवण दत्त एस यांनी केली. गणेशोत्सवानिमित्त आयोजित छप्पन भोग व महाप्रसाद वितरण दात्यांचा लकी ड्रॉ पोलिस अधीक्षकांच्या हस्ते काढण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष गिरीश अशोककुमार नाथानी यांच्या हस्ते पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस यांचा साई मूर्ती आणि शाल, श्रीफळ भेट देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी उपनगर पोलिस ठाण्याचे निरीक्षक किरणकुमार खेडकर, राज्य कर्मचारी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष रणजितसिंग राजपूत, बालाजी फाउंडेशनचे अध्यक्ष राजकुमार खानवाणी व मान्यवरांचा श्री लाल साई ग्रुपतर्फे सन्मान करण्यात आला. पुरोहित राम शर्मा यांनी सूत्रसंचालन



केले. संदीप काकुस्ते यांनी प्रास्ताविक केले. लाल साई ग्रुपचे उपाध्यक्ष सुंदर मुकेशकुमार नाथानी, राहुल साधानी, ओम भक्त्यापुरी, पीयूष कुकरेजा, सोनी वीरवाणी, दौलत वाधेवा यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यक्रमास संजीव पाटील, संजय नाथांनी, मुकेश पोपटानी, अनमोल मंगलानी, जतीन सीतपाल, विशाल नाथानी, राजा गुरुबक्षानी, गिरीश नंदवानी, दिनेश खटवानी, मुकेश कुकरेजा, विजय दावांनी, राजेश छाबडा, हरेश मोटवानी, तसेच महिला पदाधिकारी हेमांशी वाधेवा, रेश्मा नाथानी, अनिता साधानी, दिशा चंचलानी, भूमी नंदवानी, प्राची करड़ा, तान्या चंचलानी यांच्यासह सिंधी समाज बांधव उपस्थित होते.

### नगाव येथील गंगामाई इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला अतिउत्तम मानांकन

**धुळे :** गंगामाई इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे २०२४-२५ वर्षासाठी बाह्य संस्था आवेक्षणात मअतिउत्तम मानांकन प्राप्त झाले आहे. संस्थेच्या शैक्षणिक दर्जा, पायाभूत सुविधा, संशोधन कार्य तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेऊन हे मानांकन देण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष आमदार राघवेंद्र भदाणे, सचिव मनोहर भदाणे, उपाध्यक्षा ज्ञानज्योती भदाणे यांनी सांगितले की, संस्थेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधनाची संधी आणि औषधनिर्माण क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाची ओळख करून देणे हा आहे. प्राचार्य एस. व्ही. चोरडिया यांनी मानांकनाचे श्रेय शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकांच्या एकत्रित परिश्रमांना दिले.



आपलं महानगर

महाराष्ट्र शासन, राज्य कौशल्य,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (MSBSVET) मान्यताप्राप्त
Skill India
आयटीआय ट्रेड कोर्सेसला प्रवेश सुरु आहे.
इलेक्ट्रीशियन कालावधी-२ वर्ष
कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (स्थापत्य अभियंता सहाय्यक) कालावधी-१ वर्ष
• गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर रजिस्ट्रेशन व लायसन्स काढता येते.
DMLT कालावधी-२ वर्ष
डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन
DMLT चे महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिलला रजीस्ट्रेशन होते.
• केंद्र शासनाची अप्रेन्टीसशिप (Apprenticeship) लागू (Govt. of India)
अभिनव टेक्नीकल इन्स्टिट्युट रेल्वे स्टेशन जवळ, ZP रोड, वाचनालय समोर, जळगांव मो.-9423488174, 7040416582

## महत्त्वाचे

### ड्यूटीवर निघालेली तरुणी बेपत्ता

**जळगाव :** ड्यूटीकामी तसेच रिडींग कामासाठी जात आहे,असे सांगुन घराबाहेर पडलेली २२ वर्षीय तरुणी एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील गावातून गुरुवारी ( ४ सप्टेंबर) सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास बेपत्ता झाली. कुटुंबियांनी शोध घेतला असता तपास लागला नाही. या प्रकरणी तक्रारीनुसार पोलिसात मिसिंग दाखल करण्यात आली. सहायक फौजदार अधिकार पाटील हे तपास करीत आहेत.

### घराबाहेर पडलेली मुलगी बेपत्ता

**जळगाव :** घराजवळील मंदिरात जावुन येते,असे कुटुंबियांना सांगुन घराबाहेर पडलेली १९ वर्षीय मुलगी बेपत्ता झाली. बुधवारी (३ सप्टेंबर) सकाळी नऊ वाजेच्या सुमारास ही घटना शहरात एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. बराच उशिरापर्यत मुलगी घरी परतली नाही. कुटुंबातील सदस्यांनी सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. या प्रकरणी तक्रारीनुसार गुरुवारी (४ सप्टेंबर) एमआयडीसी पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आली. पोलीस नाईक हेमंत जाधव तपास करीत आहेत.

### बेशुध्दावस्थेतील तरुणाचा मृत्यू

**जळगाव :** ३५ वर्षीय तरुण उम शाला शिवारात जंगलात पडलेल्या अवस्थेत बुधवार ( ३ सप्टेंबर) सकाळी ११.५५ वाजता मिळुन आले होते. नातेवाईकाने त्याना अत्यवस्थ अवस्थेत दाखल केले असता तपासणीअंती डॉक्टरांनी मृत घोषीत केले. सरदार जगन पवार (वय ३५,रा.देव्हारी,ता.जळगाव) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. पोलीस नाईक पंकज पाटील हे तपास करीत आहेत.

### रिपरिपने दिवसाची सुरुवात

**जळगाव :** शुक्रवार (५ सप्टेंबर) सकाळ रिपरिप पावसाने सुरुवात झाली.दिवसभर उघड-झाप असे दिवसभर पावसाचे शहरात वातावरण राहिले. दुपारी काही वेळपर्यत पावसाने विश्रांती घेतली. परंतु पुन्हा पावसाने सुरुवात केली. कमी अधिक असा सतत पावसाने हजेरी सुरुच ठेवली होती. रात्री आठवाजेपर्यत पावसाचा जोर कायम राहिला. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. व्यवसायावरही परिणाम दिसुन आला.

### भगीरथ शाळेत शिक्षक दिन

**जळगाव :** कै.सुनिता जगन्नाथ वाणी भगीरथ इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थी-शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी इयत्ता १० वी चे एकूण ७५ विद्यार्थी यांनी शिक्षकाची भूमिका बजावली शाळेतील विद्यार्थी मुख्याध्यापिका दिपाली गोरख इंगळे, उपमुख्याध्यापिका म्हणून अनुष्का चंद्रशेखर शिंपी, पर्यवेक्षक मयुरी संदीप कोळी यांनी भूमिका निभावली.डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. सूत्रसंचलन देवयानी बोरसे व ख़ुशी निकम यांनी केले. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक एस.पी.निकम, उपमुख्याध्यापक जे.एस.चौधरी, पर्यवेक्षक के.आर. पाटील, जेष्ठ शिक्षक एस.डी.भिरूड, के.पी.पाटील, ए.ए.पाटील, टी.टी. चौधरी, एस.व्हि.मोराणकर, ए.एस. कोठावदे यांनी मार्गदर्शन केले.

### भगीरथ शाळेत शिक्षक दिन

**जळगाव :** स्वा. सै. ज .सु. खडके प्राथमिक विद्या मंदिर शिक्षक कृतज्ञता समारंभ शाळेचे मुख्याध्यापक संजय पाटील यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. सूत्रसंचालन संस्कृती सोनवणे या विद्यार्थि शिक्षिकेने केले. तर अनुपा परिवार हिने आभार व्यक्त केले.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९


अंकासाठी संपर्क
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९८३४७४५४२२
९६२३६०४७१२

# खग्रास चंद्रग्रहण दिसणार रविवारी : खगोलीय घटनेची मिळणार जळगावकरांना अनुभूती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

शहरासह जिल्हावासियांना रविवारी (७ सप्टेंबर) रात्री खग्रास चंद्रग्रहण ही अद्‌भूत खगोलीय घटना बघायला मिळणार आहे. ही खगोलीय घटना ५ तास २७ मिनिटे पाहण्याची जळगावकरांना अनुभूती मिळणार आहे.

शहरासह जिल्ह्यात रविवारी रात्री ८ वाजून ५८ मिनिटांनी ग्रहण सुरुवात होऊन ९ वाजून ५७ मिनिटांनी स्पर्श होईल, तर रात्री ११ वाजून ४२ मिनिटांनी चंद्र पृथ्वीच्या गडद सावलीच्या मध्यभागी येईल. सोमवारी (८ सप्टेंबर) मध्यरात्री १२ वाजून २३ मिनिटांनी चंद्राचा गडद सावलीतून विरळ सावलीत प्रवेश होऊन १ वाजून २६ मिनिटांनी चंद्रग्रहण






सुटण्यास सुरुवात होईल. तसेच २ वाजून २५ मिनिटांनी चंद्रग्रहण संपेल. रविवारी रात्रीचे खग्रास चंद्रगहणाचा कालावधी ५ तास २७ मिनिटे असेल, तसेच १ तास २३ मिनिटांच्या काळात चंद्र पृथ्वीच्या गडद छायेत असेल.

### १ तास २३ मिनिटे चंद्र पृथ्वीच्या गडद छायेत राहणार

सध्या पाऊस किंवा ढगाळ वातावरण असण्याची शक्यता आहे. वातावरण स्वच्छ असेल तर सर्वांनी कोणतेही समज-गैरसमज मनात न ठेवता चंद्रग्रहण या अद्‌भूत खगोलीय घटनेचा आनंद घ्यावा.
**- अमोघ जोशी (खगोल अभ्यासक, जळगाव)**

**चंद्रग्रहण होण्याची स्थिती**

चंद्राची पृथ्वीभोवती फिरण्याची कक्षा आणि





पृथ्वीची सूर्याभोवती फिरण्याची कक्षा (आयनिक वृत्त) यांच्यात ५ अंशांचा कोन आहे. चंद्राची कक्षा आयनिक वृत्ताला दोन ठिकाणी छेदते. त्यांना 'राहू' आणि 'केतू' असे म्हणतात. ज्या दिवशी पृथ्वी आणि सूर्य यांना जोडणाऱ्या रेषेवर राहू किंवा केतू हे बिंदू असताना तेथे चंद्र आला तर तो पृथ्वीच्या दाट सावलीत असल्याने खग्रास चंद्रग्रहण होते. अवकाशात पृथ्वीच्या गडद आणि विरळ अशा दोन सावल्या पडतात. चंद्राची कक्षा आणि आयनिक वृत्त यातील कोनामुळे प्रत्येक पौर्णिमेला चंद्र या बिंदूंवर असेलच असे नाही. कारण, हे दोन्ही बिंदू नियमित फिरत असल्याचे पाहावयास मिळते. ज्या वेळी तो या बिंदूंच्या जवळ वर किंवा खाली असतील, तर त्या वेळी चंद्र पृथ्वीच्या विरळ सावलीतून जातो. या खगोलीय घटनेला 'छायाकल्प चंद्रग्रहण' असे म्हटले जाते. ज्या वेळी तो या बिंदूंच्या किंचित वर किंवा खाली असतो, त्या वेळी चंद्राचा काही भागच दाट सावलीतून जातो, या वेळी खगोलीय घटनेला ग्रहणाला 'खंडग्रास चंद्रग्रहण' असे म्हटले जाते.






नंदनवन कॉलनी मित्र मंडळाची आकर्षक मूर्ती



भोईटेनगर सांस्कृतिक मित्र मंडळाचा विघ्नहर्ता



जय महाराष्ट्र मित्र मंडळाचा आकर्षक बाप्पा



जय गोविंदा मित्र मंडळाचे विलोभनीय गणराय



श्री गर्जना मंडळाचा विघ्नहर्ता

# लाडक्या बाप्पाचे आज विसर्जन

## मिरवणूक मार्गावर वाहनांना बंदी; फौजफाटा तैनात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

गत दहा दिवसांपासून घराघरात आणि सार्वजनिक मंडळांमध्ये विराजमान असलेल्या लाडक्या बाप्पाला शनिवारी ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला निरोप दिला जाणार आहे. विसर्जनाच्या पूर्वसंध्येला दिवसभर आणि सायंकाळी पावसामुळे भाविकांची गणपती पाहण्यासाठी तुरळक गर्दी दिसून आली.

विघ्नहर्ता गणरायाचे मोठ्या थाटामाटात आगमन झाले होते. घराघरात आणि शहरातील सार्वजनिक मंडळांमध्ये बाप्पाच्या आगमनाचा उत्साह होता. दहा दिवस बाप्पाची गीते आणि आरतीच्या आवाजाने वातावरण मंगलमय झाले होते. गत तीन दिवसात शहरातील गणेश मुर्ती दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. विसर्जनाच्या पूर्वसंध्येला अधिक गर्दी होईल या अनुषंगाने मंडळांनी गर्दी नियंत्रणाचे नियोजनही केले होते. मात्र शुक्रवारी सकाळपासूनच पावसाची रिपरिप सुरू झाली होती. सायंकाळच्या सुमारास पावसाने जोर धरल्यामुळे मंडळांमध्ये भाविकांची तुरळक गर्दी दिसून आली.

**नवीपेठेतील यात्रोत्सवावर परिणाम**

गणेशोत्सवानिमित्त नवीपेठेत यात्रा भरते. गत आठ दिवसात या परिसरात खाद्य पदार्थांसह विविध वस्तुंचे विक्रीचे स्टॉलवर भाविकांची गर्दी दिसून आली. शुक्रवारी मात्र पावसामुळे नवीपेठेतील स्टॉलवर एक-दोन ग्राहक दिसून आले. पावसाचा मोठा परिणाम या छोट्या व्यावसायिकांवर झाल्याचे दिसून आले.

**आज होणार विसर्जन**

लाडक्या बाप्पाला शनिवारी ६ रोजी निरोप दिला जाणार आहे. त्यानिमित्ताने विसर्जन मिरवणुकीसाठी मनपा प्रशासनासह पोलीस प्रशासनाने नियोजन केले आहे. शहरातील आठवडे बाजार शनिवारी बंद राहणार असून वाहनांना बंदी करण्यात आली आहे.

सात ठिकाणी मुर्ती संकलन केंद्र

जळगाव महानगरपालिकेने शहरात सात ठिकाणी गणेश मूर्ती संकलनाची केंद्र तयार केले आहेत. यात महानगरपालिका लाठी शाळा पंचमुखी हनुमान मंदिराजवळ, मनपा पांजरा पोळ शाळा जुने जळगाव, सागर पार्क, पिंप्राळा निमडी शाळा, निमखेडी गट नंबर १०१ येथील पाण्याची उंच टाकी, नाभिक समाज सभागृह शिवाजीनगर, श्री साईबाबा मंदिर मेहरूण येथे मुर्ती संकलित करण्यात येणार आहे.

**४५ जणांचे पथक**

महानगरपालिकेने गणेश घाट येथे घरगुती मूर्ती व लहान मूर्ती विसर्जनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे या ठिकाणी एक जीव रक्षक बोट, ४५ व्यक्तींचे पथक, ५ लाकडी तराफ`, प्रकाश व्यवस्था व बारागेटिंग व्यवस्था केलेली आहे. मेहरूण तलाव येथे मोठ्या मूर्ती विसर्जनासाठी सेंट टेरेसा हायस्कूल पासून पुढे तलावाच्या काठावर व्यवस्था उभारण्यात आलेली आहे. या ठिकाणी ५ तराफे, ४ क्रेन, २ राखीव क्रेन, ४५ कामगारांचे पथक, प्रकाश व्यवस्था केलेली आहे.





जळगाव : दै. 'तरुण भारत'च्या लाडक्या बाप्पाच्या आरतीप्रसंगी उपस्थित जळगाव जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने, बॉक्स हेल्प फाउंडेशनच्या संचालिका सुधा काबरा, सोबत सर्जना मीडिया सोल्युशन प्रा. लि.चे कार्यकारी संचालक रवींद्र लढ्ढा, प्रकल्प सहप्रमुख संजय नारखेडे, संपादक चंद्रशेखर जोशी, विपणन व्यवस्थापक मनोज बोरसे.



# जिल्हास्तरीय वुशू स्पर्धा जळगावात उत्साहात

## १० तालुक्यांतील २०० मुलामुलींचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरलेली पहिली जिल्हास्तरीय वुशू स्पर्धा श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात पार पडली. स्पर्धेत जिल्ह्यातील १० तालुक्यांतील सुमारे २०० मुले-मुलींनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्‌घाटन विजया केसरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अविनाश पाटील-जाधव यांच्या हस्ते झाले. वुशू स्पोर्ट्स असोसिएशनच्या अध्यक्षा दीपाली पाटील अध्यक्षस्थानी होत्या. याप्रसंगी तुळजाई फाउंडेशनचे अध्यक्ष तथा भाजपचे पदाधिकारी भूषण लाडवंजारी, धरणगाव येथील क. वा. वि. महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक प्रा. दीपक पाटील, पिंप्री भोर येथील समाजसेवक भटूदादा देसले, रिफॉर्मेशन कपचे अध्यक्ष रेहान शेख, जिल्हा वुशू स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव दिनेश सोनवणे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

अविनाश पाटील- जाधव यांनी सांगितले की, ''वुशू हा खेळ आपल्या कुस्ती, बॉक्सिंग व किक बॉक्सिंग या खेळांचे मिश्रण असून, खेळाडूंनी या कलेत निपुण होऊन केवळ स्पर्धा जिंकण्यापुरते नव्हे, तर शिस्त, स्वसंरक्षण आणि संघभावना जोपासण्यासाठीही सहभाग घ्यावा.'' भविष्यात 'वुशू खेलो इंडिया' स्पर्धा आयोजित करण्यासाठी जिल्हा वुशू संघटनेला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. दीपाली पाटील यांनी वुशू खेळाचा इतिहास, नियम व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सद्यःस्थितीवर प्रकाश टाकला आणि अविनाश पाटील-जाधव यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. पंच म्हणून अतुल जाधव, भूपेश सपकाळे, रोहित पाटील, मोईन खाटीक, राजेश पाटील, प्रेम देवरे, मुकेश ठाकरे, प्रेरणा जाधव, मंगेश जाधव, दयानंद सोनवणे यांनी जबाबदारी पार पाडली.

**स्पर्धेचा निकाल**

टीम चॅम्पियन ट्रॉफी : जळगाव संघ (१६ सुवर्ण, २ रौप्य), द्वितीय : चाळीसगाव संघ (१० सुवर्ण, २ रौप्य), तृतीय : भुसावळ संघ (८ सुवर्ण, ४ रौप्य).

# चौघांनी तरुणाला केली मारहाण

**जळगाव :** कामानिमित्त तरुण आला होता. तोंडाला रुमाल बांधुन आलेल्या अनोळखी चौघांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. एकाने लोखंडी पाईपाने मारहाण करुन दुखापत केली. बुधवारी (३ सप्टेंबर) सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास ही घटना आदर्शनगरातील दुय्यम निंबधक कार्यालयाच्या गेटसमोर घडली. या प्रकरणी गुरुवारी ( ४ सप्टेंबर) रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. उमेर सलिम पटेल (वय २५,रा.रजा कॉलनी) हा तरुण खताच्या खरेदी करण्याच्या कामासाठी आला होता. काही एक कारण नसताना तोंडाला रुमान बांधुन आलेले चौघे त्याच्याजवळ आले. शिवीगाळ करत त्यांनी तरुणाला मारहाण करण्यास सुरुवात केली. एकाने लोखंडी पाईपाने पायावर आणि डोक्यावर मारहाण केली. त्यानंतर तरुणाला जमिनीवर पाडत जिवे मारण्याची धमकी दिली. माहिती कळताच पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांनी घटनास्थळी धाव घेत प्रकार जाणून घेतला. हवालदार ज्ञानेश्वर पाटील हे तपास करीत आहेत.

# महाराणा प्रताप, स्वामी विवेकानंद मंडळाचा 'स्वदेशी अपनाओ'चा नारा



## माजी नगरसेवक कैलास सोनवणेंच्या संकल्पनेतून आत्मनिर्भर भारताचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

शहरातील कांचननगर परिसरातील महाराणा प्रताप मित्रमंडळ व श्री स्वामी विवेकानंद बहुद्देशीय मंडळातर्फे यंदा गणेशोत्सवानिमित्त राष्ट्रवाद जागृत करणारा 'स्वदेशी अपनाओ'चा नारा देण्यात आला आहे. माजी नगरसेवक कैलास सोनवणे व कल्पेश सोनवणे यांच्या संकल्पनेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत 'आत्मनिर्भर भारत'चा संदेश दिला जात आहे.

गणेशोत्सवानिमित्त शहरात गणेश मंडळांकडून यंदा विविध देखावे, आरास साकारण्यात आल्या आहेत. सामाजिक, पर्यावरणपूरक संदेश देण्याचा प्रयत्न मंडळांनी केला आहे. यात आगळेवेगळे ठरले आहे



ते कैलास सोनवणे यांचे महाराणा प्रताप मित्र मंडळ व श्री स्वामी विवेकानंद बहुद्देशीय मंडळ. या मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवादरम्यान दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये राष्ट्रवाद जागृत व्हावा यासाठी 'स्वदेशी अपनाओ, देश बचाओ, आत्मनिर्भर भारत' हा संदेश देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भलामोठा फलक मंडळाच्या दर्शनीभागात लावला आहे. या फलकाच्या माध्यमातून जळगावकरांमध्ये स्वदेशी वस्तू वापरासंबंधीची जनजागृती मंडळाकडून करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर मंडळामार्फत गणेशोत्सवाआधीच शहरात १५००० पॉम्पलेटचे वितरण करून 'स्वदेशी' चे महत्व पटवून देण्यात आले आहे. तसेच मंडळाने यंदा महादेवाच्या शिवलिंगाचा देखावा सादर करीत गणरायाची आकर्षक मुर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. माजी नगरसेवक सोनवणे यांच्या संकल्पनेविषयी भाविक देखिल फलक वाचून 'स्वदेशी अपनाओ'कडे पाऊल टाकत असल्याचे दिसून येत आहे.

# शिक्षक हाच खरा राष्ट्राचा आधारस्तंभ : प्रा. व. पु. होले

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

शिक्षक हा देशाचा आधारस्तंभ असून, आदर्श विद्यार्थी घडविणे हे प्रत्येक शिक्षकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन लेवा एज्युकेशनल युनियनचे सचिव तथा शिक्षणतज्ज्ञ प्रा. व. पु. होले यांनी केले. त्यांनी शिक्षकाची सामाजिक बांधिलकी, शिक्षक- विद्यार्थी नातेसंबंध, शिक्षण क्षेत्रातील सद्यःस्थिती, संशोधन क्षेत्रातील विकास, मूल्यसंस्कार या विषयांवर चर्चामंथ केले.

डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समितीतर्फे शिक्षक दिनानिमित्त शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांसाठी कृतज्ञता सन्मान सोहळा घेण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. व्ही. जे. पाटील अध्यक्षस्थानी होते. सत्कारमूर्ती म्हणून प्रा. व. पु. होले,

## बेंडाळे महाविद्यालयात कृतज्ञता सन्मान सोहळा



सहसचिव प्रा. एल. व्ही. बोरोले उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. सत्यजित साळवे यांनी प्रास्ताविकात काव्यमय शैलीत सन्मान सोहळा आयोजनाची भूमिका मांडली.

सुरुवातीला खरा तो एकची धर्म ही प्रार्थना संगीत विभागाच्या प्रा. ऐश्वर्या परदेशी यांनी सादर केली. शिक्षकेतर सहकारी जितू चिरमाडे यांनी संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त करून, शिक्षकांप्रति गौरवोद्‌गार काढले. प्रा. डॉ. स्मिता चौधरी यांनी, गुरू-शिष्य परंपरेचा उल्लेख करत आजची शिक्षण पद्धती व विद्यार्थी यावर भाष्य केले. प्रा. डॉ. संजय रणखांबे यांनी शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये, आचारसंहिता, गुणवत्ता, आधुनिक अध्यापन पद्धती, समाजातील शिक्षकाचे स्थान यावर मुक्तपणे चर्चा केली. प्रा. राजेश कोष्टी यांनी गुरुजी तुम्ही पुन्हा एकदा साने गुरुजी व्हाल का? ही कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

सत्कारमूर्ती संस्थेचे सहसचिव प्रा. एल. व्ही. बोरोले यांनी भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्यास अभिवादन करून, गुरू-शिष्य महिमा वर्णन केली. प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. जे. पाटील यांनी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी महाविद्यालयाचा कणा असून, शिक्षकांचे योगदान देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण आहे. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांनी सर्जनशील पद्धतीने ज्ञानार्जन करून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता प्रदान करा, असा संदेश दिला.

सोहळ्यात शिक्षकेतर सहकारी, प्राध्यापक बंधू-भगिनी, प्राचार्य, उपप्राचार्य, कुलसचिव, परीक्षा नियंत्रक, महाविद्यालय नॅक समन्वयक आदींचा सन्मान करण्यात आला. प्रा. दीपक पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. नयना पाटील यांनी आभार मानले.

॥ चौथे पुण्यस्मरण ॥



स्व. भास्कर वासुदेव ठोसर (सोनार)
स्वर्गवास ०६ सप्टेंबर २०२१
निराधाराचा आधार तुम्हीच बनविले,
श्रम करण्यास तुम्हीच दाखविले,
दुःख पचवण्यास तुम्हीच शिकविले,
तुमची आठवण क्षणोक्षणी येते..
चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त भावपूर्ण श्रध्दांजली....
* शोकाकुल *
गं.भा.यमुनाबाई भास्कर सोनार - पत्नी
श्री प्रदीप भास्कर सोनार - मुलगा
सौ .अश्विनी प्रदीप सोनार - सून
कु. कृष्णदेवराय प्रदीप सोनार - नातू
कुमारी मुक्ता प्रदीप सोनार - नात
समस्त ठोसर परिवार
मुक्ताईनगर जि. जळगाव
वा.व. - ३२२

## थोडक्यात महत्त्वाचे...



### शानभाग विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त स्पर्धा

**जळगाव :** येथील विवेकानंद प्रतिष्ठानच्या (कै.) श्रीमती ब. गो. शानभाग विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त आरतीसाठी पालक डॉ. सुधीर पाटील (वैद्यकीय विभाग), दीपाली पाटील, गजानन वाणी, सरला वाणी, दीपक पाटील (कॉन्ट्रॅक्टर), सुशील बनसोड, माधुरी बनसोड, जनार्दन पाटील, कविता पाटील आदी उपस्थित होते. मैथिली बंजारा, धनश्री महाजन यांनी सूत्रसंचालन केले.गणेशोत्सवनिमित्त लोकनृत्य तसेच डोळ्याला पट्टी बांधून सरळ रेषेत चालणे या पार पडल्या. यात ५ वी ते १० वीच्या ८३ स्पर्धकांनी सहभाग घेतला. लोकनृत्य स्पर्धेत कोळी नृत्य, गरबा, जोगवा, गोंधळ, पावरी नृत्य, धोलीडा, घुमार इत्यादी नृत्यांचे सादरीकरण झाले. यात प्रथम पारितोषिक - वेदांत पंडित, भावेश महाजन, तन्मय येवले, सोहम पाटील, अथर्व वराडे. द्वितीय पारितोषिक - यशवी पाटील, पूर्वा पाटील. तृतीय पारितोषिक - हर्षिता जनार्दन पाटील, हर्षिता चंद्रकांत पाटील तसेच डोळ्याला पट्टी बांधून सरळ रेषेत चालणे स्पर्धेत - प्रथम क्रमांक साक्षी चौधरी, द्वितीय - तेजल पारगावकर हे यशस्वी झाले. विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, संतुलन, शिस्त व आत्मविश्वास खेळातून आनंद हा या स्पर्धेचा हेतू होता. मुख्याध्यापक ज्ञानेश्वर पाटील यांनी मार्गदर्शन केले. स्पर्धा यशस्वितेसाठी विभागप्रमुख रुपाली पाटील, स्वप्नील पाटील यांनी परिश्रम घेतले.



### वाघनगरमधील विवेकानंद शाळेत गणेशोत्सव

**जळगाव :** वाघनगर परिसरातील विवेकानंद प्रतिष्ठान संचलित प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत गणेशोत्सव उत्साहात झाला. विद्यार्थ्यांच्या सहभागातून गणेशाची स्थापना करून विविध उपक्रम राबविण्यात आले. गणपती अथर्वशीर्ष पठण, रांगोळी, चित्रकला, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनविणे, नाट्यछटा, दागिने बनवणे, फ्री फायर कुकिंग अशा स्पर्धा पार पडल्या. यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धांमध्ये गणपती अथर्वशीर्ष पठणात आदित्य देशपांडे, साक्षी महाजन. रांगोळी स्पर्धेत स्वरा पाटील, कुमार देशमुख, रुचा शिंदे. टाकाऊपासून टिकाऊमध्ये अंशुमान जोशी, कृतिका पवार, मयूर जाधव, चित्रकला स्पर्धेत रिया सावंत, सिद्धेश लोखंडे, पूजा खडसे, नाट्यछटा व नाटिकेत प्रथम गट क्र. १ इयत्ता ७ वी, द्वितीय गट क्र. २ इयत्ता ६ वी, दागिने बनवणे स्पर्धेत सोनाली चौधरी, कावेरी पाटील, फ्री फायर कुकिंगमध्ये राहुल मोरे, विनया भोसले आदी विद्यार्थ्यांनी प्रथम, व्दितीय व तृतीय बक्षिसे प्राप्त केली. यात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांच्यात सामाजिक तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची जाणीव व्हावी यासाठी कार्यक्रम घेण्यात आला. मयुरी सुलक्षणे व प्रांजल नाले यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक हेमराज पाटील, समन्वयक सचिन गायकवाड, शिक्षक, पालक व व्यवस्थापन मंडळ सदस्यांचे सहकार्य लाभले.




### मू. जे. महाविद्यालयात मायक्रोबॅश स्नेहसंमेलन

**जळगाव :** येथील मूळजी जेठा (स्वायत्त) महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागात विद्यार्थ्यांचे 'मायक्रोबॅश २०२५' सांस्कृतिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. उद्घाटन प्रा. केतन नारखेडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. नारखेडे यांनी सुक्ष्मजीवशास्त्र व व्यवसाय, महाविद्यालयीन जीवन, आपल्या व पालकांच्या अपेक्षा, विद्यार्थ्यांच्या जबाबदाऱ्या या विविध बाबींवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात गायन, एकल नृत्य, समूह नृत्य, कविता व शायरी वाचन, बीट बॉक्सिंगसह विविध कलाप्रकार सादर करण्यात आले. तुमच्या महाविद्यालयीन जीवनात नक्कीच भरभरून जगा, आनंदोत्सव अनुभवा, परंतु आपले कर्तव्य व ध्येय विसरू नका, असे उपप्राचार्य डॉ. मनोज चोपडा यांनी सांगितले. या वेळी केतकी शिंपी, प्रज्ञा बाविस्कर, विशाखा पाटील, प्रसेनजित इंगळे यांना पारितोषिके देण्यात आली. समन्वयक म्हणून डॉ. नयना पाटील यांनी काम पाहिले. डॉ. संगीता चंद्रात्रे यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. सं. ना. भारंबे यांनी मार्गदर्शन केले.



### इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विविध स्पर्धा उत्साहात

**जळगाव :** विवेकानंद प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विविध स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यात वेशभूषा, गोष्टी सांगणे, भारतीय ज्ञानप्रणालीवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा पार पडली. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमधील आनंद व उत्साह, सांस्कृतिक आध्यात्मिक व भावनिक विकास, भारतीय संस्कृतीचे ज्ञान हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका योगिता शिंपी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



### रोटरी क्लबतर्फे १२ शिक्षकांचा नेशन बिल्डर अवॉर्डने गौरव

**जळगाव :** येथील रोटरी क्लब जळगाव तर्फे गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये शिक्षक दिनानिमित्त माजी कुलगुरू के.बी.पाटील व जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या हस्ते बारा शिक्षकांचा नेशन बिल्डर अवॉर्ड देऊन गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट डॉ. राजेश पाटील, अनिल कांकरिया, संदीप काबरा, अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर आदी उपस्थित होते. तर सत्कारार्थी डॉ.अपर्णा भट - कासार, उल्हास सुतार, वसुधा सराफ, माधुरी पुंडे, मुश्ताक अली व विशाल सोनकुल, स्मिता चव्हाण, हिम्मत काळे, एकनाथ पाचपांडे, जयश्री भंगाळे, मनीषा बागरेचा, आरती भंगाळे आदी शिक्षकांचा समावेश होता. रोटरी क्लबच्या लिटरसी कमिटी चेअरमन प्रा. डॉ. शुभदा कुलकर्णी यांनी नेशन बिल्डर ॲवार्ड विषयी भूमिका विशद केली. विशाल सोनकुल यांनी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांनी मार्गदर्शन केले. संवाद सचिव पंकज व्यवहारे यांनी शिक्षक कार्यपरिचय दिला. सूत्रसंचालन स्वाती ढाके यांनी केले. यावेळी विविध शाळांचे मुख्याध्यापक, रोटरी क्लब सदस्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# मराठी शाळांचे वैभव टिकवण्यासाठी पटसंख्यावाढ शिक्षकांची जबाबदारी : पालकमंत्री

## जिल्हा परिषदेच्या १५ अध्यापकांना जिल्हा शिक्षक पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ५ सप्टेंबर,**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा या सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे भवितव्य गुरुजींच्या हातात आहे. विद्यार्थ्यांचे यश हेच शिक्षकांचे खरे पारितोषिक असून गुरुजी हे या समाजाचे आदर्श आहेत. मराठी शाळांचे वैभव टिकवण्यासाठी पटसंख्या वाढवणे ही शिक्षकांची खरी जबाबदारी असल्याचे सांगत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील विद्यादानाचे उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या १५ अध्यापकांना ला.ना. हायस्कूल येथील गंधे सभागृहात आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

**'बाला उपक्रम' अंतर्गत ४८ शाळांची निवड**

जिल्हा नियोजन समिती अंतर्गत १४ कोटी रुपये निधीतून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात येतील. ६६ वर्गखोल्यांचे नवीन बांधकाम तसेच 'बाला उपक्रम' अंतर्गत ४८ शाळांची निवडीसाठी मंजुरी मिळणार असल्याचेही पालकमंत्री पाटील म्हणाले.

**यांचा झाला सत्कार**

सुनीता रत्नाकर पाटील जि.प.शाळा जवखेडे ता.अमळनेर, महेंद्रकुमार हरी सावकारे लोणपिराचे ता.भडगांव, संगिता देविदास शेळके कन्या नं.२ ता.बोदवड, गुणवंत मुरलीधर पाटील सावतर निभोरा, ता. भुसावळ, राजश्री सुभाष वाघ लोंढे ता.चाळीसगांव, राममूर्ती दगडू रायसिंग वाकळी-शेंदणी ता.चोपडा, योगिता पंकज लोखंडे धानोरे ता.धरणगांव, राजेंद्र हिलाल चिते खर्ची ता.एरंडोल, उज्वला प्रमोद लाड पी.एम.श्री. विटनेर ता. जळगांव, गजानन माणिक मंडवे नवीदा भाडी ता.जामनेर, सुनिल रमेश बडगुजर बोदवड ता.मुक्ताईनगर, अनिल बापूराव वराडे पुनगांव ता.पाचोरा, प्रतिभा देविदास सोनवणे हनुमंतखेडे ता. पारोळा, लतिफ रफीक तडवी भोकरी, ता. रावेर, किशोर संतोष चौधरी मुलांची शाळा साकळी ता.यावल यांचा समावेश आहे.

**शिक्षक हा प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक**

जळगाव जिल्ह्यातील शाळा बांधकामासह संरक्षण भिंत बांधकामासाठी निधी उपलब्ध आहे. या मुळे शाळांना नविन स्वरूप प्राप्त झाले आहे.शिक्षण ही जीवनाची गंगोत्री आहे तसाच शिक्षक हा प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. त्यामुळे या पुरस्काराच्या माध्यमातून शिक्षकांची जबाबदारी आणखीनच वाढली असल्याचे मनोगत आमदार सुरेश भोळे यांनी व्यक्त केले.

**निपुण भारत अभियानाची अंमलबजावणी**

निपूण भारत अभियानाव्दारे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आमुलाग्र बदल घडत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी सांगितले. निपुण भारत या अभियानासंदर्भात आदर्श शिक्षक पुरस्कार निवड प्रक्रिया बाबत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ अनिल झोपे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षण विभाग जामनेर यांना निपूण भारत मधे उत्कृष्ट कामगिरीबद्दल शिक्षण कप देऊन गौरविण्यात आले.

सूत्रसंचालन नितीन पाटील यांनी केले. यावेळी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.अनिल झोपे, प्राथ.शिक्षणाधिकारी सचिन परदेशी, माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, उपशिक्षणाधिकारी विजय सरोदे, नरेंद्र चौधरी, स्वाती हवेले आदी उपस्थित होते.

### रोटरी सेंट्रलच्या अबॅकस स्पर्धेत साडेपाचशे विद्यार्थ्यांचा सहभाग

**जळगाव :** येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रल व आराध्या प्रतिष्ठान आयोजित राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस व वैदिक मॅथ स्पर्धेत चार राज्यातील ५७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

प. न. लुंकड कन्या शाळेच्या डॉ. बाकरे सभागृहात या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. याप्रसंगी हरिभक्त परायण मनोज चौबे, रोटरी सेंट्रलचे अध्यक्ष जितेंद्र बरडे, मानद सचिव ॲड. केतन ढाके, आराध्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष समर्थसिंग पाटील आदी उपस्थित होते.

अबॅकस स्पर्धेत टोडलर, रेनबो लेव्हल ए व बी तसेच प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ गटातील विजेत्यांना आणि वैदिक मॅथच्या दोन गटातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी रोटरीच्या सहप्रांतपाल डॉ. अपर्णा भट-कासार, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या वर्षा पाटील, प्रतिष्ठानच्या सचिव सीमा पाटील, गोपाळ तारुळकर, श्रद्धा वाणी आदी उपस्थित होते. सई खाचणे, शिवराज भाकरे, प्रांजल वाघ व अनुज सोनवणे हे विद्यार्थी लकी चॅम्प विनर ठरले. परीक्षक म्हणून विकास सोनवणे यांनी काम पाहिले. नीलेश मोरे व ऋचा जोशी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सौरभ पाटील, कुश अंबुसकर, दुर्गेश सोनार, अभय पाटील, लव अंबुसकर, संकेत पाटील यांनी परिश्रम घेतले.



### शानभाग विद्यालयात विविध स्पर्धा उत्साहात

**जळगाव :** शानभाग विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त पालक उपेंद्र सुर्वे, शुभांगी सुर्वे तसेच संदीप जोशी, साक्षी जोशी यांच्या हस्ते आरती पार पडली. लावण्या जाधव, खुशी नेमाडे यांनी सूत्रसंचालन केले. गणेशोत्सवानिमित्त शाळेत फुलांच्या माळा बनविणे, लिंबू-चमचा आणि पझल मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. यात आठवी ते दहावीतील ६० स्पर्धक विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवला. लिंबू-चमचा स्पर्धेत ज्ञानेश्वरी पाटील (आठवी, गार्गी), धनश्री देवकर (आठवी, चाणक्य), राजश्री पाटील (नववी, वैदेही) तसेच आकृती जोडणे (पझल मेकिंग) स्पर्धेत आठवी ते दहावीतील २४ स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला. पझल मेकिंग स्पर्धेत नंदिनी देसले, मीरा, गौरवी सोनवणे, मीरा, मैथिली बंजारा, दुर्गा. हे विद्यार्थी यशस्वी ठरले. आयोजन व मार्गदर्शन मुख्याध्यापक ज्ञानेश्वर पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विभागप्रमुख रुपाली पाटील, स्वप्नील पाटील, स्पर्धाप्रमुखांनी परिश्रम घेतले.

# विसर्जन मिरवणुकांवेळी लोखंडी पाइपयुक्त झेंडे, पताका टाळा

**महावितरण प्रशासनाचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

शनिवार ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी निमित्त गणेशमुर्ती विसर्जन मिरवणुकीत नागरिक उत्साहाने सामील होतात. मिरवणुकीदरम्यान वीजवाहिन्या, विद्युत खांब तसेच ट्रान्सफॉर्मर, रोहित्र आदी वीज यंत्रणेजवळून जाताना नागरिकांनी मिरवणुकीत लोखंडी पाईपयुक्त झेंडे, पताका वापरणे टाळावे असे, सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महावितरण प्रशासनाने आवाहन केले आहे.

शनिवारी गणेश विसर्जन मिरवणूकीदरम्यान उंचावलेले रथ, सजावट केलेले मंडप, झेंडे वा पताका यांचा संपर्क वीजवाहिन्यांशी येवून अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांनी मिरवणुकीच्या मार्गादरम्यान वीजवाहिन्या आणि विद्युत उपकरणांपासून आवश्यकतेनुसार योग्य अंतर ठेवणे गरजेचे आहे. झेंडे, पताकांसाठी स्टील, लोखंडी रॉड ऐवजी शक्यतो लाकडी अथवा पीव्हीसी पाईप वापरावेत. उंच फलक, झेंडे, रथ वा सजावट अशा उपकरणांचा वापर करताना विद्युत वाहिन्यांपासून अंतर ठेवावे. ट्रान्सफॉर्मरजवळ, वीज तारा वा विद्युत यंत्रणे नजीक फटाके फोडू नयेत. दरम्यान वीज वाहिन्या तुटलेल्या वा पडलेल्या आढळल्यास महावितरणच्या आपत्कालीन २४ तास उपलब्ध असलेले १९१२ किंवा १८००-२१२-३४३५ किंवा १८००-२३३-३४३५ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा स्थानिक महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा. गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष काळजी घेत सुरक्षित व आनंदी वातावरणात उत्सव पार पाडणे हेच सर्वांचे ध्येय असावे. नागरिकांनी आनंदाच्या उत्सवाबरोबरच सुरक्षिततेचाही विचार करून विसर्जन मिरवणूक सुरक्षित पार पाडावी, असे आवाहन महावितरण प्रशासनाने केले आहे.


रजि.नं. जेजोए जेजीए/आरएसआरसीआर/३३९/९०-९१

**रुख्मिणी अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसा. लि. जळगाव**
१९४ नवीपेठ, महात्मा गांधी मार्ग, जळगाव-४२५००१ फोन नं. २२२७६४०

**पस्तीसावी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (सर्व सभासदांसाठी)** दिनांक :- ०४/०९/२०२५

श्री/सौ.------------------------------------------------------------------

रुख्मिणी अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., जळगाव या सोसायटीच्या सर्व सभासदांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, पस्तीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २०/०९/२०२५ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता सहकार बोर्ड हॉल, हौसिंग सोसायटी, कोर्टामागे, जळगांव येथे. श्री. जगदिश मन्नालाल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे, तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**(सभेपुढील विषय)**

१. मागील दि. ३०.०८.२०२४ रोजी झालेल्या चौतिसावी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा वृत्तांत वाचून कायम करणे. २. सन २०२४-२५ अखेरचा अहवाल, अंकेक्षित नफा तोटा पत्रक, तेरीज आणि ताळेबंद वाचून मंजूर करणे. ३. सन २०२४-२५ च्या नफा वाटणीस मंजूरी देणे आणि ८% लाभांश घोषीत करणे. ४. सन २०२४-२५ चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे. ५. सन २०२४-२५ लेखा परीक्षण दोष दुरुस्ती अहवाल वाचून मंजूर करणे, ६. सन २०२५-२६ साठी लेखा परिक्षक नेमणे बाबत ठरविणे. ७. म. लेखा परिक्षक यांनी प्रमाणित केलेले जिंदगीचे वर्गीकरण NPA कर्ज वर्गीकरणास मंजूरी देणे. ८. सन २०२४-२५ मध्ये संचालक मंडळाने केलेल्या संपूर्ण कामकाजास मंजुरी देणे, कर्ज वाटप, कर्ज वसुली व्याज सवलत, कर्ज खाते बंद करणे व ओटीएस स्किम इ. सपूर्ण कामकाजासंबंधी चर्चा करणे व कामकाजास मंजुरी देणे. ९.सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे. १०. सन २०२५-२६ करीता अर्थ संकल्प मंजूर करणे. ११. सन २०२१-२२ चा न नेलेला लाभांश राखीव निधीला वर्ग करणे १२. या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे. १३. म.अध्यक्ष यांचे पूर्व परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे,

**स्थळ- जळगाव**
**दिनांक : ०४/०९/२०२५**

**संचालक मंडळाच्या आदेशान्वये**
**श्री. विनोद डी. सोनार**
**व्यवस्थापक**

**टिप- १.** गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास, सदर सभा अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच विषयांकरीता सुरु होईल व ह्या सभेसाठी गणपूर्तीची अट राहणार नाही. २. सभेमध्ये संस्थेच्या कामकाजासंबंधी प्रश्न विचारायचे असल्यास असे प्रश्न लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयात सभेच्या दिवस अगोदर दाखल करावे, ३. सभा संपल्यानंतर सभासदांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित केलेला आहे. ४. सभा संपल्यानंतर अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ५. ठेवीदार व कर्जदार ह्यांना विनंती की, त्यांनी दि. ३१/०३/२०२५ अखेर शिल्लक रक्कम बरोबर आहे ह्याबाबत खात्री करुन घ्यावी. सभासदांच्या पाल्यांना शैक्षणिक गुणवत्तेवर पारीतोषीक देण्यात येणार आहे. तरी सभासदांनी आपल्या पाल्याच्या गुणपत्रिका सभेच्या एक दिवस अगोदर कार्यालयात जमा करावे हि विनंती.


### जिल्ह्यातील १६४ विशेष शिक्षकांचे समुपदेशनाद्वारे समायोजन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत विशेष शिक्षकांचे समायोजन कार्यवाही पार पडली आहे. यात १६४ विशेष शिक्षकांचे समुपदेशनाद्वारे समायोजन करून त्यांना योग्य शाळांत पदस्थापना देण्यात येणार आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) चंद्रशेखर जगताप यांच्या देखरेखीखाली विशेष शिक्षकांचे समुपदेशन करण्यात आले.

प्राथमिक शाळांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा प्रभावीपणे पूर्ण करणे तसेच शिक्षकांचा ताळमेळ साधून आवश्यक तेवढ्या शिक्षकांची उपलब्धता करून देणे हा या समुपदेशनाचा मुख्य उद्देश होता. यामुळे विशेष शिक्षकांची कमतरता असलेल्या शाळा तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना अधिक परिणाम कारक व दर्जेदार शिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. या प्रक्रियेसाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी सचिन परदेशी, उपशिक्षणाधिकारी व शिक्षण विभागातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### डॉ. आचार्य विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

डॉ. अविनाश आचार्य विद्यालय प्राथमिक विभागात शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी विद्यार्थी शिक्षक म्हणून काम पाहिले. दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनानंतर डॉ.रत्नमाला पाटील यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. संनिधी शेंडे हिने शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. संगीत शिक्षिका रंजना बाभुळके व तुषार पुराणिक, प्रचिती खैरनार व अंशुल लोहार यांनी कविता सादर केल्या. सीमा पाटील, केतन वाघ, सुनील वाघ व योगिता राणे यांनी कार्यभार सांभाळला.


## AUCTION CUM SALE NOTICE

***(Under Rule 8 (6) to be read with Rule 9 of the Security Interest (Enforcement) Rules 2002.)***

**WHEREAS, The Urban Co-op. Bank Ltd., Dharangaon, Branch Dharangaon,** has taken the actions as contemplated U/s 13 (4) of the Securitisation Act through it's Authorized officer namely **shri Prafull Ramakant Agnihotri** and thus, taken the possession of the secured assets. The present auction notice is also required to be treated as sale notice as contemplated under Rule 8 (6) of the Security Interest (Enforcement) Rules 2002.) The valuation as required under Rule 8 (6) has already been obtained by the approved valuer, duly registered under the Wealth Tax Act. Thus the present notice is composite notice. Thus by this public notice the bank is inviting offers in sealed envelope from the interested persons/ parties for sale of the following property. The auction of the said property is scheduled on 06/10/2025 and the sealed envelope will be open sharp at 11:00 A.M. and accordingly the auction proceeding will be completed thereafter within 15 Minutes. After having declared the highest bid the remaining bidders will be given one more chance to raise their offer within next 5 minutes thereafter. And thereafter whatever highest bid would receive will be finalized.

| Sr. No. | Name of the Branch | Name of the Account | Name of the borrower / owner of the property | escription of the properties mortgaged and the Plant and Machinery hypothecated with the secured creditor | Date of demand notice u/s 13 (2) and amount mentioned therein | Date of Symbollic possession taken | Amount out-standing as on 31/08/2025 | Reserved | Name of the Authorised officer | EMD (5% of the Reserved Price) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Dharangaon Branch | Instalment Loan 184/2048 | Shri Satish Dayaram Borase At Dharangaon | **House Property** Property being CTS No. 2275 situated at Dharangaon, Tq. Dharangaon, Dist. Jalgaon. Bounded as under:- East CTS No 2274 West-CTS No. Road North–CTS No. 2086 South – Road Total Area- 20.9 sq. mt., Valuation of House property Rs. 278402/- | 05/10/2021 Rs. 141814/- (Principal) + 11289/- (interest accrued) = Total = 153103/- (position as on 05/10/2021) and further interest accrued thereon | 13/01/2023 | 133345/- (Principal) + 88397/- (interest accrued) = Total – 221742/- (position as on 31/08/2025) and further interest accrued thereon | Total valuation of the House property being CTS No. 2275 is Rs. 278402/- | Shri prafull ramakant agnihotri | **EMD for House Property** Rs. 13920/- |

1) The sealed tenders are hereby invited from the public at large on the following terms & conditions, the interested parties may purchase the tender form from the, The Urban C0-op. Bank Ltd. Dharangaon, Branch – Dharangaon, in between 11:00 to 16:00 Hrs. by paying the necessary charges of Rs 500/- in between 25/09/2025 to 30/09/2025
2) Sealed Envelope of tender is to be submitted in between 25/09/2025 to 30/09/2025 during the office hours in between 11:00 to 16:00 HR's.
3) The received sealed envelope tenders will be open on 06/10/2025 sharp at 11:00 AM at the Branch / Head office of the bank at Dharangaon. After opening of the tender the highest bid will be declared and after declaration of the highest bid the remaining tenders will be given one more chance to raise their bids in between 11:15 AM to 11:25 AM and thereafter which ever one is the highest that will be accepted.

**Terms and Conditions :**

**The Property will not be sold below the Reserve price.**

a) In case of Blank tender forms received / submitted, the amount of E.M.D. will be forfeited.
b) The potential purchaser may have the inspection of the property in between 11:00 to 16:00 Hrs., with prior permission of authorized officer of the bank, at Dharangaon Branch Tq. Dharangaon, Dist. Jalgaon. (From Date 06/09/2025 to Date 30/09/2025
c) The tenderer have to pay 25 % of the amount of the offer made either through DD (to be drawn in favour of The Authorized Officer, of The Urban Co-op. Bank Ltd., Dharangaon, Dharangaon Branch Tq. Dharangaon, Dist. Jalgaon) or in Cash at the time of submission of tender form, and the successful tenderer means the tenderer whose offer is the highest one will have to pay rest of the 75 % of the amount within a period of 30 days commencing from opening of the tender form, in case of default the 25 % amount of EMD will stand forfeited. The unsuccessful tenderers will get refund of the amount of EMD immediately.
d) The offer along with the aforesaid Earnest Money Deposit (EMD) should be made in a sealed cover super scribed "Offer for purchase of property. The potential purchaser will have the choice to go for the properties mentioned in the auction notice, to further clarify.
e) The borrowers, respective tenderers / guarantors / owners of the security or their authorized representatives may remain present at the time of opening of tenders. The offerers will be called on a date given above for an auction and will be given one more opportunity to increase their offers by way of bidding. They are, therefore, advised to remain present themselves or through their duly authorized representative (s).
f) The Bank reserves its right to accept or reject any or all offers without assigning any reason and in case all the offers are rejected, either to hold negotiations with any of the tenderers / bidders or to sell the property (s) through private negotiations with any of the tenderers / bidders or other party / parties.
g) To the best of knowledge and information of the Authorized Officer, no other encumbrance exists on the property.
h) Offer in sealed envelope should be submitted to undersigned in between 11:00 to 16:00 Hr's in between 25/09/2025 to 30/09/2025
i) For reasons recorded, it shall be in the discretion of the 'Authorized Officer' to adjourn / discontinue the auction.
j) The purchaser shall bear stamp duty registration charges Cess, sales tax (if applicable) and all other incidental costs, charges including all taxes, rates and outgoings relating to the property.
k) The sale certificate shall be issued and the physical possession of the property shall be delivered to the purchaser after receiving full purchase price.
l) The said immovable property described in the schedule shall remain and be at the sole risk of the purchaser in all respects including loss or damage by fire or theft or other accident, and other risk from the date of confirmation of the sale by the undersigned Authorized Officer. The purchaser shall not be entitled to annul the sale on any ground whatsoever.
m) This notice is also notice to the above said borrowers under Rule 8 (6) of the Security Interest (Enforcement) Rules, 2002.
n) The properties mentioned below are to be sold on "AS IS WHERE IS AND NO. RECOURSE" basis
o) Thus by this public notice the bank is inviting offers in sealed envelope from the interested persons/ parties for sale of the following property. The auction of the said property is scheduled on 06/10/2025 and the sealed envelope will be open sharp at 11:00 A.M. and accordingly the auction proceeding will be completed thereafter within 15 Minutes. After having declared the highest bid the remaining bidders will be given one more chance to raise their offer within next 5 minutes thereafter. And thereafter whatever highest bid would receive will be finalized. The time place and date of opening of sealed offer is mentioned herein.

**Authorised Officers/Divisional Officer,**
**The Urban Co-op. Bank Ltd. Dharangaon,**
**Branch – Dharangaon, Dist Jalgaon**

## थोडक्यात महत्त्वाचे...

### सेट परीक्षेत सुवर्णा वाघ यांचे यश



**अमळनेर :** धुळे जिल्हा परिषदेंतर्गत प्राथमिक शिक्षका सुवर्णा श्रीकांत वाघ जून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सहाय्यक प्राध्यापक पात्रता परीक्षेत ५८.६७ टक्के गुणानुक्रमांनी उत्तीर्ण झाल्या. त्यांना इंग्रजी विषयात ३०० पैकी १९६ मार्क्स मिळाले. जिल्हा परिषद धुळेअंतर्गत गतवर्षी पवित्र पोर्टलमार्फत सेमी इंग्रजी शिक्षक म्हणून त्यांची शिक्षण सेवक म्हणून निवड झाली. प्रताप महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य, इतिहास विभागप्रमुख व उमवि इतिहास अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रो. डॉ. दत्तात्रय नामदेव वाघ तथा माजी शिक्षिका अरुणा वाघ यांच्या स्नुषा आणि झेड. बी. पाटील महाविद्यालय धुळे येथील सहाय्यक प्राध्यापक श्रीकांत वाघ यांच्या त्या पत्नी आहेत.

### सेवा शिक्षक मंडळ शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर

**चोपडा :** शिक्षक दिनानिमित्त येथील सेवाभावी शिक्षकांनी एकत्र येत सेवा शिक्षक मंडळामार्फत तालुक्यातील उपक्रमशील माध्यमिक शिक्षकांसाठी प्रोत्साहनपर 'सेवा शिक्षक गौरव पुरस्कार' प्रदान करणे सुरू केले आहे. सेवा शिक्षक मंडळ संस्थापक विलास पाटील व ॲड. डी. पी. पाटील खेडीभोकरी यांच्या परिवारातर्फे मातोश्री स्व. शांताई व पिताश्री स्व.पी.के.पाटील यांच्या स्मरणार्थ ३ विभागात दिल्या जाणाऱ्या या सेवा शिक्षक मंडळाच्या 'शिक्षक गौरव ' पुरस्कारांचे हे २४ वे वर्ष असून या वर्षाचे पुरस्कारार्थी शिक्षक परीक्षित निंबाजी चव्हाण, जि.प. प्राथमिक-कोळंबा ( प्राथमिक विभाग ), पवन लाठी विवेकानंद माध्यमिक विद्यालय (विषय शिक्षक माध्यमिक विभाग) पंकज छगन पाटील, शा. शि. पाटील माध्यमिक विद्यामंदिर चहार्डी ( संगीत विभाग) हे आहेत. या वर्षीच्या सेवाशिक्षक गौरव पुरस्कारांची घोषणा सेवा शिक्षक मंडळ संस्थापक सेवानिवृत्त मुख्याध्यापक विलास पाटील, निवृत्त मुख्याध्यापक एच.बी.मोरे, निवृत्त पर्यवेक्षक साहेबराव पाटील, मुख्या. नरेंद्र भावे, मुख्याध्यापक मंगेश भोईटे, संजय बारी, योगेश चौधरी इ. सेवा शिक्षक मंडळ सदस्यांनी केली आहे .



### 'प्रताप' प्राचार्यपदी हर्षवर्धन जाधव नियुक्त

**अमळनेर :** खान्देश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालय (स्वायत्त) अमळनेरच्या प्रभारी प्राचार्य म्हणून ३ सप्टेंबर २०२५ पासून नियुक्ती केली आहे. माजी प्राचार्य डॉ.ए.बी.जैन हे ३१ मार्च २०२५ रोजी वयाचे ६२ वर्ष पूर्ण करून सेवानिवृत्त झाले. यामुळे खान्देश शिक्षण मंडळाने प्रा.डॉ.हर्षवर्धन जाधव यांची प्रभारी प्राचार्य म्हणून नियुक्ती केली आहे. या प्रसंगी खान्देश शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ.संदेश गुजराथी, कार्योपाध्यक्ष सीए नीरज अग्रवाल, ज्येष्ठ संचालक हरी भिका वाणी, विनोद राजधर पाटील, प्रसिद्ध सर्जन डॉ.अनिल शिंदे आदींनी अभिनंदन केले.

### नवीन स्मार्ट वीज मीटर न बसवण्याची रयत सेनेची मागणी

**चाळीसगाव :** नवीन स्मार्ट मीटर बसवणे बंद करण्याची मागणी रयत सेनेने केली आहे. वीज ग्राहकांकडे वीज मीटर सुस्थितीत असताना वीज वितरण कंपनीच्यावतीने ग्राहकाना नवीन स्मार्ट मीटर बसवले जात असल्याने हे स्मार्ट मीटर जास्त गतीने फिरतात. त्यामुळे ग्राहकांना अतिरिक्त दरमहा १ ते ३ हजार रुपये भूर्दंड बसत आहे. त्यामुळे हे स्मार्ट वीज मिटर बसवणे बंद करावे, अशी मागणी रयत सेनेच्यावतीने निवेदनाद्वारे सहायक अभियंता प्रमोद कांदे यांच्याकडे १ सप्टेंबर रोजी करण्यात आली. निवेदनावर रयत सेना संस्थापक अध्यक्ष गणेश पवार, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष आबा गरुड, प्रदेश सचिव प्रमोद वाघ, प्रदेश संघटक ज्ञानेश्वर कोल्हे, जिल्हा उपाध्यक्ष स्वप्निल गायकवाड, तालुकाध्यक्ष संजय हिरेकर, मुकुंद पवार, भरत नवले, विलास मराठे, प्रदीप मराठे, शिवाजी गवळी, प्रकाश गवळी, संघटक दीपक देशमुख, हर्षल ठाकूर, भूषण पाटील, विकास परदेशी, समाधान राठोड, कुणाल पाटील, अभिजीत शिंदे, मुरलीधर तांबे, ऋषिकेश जाधव यांच्यासह रयत सेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### मालखेडे-उमरे सरपंचपदी सचिन पाटील

**कासोदा (ता. एरंडोल) :** येथून जवळच असलेल्या मालखेडे-उमरे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी उमरे येथील सचिन विठ्ठल पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तत्कालीन सरपंच प्रतिभा दिपक पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे ४ सप्टेंबर रोजी सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. सचिन पाटील यांचा सरपंच पदासाठी एकमेव अर्ज आल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य विलास दगडू पाटील, सुषमा दीपक पाटील, प्रतिभा पाटील, सचिन पाटील उपस्थित होते. एकूण सात सदस्यांपैकी पुष्पाबाई समाधान पाटील, दशरथ आधार अहिरे, व सपना संजय भिल हे तीन सदस्य अनुउपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आर. के. पटाईत व ग्रामपंचायत अधिकारी एम. बी. महाजन यांनी काम पाहिले. सचिन पाटील यांचे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील व मित्र मंडळी यांनी अभिनंदन केले आहे.



### संत ज्ञानेश्वर कॉलेज खो-खो स्पर्धेत प्रथम

**सोयगाव :** येथे झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये संत ज्ञानेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील खो-खो ची टीम तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाने विजय झाली. त्यातील सहभागी खेळाडूच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे तसेच कनिष्ठ विभागप्रमुख डॉ.उल्हास पाटील, डॉ.सैराज तडवी यांनी अभिनंदन केले. तसेच मार्गदर्शन डॉ. नीलेश गाडेकर, प्रा. शेख तौफिक, प्रा.निकम यांनी केले. महाविद्यालयातील डॉ. एस. एल. पाटील, प्रा.रवींद्र जाधव, प्रा. दीपक लिंबे, बुटुले, प्रा.शंकर कानडे, प्रा.शेख तोफिक, प्रा.ए.ए. सय्यद, प्रा.विनोद चव्हाण, प्रा.स्वाती देशमुख, प्रा.बी. ए. पाटील, प्रा. अनिल मानकर, निकम, योगेश काळे, अश्विनी काळे, दीपक कल्याणकर व शिक्षक, शिक्षकेतरांनी त्यांचे अभिनंदन केले.

### श्री गणेश पुराण कथेसह महायज्ञ सांगता
### इंद्रदेवजी महाराज आश्रमात आज महाप्रसाद

**पारोळा :** २९ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या दरम्यान दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत राष्ट्रीय कथाकार श्री श्री १००८ महामंडलेश्वर डॉ संत श्री इंद्रदेवजी महाराज यांच्या रसाळ वाणीद्वारे श्री गणेश पुराण कथेचे व श्री गणेश महायज्ञाचे आयोजन सावखेडा होळ (ता .पारोळा )स्थित श्री इंद्रदेवजी महाराज आश्रम येथे करण्यात आलेले होते. याचा सांगता समारोह शनिवारी ( ६ सप्टेंबर ) करण्यात आला आहे. सकाळी दहा वाजेपासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत महाप्रसाद (भंडारा) चे आहे. महाप्रसादाचा लाभ ग्रामस्थांनी घ्यावा, असे येथील राधा राणी सेवा समिती व आयोजकांनी केले आहे.

# विमानतळ परिसरात बिबट्याकडून गायीची शिकार

## शेतकऱ्यांमध्ये दहशत, शासनस्तरावरून भिल्ल कुटुंबाला तातडीने नुकसान भरपाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नशिराबाद ५ सप्टेंबर**

जळगाव शहरापासन विमानतळ परिसरात दोन दिवसापूवी बिबटयाचा वावर आढळून आला आहे. नशिराबादपासून काही अंतरावर असलेल्या विमानतळानजीकच्या शेतात ३ सप्टेंबर रोजी मध्यरात्री बिबट्याने गायीवर हल्ला केल्याने गायीचा मृत्यू झाला. यामुळे परिसरात शेतकऱ्यांमध्ये बिबटयाच्या दहशतीचे वातावरण दिसून येत आहे.



जळगाव शहरापासून ८ ते १० कि.मी. अंतरावर असलेल्या विमानतळ परिसरात बुधवारी रात्री नशिराबाद शिवारानजीकच्या विलास नाईक यांचे शेत आहे. चिंचोली येथील संजय भिल हे पत्नी व मुलासह विलास नाईक यांच्या शेतातील झोपडीत वास्तव्यास आहेत. संजय भिल यांच्या गायीवर शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला करीत फडशा पाडला. यामुळे या परिसरातील शेतकऱ्यामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. बिबट्याच्या हल्ल्यात गायीच्या मृत्यूमुळे भिल्ल कुटुंबाचे नुकसान झाले असून शासनस्तरावरून तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणीसह जळगाव वनपरिक्षेत्र व वनपाल अधिकाऱ्यांनी बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली जात आहे.

# नशिराबादेत २७ मंडळांच्या मूर्तींचे आज विसर्जन

**तभा वृत्तसेवा**
**नशिराबाद (ता. जळगाव), ५ सप्टेंबर**



येथे शनिवारी गणेश उत्सवानिमित्त सार्वजनिक गणेश मित्र मंडळ मानाच्या गणपतीने मिरवणुकीला सुरुवात होईल त्यानंतर गावातील एक एक मंडळ रांगेत लागून डीजेच्या तालावर ती लेझीम पथक व विविध प्रात्यक्षिक दाखवून मिरवणुकीला सुरुवात होईल. नशिराबाद पोलीस स्टेशन अंतर्गत ५५ गणेश मंडळाचे स्थापना करण्यात आली होती. त्यातील २७ मंडळे ही नशिराबादेतील आहेत. यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

नशिराबाद येथे गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर विसर्जनाच्या तयारीसाठी नगरपरिषदेने वाघूर नदी परिसरात नियोजन सुरू केले आहे. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित विभागाने नदी परिसराची पाहणी केली असता विषय स्तरावर आवश्यक सुरक्षेचे सुविधा उपलब्ध करून देण्याचे कामाला सुरुवात झाली आहे नदी परिसरात रोषणाई, पाण्याची खोली प्रवेश व मार्ग आपात्कालीन मदत केंद्र, स्वच्छतागृहाची व्यवस्था असेल. विद्युत यंत्रणेजवळ जाताना विशेष दक्षता घेण्याचे आवाहन महावितरणचे अधिकारी पवन वाघुळदे यांनी केले आहे.



# एरंडोलला अथर्वशीर्ष पठण

**तभा वृत्तसेवा**
**एरंडोल, ५ सप्टेंबर**

येथील सरस्वती कॉलनीत राजमाता जिजाऊ महिला मंडळ आणि सर्वधर्मसमभाव महिला मंडळातर्फे गणरायासमोर सामूहिक अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम नुकताच उत्साहात झाला. पठणानंतर उपस्थित सर्व महिलांनी आरती सादर करून प्रसादाचे वाटप केले.

शोभा जगदीश साळी यांची ज्येष्ठ महिला नागरिक संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सर्वधर्मसमभाव महिला मंडळाच्या अध्यक्षा मीना मानुधने यांनी कार्यक्रमाचे नियोजन केल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक माजी उपनगराध्यक्षा तथा जिजाऊ महिला मंडळाच्या अध्यक्षा शकुंतला अहिरराव, सूत्रसंचालन वंदना पाटील तर आभार वैशाली पाटील यांनी केले. कार्यक्रमास जिजाऊ महिला मंडळ आणि सर्वधर्मसमभाव महिला मंडळाच्या भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी चंद्रकला जैन, छाया निंबाळकर, मीना चौधरी, कविता मानुधने, शकुंतला पाटील, कल्पना चौधरी, मंगला चौधरी, जयश्री वसईकर, माधुरी पाटील यांनी परिश्रम घेतले.

# घरगुती गॅस हंडीतून वाहनात गॅस भरण्याचा प्लॅन पोलिसांनी उधळला; पाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

घरगुती गॅस हंड्या वाहनात भरुन या हंडीतून वाहनात गॅस भरण्याचा संशयितांचा प्लॅन होता. एलसीबी पथकाने तपासचक्र फिरवित घरगुती ५२ सिलिंडर गॅस हंडी, इलेक्ट्रीक मोटार, वजन काटा, मशिन,वाहन असा सुमारे ५ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. ही कारवाई ४ सप्टेंबरला तांबापुरा ते इच्छादेवी चौक दरम्यान करण्यात आली.

तक्रारीनुसार (एमएच१९ सीएक्स १०७५) या वाहनात एचपी कंपनीच्या ५२ त्यात दोन भरलेल्या व ५० खाली गॅस हंडी तसेच आठ भारत गॅस कंपनीच्या भरलेली हंडी वाहनात ठेवल्या होत्या. हंडीमधील गॅस वाहनात भरण्यासाठी इलेक्ट्रीक मोटार, वजन काटा, गॅस भरण्याची मशिन असे साहित्य ठेवले होते. ही माहिती मिळताच एलसीबीच्या पथकाने घटनास्थळाकडे धाव घेत तपासाला गती दिली. दोन संशयित वाहनासह इच्छादेवी चौकात मिळाले. हा मुद्देमाल हस्तगत केला.

याप्रकरणी तक्रारीनुसार अनिल शंकर सोनवणे (वय ४५, रा.बांभोरी), मोहन शेख युसुफ शेख (रा.तांबेपुरा इच्छादेवी चौफुलीजवळ) यांच्या विरुध्द धरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक फौजदार सुनील लोहार हे तपास करीत आहेत.

# वरणगावजवळ गावठी कट्ट्यासह दोघे गजाआड

**भुसावळ :** गावठी कट्ट्यासह दोघांना गजाआड करण्यात आले आहे. तालुक्यातील वरणगाववजवळ जळगाव येथील स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. चरणसिंग उखा चव्हाण (वय ३६, रा. चौडी, ता.जि.बऱ्हाणपूर, म.प्र) आणि पंकज रतनसिंग चव्हाण (वय २५, रा. मोरझिरा, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, वरणगाव शहरातील फुलगाव ब्रीजच्या खाली गावठी कट्टासह दहशत माजविण्याच्या उद्देशाने येणार आहे. त्याप्रमाणे गणेशोत्सव सण लक्षात घेऊन राहुल गायकवाड यांनी एक पथक तयार करुन पथकास सूचना दिल्या. दुचाकीवरील इसमांची अंगझडती घेतली असता त्यांच्याजवळ एक गावटी बनावटीचा पिस्तोल व २ जिवंत काडतुस तसेच वरील क्रमांची काळ्या लाल रंगाची पल्सर मोटार सायकल व दोन मोबाईल असा अंदाजे एक लाख २९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल विनापास परवाना बाळगताना मिळाला. हा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याबाबत वरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सोपान गोरे, यशवंत टहाकळे, प्रेमचंद सपकाळे, प्रीतम पाटील, श्रीकृष्ण देशमुख, बबन पाटील, रवींद्र चौधरी, सचिन घुगे, भरत पाटील यांनी केली आहे.

# युवाशक्ती फाऊंडेशन, जैन फाऊंडेशनतर्फे ७९० रोपांचे आज होणार वाटप

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ५ सप्टेंबर**

भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन व युवाशक्ती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मंडळातर्फे ७९० रोपांच्या सहाय्याने बल्लाळेश्वर गणपतीची प्रतीकृती देखावा म्हणून सादर करण्यात आली आहे. वृक्षसंवर्धन करुन पर्यावरणाचा संदेश यातून दिला गेला. अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपती विसर्जनाच्या दिवशी शनिवारी ६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजेपासून रोपांचे वाटप नागरिकांना करण्यात येणार आहे.



मंडळातर्फे महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, दिप्ती कराळे, जिल्हाधिकारी आयुषप्रसाद, जैन इरिगेशन सिस्टम्स लि. चे अध्यक्ष अशोक जैन, ज्योती जैन, सार्वजनिक गणेश महामंडळाचे अध्यक्ष सचिन नारळे, अपूर्वा नारळे, ललित चौधरी, युवाशक्ती फाऊंडेशनचे संस्थापक विराज कावडीया, अनिल जोशी, राजेश नाईक, लेफ्टनंट शिवराज पाटील, मृणालिनी चित्ते, जितो लेडीज विंगच्या अध्यक्षा डॉ. सोनाली जैन, शितल जैन, नरेंद्र भोई, दिलीप पाटील, प्रितम शिंदे, संदिप सुर्यवंशी, पियुष हसवाल, दिक्षांत जाधव, सागर सोनवणे यावेळी उपस्थित होते.

नुतन मराठा महाविद्यालयातील विद्यार्थिनी कल्याणी महाजन हिने तलवारबाजी सह इतर चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. महाबली ढोल पथकातील १२८ वादकांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. चित्तथरारक रोप मल्लखांबचेही प्रात्यक्षिके नरेंद्र भोई यांच्या मार्गदर्शनात युवतींनी सादर केले.

# 'अंतर्नाद'कडून 'एक दुर्वा समर्पणा'तून १० विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप

## गणेशोत्सवात १८७ विद्यार्थ्यांना दिला मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ५ सप्टेंबर**

शहरातील अंतर्नाद प्रतिष्ठानतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही 'एक दुर्वा समर्पण' हा उपक्रम राबविण्यात आला. या वर्षी उपक्रमाचे नववे वर्ष होते. गणेशोत्सवाच्या खर्चात बचत करुन तसेच दात्यांच्या स्वेच्छा मदतीतून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

पाच दिवस चाललेल्या या उपक्रमाअंतर्गत १८७ विद्यार्थ्यांना वह्या, पेन, अक्षरमित्र पुस्तके, पाट्या, पेन्सिली, पट्ट्या, खोडरबर, रंगपेट्या, रजिस्टर आदी साहित्य वाटण्यात आले. समारोपाच्या दिवशी विशेष उपक्रम म्हणून १० विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.



**विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद**

या उपक्रमाची सुरुवात यावल तालुक्यातील विरोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाली. त्यानंतर वढोदा (ता. यावल) व फेकरी (ता. भुसावळ) येथील शाळांमध्येही शैक्षणिक साहित्य वाटप झाले. भुसावळ येथे सायकल वाटप सोहळ्यात प्रकल्पप्रमुख अमितकुमार पाटील, समन्वयक कपिल धांडे, सहसमन्वयक केतन महाजन, ज्ञानेश्वर घुले, योगेश इंगळे, कुंदन वायकोळे, जीवन महाजन, समाधान जाधव, विक्रांत चौधरी, विपीन वारके, दीपक वारके, अंतर्नादचे अध्यक्ष संदीप पाटील यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

**दीपस्तंभ फाऊंडेशनचे सहकार्य**

दीपस्तंभ फाऊंडेशन, मनोबल जळगाव येथे वापराअभावी पडून असलेल्या नवीन सायकली अंतर्नाद प्रतिष्ठानने मागणी करून विद्यार्थ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध करुन घेतल्या. त्यांची योग्य दुरुस्ती करून यावल व भुसावळ तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. या कार्यासाठी संस्थापक यजुर्वेंद्र महाजन, संचालक राजेंद्र पाटील, सीएसआर प्रमुख योगेश सूर्यवंशी, ॲडमिन सम्राट माळवदकर, एचआर प्रमुख ईशल नाईक, हॉस्टेल प्रमुख विद्या भालेराव, योगिता महाजन यांचे विशेष सहकार्य लाभले.

फेकरी येथे समारंभास प्रमुख अतिथी म्हणून सरपंच चेतना संजय भिरूड, सामाजिक कार्यकर्ते संजय भिरूड, सुनील भिरूड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा रुकसाना बी. फकीर, नसीरशहा फकीर, सलमानशहा फकीर, साबीरशा फकीर, मुख्याध्यापक चंद्रकांत सूर्यवंशी, शिक्षिका प्रियंका कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ग.स.सोसायटी सदस्य योगेश इंगळे, ज्ञानेश्वर घुले, कुंदन वायकोळे, अंतर्नाद प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप पाटील तसेच पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

**दातृत्वाच्या दिंडीचे वारकरी**

उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रवीण बऱ्हाटे, अभिषेक चौधरी, देवानंद पाटील, तेजस पाटील, सुनील तायडे, सचिन पाचपांडे, प्रवीण पाटील, राजू बोंडे, मनमोहन करसाळे, भरत बऱ्हाटे, किशोर पाटील, भूषण कोटेचा, अलका सुरवाडे यांनी सहकार्य केले.

# अनंत चतुर्दशी अन् गणपती विसर्जन

दरवर्षी येणारी भाद्रपद शुद्ध चतुर्दशी दोन कारणांनी महत्वपूर्ण असते. या दिवशी पाहुणचाराला आलेले लाडके बाप्पा परत जातात, तर याच दिवशी अनेक भाविक अनंताचे व्रत करतात. त्यामुळेच या दिवसाला अनंत चतुर्दशी असे म्हटले जाते. गणेशोत्सवाला सार्वजनिक रुप छत्रपती शिवाजी राजांनी पुणे येथे दिले, असे दाखले इतिहासात मिळतात. त्यांच्या काळात म्हणजे १६३० ते १६८० पर्यंत उत्सव सार्वजनिक पद्धतीने साजरा केला गेला जात असे. त्या मागील त्यांचा उद्देश स्वराज्य संस्कृती लोकांना कळावी व त्यांच्यात देशभक्ती जागवावी हा होता. तसेच भाद्रपद शु. ४ ते भाद्रपद शु.१४ या कालावधीतील प्रचलीत गणेशोत्सवाच्या पूर्वी श्री समर्थ रामदास स्वामींनी हा उत्सव सुरू केल्याचीही नोंद इतिहासात आहे. सुंदरमठ शिवकालीन शिवथर प्रांतातील सुंदरमठ येथे सन १६७५ साली छ. शिवाजी राजे आणि समर्थ रामदास स्वामी दोघांनी मिळून हा गणेशोत्सव भाद्रपद शु.!! ४ ते माघ शु.!! ५ गणेश जयंतीपर्यंत पाच महिने साजरा केला होता. पेशवेकालीन पुण्यात साजऱ्या केल्या जाणाऱ्या सार्वजनिक उत्सवात, तीन प्रमुख उत्सव असत; दसऱ्याचे सीमोल्लंघन, गणेशोत्सव आणि होळी. हे तिन्ही उत्सव अतिशय भव्य प्रमाणात आणि मोठ्या उल्हासाने साजरे केले जात असत.

सन १८९३ पासून पुण्यातील सर्व गणपतींची एकत्र विसर्जन मिरवणुकीची परंपरा आहे. मंडळांच्या गणपतीचे दहा दिवस आणि विसर्जन मिरवणूक हे दोन्हीही सध्या मात्र फार मोठे इव्हेंट्स झाले आहेत.

पाणावलेले डोळे आणि ढोलताशांचा गजर, अशा संमिश्र वातावरणात 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या', 'गणपती चालले गावाला... चैन पडेना आम्हाला' असा जयघोष करीत गणरायाला भावपूर्ण निरोप आपण दरवर्षीच देतो. काही घरी दीड दिवसांनी, काही ठिकाणी सात दिवसांनी तर बहुसंख्य ठिकाणी अनंत चतुर्दशीला हा भावपूर्ण सोहळा दरवर्षी रंगतो. माहेरवाशीण म्हणून तीन दिवसांसाठी आलेल्या गौरींचा तर थाटच वेगळा असतो. प्रार्थना करत अक्षता टाकून गौरींचे मुखवटे स्टँडवरून काढताना महिला वर्ग खरंच गहिवरतो. विसर्जन करून घरी आल्यावर गणपतीचं रिकामं मखर बघुन फारच उदास वाटतं. सार्वजनिक गणपती मंडळाच्या कार्यकर्त्यांची अवस्था तर आणखी वाईट असते. गणपती बाप्पा आपल्या घरी येताना सुखसमृद्धी, भरभराट घेऊन येतात अशी भक्तांची गाढ श्रद्धा आहे. सुखकर्ता आणि दुखहर्ता असलेल्या विघ्नविनाशक गणरायाला निरोप देताना भक्तांच्या डोळ्यात अश्रू दाटलेले असतात. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मिरवणुकांचे भव्य स्वरूप पाहता, आज म्हणजे शनिवार, ६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या विसर्जनासाठीची तयारी स्थापनेपासूनच सुरू झालेली असते. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मिरवणुकांचे भव्य स्वरूप पाहता, या दिवसाचे महत्त्व खूप जास्त आहे. या दिवशी केवळ गणपती विसर्जन नाही, तर भगवान विष्णूच्या अनंत रुपाचीही पूजा करण्याची परंपरा असल्याने या दिवसाचे धार्मिक महत्त्व अधिक वाढते.

यंदाच्या अनंत चतुर्दशीला विसर्जनासाठी शुभ वेळा खालीलप्रमाणे आहेत.

१) सकाळची शुभ वेळ : ०७:३६ ते ०९:१०
२) दुपारची शुभ वेळ : १२:१७ ते ०४:५९
३) संध्याकाळी शुभ वेळ : ०६:३३ ते ०७:५९
४) रात्रीची शुभ वेळ : ०९:२५ ते ०१:४४ (सप्टेंबर ०७)
५) पहाटेची शुभ वेळ : (रविवारी ७ सप्टेंबर ) ०४:३६ ते ०६:०२

भक्तांच्या घरी पाहुणचार घेतल्यानंतर गणपती बाप्पा पुन्हा कैलास पर्वतावर परततात असे मानले जाते. गणरायाला भक्त निरोप देताना 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशी विनंती करूनच निरोप देतात. विसर्जन हे निसर्ग चक्राचे प्रतीक आहे, असेही मानले जाते.

पुढच्या वर्षी ज्येष्ठ अधिकमास येत असल्याने गणपती बाप्पाचे आगमन सोमवारी, १४ सप्टेंबर २०२६ रोजी म्हणजे यंदाच्या तुलनेत १८ दिवस उशिराने होणार आहे.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाचा कालावधी दहा दिवस इतका निश्चित केला. त्यानुसार अनंत चतुर्दशीला महाराष्ट्रात दहा दिवसांच्या गणपतीचे विसर्जन करतात. या दिवशी विशेषतः महाराष्ट्र व हरियाणामध्ये अनंताची पूजा केली जात असल्याने या दिवसाला अनंत चतुर्दशी असे म्हटले जाते.

**- विलास पंढरी,** मोबाईल ९८६०६१३८७२



# ११ हजार गणपती चित्रांच्या संग्रहाचा छंद जोपासणाऱ्या विशाखा देशमुख

१४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती असणाऱ्या गणपतीची विविध रूपे नेहमीच प्रत्येकाला भुरळ घालतात. पण अशी गणपतीची विविध रूपे गायिका आणि लेखिका असणाऱ्या जळगाव येथील विशाखा विलास देशमुख यांनी आपल्याकडे संग्रहीत केली आहेत. आज त्यांच्याकडे ११ हजार गणपती चित्रांचा संग्रह झाला आहे. हा एक छंद म्हणून त्यांनी जोपासला आहे.

श्रद्धा आणि आवड असली की कोणताही छंद आपले जीवन समृद्ध करत असतो. सुरुवातीला लग्नपत्रिकेवरील असणाऱ्या गणपतीने त्यांचे लक्ष वेधले आणि तो गणपती त्यांनी सांभाळून ठेवला. असे करता करता प्रत्येक लग्नपत्रिका तसेच घरात येणाऱ्या वर्तमानपत्रातील गणपती चित्रे जपून ठेवण्याचा छंदच त्यांना लागला. कारण प्रत्येकच गणपती वैशिष्ट्यपूर्ण असायचा आणि त्याची भुरळ पडायची. केवळ पाच-सहा गणपती चित्रे जमवण्यापासून ११ हजारांपर्यंतचा प्रवास कसा झाला हे कळलेच नाही आणि हे गणपतीच्या कृपेनेच घडून आले, असे त्या म्हणतात.

गेल्या २० वर्षापासून त्या आपला छंद जोपासत आहेत. केवळ चित्रेच नाही तर अनेक विविध मूर्तीदेखील त्यांनी जतन केल्या आहे. त्यात खड्यांचा, पानाफुलांचा, सुपारीवरील असे विविध प्रकारचे आकर्षक गणपती त्यांच्याकडे पाहायला मिळतात. कोणताही संग्रह एकदम होत नसतो. त्यासाठी आधी मनात विचार यावा लागतो, प्रयत्न करावा लागतो, सातत्य ठेवावं लागतं तरच छंद वाढतो. त्याचबरोबर आनंदही वाढतो. गणपतीच्या मंदिरात विशेषतः अष्टविनायकातील सर्व मंदिरांच्या जवळ असणाऱ्या दुकानांमधून तसेच गणपतीपुळे, दगडूशेठ हलवाई मंदिर येथूनही त्यांनी काही मूर्ती खरेदी केल्या आहेत. अनेकांना त्यांचा हा छंद माहीत असल्याने त्यांना अनेक जण त्यांच्या वाढदिवसाला गणपती भेट देत असतात.

गणपती उत्सवाच्या आठवणी सांगताना नकळत त्या माहेरच्या अंगणात धुळ्यात पोहोचतात. इयत्ता पाचवीपासूनच या गणेशोत्सवात कॉलनीत होणाऱ्या कार्यक्रमात नृत्य, गायन, नाटक यात भाग घेऊन धमाल करत असू. संगीत आणि साहित्याची आवड असल्याने गणपती बाप्पाच्या कृपेने गंधार कला मंडळातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करू शकते, असे त्या सांगतात. गणपती चित्रे आणि मूर्ती असा संग्रह जपत असतानाच नाणी, नोटा साहित्य आणि संगीतविषयक पुस्तके, पोस्टाची तिकिटे असे विविध छंद त्यांनी आवर्जून जपले आहेत.

गणपती उत्सव तर त्यांच्यासाठी पर्वणी असते. व्हॉट्सॲपवरसुद्धा मनमोहक गणपती येतात. त्यातील निवडक गणपतीच्या कॉपी लॅबमधून काढून आणून त्यांनी सुंदर अल्बम तयार केला आहे. कुठल्याही शुभकार्याच्या पत्रिकेत गणपतीचे चित्र असतेच. ती पत्रिका लोक कुठेही ठेवतात. त्यांच्या लेखी तो कागद असतो. पण विशाखा देशमुख यांना तो देव आहे, त्याचे पावित्र्य जपलेच गेले पाहिजे. म्हणून त्या अगदी रस्त्यात सापडलेले चित्रही उचलून संग्रहात ठेवतात.

कुणाच्या घरी गेल्यावर तिथे असणाऱ्या भिंतीवरील गणपतीने त्यांचे लक्ष वेधले जाते. तो कुठून आणला याची चौकशी करतात आणि तसाच गणपती मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांना गणपती जमवण्याचा छंद आहे हे बहुतेकांना माहीत असल्याने ते मुद्दाम जमवून त्यांच्या सुपूर्द करतात. असे गणपती मिळाल्यानंतरच आनंद अवर्णनीय असतो. हा छंद जोपासत असताना मैत्रिणी, नातेवाईक, घरातील सगळ्यांची मदत असल्यानेच हे शक्य होते. गणपती चित्रे आणि मूर्ती संग्राहक-कलाकार विशाखा देशमुख यांना शुभेच्छा.

**- रवींद्र मोराणकर,** मोबाईल ९९२२ ४३८३ ९६

www.tarunbharat.net
तरुण भारत
आसमंत
शनिवार, ६ सप्टेंबर २०२५




# ठकासी व्हावे ठक!



अन्याय सहन करणारा अन्याय करणाऱ्याइतकाच दोषी असतो. अमेरिकेने भारताच्या स्वायत्त धोरणात नाक खुपसण्याचा प्रयत्न करण्याबरोबरच कोंडी करण्याचा प्रयत्न केल्यामुळे भारतालाही मार्ग काढणे क्रमप्राप्त होते. त्यातून 'साऊथ ग्लोबल'ची कल्पना पुढे आली. 'मित्राचा शत्रू तो मित्र' हा न्याय भारताने इथे वापरला असून त्यात काहीच वावगे नाही. म्हणूनच चीनमध्ये पार पडलेल्या शांघाय परिषदेचे महत्त्व मोठे आहे.



**प्रा. एम. डी. कुलकर्णी**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेने ५० टक्के कर लादल्यानंतर भारताने जगातील इतर देशांप्रमाणेच केले. वाढत्या विभाजनकारी आणि विषारी परिस्थितीला तोंड देण्यासाठी चीन, रशिया आणि इतर जागतिक देशांशी संवाद साधला. चीनमधील तियानजिन येथे झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेने यासाठी एक योग्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले. तिथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेतली. या ठिकाणी व्यापाराच्या शस्त्रीकरणावर नाराज असलेल्या इतर नेत्यांचा समावेश होता. ट्रम्प यांच्या करहल्ल्यानंतर भारतासमोर दोनच पर्याय होते. एक म्हणजे अमेरिकेसमोर झुकणे आणि रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवणे; परंतु भारताने तसे करण्यास नकार दिला. कारण रशिया हा भारताचा चांगला मित्र आहे. बांगलादेश मुक्ती असो वा अन्य मोहिमा; रशिया नेहमीच भारताच्या मदतीला धावून आला. त्यातच दबावाला बळी पडणे मोदी यांच्या स्वभावात नाही. या प्रकरणी दुसरा पर्याय म्हणजे अमेरिकेसमोर मजबूतपणे उभे राहणे आणि इतर संधी शोधणे. हा पर्याय भारताने सध्या निवडला आहे, असे दिसते. तथापि, परराष्ट्र धोरणतज्ज्ञांनी सल्ला दिला की, भारताला अल्पकालीन समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. अर्थात दीर्घकाळासाठी ते चांगले राहील. गेल्या रविवारी चीनमध्ये मोदी आणि जिनपिंग यांच्यातील बैठकीमागे हाच संदर्भ होता. त्याचा तत्काळ परिणाम म्हणजे दोन्ही देशांमधील थेट विमानसेवा पुन्हा सुरू करणे आणि व्हिसा जारी करण्याची प्रक्रिया सोपी करणे. हा एक नाट्यमय बदल आहे. अमेरिकेलाही या संभाव्य परिणामाची अपेक्षा असावी.

मोदी-जिनपिंग यांच्यातील बैठक ही भारताच्या सामरिक स्वायत्तता राखण्याच्या धोरणाचा एक भाग म्हणून पाहिली जात आहे. परंतु यामुळे भारतापुढे आणखी भू-राजकीय आव्हाने निर्माण झाली आहेत. मोदी यांच्यासारखाच ट्रम्प यांचाही स्वभाव आहे. ते या घडामोडी हलक्यात घेणार नाहीत आणि भारत आणि रशियाविरुद्ध अधिक दंडात्मक पावले उचलण्याची शक्यता आहे. कारण भारताला सवलतीच्या दरात तेल विकत असल्याबद्दल अमेरिका रशियाला विरोध करते. दुसरीकडे अमेरिकेच्या न्यायालयाने ट्रम्प यांना टॅरिफच्या मुद्यावरून दणका दिला आहे. भारताशी संबंध बिघडल्यामुळे जागतिक व्यासपीठावर नवी राजकीय समीकरणे आकाराला येत असून अमेरिकेवर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळेच पुतीन यांच्याशी चर्चेच्या काही मिनिटे अगोदर अमेरिकेला उपरती झाली आणि तिने भारताशी चर्चेची तयारी असल्याचे संकेत दिले आहेत. भारताने आता सशर्त चर्चेची अट घातली आहे. ट्रम्प या वर्षी भारताने आयोजित केलेल्या 'क्वाड' शिखर परिषदेत सहभागी होणार नाहीत. या परिषदेला 'इंडो-पॅसिफिक' प्रदेशात चीनसाठी आव्हान म्हणून पाहिले जाते. ट्रम्प यांनी हस्तक्षेप केला आणि चीनवर कारवाई केली, तर ते भारत आणि चीनमधील नवीन संबंधांची परीक्षा असेल. सध्या रशियाचे तेल खरेदी करण्यामुळे भारताचा फायदा होत आहे. अनेक अमेरिकन लोकांना वाटते की, ट्रम्प यांनी चीनला शिक्षा करण्याचा प्रयत्न केला नाही. चीन रशियाकडून भारतापेक्षा जास्त तेल खरेदी करतो. त्यामुळे ट्रम्प यांचा दुटप्पीपणा जगासमोर आला आहे.

चीनने अमेरिकेविरुद्ध शुल्क लादून प्रत्युत्तर दिले, तर भारताने सामंजस्यपूर्ण वृत्ती स्वीकारली. भारत-पाकिस्तान वाद संपवण्याचे श्रेय आपल्याला न दिल्याबद्दल ट्रम्प महाशय मोदी यांच्यावर नाराज आहेत. त्यांनी हा दावा अनेक वेळा जाहीरपणे केला आहे. पाकिस्तानने शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी दिला, तसाच पाठिंबा भारताने त्यांना द्यावा, अशी त्यांची इच्छा आहे; परंतु मोदी तसे करू शकत नाहीत. भारत-पाकिस्तान दरम्यानचा संघर्ष हा द्विपक्षीय मुद्दा आहे. त्याचे उल्लंघन केल्यास मोदी यांच्यावर भारतात टीका होऊ शकते. पाकिस्तानी दहशतवादी हल्ल्यासाठी सौदेबाजी करणारा देश म्हणून भारताकडे पाहिले जाऊ शकत नाही. म्हणून भारत-अमेरिका संबंधांमधील सध्याच्या गुंतागुंतीला एक वैयक्तिक पैलू आहे. अलिकडच्या काही महिन्यांमध्ये भारत-चीन संबंधांमध्ये अनेक चढ-उतार आले. एक वर्षापूर्वी भारताने व्यापारी वर्गाच्या आग्रहावरून चीनशी संबंध कमी केले. तरीही द्विपक्षीय व्यापार वेगाने वाढला आणि व्यापार तूट ९३ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली. सीमा संघर्ष झाले आणि दोन्ही शेजाऱ्यांचे राजनैतिक आघाड्यांवर एकमेकांशी मतभेद आहेत. या वर्षी मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानमध्ये लष्करी संघर्ष झाला, तेव्हा चीन त्यात अप्रत्यक्षपणे सहभागी होता. पाकिस्तानी सैन्याने चिनी बनावटीच्या उपकरणांचा मोठ्या प्रमाणात वापर केला. त्यात लढाऊ विमाने आणि रडार प्रणालींचा समावेश होता. भारताने चीनविरुद्ध कोणतीही औपचारिक भूमिका घेतली नसली, तरी भारताने चीनशी संबंध सामान्य करावेत का, असे प्रश्न अजूनही आहेत.

आज मात्र भारत-चीन या दोन्ही देशांमधील या जवळिकीचे श्रेय ट्रम्प प्रशासनाला द्यावे लागते; परंतु 'हत्ती आणि ड्रॅगन' एकत्र येण्याच्या आश्वासनाव्यतिरिक्त अर्थपूर्ण संवाद होण्यापूर्वी दोन्ही देशांना अनेक मोठ्या अडथळ्यांवर मात करावी लागेल. २०१४ मध्ये सत्तेत आल्यापासून मोदी यांनी भारत-चीन संबंधांमध्ये वैयक्तिक रस घेतला असून २०१८ पर्यंत पाच वेळा शेजारील देशाला भेट दिली आहे; परंतु २०२० मध्ये लडाखमधील गलवान येथे झालेल्या सीमासंघर्षाने संबंधांना पूर्णविराम लावला आणि त्यानंतर मोदी यांना चीनला भेट देण्यासाठी सात वर्षे लागली. सीमा प्रश्न द्विपक्षीय संबंधांच्या केंद्रस्थानी आहे. दोन्ही देशांचे हजारो सैनिक अजूनही वादग्रस्त सीमेवर तैनात आहेत. ताज्या बैठकीनंतर चीन आणि भारताने सीमेवर शांतता राखण्याची आणि आपले मतभेद वादात बदलू न देण्याची शपथ घेतली. असे होणे शक्य आहे; परंतु सोपे नाही. भारताची जमिनीवरील वास्तविकता बदललेली नाही. पाश्चिमात्य देशांसोबतचे मूलभूत आर्थिक संबंध अजूनही मजबूत आहेत आणि अमेरिका हा त्याचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. भूराजकीयदृष्ट्या गेल्या दोन दशकांमध्ये विविध अमेरिकन प्रशासनांनी भारताला 'इंडो-पॅसिफिक'मध्ये चीनच्या विस्ताराविरुद्ध अमेरिकेचे केंद्र म्हणून पाहिले आहे. भारत हा इतर अनेक बहुपक्षीय व्यासपीठांचा भाग आहे, ज्यांना चीन आणि रशियाविरोधी म्हणून पाहिले जाते. ट्रम्प यांचे भारतासोबतचे व्यवहार हे दोन्ही लोकशाहींना तोंड दिलेल्या अनेक चढ-उतारांपैकी एक आहेत. ही वास्तविकता आहे. या पृष्ठभूमीवर येत्या काही महिन्यांत ट्रम्प भारताबाबतचे त्यांचे धोरण आणि शुल्क यावर सौम्य भूमिका घेतील का हे पाहणे बाकी आहे.

शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) माध्यमातून भारत भूराजनीतीच्या दृष्टिकोनातून मोठा धोरणात्मक फायदा मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. (पान २ वर)



# भारतीय दुग्ध व्यवसायावर अमेरिकेची नजर का?

शेती आणि शेतीपूरक व्यवसाय खुले करावेत म्हणून आयात शुल्काचा दबाव टाकणाऱ्या ट्रम्प यांच्या धोरणामुळे, भारताला दूरदृष्टीने पूर्ण मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारून आणि निर्यात वाढवून व्यापारातील तूट भरून काढता येईल. आजघडीला आयात थांबवली तर परकीय चलनाची बचत होऊन प्रगती साधता येऊ शकते. यासाठी दूध उत्पादन व्यवसाय मुक्त करण्यासाठी शरद जोशींप्रमाणे चळवळ उभी करायला हवी.

**मुकुंद गायकवाड**
कृषितज्ज्ञ

जागतिक व्यापार संस्था (डब्ल्यूटीओ) निर्माण झाल्यामुळे शेती व्यवसायात आमूलाग्र बदल झाला आहे. पूर्वी शेती व्यवसायाकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नव्हते. दुसऱ्या महायुद्धानंतर इंटरनॅशनल मॉनेटरी फंड (आयएमएफ), इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (आयटीओ) अशा संस्था निर्माण झाल्या होत्या. परंतु या संस्थांमध्ये शेतीचा समावेश केलेला नव्हता. डब्ल्यूटीओ निर्माण झाल्यानंतर व्यापार म्हणून शेतीचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारताने आपले कृषिक्षेत्र खुले करावे यासाठी दबाव टाकला. या दबावाला बळी न जाता भारताने त्याला मान्यता दिली नाही. त्यामुळे हा करार एक प्रकारे फिस्कटल्यात जमा आहे. मुळात ट्रम्प यांनी भारताच्या दुग्ध व्यवसायावर आपले लक्ष केंद्रित का केले, तो खुला व्हावा यासाठी त्याने धडपड का केली हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचा विचार करता गुजरातनंतर इथे दुधाची क्रांती झाली. पूर्वी भारतामध्ये अन्नधान्याची कमतरता होती, तशी दुधाचीदेखील होती. ती लक्षात आल्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल यांनी डॉ. कुंटेंच्या सहाय्याने नव्याने मुहूर्तमेढ रोवली, आणि हा व्यवसाय खूपच फोफावला, प्रगतिपथावर गेला. त्याचे अनुकरण करून महाराष्ट्राने गुजरातला मागे टाकले. महाराष्ट्रामध्ये दूध व्यवसायाची चळवळ कशी वाढली याचा आढावा घेतला असता सुरुवातीला दूध सोसायट्या, जिल्हा दूध संघ आणि किडींग प्लांट अशा पद्धतीने दूध व्यवसाय वाढला. त्यानंतर खाजगी व्यावसायिक या व्यवसायात पडले आणि त्यांनी त्याला चांगली चालना दिली. उदाहरणादाखल सांगायचे तर चितळे उद्योगाने दूध आणि दुधापासून उत्पादित पदार्थांना केवळ पुणेच नव्हे, इतरही ठिकाणी चांगली बाजारपेठ निर्माण करून दिली.

आज महाराष्ट्रातला सहकारी स्तरावरचा दूध व्यवसाय साखर कारखान्यांप्रमाणेच मोडीत निघाल्यात जमा आहे. परंतु गोकुळ, राजहंससारख्या एखाद- दुसऱ्या संस्था अजूनही तग धरून कार्यरत आहेत. तरीसुद्धा सुदैवाने महाराष्ट्रात दूध व्यवसाय चांगला फोफावला आहे. दुष्काळी शेतीच्या पार्श्वभूमीवर तो वरदान ठरला आहे. दुष्काळी शेतीला तो एकमेव आधार नसता तर महाराष्ट्रातील पावसावर अवलंबून असलेली बहुतांश शेती मोडकळीला आली असती. भारतातील दूध व्यवसाय संघटित आहे आणि त्याला बाजारपेठ आहे, हे चलाख ट्रम्प याने ओळखले आणि त्याच्या अभ्यासकांनी त्याला हे दाखवूनही दिले. त्यामुळेच या व्यवसायाकडे त्याचे विशेष लक्ष गेले. भारतातील शेतीबरोबरच दूध व्यवसायही खुला करावा असा त्याचा आग्रह होता. परंतु भारताने त्याला मान्यता दिली नाही. त्यामुळे इतर देशांच्या मानाने अमेरिकेशी आपल्या चाललेल्या वाटाघाटी बराच काळ रेंगाळल्या आणि शेवटी रशियन तेल खरेदीच्या मुद्द्यावर येऊन थांबल्या. या पृष्ठभूमीवर जगातील अनेक देशात भारतीय दूध व्यवसायावर लेखन प्रसिद्ध झाले.

वास्तविक पाहता जगामध्ये नेदरलँड, न्यूझीलंड आणि काही युरोपियन देश दूध व्यवसायात आघाडीवर आहेत. त्यांच्याकडे पहिल्यापासून जास्तीत जास्त गायींच्या प्रजाती उपलब्ध आहेत. तसा विचार करता, आपल्याकडील दूध व्यवसाय सुरुवातीला देशी (गावठी) गायींवर अवलंबून होता. परंतु मणीभाई देसाई यांनी या क्षेत्रामध्ये कृत्रिम उत्पत्ती रूढ करून जास्तीत जास्त दूध देणाऱ्या परकीय गायींच्या जातीचा स्थानिक गायींशी संकर घडवून आणून भारतीय दूध व्यवसायात आमूलाग्र बदल घडवून आणला. आज मणीभाई देसाईंच्या योगदानापासून भारतीय शेतकरी अभिक्त आहे. परंतु बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाऊंडेशन या संघटनेने महाराष्ट्र आणि भारतीय दूध व्यवसायात फार मोठे योगदान दिले आहे. आपल्याकडे असलेल्या गायींच्या प्रजाती आणि दुग्ध व्यवसाय पाहता त्यात अनेक उणिवा दिसत होत्या. इथल्या गायी कधीच परकीय गायींप्रमाणे बंदिस्त ठेवल्या जात नव्हत्या. त्याची शक्ती रानोमाळ चारा धुंडाळण्यामध्ये खर्च होत होती. हे ओळखून भारतीय शेतकऱ्यांना बंदिस्त गोठ्यात दुग्ध व्यवसाय करण्याची पद्धत पटली आहे. त्यामुळे संकरित गायीसुद्धा आता रानोमाळ भटकायला सोडण्याऐवजी बंदिस्त ठेवून त्यांची पूर्ण शक्ती वापरून भारताला दुग्ध व्यवसायात पहिल्या क्रमांकावर पोहोचविले जात आहे.

स्वातंत्र्यापूर्वी भारतामध्ये नेदरलँडकडून दूध पावडर आणि लोण्याची आयात होत होती. ते 'आणंद' चळवळीने बंद केले आणि आता महाराष्ट्रामध्येही हे पदार्थ तयार होऊ लागल्याने आपली गरज भागवूनही भारत या व्यवसायात निर्यातक्षम अवस्थेत पोहोचला आहे. चीज, बटर आणि दूध पावडर या उत्पादनांमध्ये आपला देश आघाडी घेण्याच्या स्थितीत आला आहे. त्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची या व्यवसायात शिरकाव करण्याची प्रबळ इच्छा झाली. दुग्धोत्पादनाची भारताची बाजारपेठ मोठी आहे. सरकारने वेळीच धोका ओळखून धोरण आखल्याने आज आपले दोन्ही व्यवसाय सुरक्षित राहिले आहेत. भारतीय दुग्ध व्यवसायावर आलेले हे संकट ही एक चांगली संधी मानून भारताला दूध आणि दुग्धजन्य पदार्थ निर्यात करण्याची आवश्यकता आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सरकारने शेती आणि शेतीपूरक व्यवसायाकडे लक्ष दिल्यास भारताची अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर येऊ शकते; पण सरकार या क्षेत्राकडे गांभीर्याने लक्ष देईल की नाही ही शंका आहे, असे विधान केले होते. कारण केंद्र किंवा महाराष्ट्र सरकारमध्ये शेती क्षेत्रातील एकही जाणकार मंत्री नाही. त्यामुळे अशा प्रकारचे धोरण सरकार अवलंबेल, अशी शक्यता नाही. सरकारने शेती आणि शेतीपूरक क्षेत्र खुले केल्यास गोकुळ, चितळे आणि अमूलसारख्या संस्था परदेशातील दुग्धजन्य पदार्थांचे मार्केट काबीज करू शकतात, अशी क्षमता निर्माण झाली आहे. परंतु भारत सरकार दोन्ही क्षेत्रं खुले करण्यास तयार नाही.

१९९१ मध्ये आपण उद्योग धंद्यांच्या बाबतीत मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली, पण शेतीला जास्तीत जास्त बंदिस्त केले, ही मोठी शोकांतिका आहे. याबाबत ज्येष्ठ शेतकरी नेते शरद जोशींनी आवाज उठवला होता. मी सुद्धा 'जागतिकीकरण: शाप नव्हे, वरदान' हे पुस्तक अमेरिकेत जाऊन लिहिले आणि या प्रश्नाला तोंड फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणत्याही जाणकाराचा दुग्ध व्यवसाय आणि शेती खुली करण्याच्या बाबतीत अद्याप आग्रह नसल्याने किंवा अभ्यास नसल्याने ही क्षेत्रे स्वातंत्र्यापासूनच्या प्रत्येक सरकारांनी जास्तीत जास्त बंदिस्त केली. चीननेही १९७८ मध्ये कम्युनिस्ट राजवट असूनही मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली. परंतु आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जबरदस्ती केल्यावर आणि भारताला सोने गहाण ठेवावे लागल्यावरही हे व्यवसाय खुले करायचे मनमोहन सिंग यांचे धाडस झाले नाही.

आता ट्रम्प यांच्या ताज्या टेरीफ धोरणामुळे भारताला आपली तूट भरून काढायची असेल तर रशिया आणि चीन यांच्याबरोबर वाटाघाटी करण्यापेक्षा पूर्ण मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारून येत असलेली तूट भरून काढता (पान २ वर)



## सिनेसृष्टी

**रमेश विनायक पोफळी**
७७७५९००८२४



# इये मराठीचिये नगरी : आशा भोसले

## मराठी चित्रपटातील सांगीतिक प्रवास

'ऐकशील का रे माझे, अर्थहीन गीत ।
दूर दूर जाते धरूनी उरी तुझी प्रीत ॥'

१९५२ सालच्या 'लाखाची गोष्ट' या मराठी चित्रपटात ग. दि. माडगूळकर यांचे शब्द स्वरांच्या मधात घोळून आशा भोसले यांनी त्यातील भाव जिवंत केले. धृपदातील चालीची नजाकत हृदयाची स्पंदने थांबवितात. अंतऱ्यातील स्वरांची किमया चित्तवृत्तींना जागृत करते. उरात प्रीती साठवून निघून जाण्यातील कळवळा कळतो. स्वरोच्चारात आणलेली खुमारी अवर्णनीय आहे.

'डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे ।
सादा विना कळाले संगीत लोचनांचे ॥'

डोळ्यात अहोरात्र फिरणारी दोन पाखरे प्रसंगानुसार भाव प्रेरित करीत असतात. कुठल्याही नादाशिवाय हे मूकसंगीत सर्वकाही विषद करते. सुधीर फडकेंच्या धृपदातील शब्दांना आशाताई उत्तरतात...

'मी वाचले मनीचे ।
फुलवी मनात आशा सांगावया तुला ते ।
नाही जगात भाषा हितगुज प्रेमिकांचे ।
हे बोल त्या मुक्यांचे... डोळ्यात...॥'

नेत्रपल्लवांनी उजागर केलेल्या संकेताने माझ्याही मनी आशा पल्लवित झाल्या. व्यक्त करण्यास शब्द नाही, नेत्राद्वारे प्रेमाचे हितगुज हीच मुक्या मनाची भाषा. सौंदर्याने नटलेल्या शब्दप्रभू 'गदिमां'च्या शब्दांचे तेवढ्याच ताकदीने गायलेले गाणे ऐकतानाच्या क्षणांचे सदैव ऋणी राहावे.

'ही कुणी छेडिली तार । प्राजक्ताच्या मधुगंधासम । कुठूनी ये केदार?'

पु. ल. देशपांडे यांच्या १९५३ सालच्या 'गुळाचा गणपती' चित्रपटातील हे युगल गीत आशाताई व वसंतराव देशपांडे यांच्या स्वरांच्या गुंफणीत विणलेले आजही तितकेच ताजे व टवटवीत वाटते. धृपदाची सुरुवात आशाताईंच्या सुरावटीने होते. इथे तर प्रेमाचा केदारच मुळी केदार रागात आळविला आहे.

'वेलीवर त्या तुम्ही चढू नका । चढा सूर नच लवे गायका ।
तूच चढ तारविलास्वर हा । तूच तोड ही तार ।
ही कुणी... ही कुणी छेडली तार ॥'

म्हणताना आशाताईंचा स्वर हृदयसतारीच्या हिंदोळ्यावर झुलतो. प्रेमाची तार छेडण्याकरिता सतारीच्या तारेची योजना.

'नाच रे मोरा, आंब्याच्या वनात । नाचरे मोरा नाच.'

१९५३ सालच्या 'देवबाप्पा' चित्रपटातील आशाताईंच्या कोवळ्या स्वरातील हे गाणे आम्हाला बालवयात घेऊन जाते. या गाण्यावर बालवयातील मुली कमरेला मोराचा पिसारा बांधून नृत्य सादर करायच्या. हे दृश्य आजही आठवते. ओजस्वी शब्दांना कलाटणी देऊन साध्या अर्थपूर्ण शब्दातले गदिमांचे हे बालगीत आजही लोक विसरले नाहीत. आशाताईंच्या जादुई स्वरांची मोहिनी १९५० च्या आधीपासून पडू लागली होती.

'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख.' 'गोरी गोरी पान फुलासारखी छान' ही अप्रतिम गाणी माहिती नाही असा मराठीदर्शक विरळाच!

ग. दि. माडगूळकरांनी या रचना खऱ्या तर १९४९-५० च्या दरम्यान 'लक्ष्मीची पावलं' या चित्रपटासाठी रचल्या होत्या. श्रीनिवास खळे हे तेव्हा नवोदित संगीतकार होते. गदिमा नाराज झाले. परंतु खळे यांनी दोन्ही गाणी आशाताईंकडून रेकॉर्ड करून त्यांना ऐकवली तेव्हा त्यांनी खूश होत खळे यांची स्तुती केली. दुर्दैवाने हा चित्रपट निघालाच नाही. माडगूळकरांनी स्वतः प्रयत्न करून एच.एम.व्ही. कडून त्या रचना रेकॉर्ड करून घेतल्या. अशारीतीने सिनेमासाठी तयार केलेली ही गाणी, भावगीते म्हणून मराठी रसिकांच्या घराघरात पोहोचली. गीतकाराच्या शब्दापलीकडे व संगीतकाराच्या संगीतापलीकडे जाणारा आशाताईंचा आवाज ऐकल्यावर कुणीही निःशब्द होतो. कारण तुर्यावस्थेत शब्द फुटत नाही. 'पाण्या तुझा रंग कसा' या शीर्षकाची ध्वनिफीत कोलंबिया कंपनीने काढली होती. त्यात प्रसिद्ध कवयित्री शांताबाई शेळके यांचे निवेदन होते. त्या म्हणतात, ''श्रावणसरीची रिमझिम, पावसानंतरच्या मृदगंध, झगमगणारे आलिशान नृत्य गृह, कातरवेळी रानातून जाणारी एकाकी वाट, तांबड्या फुलांनी मोहरलेला पळस इ. विविध स्वरांनी साकार होणारा आशाताईंचा आवाज आहे. तिच्या स्वरांची रेंज मोजायला फूटपट्टीच नाही. तीन मिनिटांच्या सिनेमातील गाण्यात तिच्या आवाजाची रेंज मोजण्याचा प्रयत्न म्हणजे सागराला मुठीत सामावण्याच्या प्रयत्नासारखा आहे.''

जुन्या पिढीतील स्वरभास्कर पं. दीनानाथ मंगेशकर यांच्या पदरी आशा हा मुक्तकोटीचा आत्मा ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगली मुक्कामी अवतरला. घरात संगीताचे वातावरण. दीनानाथांनी आपल्या गळ्यातील गांधार लता यांच्या गळ्यात सामावला व स्वतःच्या गळ्यातील तडफदार स्वर व पहाडी ठेक्याचा वारसा आशाताईंना दिला. दीनानाथ यांना ज्यांनी ऐकले नाही त्यांनी आशाताईंची संगीत नाट्य गीते ऐकावीत. १९४३ साली 'माझे बाळ' या मराठी चित्रपटात त्या सर्वप्रथम गायल्या दत्ता डावजेकर यांच्या संगीतात. गाणे होते 'चला चला नव बाळा...'

वयाच्या १६ व्या वर्षी घरच्यांच्या विरोधात जाऊन १५ वर्षांनी मोठे असलेले गणपतराव भोसलेंशी विवाह केला व आशा मंगेशकरच्या 'आशा भोसले' झाल्या. या दाम्पत्याला हेमंत, आनंद व वर्षा ही अपत्ये झालीत. भोसले यांचे निधन १९६६ साली झाले. आशा भोसले यांनी दुसरा विवाह हिंदीतील प्रसिद्ध संगीतकार आर. डी. बर्मन यांच्याशी १९८० साली केला. बर्मन यांचे निधन १९९४ साली झाले. आशा यांच्या आयुष्यात एक न्यूनगंड नेहमीकरिता आहे. 'या जन्मी दुय्यम स्थानावर समाधान!' लतानंतर आशा याच दृष्टिकोनाचे समर्थन करते. १९६२ साली चीन युद्धा नंतरच्या राष्ट्रीय कार्यक्रमात लता यांनी गायलेले 'ऐ मेरे वतन के लोगो' हे गीत अजरामर झाले होते. १९६५ साली पाक युद्ध जिंकल्यावर तशाच कार्यक्रमात आशा भोसले यांनी एक गीत गायले होते.

'कर लो प्रणाम ऐ लोगो । वो वंदनीय है बहने
इस देशके लिये जिन्होने । विधवा के कपडे पहने ॥'

भारत-पाक तह झाला. या गीताची तबकडी निघालीच नाही. गाण्याची सुरावट व शब्द 'ऐ मेरे..'पेक्षा चांगले होते, असे म्हणतात. याच कार्यक्रमानंतर आशाताईंनी आपली आभूषणे पंतप्रधानकोशात अर्पण केली होती.

'झुक झुक झुक झुक आगीन गाडी ।
धुरांच्या रेषा हवेत काढी ।'

'तू सुखी रहा' चित्रपटातील बालपणीच्या स्मृती चाळवणारे हे गीत रक्ताच्या नात्यातील ओढीतील शाश्वत आनंद प्रकट करतात. बालसुलभ पवित्र्यात आशाताईंनी गायलेले खोडकर व चंचल स्वरातल्या या गाण्याने खूप लोकप्रियता मिळविली होती.

'बुगडी माझी सांडली ग ।
जाता साताऱ्याला ग जाता साताऱ्याला-

आशा भोसले यांनी 'सांगते ऐका' चित्रपटात गायलेली व पडद्यावर जयश्री गडकरने सादर केलेली ही 'बुगडी' अजरामर झाली. शब्दात व चालीत अनोखे रंग व ठसका भरण्याचे कसब त्यांच्यात आहे.

'आज कुणीतरी यावे' (मुंबईचा जावई) चित्रपटातील सुधीर फडके यांची मल्हार रागातील सुरांची धून गदिमांच्या शब्दांना कुरवाळीत आशाताईंनी मेघमल्हारचे सूर मुक्तपणे कोसळणाऱ्या पर्जन्यसरींची खुमारी वाढवीत तानसेनी गायकी सिद्ध केली.

'दिवसामागुनी दिवस चालले । ऋतु मागुनी ऋतु' (सुवासिनी) चित्रपटात आशाच्या स्वरांनी फुलविलेली विरही प्रीत मनात गलबल निर्माण करते. प्रत्येक कडव्याच्या शेवटी सेतू, केतू, ओतू या शब्दांवर स्वरांचे वजन ठेवून गायले आहे. त्यांनी अजरामर केलेल्या काही मराठी लावण्या...

- 'अत्तराचा फाया तुम्ही मला आना राया' - भाऊबीज
- 'ग बाई झोंबतो गारवा' - गणानं घुंघरू हारवलं
- 'नाचू किती लाजू किती' - सुगंधी कट्टा
- 'रेशमाच्या रेघांनी...' - मराठा तितुका मेळवावा
- 'या रावजी बसा भावजी' - नाव मोठं लक्षण खोटं
- 'गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय' - हेमंत कुमार यांच्या सोबत गायलेले कोळीगीत.
- 'जिवलगाSS राहिले दूर घर माझे' - यातील 'जिवलगा'एवढ्या एकाच शब्दाच्या उच्चाराने त्यांच्या गायकीची जातकुळी समजून येते. काय नजाकतीने त्या स्वर पेलतात! स्वरातून विविध भाव सहज प्रकट करतात.
- 'ऐन दुपारी यमुना तीरी खोडी उगी काढली' - (पडछाया) : या गाण्यात प्रियकर-प्रेयसीचा खेळकर शृंगार आशाताईंनी नटखट अंदाजात फुलविला आहे.
- 'जांभूळ पिकल्या झाडाखाली ढोल कुणाचा वाजवी' - (जैत रे जैत) : हृदयनाथ यांची चाल लोकगीताच्या बाजात स्वरांची अवखळ बांधणी करून सार्थ केली आहे.
- 'दळीता कांडीता' किंवा 'पंढरीनाथा झडकरी आता' अशी भक्तिगीते आशाताईंनी भक्तिरसात न्हावून गायिली आहेत.

अनेक पुरस्कारांच्या त्या मानकरी ठरल्या आहेत.

२००७ - ग्रॅमी अवॉर्ड. हा अवॉर्ड मिळणाऱ्या त्या पहिल्या भारतीय आहेत. २००० - दादासाहेब फाळके पुरस्कार. २००१ - जीवन गौरव पुरस्कार. २००८ - पद्मभूषण पुरस्कार. सर्वोत्कृष्ट गायिका म्हणून आठ वेळा फिल्म फेअर पुरस्कार. महाराष्ट्र सरकारकडून १५ पेक्षा जास्त पुरस्कार.

आशा भोसले यांनी सर्व भाषांतील मिळून १२ हजारांच्या वर गाणी गायली असून मराठीतही हजारो गाण्यांचे त्यांचे योगदान आहे. या लेखात त्यांच्या फक्त मराठीतील गायकी कारकीर्दीचा ऊहापोह केला आहे. अथांग सागरातील स्वररूपी जल, ओंजळीत घेऊन सागरालाच अर्पण करण्याचा हा क्षीण प्रयत्न. वयाच्या व काळाच्या ओघाला थोपवून धरीत त्या आजही गात आहेत. ८ सप्टेंबर २०२५ रोजी वयाची ९२ वर्षे त्या पूर्ण करीत आहेत. ज्येष्ठ कवयित्री अमृता प्रीतम यांनी म्हटल्याप्रमाणे 'अंबर की एक पाक सुराई' हे शीर्षक त्यांनी सार्थ केले आहे. आशा भोसले या गानरत्नाला 'भारत रत्न' हा पुरस्कार तसेच उदंड आयुष्य प्राप्त होवो, हीच ईश्वराकडे प्रार्थना करताना त्यांनी पंडितराव नगरकरांसोबत गायलेली अमर आळवणी आठवते...

'सांगा मुकुंद कुणी हा पाहिला...'

## कथा

**सचिन चव्हाण**
९१५८३९३२६०

## बेगड

खेड्यापासून थोड्याशा अंतरावर असलेलं पिंपळगाव तसं लहानसं, पण निसर्गसंपन्न. वडाच्या पारावर संध्याकाळी निवांत गप्पा झडायच्या. या गावातली खरी ओळख होती 'बेगड' म्हणजेच गावाची बैलजोडी. गावरान भाषेत बेगड म्हणजे एकजुटीची, समजुतीची आणि कष्टाची प्रतीक असलेली बैलजोडी. ही जोड 'नाग्या' आणि 'लाल्या'ची होती. ही जोडी होती हरिभाऊंची. हरिभाऊ गावातले एकमेव वाचनप्रिय शेतकरी. शेत आणि दोन मुलं ही त्यांची संपत्ती; पण त्यांच्या हृदयात या बैलजोडीसाठीही खास जागा होती. प्रेमाने वाढवलेली ही जोड होती. नाग्या जरा शांत, शिस्तीत काम करणारा तर लाल्याचा स्वभाव हट्टी पण दमदार. एकमेकांची साथ इतकी पक्की की रानात नांगरताना नांगरणं थांबतं, पण त्यांची एकसंध चाल थांबत नसे.

गावातली लहान मुलं त्यांना 'नागलाल' म्हणून हाक मारायची आणि दोघेही मान हलवून प्रतिसाद द्यायचे. पावसाळ्यात रानात उभे असताना त्यांच्या अंगावर पडणारे थेंब त्यांना थांबवत नसत. उन्हाळ्यात पाण्याच्या हंड्यासाठी साखर आणि मीठ दिलं की पुन्हा जोमात कामाला लागायचे.

एक वर्ष फारच कठीण आलं. पावसाने पाठ फिरवली. जमीन कोरडी पडली, विहिरी आटल्या आणि बैलांना चारा मिळेनासा झाला. हरिभाऊंचं मन बेचैन झालं. बैलांना दोन वेळा जेवण द्यायचंही अवघड झालं. मुलांचे शालेय खर्च, बियाण्यांचे उधार, सगळं डोक्यावर. एका संध्याकाळी हरिभाऊंनी चटईवर बसून पत्नीला विचारलं,

''गिरी, हे आपले बेगड विकायचे का तुकाराम शेटला. दोन लाख देतो म्हणतो.'' पत्नी गिरीबाई क्षणभर गप्प झाली. ती बैलजोडी म्हणजे हरिभाऊंचं मन होतं, हे तिलाही ठाऊक होतं. तरी हळूच म्हणाली,

''शेवटी पोरांची भूक आणि शाळा महत्त्वाची, पण तूच ठरव.'' हरिभाऊ तळमळला. सकाळ झाली. नागलाल अंगणात उभे होते. हरिभाऊंच्या डोळ्यात नकळत पाणी आलं. त्यांनी त्यांच्या कपाळावरून हात फिरवला. काही क्षणात त्यांनी निश्चय केला- 'माझ्या जोडीदारांना विकणार नाही. गरज पडली तर मी स्वतः मजुरी करीन, पण नागलाल माझेच राहणार!'

त्या रात्री हरिभाऊ गडबडीत गावातल्या समर्थ शेतकरी गटाच्या बैठकीला गेले. तेथे गावातल्या काही तरुण शेतकऱ्यांनी ठरवलं चारा छावणी सुरू करायची. कोणाच्या बैलांना विक्रीला जाऊ द्यायचं नाही. शासनाकडे अर्ज करून एकोप्याने सगळ्यांची जनावरं वाचवायची. हरिभाऊंचा आत्मविश्वास वाढला. त्यांनी आपल्या बैलजोडीची ओळख सांगून पुढाकार घेतला. गावातल्या सगळ्या शेतकऱ्यांनी हातमिळवणी केली. १५ दिवसातच गावाच्या जरा बाहेर एक चारा छावणी उभी राहिली. प्रत्येकाच्या जनावरांना वेळेवर चारा-पाणी मिळू लागलं. हरिभाऊ रोज सकाळी नागलालला घेऊन रानात जात. जरी शेती नांगरण्यासारखी नव्हती, तरी दोघांची एकत्र फिरण्याची सवय जपली.

एके दिवशी जिल्ह्याच्या कृषी अधिकाऱ्यांनी गावाला भेट दिली. त्यांनी बेगड पाहिलं, त्यांच्या ताकदीचं आणि संयमाचं कौतुक केलं. छावणीतील उपक्रमाला राज्य शासनाची मदत मिळाली आणि गावातल्या शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला. गावातल्या मुलांना 'नागलाल' म्हणजे कष्टाचे, सोबतीचे आणि नात्याचे प्रतीक वाटू लागले. शिक्षकांनी एकदा विचारलं,

''माणसाने कोणासारखं बनावं?'' तर एका मुलीने उत्तर दिलं,

''नाग्या आणि लाल्या सारखं. जे सोबत चालतात, कधी न थकता, न थांबता.''

दोन वर्षांनी पावसाळा पुन्हा भरभरून आला. रानं हिरवीगार झाली. नांगरणीचं काम सुरू झालं. हरिभाऊ पुन्हा त्यांच्या बेगडाला घेऊन शेतात गेले. त्यावेळी नाग्या आणि लाल्या नेहमीसारखेच, पण जरा वयस्कर वाटत होते. शेतात नांगरणी करताना हरिभाऊ थांबले. त्यांनी वाकून त्यांच्या गळ्याभोवती हात घातला. डोळे भरून आले. 'तुमच्यामुळेच मी माणूस म्हणून जगलो रे' असं म्हणून त्यांनी कपाळ टेकवलं.

आजही पिंपळगावात वडाच्या पारावर नागलालची गोष्ट सांगितली जाते. गावात एखादी बैलजोडी फार समंजसपणे काम करताना दिसली की गावकरी म्हणतात, 'खरं बेगड पाहायचं असेल, तर हरिभाऊंचं नागलाल पाहा.' कधी कधी आपली शान गाडीत नाही, तर जोडीच्या जोडीदारीत लपलेली असते.

## विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**
७२०८५५५४५८

# सर रामकृष्णपंत : स्मृतिशताब्दी

**राजकारण करण्यासाठी एक वेगळा स्वभाव लागतो. न्यायमूर्ती रानडे आणि लोकमान्य टिळक हे ज्ञानपिपासू आणि ज्ञानप्रसारक होतेच; पण त्यांनी आपली ऊर्जा राजकीय चळवळीकडे वळवली. रामकृष्णपंत हे देखील ज्ञानपिपासू आणि ज्ञानप्रसारक होते. आपल्या दीर्घ आयुष्यात त्यांनी अखंड ज्ञानसाधना केली. ऐतिहासिक घटनांचा प्रमाणशुद्ध अन्वयार्थ लावून प्राचीन भारताच्या इतिहासाची मांडणी कशी करावी, याचा आदर्श त्यांनी घालून दिला. २४ ऑगस्ट ही त्यांची स्मृतिशताब्दी.**



१८ जुलै १८५७ या दिवशी मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. त्याचे संस्थापक होते जॉन विल्सन, जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेट आणि डॉ. भाऊ दाजी. जॉन विल्सन हा विद्यापीठाचा पहिला कुलगुरू बनला. विद्यापीठ हे इंग्लंडमधल्या युनिव्हर्सिटी ऑफ लंडनच्या कित्त्यानुसार काम करेल, असे ठरवण्यात आले.

मुंबईत या आधीच दोन कॉलेजेस निघालेली होती. १८३५ साली एलफिन्स्टन कॉलेज सुरू झाले होते. हे विद्यार्थ्यांना बॅचलर ऑफ आर्टस्ची पदवी देत असे, तर ग्रँट मेडिकल कॉलेज १८४५ साली सुरू होऊन ते वैद्यकीय पदवी देत असे. १८५७ साली विद्यापीठ स्थापन झाल्यावर ही दोन्ही कॉलेजेस् विद्यापीठाला जोडण्यात आली. पुढे १८६२ साली मुंबई विद्यापीठातून पहिले चार विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडले. त्यातले एक होते महादेव किंवा माधव गोविंद रानडे. पुढच्या काळात ते न्यायमूर्ती रानडे या नावाने प्रख्यात झाले. दुसरे होते रामकृष्ण गोपाळ भांडारकर.

न्यायमूर्ती रानड्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याबद्दल खुद्द लोकमान्य टिळक लिहितात की, 'थंड गोळा होऊन पडलेल्या महाराष्ट्राला जिवापाड मेहनतीने पुन्हा जिवंत करण्याचे काम सर्वप्रथम रानड्यांनी केले.' इतिहास, भाषा आणि धर्म यांच्या संदर्भात हेच काम भांडारकरांनी केले, असे म्हणता येईल. भांडारकर घराणे मूळचे वेंगुर्ल्याचे. त्यांचे मूळ आडनाव पत्की. परंतु त्यांचा कोणीएक पूर्वज भांडाराचा म्हणजे खजिन्याचा प्रमुख असल्यामुळे भांडारकर हे आडनाव रूढ झाले. भांडारकर १८६२ साली मुंबई विद्यापीठाचे बी. ए. आणि लगेच १८६३ साली एम. ए. झाले. म्हणजे इंग्रज सरकारने सुरू केलेल्या नव्या विद्यांमध्ये ते पारंगत झाले. पण या आधी ते पुण्यात आणि मुंबईत परंपरागत भारतीय विद्याही उत्तम प्रकारे शिकले होते. सांख्य, न्याय, वैशेषिक, योग, पूर्व मीमांसा आणि उत्तर मीमांसा (म्हणजेच वेदांत) ही भारतीय विद्येची सहा शास्त्रे किंवा षट् दर्शने आहेत. यापैकी न्याय आणि वेदांत यांचा अभ्यास भांडारकरांनी पारंपरिक पद्धतीने शास्त्री पंडितांजवळ केलेला होता. त्याचप्रमाणे व्याकरण, संस्कृत, पाली, अर्धमागधी या भाषांचाही त्यांचा उत्तम अभ्यास होता. थोडक्यात रामकृष्ण भांडारकर हा तरुण पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन्ही विद्यांमध्ये पारंगत झाला. त्या वेळेला अनेक युरोपीय पंडित भारतासह पूर्वेकडच्या अनेक देशांचा, भाषांचा, संस्कृतींचा अभ्यास करून, त्यांच्या मताने त्यांचा अर्थ लावण्यात गुंतलेले होते. त्यांच्यामध्ये ब्रिटिश होते. फ्रेंच होते आणि जर्मन सुद्धा होते. त्यांना खरीखुरी ज्ञान मिळवण्याची इच्छा अगदीच नव्हती असे नव्हे; पण पूर्वेकडच्या देशांपेक्षा आमची पश्चिमी संस्कृती भाषा जरा जास्त श्रेष्ठ आहेत, असे दाखवून देण्याचा हेतू जरा जास्त होता. धर्मप्रचाराचा हेतूही होताच. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर पुण्या-मुंबईतले पाद्री लोक संत तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करून, त्यांना हवा तसा अर्थ लावून, संत तुकाराम हे कसे हिंदुधर्म विरोधी होते, असे सिद्ध करू पाहत होते.



भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे

भांडारकरांनी सर्वप्रथम संस्कृत भाषेची दोन शालेय पाठ्यपुस्तके लिहिली. त्यामुळे नव्या इंग्रजी पद्धतीच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संस्कृत शिकण्याची उत्तम सोय झाली. पुढे ते पुण्याच्या प्रसिद्ध डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक झाले. संस्कृत भाषा आणि एकंदरीतच पौर्वात्य विद्या किंवा प्राच्य विद्या यांच्या संदर्भात भांडारकरांनी पद्धतशीर काम सुरू केले. उपलब्ध साधनांची चिकित्सा, अभ्यास, जोडणी कशी करावी आणि कसल्याही अभिनिवेशाच्या आहारी न जाता निष्पक्ष, शास्त्रीय निष्कर्ष काढून त्याची मांडणी कशी करावी, याची एक उत्कृष्ट पद्धत त्यांनी विकसित केली. गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांनी, 'हिंदूंची पुराणे म्हणजे शिमगा' असे एककल्ली विधान केले होते. भांडारकरांनी ते सप्रमाण खोडून काढून पुराणांतल्या अद्भुत भासणाऱ्या कथांमध्ये पुष्कळ ग्राह्य गोष्टी आहेत, असे दाखवून दिले.

सन १८७४ साली लंडनमध्ये 'इंटरनॅशनल कॉंग्रेस ऑफ ओरिएंटलिस्ट' म्हणजे आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या विशारदांची परिषद भरली होती. इजिप्तच्या पिरॅमिडस्मध्ये जी चित्रलिपी सापडते तिला हायरोग्लीफ्स असे म्हणतात. सन १८०१ मध्ये इजिप्तवर चाल करून गेलेल्या नेपोलियनच्या फ्रेंच सैन्याला एक शिलालेख सापडला. त्याला म्हणतात 'रोझेटा स्टोन.' या शिलालेखामुळे हायरोग्लीफ्सचा उलगडा करता आला. तो रोझेटा स्टोन या लंडनच्या परिषदेत मुद्दाम सर्वांना पाहायला ठेवण्यात आला. विशेष म्हणजे त्याच परिषदेत भांडारकरांचा नाशिक येथील सातवाहनांच्या शिलालेखावरील शोध लेख वाचला गेला.

लक्षात घ्या, हा १८७४ चा काळ आहे. या काळात इंग्रज सरकार भारतातली आपली सत्ता अधिकाधिक दृढ करण्याच्या प्रयत्नात होते. त्याच वर्षी महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. पण त्याकडे दुर्लक्ष करून इंग्रज सरकार भारताची लूट करण्यात मग्न होते. आणि त्याच वर्षी गुलाम भारतातल्या एका विद्वानाचा महत्त्वपूर्ण लेख खुद्द लंडनमधल्या एका परिषदेत वाचला जात होता. म्हणजे आयोजक तो डावलून बाजूला ठेवू शकत नव्हते.

तुकाराम महाराजांच्या अभंगांच्या अर्थाच्या संदर्भातही भांडारकरांचे चिंतन महत्त्वाचे आहे. तसेच पाली आणि अर्धमागधी भाषांवरील प्रभुत्वामुळे त्यांनी बौद्ध धर्मावरही चिकित्सक लेखन केले.

धर्म हा भांडारकरांच्या चिंतनाचा खास विषय होता. बायबलमध्ये एकच देव आहे. एकाच देवाची उपासना आहे. आमच्याकडे अगणित देव आणि असंख्य उपासना पद्धती आहेत. त्यामुळे पाद्री लोक आम्हाला भारी पडतात. म्हणून आपणही एकेश्वरी उपासना पंथ काढून पाद्रींना उत्तर दिले पाहिजे. अशा काहीशा भावनेतून बंगालमध्ये राजा राममोहन राय यांनी ब्राह्मो समाज काढला. त्यांचे एक अनुयायी केशवचंद्र सेन यांनी महाराष्ट्रात दौरा करून प्रवचने दिली. त्या प्रभावातून महाराष्ट्रात 'प्रार्थना समाज' स्थापन झाला. रामकृष्णपंत १८६९ साली त्याचे सभासद झाले. पण वेद उपनिषदे, गीता, साधुसंतांची वचने यांचा आधार घेऊन, स्वतः पदे, कविता, रचून संस्कारविधी तयार करून प्रार्थना समाजाची वैचारिक तत्त्वे पक्की करण्याचे काम भांडारकरांनी केले.

भांडारकरांचे संशोधन कार्य जसे महाराष्ट्राला आवडले, तसे हे धार्मिक कार्य मात्र फारसे पसंत पडले नसावे. कारण सर्वशक्तिमान परमेश्वराला मानणारा, पण मूर्तिपूजा अमान्य करणारा प्रार्थना समाज महाराष्ट्रात फारसा लोकप्रिय होऊ शकला नाही.

भांडारकरांची ज्ञानसाधना मात्र अखंड सुरू होती. १९११ साली इंग्रज सरकारने त्यांना 'सर' हा किताब दिला. त्यांच्या हयातीतच, त्यांच्या ८०व्या वाढदिवशी, १९१७ साली त्यांच्या शिष्यांनी पुण्यात 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर' स्थापन केले. आयुष्यभर अखंड विद्याव्यासंग केलेल्या या ऋषितुल्य महापंडितांचे निधन २४ ऑगस्ट १९२५ या दिवशी, वयाच्या ८८व्या वर्षी वार्धक्याने झाले. त्यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त नम्र अभिवादन.

*(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)*

# ठकासी व्हावे ठक!

(पान १ वरून)

'जागतिक दक्षिणे'चे अर्थात ग्लोबल साऊथचे महत्त्व समजून घेत मोदी यांनी चीनमधील तियानजिन येथे मध्य आशिया, युरेशिया, दक्षिण आणि पूर्व आशियातील अनेक देशांच्या नेत्यांसोबत बैठका घेतल्या आणि परस्परसंबंध मजबूत करण्याबद्दल चर्चा केली. मोदी आणि जागतिक नेत्यांची ही बैठक 'एससीओ'पेक्षा वेगळी आहे. तिचा उद्देश संबंधित देशांसोबत आर्थिक आणि धोरणात्मक भागीदारी मजबूत करणे आणि विस्तारणे आहे. परिषदेला उपस्थित असतानाच मोदी यांनी म्यानमारच्या नेत्यासोबत द्विपक्षीय चर्चा केली आणि व्हिएतनाम, लाओस, नेपाळ, मालदीव, बेलारूस, आर्मेनिया, कझाकिस्तान, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान, उझबेकिस्तान आणि इजिप्तच्या नेत्यांसोबतही चर्चा केली. यादरम्यान दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला आणि परस्पर सहकार्याच्या अनेक क्षेत्रांबद्दल भविष्यातील शक्यतांचाही विचार केला. यामध्ये विकास क्षेत्रातील भागीदारीपासून संरक्षण, सुरक्षा आणि सीमा व्यवस्थापन, सीमा व्यापार अशा मुद्यांचा समावेश आहे. पंतप्रधानांनी घेतलेल्या इतर महत्त्वाच्या बैठकांमध्ये मध्य आशियाई आणि युरेशियन देशांच्या नेत्यांसोबतची त्यांची बैठक समाविष्ट आहे. भारताला या देशांकडून नैसर्गिक संसाधने मिळवायची आहेत आणि त्या देशांमध्ये स्वतःसाठी नवीन बाजारपेठाही शोधायच्या आहेत. अमेरिकेच्या वाढीव आयात शुल्कामुळे निर्यातीवर होणारा परिणाम भरून काढण्यासाठीची ही पावले उपयोगी पडणार आहेत.

*(लेखक राज्यशास्त्र आणि संरक्षणशास्त्र या विषयांचे अभ्यासक आहेत.)*

# भारतीय दुग्ध व्यवसायावर अमेरिकेची नजर का?

(पान १ वरून)

येईल. आजही भारत १,४५,००० कोटी रुपयांचे खाद्यतेल आयात करतो. शेती मुक्त झाली तर शेतकरी निश्चितपणे तूट भरून आयात थांबवू शकेल. आणि परकीय चलनाची बचत करू शकेल. शेतकऱ्यांवर विश्वास ठेवल्यास आपण हे निश्चित करू शकतो, पण त्यांना विश्वासात घेण्याऐवजी अद्याप आपले सरकार चीन, जपान आणि रशियाच्या मागे लागून अमेरिकेचा डाव उलटवण्याचा प्रयत्न करत आहे. हा प्रश्न गांभीर्याने लोकांसमोर चर्चिला जायला हवा, सरकारचे धोरण बदलण्यासाठी लोकांनी पुढाकार घ्यायला हवा.

आज भारत निर्यात करून जगाच्या गरजा भागवू शकत असताना म्यानमार, मलेशिया आणि इंडोनेशिया यांच्याकडून खाद्यतेल आयात करतो. ही आयात थांबवली तर परकीय चलनाची बचत होऊन प्रगती साधता येऊ शकते. प्रगतशीलही नसलेले हे देश आपल्याला निर्यात करू शकतात तर आपली अडचण काय आहे? यासाठी भारतीय शेती आणि पूरक व्यवसाय म्हणून दूध उत्पादन व्यवसायाला मुक्त करण्यासाठी शरद जोशींप्रमाणे चळवळ उभी करण्याची आवश्यकता आहे.

## सुखात्म


**डॉ. अविनाश भास्कर मोहरील**
९४२३१२३९०६


# आनंदाश्रू

त्या दिवशी माझ्या मुलाने युट्युबवर फार प्रसिद्ध असलेला एक टेलिव्हिजन शो दाखविला. तो बरेच वेळा संबंधित शो बघत असतो. नेमका हा काय बघतो, याबद्दल जाणून घेण्यासाठी त्याच्या सोबत जरा वेळ बसलो. अमेरिकेमध्ये अतिशय प्रसिद्ध असलेला 'अमेरिकाज गॉट टॅलेंट' नावाचा तो कार्यक्रम. भारतातही आता अशा प्रकारचे टी.व्ही. शो सुरू झाले आहेत; ज्यामध्ये विविध क्षेत्रामध्ये तरबेज असलेले लोक आपली कला सादर तरतात व नंतर परीक्षक आणि जनतेकडून वोट मागून या सर्व लोकांमधून विजेता घोषित केला जातो. त्या शोच्या अंतिम राऊंडमध्ये दोन मुलींची निवड झाली होती. एक होती १३ वर्षांची डार्सी लेन, जी बोलक्या बाहुल्यांसोबत अप्रतिम सादरीकरण करीत होती आणि दुसरी ९ वर्षांची अँजेलिका हेल, जी गायन करीत होती. अँजेलिकाचे सादरीकरण जेव्हा सुरू होते, तेव्हा त्या सबंध सभागृहातील प्रत्येक जण व कदाचित तो शो अमेरिकेतच नव्हे, तर जगभर बघणारा प्रत्येक जण थरारून गेला होता. इतक्या छोट्या वयाच्या मुलीकडून एक इंग्रजी गाणे अतिशय सुरात आणि सर्व लकबींसह ऐकताना प्रत्येकाला आश्चर्य आणि कौतुक अशा संमिश्र भावनांचा अनुभव येत होता. ते सर्व बघत असताना माझे डोळे भरून येण्यासाठी कारणीभूत ठरलेले एक चित्र जे मला सहजच बघायला मिळाले. त्या मुलीचे सादरीकरण संपल्यावर तेथे उपस्थित सर्वांनी तिला उभे राहून मानवंदना दिली. हॉलिवूडच्या एका प्रख्यात अभिनेत्याने जवळ घेऊन तिचे भरभरून कौतुक केले. त्या चिमुकलीच्या आयुष्यातील तो फारच मोठा प्रसंग होता. कॅमेरा फिरत होता आणि फिरता फिरता तो अचानक त्या चिमुकलीच्या आई-वडिलांच्या चेहऱ्यावर स्थिरावला. आपल्या मुलीचे होणारे कौतुक आणि तिने गाजविलेला पराक्रम बघून त्या दोघांच्याही डोळ्यातून आनंदाश्रू वाहत होते. त्या दोघांना झालेला आनंद खरोखरीच गगनात मावत नव्हता. एकमेकांना घट्ट बिलगून त्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली होती. काही क्षणच तो कॅमेरा त्यांच्या चेहऱ्यावर होता, परंतु त्या संपूर्ण कार्यक्रमातील ते एक फारच सुंदर चित्र होते, जे बघून माझेही डोळे भरून आले. कुणीतरी मागे मला म्हणाले होते की, असल्या कार्यक्रमांमध्ये आई-वडिलांनी कधी रडायचे, किती रडायचे वगैरे ठरलेले असते. ठाऊक नाही. परंतु त्या कार्यक्रमात ज्या लहानग्या म्हणजे केवळ नऊ वर्षाच्या त्या मुलीचे जागतिक पातळीवर एवढे कौतुक होताना तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यात येणारे अश्रू ठरवून आणले असतील, असे मी अजिबात मान्य करायला तयार नाही. कारण आपल्या मुला-मुलींच्या कर्तृत्वाने मनोमन धन्यतेचा अनुभव घेणारे जगातील कोणतेही पालक आपल्या पोटजनाच्या कौतुकाच्या वेळी भावनाविष्काराचे नाटक करू शकतील, ही सुतराम शक्यता नाही. ते तर अतिशय प्रामाणिक आणि सच्चे भावनिक प्रकटीकरण होते. त्यातील सच्चेपणामुळेच ते माझ्याही हृदयापर्यंत पोहचू शकले व नकळत माझेही डोळे पाणावले.



आपल्या कर्तृत्वाने आपल्या आई-वडिलांना किती आणि कसा आनंद होऊ शकतो, हे जर मुला-मुलींना त्याच्या विद्यार्थिदशेमध्येच कळले तर काय धमाल होईल. एक अफलातून स्वप्न सर्वच मुला-मुलींना देण्यासाठी माझ्या मनात तयार झाले. ते स्वप्न म्हणजे आयुष्यात काही होवो अथवा न होवो; किमान एकदा तरी आपल्या जन्मदात्या आईला आणि पित्याला आपला अभिमान वाटावा आणि आपल्या कर्तृत्वाने त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू यावेत, असा क्षण त्यांना जगायला द्यावा. त्यासाठी कितीही कष्ट घ्यावे लागले तरी चालतील, पण आई-वडिलांनी आपल्याला या जगात आणून जे अस्तित्व प्रदान केले, त्याची उतराई होणे तर कुणालाच शक्य नाही; निदान आपल्याबद्दल अभिमान वाटावा असा एक तर क्षण आपल्याला निर्माण करता आला तर तो एक अतिशय सकारात्मक भाग ठरू शकतो. त्यामुळेच जीवनाला खरा अर्थ प्राप्त होत असतो. असा विचार करणारी मुले-मुली आपल्याला घडवावी लागतील. कारण कधी कधी तर आई-वडिलांना अपमानित करण्याचे क्षण जेव्हा त्यांच्या जीवनात त्यांचीच पोरे आणून ठेवतात तेव्हा मात्र या मुलाला किंवा मुलीला जन्म दिल्याबद्दल पश्चात्तापाशिवाय त्यांच्याकडे काही उरत नाही व त्यांना हताश व्हावे लागते.

साधारण तीन वर्षांपूर्वी असाच पश्चातापदग्ध बाप माझ्यासमोर बसून माझ्या कक्षामध्ये जेव्हा लहान मुलासारखा ढसाढसा रडला व त्यावेळी अतिशय असंवेदनशील बनून त्याची मुलगी बाजूने निर्विकारपणे बापाचे रुदन चेहऱ्यावरची रेषही न हलविता बघत होती, तेव्हा मात्र मला त्या बापाचा खरोखरीच कनवाळा आला. कुठल्या तरी एका टवाळखोर मुलावर प्रेम आहे म्हणून घरातून निघून गेलेली ती मुलगी जिचा बाप तिला घरी येण्यासाठी विनवणी करत होता व ती ठामपणे त्याला नकार देत होती.

''मी सज्ञान आहे आणि तुम्ही माझ्यावर जबरदस्ती करू शकत नाही. माझे त्याच्यावर प्रेम आहे आणि मला त्याच्यासोबतच राहायचे आहे. तो सध्या खूप कमावत नसला, तरी तुमच्यापेक्षा जास्त पैसे कमावण्याची त्याच्यात धमक आहे. मी त्याच्याबद्दल विचारले होते तेव्हा तुम्ही मला होकार दिला नाही म्हणून मी त्याच्याच सोबत लग्न केले आणि आता मी त्याच्यासोबतच राहीन. तुम्ही काहीही म्हणाले तरी मी ऐकणार नाही'', या पद्धतीची वाक्ये ती आपल्या जन्मदात्याला माझ्या समक्ष ऐकवित होती.

''झाले गेले विसरून जा आणि घरी ये. मी त्या मुलासोबतच तुझे विधिवत लग्न लावून देतो. यामुळे समाजात आमची पत राहील आणि तुझ्यापाठी असलेल्या दोन्ही बहिणींची लग्ने व्यवस्थित होतील. नाहीतर तुझ्या या अशा पद्धतीच्या लग्नामुळे त्यांची लग्ने कशी होतील, याची मला चिंता वाटते आहे. म्हणून मी तुझ्या हवे तर पाया पडतो, पण घरी चल. आपण सर्वजण बसून ठरवू आणि तुझे पुन्हा लोकांसमक्ष लग्न कसे लावता येईल, याबाबत विचार करू. तू घरी चल. सर, तुम्ही तरी हिला समजावून सांगा,'' अशी विनंती मला करून तो साधारण पन्नाशीचा व्यक्ती पाच वर्षाच्या लहान मुलासारखा रडू लागला. मलाच कसेतरी झाले. त्याच वेळी माझी त्या मुलीकडे नजर गेली. ती अत्यंत बेमुर्वतपणे, कोणतीही खंत किंवा वडिलांची अशाप्रकारे होणारी अवहेलना बघूनही जणू काही 'मला काय त्याचे' या थाटात उभी होती. काही वेळाने मी तिला बाहेर पाठवून दिले. तिला समजावण्याचा मी प्रयत्न करतो, असे बळेबळेच आश्वासन देऊन मी त्या पालकाला पाठवून दिले. मनात मात्र तोच तो विचार सारखा घोळत राहिला. आपल्या वडिलांच्या डोळ्यात दुःखाश्रू बघूनदेखील तिचे मन द्रवले नाही. अशा प्रकारची असंवेदनशीलता मुला-मुलींच्या ठायी का निर्माण होते. कारण त्यांना आई-वडिलांच्या डोळ्यात त्यांच्या कर्तृत्वाने येणाऱ्या आनंदाश्रूंची किंमत आणि महत्त्वच कळलेले नसते.

आपल्या आई-वडिलांना आणि त्यांच्या आपल्यासाठीच्या मनस्वी भावना समजून घेण्याचे तंत्र मुलांना आत्मसात करण्याची गरज आहे. त्यांच्यामध्ये या संवेदनशीलतेची कमतरता असण्याचे एक कारण म्हणजे त्यांच्या आजूबाजूने संपूर्णपणे व्यावहारिकता बाळगणारे जग बनलेले आहे. त्या व्यावहारिक जगतात अशा प्रकारचे एखादे स्वप्न मुला-मुलींच्या मनात वसविता आले तर! प्रत्येक आई-वडिलांच्या जीवनात किमान एकदा असे अभिमानी आनंदाश्रू वाहतील. त्या प्रत्येक आई-वडिलांसाठी किती भाग्याचा क्षण असेल तो! आपले विद्यार्थी-विद्यार्थिनी हा क्षण आपल्या आई-वडिलांना देतील? कारण त्या क्षणाशिवाय त्यांच्या आई-वडिलांना त्यांच्या मुलाबाळांकडून खरोखरीच काहीही नको असते.

## प्रबंधांची बीजे


**श्रीरंग श्री. हिर्लेकर**
९४२२११८९३


# परिणामकारक लेखनाची सप्तपदी

आश्चर्य वाटेल, पण अनेक वर्षांपूर्वी एका प्रतिष्ठित लेखकाने 'विनोदाचे शास्त्र' या विषयावर व्यासंगपूर्ण प्रबंध लिहून आचार्य पदवी प्राप्त केली होती. याचप्रमाणे लेखन कसे करावे याचे मार्गदर्शन हाही एक प्रबंधाचा विषय होऊ शकतो. लेखन करावयाचे म्हटले की, अनेकांना ही आपल्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे असे वाटते. अगदी सुशिक्षित म्हणवणारेही चार ओळी लिहिताना गडबडतात. साधे घरगुती पत्र किंवा खरेदीची यादी करतानाही अडखळतात. भरपूर वेळ घेऊन, चार-पाच कागद फाडून फेकल्याशिवाय त्यांचे होत नाही. यानंतरही महत्त्वाचे काही लिहावयाचे राहतेच. लिखाणात संदिग्धता दिसते. साधी बँकेची स्लिप किंवा एखादा फॉर्म कोणाचीही मदत न घेता भरणे तर त्यांच्या दृष्टीने दिव्यच. वास्तविक फॉर्म भरणे 'रिकाम्या जागी योग्य शब्द भरा' इतके सोपे असते. शालेय अभ्यासक्रमात याची तयारी करून घेतलेली असते. मित्राला पत्र लिहा, वडिलांना पत्र लिहून पैसे मागवा, सहलीचे वर्णन करा, सुटीचा अर्ज करा, छत्रीचे आत्मवृत्त लिहा, निबंध लिहा इ.



हे लेखनाचे झाले; पण अनेकांना अगदी सोप्या भाषेत लिहिलेलेही कळत नाही. कारण अक्षरे, त्यापासून तयार झालेले शब्द, वाक्ये, ध्वनित होणारा अर्थ यांची संगती लावून विषय अभ्यासणे ही कला आहे. शब्दांचे अर्थ ऐकण्या-बोलण्यामुळे परिचित झालेले असतात, पण तेच शब्द कागदावर दिसले की तारांबळ उडते. यामागे मानसशास्त्रीय आणि मेंदूच्या कार्यपद्धतीचे कारण आहे. शब्दाचे नाते कानाशी असल्याने अनेकांना कागदावरील त्याचे दृश्य रूप आकलन होण्यास अडचण जाणवते. कल्पनेतील आशय हा परा, पश्यन्ति, मध्यमा हे तीन टप्पे ओलांडत जीभेवरून बाहेर पडतो. येथे जीभेऐवजी लेखणी असते. कल्पनेतील आशयाला अक्षरांच्या आकृतिबंधात उमटवण्याची क्रिया करावी लागते. बोलताना जिभेने आणि ऐकताना कानांमार्फत शब्द जितके सहज आत्मसात होतात तितके डोळ्यांनी त्या शब्दांच्या अक्षराकृती कागदावर वाचून अर्थबोध होणे हे कठीणच.

ज्यांना लेखनाची सवय आहे त्यांची सवय विकसित व्हावी, लेखन अधिक दर्जेदार व्हावे, प्रतिपाद्य विषय वाचकाला नेमका कळावा, 'लेखकाचे हृदयीचे वाचकांचे हृदयी जावे' या दृष्टीने काही महत्त्वाचे मुद्दे सांगणे या दृष्टीने आता विचार करू.

**१) बोलण्यापेक्षा लिहिणे सोपे** : पुरेसे स्टेज डेअरिंग असले, तरी बोलण्यापेक्षा लेखन सोपे आहे. कारण शब्द हे असे शस्त्र आहे की ते परत घेता येत नाही. 'यद् गत्वा न निवर्तन्ते' गेलेला जीव परत येत नाही तसाच उच्चारलेला शब्दही परत येत नाही. लेखनाचे तसे नसते. संगणक आल्यापासून तर अजिबातच नाही. लिहिलेला शब्द खोडणे, त्या जागी नवीन लिहिणे, सबंध वाक्यच काय, पण परिच्छेदही बदलणे, वरचा खाली आणि खालचा वर करणे हे लेखनात शक्य आहे. वक्तृत्वात जे काम चेहऱ्यावरील हावभावाचे, शब्दफेकीचे, तेच लेखनात योग्य विरामचिन्हे, हव्या त्या शब्दाला ठळक करणे, इटॅलिक अक्षरांमुळे होते. त्यामुळे लेखकाच्या मनातील नेमका भाव मांडणे सोपे होते.

**२) अभ्यासेवीण बोलू नये** : 'प्रकट होओनि नासावे, बरे नव्हे।' आपल्याला काही सांगावयाचे आहे त्याचा पुरेसा अभ्यास असणे ही सर्वात प्राथमिक गोष्ट आहे. आडातच नसेल तर पोहोऱ्यात कोठून येणार? हे म्हणजे एका आंधळ्याने दुसऱ्याला वाट दाखवण्यासारखे होईल. लेखन कसे करावे यावर समर्थांनी विस्तृत लिहिले आहे. 'दिसामाजी काहीतरी ते लिहावे' असे सांगणारे समर्थ प्रसंगी 'अखंडित वाचीत जावे' असे लिहितात.

**३) चिरस्थायी लेखन** : कागदाची खरी किंमत साक्षरापेक्षाही निरक्षरालाच अधिक असावी. निरक्षर लोक कागद खूप जपून ठेवतात. लेखन हे यावतचंद्रसूर्यदिवाकरौ शाश्वत राहते. म्हणून फक्त अक्षरओळख असलेले सही करताना फार आढेवेढे घेतात आणि केलीच तर आपण काही भलत्याच गोष्टीला मान्यता तर दिली नाही, या शंकेने अस्वस्थ होतात.

**अर्थसंकेत पाळावेत** : अतिपरिचयात् अवज्ञेमुळे सुशिक्षित मात्र अतिशय बेपर्वाईने लिहितात. आपण काय लिहितो, त्यातून कोणते अर्थ व्यक्त होतात याकडे त्यांचे लक्ष नसते. शब्दाला अनेक प्रकारे अर्थ प्राप्त होतात. सरल अर्थ, लाक्षणिक अर्थ, व्यंगार्थ इ. त्यामुळे अर्थ जरी तोच असला, तरी कोणता शब्द कधी योजावा, याचे भान हवे. उदा. शुभ पूजेनंतर केली जाते ती उत्तरपूजा तर श्राद्धविधीतील पूजेला उत्तरक्रिया म्हणतात. श्राद्धात थोड्या अन्नाला पिंडाएवढा म्हणणे ठीक, पण लग्नाच्या पंगतीत पिंडाएवढे वाढा म्हणणे चूकच. हे म्हणजे सिगारेट लायटरचा उपयोग देवापुढील निरंजन लावायला करणे होईल.

**४) विषयाकडे लक्ष द्यावे** : ध्रुवपद सोडू नये. त्याच अनुषंगाने लिहावे. शीर्षक म्हणजे तंबोऱ्याचा स्वर किंवा काळी पांढरी पट्टी, रागाचे कायदे. लक्ष्मणरेषा ओलांडू नये. नाहीतर लेखनाचा पदर ढळतो. लिहिण्याच्या ओघात अनेकदा विषयांतर होते. इतके की, 'अरेबियन नाईटस्' कथेप्रमाणे एकातून एक, त्यातून दुसरी-तिसरी अशी भटकंती होते, मूळ कथावस्तू हरवते. जे लिहावयाचे ते नेमके आणि नेटके लिहावे. लेखन पूर्ण होताच पूर्वी ठरलेल्या शीर्षकात थोडा बदल करावा लागतो. तो करावा. मात्र हे आकर्षक पॅकिंगमध्ये वस्तू सादर करावी इतपतच असावे.

**५) सहजतेत सौंदर्य** : अनेक संदर्भ देऊन आपल्या विद्वत्तेची जाहिरात करण्याची अनेकांना हौस असते. तसे करणे टाळावे. काही विशिष्ट ठिकाणी संदर्भ द्यावेच लागतात. उदा. कायदेशीर गोष्टी, आकडेवारी. ते आवश्यक असते. भाषेत कृत्रिमता नको. कौतुक करावयाचे तर साध्या सोप्या भाषेत करावे. मोठमोठी विशेषणे वापरू नयेत. नाटकीपणा कोणता आणि मन:पूर्वक कोणते ते चाणाक्ष वाचक ओळखतात. अलंकार वापरावेत, पण ते बोजड न वाटता भाषासौंदर्य वाढवणारे असावेत. मोरोपंत आणि गडकरी यांच्यावर होणारा आरोप खरा आहे. दोघेही अतिशय जड लिहीत. विद्वानांचे ठीक, पण सामान्य वाचकांची त्यामुळे ओढाताण होते. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांवरही आरोप केला जातो की, ते एकात एक खूप दृष्टांत किंवा उदाहरणे देत. अर्थात त्यामागे कारणे होती. त्यांच्यासमोर ज्ञानी पंडितही होते आणि सामान्य शेतकरीही होते. एकाच वेळेस विद्वानांच्या पगड्या आणि सामान्यांचे मुंडासे डोलावयास लावणे, हे त्यांचे सामर्थ्य होते.

स्वत:ची शैली विकसित करावी : अनुकरण करू नये. सुरुवातीच्या काळात सैगलचे अनुकरण मुकेशने केले. नूरजहाँचे लता मंगेशकरांनी केले; पण लवकरच दोघांनीही स्वत:ची शैली विकसितच नव्हे तर प्रस्थापित केली. सुरुवातीच्या काळात पु. ल. देशपांडेंमध्ये गडकरींचा भास व्हायचा. उदा. त्यांचे अंगुस्तान विद्यापीठ, रेल्वे, किंवा पानवाला हे लेख. पुढे पु.ल. बदलले. मी तर असे म्हणेन की, सुरुवातीला दोघांत इतके साम्य होते की, दुर्दैवाने गडकरी जर लवकर गेले नसते तर त्यांनी उत्तर आयुष्यात पु.लं. सारखे लिहिले असते. गडकरी, अत्रे आणि पु.ल. या तिघांचेही लेखनातील गोत्र एकच, पण प्रवर निराळे. प्रवर्तन करते ते प्रवर. म्हणून साम्य असावे, पण अनुकरण नको.

**६) वाचकांची उंची** : आपला वाचक वर्ग कोणता, याचे लेखकाने भान ठेवावे. 'अहं ब्रह्मास्मि' या पाच अक्षरातून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान समजणारे ऋषी परमज्ञानी होते. तेच तत्त्वज्ञान पुढे ईशावास्यात २० श्लोकात विस्तारले. तुलनेने अर्जुन कमी तयारीचा म्हणून त्याच्याकरिता तेच ७०० श्लोकात कृष्णाने विकसित केले आणि माउलींनी तेच सर्वसामान्यांकरिता ९००० ओव्यात पसरवले. अमृतानुभव लिहिणारे ज्ञानेश्वर तेच, त्यांनीच ज्ञानेश्वरी लिहिली आणि हरिपाठही त्यांनीच सांगितला. तिन्ही ठिकाणची शैली, भाषाप्रयोग इतकी भिन्न की, हे सर्व लिहिणारे ज्ञानेश्वर एकच की तीन अशी भ्रांत व्हावी. भाषेवर अशी पकड पाहिजे की, वाचकांची निकड बघून लिहिता आले पाहिजे.

**७) भाषाशुद्धी आणि व्याकरण** : हा सर्वांत गंभीर आणि तरीही सर्वात जास्त दुर्लक्षित मुद्दा आहे. एकच भाषा, पण गावोगावी तिचे व्याकरण आणि स्वरूप बदलते. एका प्रांतातील वाक्प्रयोग इतरत्र समजणे अवघड होते. त्यांची कारणे, कोण चूक कोण बरोबर हा विषय येथे नाही, पण तरीही व्याकरणाचे नियम मोडू नयेत. भाषेचा उपयोग जरी आपले म्हणणे दुसऱ्याला समजावणे हा असला, तरी व्याकरण पाळले नाही तर भाषा वैश्विक न होता व्यक्तिगत आणि अस्ताव्यस्त होईल. अनेकदा काही शास्त्रीय संदर्भ येतात. पारिभाषिक शब्दांचा अर्थ स्पष्ट करावा. वृत्तपत्रातील हौशी कथाकारांमध्ये एक दोष नेहमी लक्षात येतो की, आधी तृतीय पुरुषी निवेदन स्वरूपात असलेली कथा अचानक रूळ बदलून प्रथमपुरुषी होते. कर्तरी आणि कर्मणी प्रयोगांची सरमिसळ दिसते. घरगुती कथेत मागचा-पुढचा संदर्भ न देता एकदम एखाद्या व्यक्तीचे नाव येते. मध्येच वाक्य येते- 'संपदाने असे म्हटले.' वाचकाला काय कळणार की, संपदा ही कोणाची कोण? त्यामुळे कथा लिहिताना हे गृहीत धरून लिहावे की, वाचक हा लेखकाच्या घरगुती नातेसंबंधाशी अपरिचित आहे. मूळ विषयाला येण्यापूर्वी अनेकदा पाल्हाळ दिसते. ते नसावे आणि एकदम विषयावरही येऊ नये. थोडक्यात म्हणजे आपला वाचक वर्ग कोण ते लक्षात घेऊन लिहावे तरच लेखन सुगम आणि प्रभावी होईल.



# पितृऋणाला आदरांजली


**वैष्णवी कुलकर्णी**


**सांपत्तिक, आध्यात्मिक, वैचारिक संस्कार यांच्या पाठबळावरच प्रत्येकाचा जीवनपट आकार घेतो. म्हणूनच पूर्वजांचे उपकार, उपदेश, दूरदृष्टी, आपल्याला उपकृत करत असते. अशा या उपकाराची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती आदरांजली व्यक्त करणारा पितृपंधरवडा विशेष ठरतो. समाजातला एक वर्ग या काळात नवी खरेदी, मंगल कार्याचा शुभारंभ करत नाही. पण हळूहळू या समजुतीत बदल घडत आहे.**

विश्वाच्या या प्रांगणात आपलं अस्तित्व किती क्षणभंगूर आहे, याची नेमकी जाणीव सामान्य माणसाला आहे. आपली वाटचाल सुकर करण्यास, जगणं सुसह्य करण्यास पूर्वजांची पुण्याई कशा प्रकारे साह्यभूत ठरते याची त्याला कल्पना आहे. त्यामुळेच मनुष्य हा आपल्या वंशावळीचा सार्थ अभिमान असणारा आणि पूर्वजांचं पावन स्मरण ठेवणारा जीव आहे. जगभरातला प्रत्येक समाज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने आपल्या पूर्वजांप्रती आदरांजली व्यक्त करताना दिसतो. एकत्र येऊन घरातल्या दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करताना दिसतो. आपल्याकडे पितृपंधरवड्यामध्ये पितृकर्म पार पाडून ही प्रथा जपली जाते. आधीच्या पिढीने लावलेल्या रोपांचे वृक्ष होऊन त्याची मधुर फळं पुढच्या पिढीने चाखावीत; त्याच पद्धतीने आधीच्या लोकांनी घेतलेल्या कष्टांमुळेच आजच्या पिढीचं जगणं सुकर होत असतं. सांपत्तिक, आध्यात्मिक, वैचारिक तर कोणी कलासक्तीचे संस्कार देऊन पुढच्या पिढीसाठी समृद्ध पृष्ठभूमी तयार केलेली असते. काही अपवाद वगळता बहुतांश लोक या पूर्वपीठिकेवरूनच आपला जीवनपट सुरू करतात आणि आपल्या कामगिरीने तो रंगवतात. म्हणूनच पूर्वजांचे उपकार तसंच उपदेश दूरदृष्टी, गुणग्राहकता आणि द्रष्टेपणा आपल्याला उपकृत करत असतो. अशा या उपकाराची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती आदरांजली व्यक्त करणारा पितृपंधरवडा विशेष ठरतो.

शास्त्राने सांगितलेले श्राद्धविधी या पंधरा दिवसांमध्ये पार पडतात, ते शक्य नसल्यास यथाशक्ती दानकर्म केलं जातं. सध्या गरजूंना आवश्यक त्या स्वरूपात मदत करुनही लोक पितृऋणाचा मान ठेवताना दिसतात. त्यामुळेच आता एकीकडे पारंपरिक पद्धतीने तर दुसरीकडे आधुनिक जाणिवांनिशी या १५ दिवसांकडे पाहिलं जातं. पण उपचार कुठलेही असले तरी ते करताना स्वर्गवासी पूर्वजांचं स्मरण असतंच. पूर्वी हे दिवस शुभकार्यासाठी निषिद्ध मानले जायचे. आजही बऱ्याच अंशी ही समजूत कायम आहे. त्यामुळे या दिवसांमध्ये कोणी आवर्जून शुभकार्य पार पाडताना दिसत नाही, पण तत्पश्चात सुरू होणाऱ्या उत्सवपर्वाची आणि त्यानंतरच्या लग्नसराईची पूर्वतयारी म्हणून हा काळ भलताच उपयुक्त ठरतो. श्रावणसोहळा आणि गणेशसोहळा आटोपल्यानंतर एक उसंत देणारे हे दिवस काहीसे संथ असतात असं काही लोक म्हणतात. कारण ते उत्सवसाखळी खंडित करणारे असतात. सणावारांच्या निमित्ताने महिनाभरापेक्षा अधिक काळ उत्सवी वातावरण अनुभवल्यानंतर पितरांच्या स्मरणाने हळवं करणारे असतात. मात्र पूर्वजांचे आशीर्वाद लाभले तर पुढे सगळं चांगलंच होईल ही आश्वस्तताही मोलाची असते. म्हणूनच आजच्या धकाधकीच्या काळातही पितरांना समर्पित असणारे १५ दिवस रुढीनुसार पार पडतात.



पूर्वजांनी मानवी वर्तणुकीचे नियम लिखित स्वरूपात घालून दिले. यालाच उपनिषदं, वेद, पुराण अशा नावांनी संबोधलं गेलं. या रूपरेषेवरून चालणं हे काही काळासाठी शक्य असलं, तरी स्वत:ला सदा सर्वकाळ या नियमांमध्ये बांधणं शक्य नसतं. अशा वेळी या नियमांचा गरजेपुरता संदर्भ घेतला जातो आणि कार्य पार पाडलं जातं. स्वातंत्र्य आणि प्रलोभनं यांच्यामध्ये मानवी मन गुरफटत जातं आणि म्हणूनच अंतिम सत्याकडे डोळेझाक होऊ लागते. मानव बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर उत्तम आरोग्य सुविधा निर्माण करतोच; पण मृत्यूला जिंकण्याचेही मनसुबे रचतो. आयुष्यभरात जोडलेले आसपासचे नातेसंबंध त्याला अंतिम क्षणी मोहात पाडतात. आयुष्याच्या कातरवेळी तो गतकाळातल्या स्मृतींमध्ये रममाण होताना दिसतो. मृत्यूनंतर आपण सगे-सोयऱ्यांपासून लांब जाणार आहोतच; याशिवाय हा प्रवास आपल्याला एकट्याने करावा लागणार या जाणिवेने तो जास्त अस्वस्थ होत राहतो. मानवी जीवनातल्या प्रत्येक महत्त्वाच्या घटनेचे सोहळे साजरे केले जातात. या सोहळ्यात मृत व्यक्तीच्या संदर्भात असलेल्या सोहळ्यांचाही समावेश असतो. दु:खाची किनार असणारा हा सोहळा प्रियजनांच्या मरणोत्तर शांतीसाठी जड अंत:करणाने का होईना, पार पाडला जातो. भारतीय संस्कृतीमध्ये जिवंत व्यक्तीबरोबरच मृतात्म्यांच्या भावनांचाही विचार केला जातो. पितरांनी त्यांच्या मृत्यूनंतरही आपल्यावर कृपा करत राहावी, या सहज विचारसरणीतून पितृपक्षात घरातील मृत व्यक्तींसंबंधीची पितरकर्म करण्याची प्रथा निर्माण केली गेली असावी.

'मृत्यूनंतरचा प्रवास' या संकल्पनेमुळेच मृत व्यक्तीचे श्राद्ध करणे, त्यांना तर्पण करणे या प्रथा आढळतात. भाद्रपदातला कृष्णपक्ष हा श्राद्धपक्ष किंवा पितृपक्ष मानला जातो. या पंधरवड्यात आपल्या पूर्वजांचे, पितरांचे स्मरण करून ते ज्या योनीत असतील तिथे सुख-शांती मिळावी म्हणून प्रार्थना केली जाते. धार्मिक कृत्यांच्या प्रथेनुसार श्राद्धाच्या दिवशी पितृदान तर्पण केले जाते. या कार्यानिमित्त घरातील सगळे एकत्र येतात, एकत्र बसून दोन घास खातात. यशाशक्ती दानकर्म पार पडते. हयात नसलेल्यांच्या आठवणी निघतात. एक प्रकारे हा पांगलेल्या कुटुंबाला एकत्र आणण्याचा उपचारही ठरतो. आता हयात नसलेल्या शरीरांनी पूर्वी या आप्तेष्टांमधला दुवा म्हणून काम केलेले असते. त्यांनी कुटुंबाची ही मोळी बांधून ठेवलेली असते, मोळी एकत्र टिकवून ठेवलेली असते पण गाठ सैल होताच मोळीतली काष्ठं विखुरण्यास वेळ लागत नाही. कदाचित हीच अप्रिय बाब टाळण्यासाठी आणि घरातील सर्वांना आपल्या मूळ वृक्षाच्या सयीच्या सावलीत पुन्हा एकत्र आणण्यासाठी या कर्माचं प्रयोजन असावं. कारण अगदी आत्ता-आत्तापर्यंत लोक एक वेळ सणाला एकत्र येत नसत पण घरातील पितृकर्माला आवर्जून उपस्थित राहात असत.

आधुनिक युगात पितृकर्माच्या रितींवर प्रत्येकाचा या सर्व कृतींवर विश्वास असेलच किंवा त्यासाठी पुरेसा वेळ देणं शक्य होईलच असं नाही. पितरांच्या उपकारांची उतराई होण्याचा सोहळा म्हणजे पितृपक्ष पंधरवडा. पितरांचं एखादं अपुरं ध्येय पुत्राने अगर कन्येने पूर्ण करण्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारल्याने पिता अगर माता निश्चितपणे संतुष्ट होतील. हे करत असताना पुत्राला अगर कन्येलाही समाधान मिळेल. पितरांची आठवण करण्याचे हे दिवस पवित्र मानले पाहिजेत. आपल्यालाही पितरांप्रमाणे एक दिवस जायचं आहे, याचं भान याच दिवसात मनावर ठसलं जातं. या भूतलावर आपल्याला मिळणारा वेळ विधायक कामांसाठी वापरावा याचं भान येतं. या श्राद्धपक्षात सत्कृत्याचे पाथेय बांधण्याची मनाची जिद्द वाढते. एकदा सत्कृत्याचे पाथेय बांधण्याचा निश्चय केला की जीवन अधिकाधिक क्रियाशील बनतं. कदाचित हा धडा देण्यासाठी या पंधरवड्याचं प्रयोजन केलं असावं.

हा काळ अनेकदा अनिष्ट समजला जातो. या काळात नवी खरेदी, मंगल कार्याचा शुभारंभ केला जात नाही. समाजातला एक वर्ग अजूनही या काळाला नाकं मुरडतो. पण हळूहळू समाजाच्या समजुतीत बदल घडू लागला आहे. समाज जुन्यासोबत नव्या विचारांची गुंफण करून नवी विचारधारा प्रवाहित करत आहे. त्यामुळे या काळातही काही नवीन कामांचा श्रीगणेशा होतो. या काळात बऱ्याच घरांमधून कर्मकांडाचा अतिरेक न करता विशिष्ट तिथीला दानधर्म करणं, वृद्धाश्रमात अथवा अनाथालयात अन्नदान वा इतर वस्तूंचं दान करणं, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणं ही स्त्युत्य कर्मं पार पाडली जातात. समजुतीने घेतलेलं हे चांगलं वळण आहे, असं म्हणावं लागेल. आपल्यातून गेलेल्या व्यक्तींचं मरणोत्तर जग आभासी आहे, आपल्या कल्पनेच्या पलीकडलं आहे. त्याला ओढून ताणून आपल्या जगात आणण्यापेक्षा या जगात, आपल्याबरोबर राहणाऱ्या पण जाणिवा मृतवत झालेल्या लोकांच्या आयुष्यात आशेचा एक किरण आणणं हे पितरकर्म नसेल कदाचित, पण मनुष्यकर्म नक्कीच आहे. या आयुष्यात मनुष्य म्हणून जगताना मनुष्यकर्म करणंही पुरेसं आहे. हे करत राहिलं तर आयुष्याच्या अखेरीस संध्याछाया दाटून आली तरी जीव कासावीस होणार नाही, काय केलं या सोन्यासारख्या आयुष्यात, असा व्यथित करणारा प्रश्न भेडसावणार नाही. संधी असूनही लोकांशी चांगलं वागू शकलो नाही ही खंत त्रास देणार नाही. उलटपक्षी, यमदूताच्या स्वागताला तनाबरोबर मनानंही आपण सिद्ध असू. मिळालेल्या आयुष्याबद्दल कृतार्थता आणि आत्तापर्यंत केवळ कथांमधून ऐकलेल्या स्वर्गनगरीच्या प्रवासाला सिद्ध असू.




## विशेष

**पराग मगर/** ८२७५५५३५६६



# आव्हान स्वीकारणारे दैवी स्वर...

**त्यांचे 'हमे तुमसे प्यार कितना' हे गीत ऐकताना आजही त्यातील प्रेमाची आर्तता अस्वस्थ करते तर 'भवानी दयानी' ही रचना ऐकताना आई भवानीशी तादात्म्य पावल्याचा अनुभव प्रत्येकाला येतो. शास्त्रीय-उपशास्त्रीय संगीतात आपला वेगळा ठसा उमटविलेल्या प्रसिद्ध गायिका पद्मभूषण बेगम परवीन सुलताना भारतीय शास्त्रीय संगीताला आईच मानतात. त्या म्हणतात,'शास्त्रीय संगीत हा भारतीय संगीताचा आत्मा आहे. आपल्याला ते जपायचं आहे. मी त्याची पायिक आहे. या संगीताला घेऊनच जगणार आणि ते घेऊनच शेवटी ईश्वरापाशी जाणार.' नुकत्याच त्यांच्या नागपूर भेटीच्या वेळी जाणून घेतलेला हा त्यांचा सांगीतिक प्रवास त्यांच्याच शब्दात...**

☞ ***संगीत जीवनात कधी आलं? बालपणीच्या संगीताशी जुळलेल्या कुठल्या आठवणी आजही मनात रुंजी घालतात?***

- जन्माच्या अगोदरच संगीत माझ्या जीवनात आलं. माझी आई फार सुंदर गायची आणि मोठमोठ्या कलाकारांना ऐकायची. त्यामुळेच, तिच्या पोटात असतानाच माझी खास करून, भारतीय शास्त्रीय संगीताशी नाळ जुळली. माझे वडीलही संगीतकार होते. ते आईला म्हणायचे, संगीत ऐक कारण येणाऱ्या बाळाला कलाकारच व्हायचे आहे. त्यामुळे अशा संगीताने खास करून शास्त्रीय संगीताचा दरवळ असलेल्या घरात माझा जन्म झाला आणि संपूर्ण बालपण गेले. विशेष म्हणजे आम्हाला केवळ शास्त्रीय संगीत ऐकण्याची परवानगी होती. विविध भारतीदेखील आम्हाला ऐकू दिलं जात नसे. अपवाद केवळ लतादिदी आणि मोहम्मद रफी यांचा! त्यांचीच गाणी ऐकण्याची मुभा होती. गुरूंकडून संगीत शिका आणि रियाज करा हेच कायम आम्हाला सांगितलं गेलं. माझा जन्म १९५० चा! आमच्या वेळी घरी टेलिव्हिजन वगैरे काहीच नसल्यामुळे आयुष्यात भटकाव नव्हताच. केवळ शास्त्रीय संगीत शिकायचं आहे आणि तेच जीवन असणार, हेच आमच्यावर बिंबवलं गेलं.

☞ ***पहिल्या गायनाचा अनुभव कसा होता. ही संधी कधी मिळाली?***

- मी १२ वर्षांची होते. माझे गुरू दिवंगत पं.चिन्मय लाहिरीजी एक दिवस मला म्हणाले, 'परवाना आपको मंच पर गाना है.' ते वर्ष होते १९६२! ती प्रस्तुती माझ्या आयुष्याच्या सांगीतिक प्रवासाला कलाटणी देणारी ठरली. पं. ओंकारनाथ ठाकूर, पं.रविशंकर, उस्ताद अल्लाउद्दीन खां अशी दिग्गज मंडळी तेव्हा ऐकायला आली होती. या सगळ्या गुरूंचे आशिर्वाद मिळाले. त्यांचे शब्द,'बेटा,बहोत अच्छा गाती हो। ऐसी ही गाती रहो। खूब रियाज करो। तुम्हारे आवाज में सजीवता है, उसे बरकरार रखो।' आजही कानात रुंजी घालतात.

☞ ***आसाममधील नगाव या लहानशा गावातून मुंबई आणि पुढे आंतरराष्ट्रीय स्तरावरचा प्रवास कसा होत गेला?***

- या प्रश्नाचं पहिलं आणि शेवटचं उत्तर एकच, ते म्हणजे माझी मेहनत, माझा रियाज आणि माझ्या गुरूंचा आशीर्वाद अन् विश्वास! बालपणीचा कठीण काळ कुणीच विसरत नाही. नगाव या गावात तेव्हा वीजही नव्हती. दिव्याच्या प्रकाशात आम्ही अभ्यास आणि रियाज केला. याच प्रवासात कोलकाता येथे झालेला कार्यक्रम रसिकांना प्रचंड आवडला. यानंतर, मी मुंबईला आले. मुंबईच्या लोकांनी मला आपलंसं केलं आणि भरभरून प्रेम दिलं. आम्ही तुम्हाला जाऊ देणार नाही आणि तुम्हाला महाराष्ट्रातच राहायचे आहे, असे मला लोक हक्काने म्हणायचे. याच हक्काच्या भरवशावर गेली ४८ वर्षे मी महाराष्ट्रात राहते आहे. मी आज स्वतःला संपूर्ण महाराष्ट्रीयन समजते. महाराष्ट्रीयन लोक संगीतावर खास करून शास्त्रीय संगीतावर भरभरून प्रेम करतात. हे मी केवळ नागपुरात कार्यक्रम आहे, म्हणून बोलत नाही. मुळात मी खरं बोलायला कधीच घाबरत नाही. कलाकार हा नेहमी सच्चा असला पाहिजे. आपल्यावर प्रेम करणाऱ्यांच्या सहवासात आपण बहरत जातो. त्यामुळे माझ्यावर प्रेम करणाऱ्या महाराष्ट्राच्या ऋणातच मला आयुष्यभर राहायचे आहे.



### पटियाला घराण्याची गायकी

पद्मभूषण बेगम परवीन सुलताना यांचे गायन पटियाला घराण्याच्या मुशीतून तयार झाले आहे. आसामच्या नगांवमध्ये जन्मलेल्या परवीन सुलताना यांचे बालपणच शास्त्रीय संगीताच्या वातावरणात गेले. त्यांचे वडील इकरामुल मजीद यांची शास्त्रीय संगीताची पक्की बैठक होती. तेच त्यांचे पहिले गुरू बनले. साधारण पाच वर्षांच्या वयात त्यांनी आपल्या वडिलांकडून पटियाला घराण्यातील गायकीची तालीम घेण्यास सुरुवात केली. यानंतर, आचार्य चिन्मय लाहिरी यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या सान्निध्यात सुलताना यांच्या शास्त्रीय शिक्षणाचा व्यापक विस्तार झाला. जेव्हा त्यांचा विवाह उस्ताद किराणा घराण्याचे गायक दिलशाद खान यांच्याशी झाला, तेव्हा त्यांच्या जुगलबंदी आणि संयुक्त प्रदर्शनात पटियाला आणि किराणा घराण्याचा अनोखा संगम दिसून आला. असे असले तरी त्यांनी पटियाला घराण्याची गायकी आयुष्यभर जपली.

☞ ***चित्रपटात गायनाची सुरुवात कशी झाली. पाकिजाची गाणी आजही आवडीने ऐकली जातात. कसा होता हा अनुभव?***

- मी मुंबईत शास्त्रीय-उपशास्त्रीय संगीताचे कार्यक्रम करीत होते. एक दिवस नौशाद साहेबांनी मला बोलावलं. माझा हात हाती घेत ते म्हणाले,'बेटा, इतनी छोटी सी हो और कितना बढिया गाती हो.' यावेळी मदन मोहन देखील उपस्थित होते. नौशादजी म्हणाले, 'बेटा, मी पाकीजा चित्रपट करतोय. पण, त्याचं संगीत माझं नाही. गुलाम मोहम्मद यांनी संगीत दिलंय. पण, नुकतंच त्यांचं निधन झालं. चित्रपटातील लताबाईंची गाणी गाऊन झाली आहे. थोडं पार्श्वसंगीत बाकी आहे. माझी इच्छा आहे की, तुम्ही माझ्यासोबत गावं.' त्यांच्या सांगण्यावरून मी या चित्रपटातील यमन रागातील तराणा आणि काही ठुमरी गायले. ते त्यांना प्रचंड आवडले आणि चित्रपट संगीताच्या क्षेत्रात पाकीजाच्या रूपाने माझा प्रवेश झाला. पुढे एस.डी.बर्मन, मदन मोहन, लक्ष्मीकांत प्यारेलाल, पं.जसराज, उषा खन्ना यांनी माझ्याकडून बरीच गाणी गाऊन घेतली. बहुतेक गाणी लोकप्रिय झाली. संगीत हे संगीत असतं. त्यात मी चांगलं किंवा दुय्यम असा भेद करीत नाही. पण, आत्म्यापासून एक गोष्ट सांगते, चित्रपट संगीतात माझं मन रमत नाही. जे समाधान मला शास्त्रीय संगीतात मिळतं ते अन्यत्र कुठेच नाही आणि चित्रपट संगीतात मंगेशकर भगिनींनी जी उंची गाठली ती कायम राहील.

☞ ***आजच्या युवा गायकांना काय सांगाल?***

- संगीत शिकण्याचा आणि त्यात पुढे जाण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे रोजचा रियाज! तो करायचा नसेल तर संगीताकडे फिरकूही नका. रियाज असेल तर तुम्ही कुठलंही गाणं गाऊ शकता. आज मी इथंवर पोहोचले त्याचं कारण होतं की, मला आव्हानं आवडतात आणि मी ते स्वीकारते. तेच तुम्हाला बळकट करतात. युवा कलाकारांनाही मी तेच सांगते, स्वतःमध्ये जिद्द निर्माण करा.

### भारतीय संस्कृतीच आपली आई!

प्रत्येक श्वासात संगीत भरून असलेल्या बेगम परवीन सुलताना म्हणतात, शास्त्रीय संगीत हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. ती आपली आई आहे आणि तिचा सांभाळ आपल्याला करायचा आहे. शास्त्रीय संगीतात ईश्वराशी तादात्म्य पावण्याची ताकद आहे. त्यामुळेच, संपूर्ण जग आता मानसिक समाधानासाठी भारतीय संगीताकडे वळत आहे. हे संगीत जपणे आपली जबाबदारी आहे. ते शिकायला तर श्रम लागतातच पण, ऐकायलाही परिश्रम घ्यावे लागतात. भारतीयत्व हे आपल्या शास्त्रीय संगीतातून व्यक्त होते. ही अभिव्यक्ती अबाधित ठेवणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

### चित्रपटातील शास्त्रीय संगीताचा आवाज

बेगम परवीन सुलताना यांनी चित्रपटांतूनही शास्त्रीय संगीताला सन्मान आणि योग्य स्थान दिले. १९६८ मध्ये आलेला आसामी चित्रपट 'मोरे त्रिष्णा' मधून त्यांनी पार्श्वगायनाला सुरुवात केली. 'दो बूंद पानी' (१९७१) आणि 'पाकीजा' (१९७२) या चित्रपटांतून त्यांच्या हिंदी गायनास सुरूवात झाली. १९८१ मधील कुदरत चित्रपटातील अमर गाणे 'हमें तुमसे प्यार कितना' हे त्यांच्या आयुष्यात मैलाचा दगड ठरले. संगीतकार आर. डी. बर्मन यांनी स्वतः त्यांना हे गाणे शास्त्रीय पद्धताने गाण्यास सांगितले. आपल्या खास शास्त्रीय शैलीत हे गीत गाऊन त्यांनी या गीताला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले.

---

## चिंतन

**रविबाला काकतकर/** ७४९८४५०४७५

**प्रत्येक व्यवहारामध्ये देणारा आणि घेणारा असे दोन जण असतात. त्यांच्यामध्ये केवळ वस्तूंची आणि पैशांची देवाणघेवाणच नसते तर ऊर्जेचे हस्तांतरणदेखील होते. अनेकदा खर्च केलेल्या पैशांपेक्षा अधिक आत्मिक समाधान अशा व्यवहारांमधून मिळते.**

# कामावर ठसा उमटविणे



आपण दुरुस्तीला टाकलेले वाहन ताब्यात घेण्यासाठी जातो त्यावेळी जर मेकॅनिकने आपली गाडी छान पुसून, त्याचे तुटलेले रबरी न सांगता बदलले, कधी भाजीवाल्या बाईने आपण खरेदी केलेल्या भाजीवर थोडी कोथिंबीर वर दिली किंवा घरी दुधाचा रतीब घालणाऱ्या गवळ्याने वरून थोडे दूध अधिक दिले तर कसे वाटते? या सर्व व्यक्तींनी स्वेछेनी केलेल्या या कामांना इंग्रजीत एक समर्पक म्हण आहे, वॉक ऑन एक्स्ट्रा माईल. आपल्या कामावरच आपला वेगळा ठसा उमटविणे. प्रशंसेसाठी किंवा स्पर्धेसाठी नाही तर आपलेच काम स्वतःला समर्पित भावनेने करणारी, अधिक देण्य ात आनंद मानणारी ही उदाहरणे आहेत. अमेरिकेतल्या छोट्या गावांमध्ये बेकर्स डझन अशी म्हण आहे. म्हणजे कोणताही बेकरीवाला किंवा फळवाला एका डझनात १२ ऐवजी १३ वस्तू बांधून देतो. असेच अजून एक उदाहरण! एकदा एका प्रसिद्ध बेकरीतून एकाने आपल्या मुलीच्या वाढदिवसासाठी केक ऑर्डर केली. काम संपल्यानंतर तो विमानाने गावी परत जाताना ती दुकानातून तो घेणार होता. परंतु कामाच्या गडबडीमुळे त्याला केक घेणे शक्य होणार नव्हते म्हणून दुकानदाराला त्याने केक कॅन्सल करण्य ासाठी फोन केला. त्या दुकानदाराने सांगितले,'मला फक्त तुमच्या फ्लाईटचा नंबर सांगा. मी केक विमानतळावर पोहोचवतो आणि खरंच त्यांनी त्या ग्राहकाचे पार्सल नुसते वेळेत पोहोचवले नाही तर त्याच्या मुलीसाठी एक छान खेळणे आणि ग्रीटिंग कार्डही त्या दुकानातर्फे भेट म्हणून पाठविले. मनाला स्पर्श करणाऱ्या, अशा प्रसन्न कृतींच्या मागे दातृत्वाची आणि विपुलतेची भावना असते. प्रत्येक व्यवहारामध्ये देणारा आणि घेणारा असे दोन जण असतात. त्यांच्यामध्ये केवळ वस्तूंची आणि पैशांची देवाणघेवाणच नसते तर ऊर्जेचे हस्तांतरणदेखील होते. अनेकदा खर्च केलेल्या पैशांपेक्षा अधिक आत्मिक समाधान अशा व्यवहारांमधून मिळते. कधी उलटेही घडते. वस्तू विकाणाऱ्याची, देणाऱ्या-घेणाऱ्याची मानसिकता नकारात्मक असेल तर, महाग वस्तू घेऊनही समाधान मिळत नाही.

अनेक व्यक्ती केवळ सांगकामे किंवा फक्त नेमून दिलेले कामच पाट्या टाकण्या सारखे करणार. क्वाएट क्विटींग असा एक वाक्प्रचार आहे. काम आता अंगावर येणार अशी शंका आली की, तिथून गुपचूप निघून जाणारे! वस्तुतः मुळात नेमून दिलेल्या कामापेक्षा आपण होऊन अधिक मदत करणारे, कामाशी एकरूप झालेले, न सांगताही आपली जबाबदारी मानून काम करणारे कर्मचारी, त्यांची तळमळ आणि निष्ठेची नोंद वरिष्ठांकडून निश्चित होते, पदोन्नतीही मिळते. त्यांचा मूळ पिंडच स्वयंप्रेरणेचा असतो. अशांकडे संधीही आपोआप चालून येतात. अजून एक उदाहरण! एकाच खात्यात काम करणारे दोन कर्मचारी! त्यांचा वरिष्ठ अधिकारी! अधिकारी पहिल्या कर्मचाऱ्याला सांगतो, अमुक काम करायचे आहे. त्यावर त्याचे उत्तर, सर मी हे काम कधी केलेले नाही तर तुम्ही ते दुसऱ्या कोणाला द्यावे. आता दुसऱ्याला तेच काम करायचे आहे म्हणून सांगितल्यावर तो म्हणतो, सर मी हे काम कधी केलेले नाही. पण, मी करून बघतो. नवे काम शिकण्याची, जीवनात पुढे जाण्याची जिद्द असे अनेक गुण दुसऱ्याच्या छोट्या उत्तरातून सहज दिसले. दैनंदिन जीवनात, आपले अगदी छोटे कामही आपण जीव ओतून व्यवस्थित केले किंवा काही अधिक केले तर ते आपले वेगळेपण होय. अगदी कपाट लावण्यापासून आपण किती व्यवस्थित आहोत? आपल्या मागे असे म्हटले जाते का? त्याचं काम? मग अगदीच अव्यवस्थित असणार. उलट असे म्हटलं जातं का की, त्याचे काम? मग बघायलाच नको. तपासण्याचीही गरज नाही. कोणतीही जबाबदारी तो उत्कृष्ट करतो. प्रसिद्ध ट्रेनर शीव खेरा म्हणतात, यशस्वी माणसं जीवनात काही वेगळं करत नाहीत. पण, प्रत्येक काम ते वेगळं करतात. म्हणूनच आपल्या यशात या वेगळेपणाचा स्पार्क दिसायला हवा हे खरे!

---

## अभिजात अमृत

**प्रा. सुनंदा पाटील/** ८४२२०८९६६६

# ऐलमा पैलमा गणेश देवा



अनंत चतुर्दशी! गेले दहा दिवस सगळ्यांच्या लाडक्या बाप्पाची घरोघरी पूजा झाली आणि आता बाप्पाचं विसर्जन झालं. पाणावलेल्या डोळ्यांनी आपण त्याला निरोप दिला. एक आठवण झाली. माझ्या माहेरी गणपती विसर्जन करून परतताना एक गाणं म्हणायचे.

***'हात जोडतो पाया पडतो, जातो अपुल्या गावा***
***येतो गा देवा, लोभ असू द्यावा...*** हे गीत झाडी पट्टी भागात म्हणतात.

एवढ्यानेच आपले सण संपत नाहीत. अगदी पक्षाच्या पंधरवड्यात कुठलाही सण नसतो, असं म्हणतात. मात्र, भाद्रपद कृष्ण चतुर्थीला विदर्भात काही ठिकाणी मस्कऱ्या किंवा हाडपक्या गणपतीची स्थापना होते. तोही दहा दिवसांच्या मुक्कामी असतो. तसंच भुलाबाईची स्थापनासुद्धा पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी होणार आहे.



भुलाबाई हा महाराष्ट्रातील विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात साजरा केला जाणारा एक पारंपरिक सण आहे. जो भाद्रपद पौर्णिमेपासून अश्विन पौर्णिमेपर्यंत असतो. या उत्सवात भुलाबाई म्हणजे पार्वती हिची महादेव आणि बाल गणेशासोबत मातीची मूर्ती तयार करून तिची पूजा केली जाते. ही पूजा म्हणजे नवीन आलेल्या धान्याच्या आगमनाचे आणि स्वागताचे प्रतीक आहे. अर्थातच, कवितांविषयी लिहिताना भुलाबाईची गाणी हा विषय सोडून चालणार नाही. पूर्वापार मौखिक अंगानं ही सगळी गाणी वारसा हक्काने आम्हाला मिळाली आहेत. आज काही ठिकाणी लिखित स्वरूपात ही गाणी जतन केलेली आहेत. यातही शिवपार्वतीचीच गाणी आहेत आणि पार्वतीची महत्त्वाची पूजा आहे.

भुलोबा म्हणजे शंकर आणि भुलाबाई म्हणजे पार्वती! हा सण पार्वतीच्या पृथ्वीवरील सृर्जनशीलतेचा सण म्हणूनच साजरा केला जातो. हा सण संपूर्ण एक महिनाभर चालतो आणि यात शंकर-पार्वतीची मांडीवर गणपती बसलेली मूर्ती बनवतात. पारंपरिक पद्धतीने ही पूजा-आरती करून नैवेद्य दाखवतात. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी नदीवर किंवा तलावात या पार्थीव मूर्तीचे विसर्जन केले जाते. पारंपरिक गाणी गाऊन, नृत्य करून हा आनंद उत्सव साजरा करतात.

भुलाबाई म्हणजे पार्वती! जगन्माता आदिपराशक्ती भूमीसारखी सर्जनशील म्हणून ही माता भुवनेश्वरी ! या भूमीच्या सृजनशीलतेचा उत्सव म्हणजे भुलाबाई! भूमी आणि परम प्रकृती स्वरूपा पार्वती मातेचा सृर्जनोत्सव! असे मानले जाते की, पार्वती भिल्लीणीच्या रूपामध्ये पती शिवशंकर महादेवासोबत बाहेर येते, लोकांना भेटते आणि संपूर्ण वातावरण उल्हासित करते. मुलीच्या आगमनाने आईवडिलांसह सगळी बाहेरची माणसं भारावतात. तिच्यासाठी विविध पक्वान्न तयार होतात, खेळ खेळून जागरणं केली जातात. एका माहेरवाशिणीच्या आगमनाची म्हणून शिवशक्तीची ही पूजा आहे. एक प्रकारचा हा सुफलन विधी आहे. शिव शंकराचे प्रतीक या पूजेत आहे. मात्र, शिवशंकराची उपस्थिती फक्त नावाला असते अगदी एका जावयाप्रमाणे!

एका आख्यायिकेनुसार परब्रम्हस्वरूपिणी माता पार्वती आणि शिवशंकर सारीपाट खेळायला बसले. देवर्षी नारदाने त्या ठिकाणी सांगितले की, पणाला काहीतरी वस्तू लावल्याशिवाय हा खेळ रंगत नाही आणि पार्वती प्रत्येक डाव जिंकत गेली. शंकराचे गजचर्म व्याघ्रांबर सर्व आयुधे हे शंकराकडून पार्वतीने हिरावून घेतले. दिगंबर शंकर नाराज होऊन वनात निघून गेले आणि पार्वतीने त्यावेळी भिल्लीणीचे रूप घेऊन शंकराला भुलवले आणि ती त्यांना परत घेऊन आली . भुलले म्हणून शंकर भुलोबा आणि भुलविले म्हणून जगन्माता भुलाबाई !

यात पूजा शंकर-पार्वतीची असली तरी हा मुली-स्त्रियांचा सण पार्वतीभोवतीच फिरतो. पूर्वी कोजागिरी पौर्णिमेपर्यंत चालणारा हा सण आज फक्त पाच दिवस किंवा एक दिवस साजरा होतो. बऱ्याच ठिकाणी हादगा, भोंडला आणि भुलाबाई एकच प्रकार आहे, असं म्हटलं जातं. पण, भुलाबाई हा उत्सव सृजनाचा आहे. भुलाबाई राणीचे डोहाळे साजरे केले जातात.

***तिचे डोहाळे तिला भारी, नेऊन टाका पलंगावरी***

अशाप्रकारे मातृत्वाची गाणी यावेळी गायली जातात. हा उत्सव मातृपूजा आणि मातृत्व गौरव आहे. या भुलाबाईच्या गीतांच्या माध्यमातून सुफलीकरणाच्या रूढीपरंपरांचे आपल्याला ज्ञान होते.

मूर्तिपूजा केल्यानंतर खरंतर विसर्जनाशिवाय ती उचलली जात नाही. पण, भुलाबाईचं सगळंच वेगळं आहे. एका ठिकाणी स्थापना केल्यानंतर तिथे गाणी म्हणता येत नाहीत. म्हणून भराडी गौरीसारखाच भुलाबाईच्या मूर्तीला अंगणात, चौकात किंवा मोठ्या बैठकीत मधोमध ठेवले जाते. तिच्या भोवती कोंडाळं करून बायका-मुली बसतात आणि मग गाण्यांना सुरुवात होते.

ऐलमा पैलमा गणेश देवा, माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा

या गीताने सुरुवात होते

***भाद्रपदाचा महिना आला, आम्हा मुलींना आनंद झाला***
***पार्वती बोले शंकराला, चला हो माझ्या माहेराला***
***अशा प्रकारच्या गीतांनी अंगण पुलकीत होतं. यातच,***
***यादव राया राणी रुसून बसली कैसी,***
***सासुरवाशी सून घरास येईना कैसी...***
***सासू गेली समजावयाला,***
***चला चला सुनबाई आपल्या घराला...***
***पाटल्यांचा जोड देते तुम्हाला,***
***पाटल्याचा जोड नको मला...***
***मी नाही यायची तुमच्या घराला,***
***यादव राया राणी रुसून बैसली कैसी...***

नंतर, सासरच्या सगळ्या मंडळीची नावे घेऊन, प्रत्येक दागिन्यांची नावे घेऊन हे गीत पूर्ण केले जाते. तरीही राणी घरी जायला तयार नाही. शेवटी नवरोजी आल्यानंतर मात्र ती घरी जायला तयार होते. अशा प्रकारची गीतं म्हणजेच सासरी होणारा छळ किंवा त्रास, माहेरचा आनंद उपभोगणे हे त्याकाळच्या बालविवाहाचे प्रतीक आहे. अगदी...

***कारल्याचं बी पेर गं सुनबाई,***

मग जा आपल्या माहेरा... हे गीत सर्वांना माहिती आहे. अगदी कारल्याचं बी पेरल्यापासून तर तो वेल वाढला, त्याला कळ्या आल्या, फुलं आली, कारली लागली, त्या कारलीची भाजी केली. नंतर, ती भाजी खाऊन जा असं सासूबाई म्हणतात आणि एक प्रकारे हा त्या छोट्याशा सुनेचा छळ होतो. आणि मग यातूनच,

***सासरच्या वाटे कुचु कुचु काटे,***
***माहेरच्या वाटे हळद-कुंकू दाटे...***
***पंढरीच्या वाटे नारळ फुटे,***

अशा प्रकारच्या गीतांनी जन्म घेतला असावा, असं म्हणायला वाव आहे. आता हा मातृत्वाचा उत्सव म्हटल्यावर पार्वतीचं गर्भारपण, बाळंतपण, बारसं हे सगळं व्हायलाच हवं. शिवाय, ती आपल्या नवऱ्यासोबत माहेरपणाला आलेली आहे. बाळंतपणाला आलेली आहे. त्याचीही अनेक गाणी भुलाबाईच्या उत्सवात गायली जातात.

www.tarunbharat.net

तरुण भारत आकांक्षा



# छोटे उस्ताद

## तुम्हाला माहिती आहे का?

- शाडू माती म्हणजे पांढरट करड्या रंगाची, अत्यंत बारीक कणांची नैसर्गिक माती आहे. पाण्यात कालवल्यानंतर या मातीला आकार देता येते. त्याचे कण बारीक असल्यामुळे ती पाणी सहज शोषून घेते आणि दिलेला आकार कायमही राहतो. शाडू मातीपासून घडवलेल्या आकाराला बेकिंगची गरज पडत नाही. जवळपास ६ प्रकारच्या मूर्ती सध्या बाजारात उपलब्ध आहेत. त्यापैकी पीओपी आणि शाडू माती व्यतिरिक्त लाल माती, पेपर मॅशे, गोमय आणि मातीच्या मिश्रणाने बनवलेली अशा प्रकारच्या मूर्ती मिळतात.

## अशी पाखरे येती

**निशिकांत मायी** / ९८८११५२४३९

# करड्या आवाजाचा भोरडा

दरवर्षी ऑगस्ट महिन्यात भारतात येणारा स्थलांतरित पक्षी भोरडा यावर्षीही भारतात दाखल झाला आहे. नेहमी समूहाने राहून आपल्या सहकाऱ्यांसोबत तो स्थलांतर करून जुलै-ऑगस्ट महिन्यात भारतात राहून पुन्हा एप्रिलच्या सुमारास तीव्र उन्हाच्या झळांमुळे स्वदेशी म्हणजेच पूर्व यूरोप आणि मध्य-पश्चिम आशियात परत जातो. भोरडी सारिका, गुलाबी सारिका किंवा गुलाबी साळुंकी अशा नावांनी ओळखला जाणारा भोरडा स्टर्निडी कुळातील पक्षी आहे. भारतात स्थलांतर झाल्यानंतर तो सर्वत्र आढळून येतो. इतकंच काय, पंजाब आणि महाराष्ट्रात त्यांचे थवेच्या थवे दिसून येतात. एका थव्यात साधारणपणे ५०० पक्ष्यांचा समावेश असतो. आकाराने चिमणीएवढ्या भोरडा पक्ष्याच्या शरीराची लांबी




२० ते २४ सेंमी एवढी असते. काळे डोके, मान, कंठ, पंख व शेपटी पण, बाकी शरीराचा रंग फिकट गुलाबी असतो. चोच पिवळसर गुलाबी रंगाची असते. मात्र, मादी भोरडाच्या गुलाबी रंगात किंचित करडी झाक असल्याचे दिसते. नर आणि मादी दोघांच्याही डोक्यावर मागे वळलेला पिसांचा तुरा असतो. ज्वारी-बाजरीचे पीक या पक्ष्यांचे आवडते खाद्य आहे. शेतात तयार कणसांतील दाणे खाऊन ते पिकांचे नुकसान करतात. असे असले, तरी पिकांवर आलेले किटक व पिकांना हानी पोहोचविणाऱ्या टोळ किडीही फस्त करीत असल्याने पिकांवरील कीड नाहीशी होते. फुलांतील मकरंदही ते आवडीने चाखतात, झाडांची फळे खातात. वडाच्या झाडांवर ते विश्रांती घेतात पण, कर्कश्श आवाज करून गोंधळ घालतात. या करड्या आवाजाने झाडावर एकच गोंधळ निर्माण झाल्याचे दृश्य दिसून येते.

विणीच्या हंगामात नराच्या डोक्यावरील पिसांचा तुरा अधिक आकर्षक होतो. पण, नवजात पिलांना असा कोणताही तुरा असल्याचे दिसत नाही. मे-जूनचा काळ हा त्यांचा प्रजननाचा हंगाम आहे. खडक-टेकड्यांच्या बिळांत घरटी तयार करून त्याच घरट्यांमध्ये मादी निळ्या रंगांची तीन ते चार अंडी घालते. झाडांवरून येणाऱ्या कर्कश्श आवाजाने परिसर दुमदुमून जातो आणि हा आवाज भोरडा पक्ष्यांचा असतो, हे सांगणे न लगे!

## Math Puzzle

Arrange the similar figures in to three group of three figures each.





Previous Math puzzle Answer : 09

## ह

या आद्याक्षरापासून सुरु होणारे चार अक्षरी शब्द दिलेल्या संकेताच्या मदतीने शोधावयाचे आहे.

-: संकेत :-

१. आपलेच म्हणणे तेच खरे मानणारा
२. जासूद, निरोप्या, पडेल ते काम करणारा
3. अन्नावर आनंदाने होणारा वातविकार
४. अगतिक, निरुपाय, निराश झालेला
५. हाताने केलेले कलाकुसरीचे काम
६. समुद्रमंथनातून निघालेले भयंकर विष




(उत्तर पुढील अंकी)

मागील अंकातील डोकं चालवाचे उत्तर : 1. अवजड 2. ब्रह्मगिरी 3. आत्मज्ञान 4. इंद्रजाल 5. आधारित

आपण शोधलेले नांव – **गिरिजात्मज**

## प्रश्नसंच - २८




**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

### योग्य पर्याय निवडा...

१) **बापुनाच्या मुलाचे नाव काय होते ?**
अ) तुकाराम ब) गोविंद क) गोपाळ ड) नामदेव

२) **कुकाजीचा वाडा कशाच्या शेजारी होता?**
अ) चौफाळा ब) देऊळ क) नदी ड) प्रदक्षिणेच्या रस्त्यावर

३) **परमहंसाच्या तोंडी कोणता जप चालू होता?**
अ) रामकृष्ण हरी ब) जय श्रीराम क) ओंकार ड) राधेकृष्ण

४) **महाराजांनी पहिली संपत्ती कोणती सांगितली आहे?**
अ) धन ब) शरीर क) भक्ती ड) समाधान

५) **दांभिक एकमेकांसमोर येताच काय होते?**
अ) नाके मुरडणे ब) एकमेकांना टाळणे क) भांडण ड) अबोला

६) **हरी कोणासाठी महार होऊन बेदरास गेला?**
अ) गौरांगप्रभू ब) उध्दव क) रामानुज ड) दामाजीपंत

७) **सरोवराची दिव्य शोभा कशामुळे ?**
अ) तोय ब) पद्मनाभ क) नीरज ड) मासे

८) **काशिनाथ गर्देच्या वडिलांचे नाव काय ?**
अ) गोपाळ ब) गोविंद क) खंडेराव ड) कृष्णराव

९) **प्रपंचाला केव्हा किंमत नसते ?**
अ) कर्तव्यास चुकला ब) पैसा नसला क) लाजिरवाणे जीवन जगत असल्यास ड) सत्शील नसल्यास

१०) **संतकृपा झाल्यास व्यक्ती कशी राहाते?**
अ) वैराग्यी ब) समाधानी क) सुखी ड) स्थितप्रज्ञ

### प्रश्नसंच - २७ उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ब | २) अ | ३) ड | ४) क | ५) अ |
| ६) अ | ७) क | ८) ड | ९) क | १०) ब |

### प्रश्नसंच क्र. २७ चे भाग्यवान विजेते

अमर काजवे, डॉ.शीला कुलकर्णी, रवींद्र साधू, डॉ. आनंद पळसोदकर, वैशाली सप्रे, संज्योत कुलकर्णी, हरिभाऊ वानखेडे, शेखर कोतवाल, सुयश कणीकर, वसुधा सुवर्णपाठकी, प्रतिमा गोरे, संध्या असनोडकर, कुंजलता पाटील, अर्चना बिरारी, संदेश पाटील, दिपाली पाटील, निधी गोळवलकर, राजश्री जोशी, दीपमाला तळपते, मंजुषा साठे, प्रियांका मालशे, वनमाला जुनघरे, सुरेश तळपते, सुनिता जोगळेकर, सुहासिनी दलाल, मनोहर पाटील, मीना खेडेकर, सुषमा सोमठाणकर, साक्षी पांडे, अरुंधती फडके, कुमुद मेटकर, नयना पाटील, नयना महाजन, विद्या पळसोदकर, शोभा कुळकर्णी, सुनेत्रा कोडापे, सीमा निवसरकर, प्रीतिलता वखरे, सुलोचना येवले, प्रसाद कावळे, सुचिता जोशी, नारायण तायडे, सुरेखा कोकजे, सुनिता सोनारे, सुजाता कुलकर्णी, शिवशक्ती साखरे, अलका देशमुख, नीता कुलकर्णी, पुष्पलता गावंडे, छाया कुलकर्णी, विजया ताम्हनकर, नीलम पांढरीपांडे, सुनिता पाटील, स्वाती मुळे

## देशोदेशीच्या लोककथा

**प्रीती वडनेरकर**/ ९८२३९९४७९२



# शहाणी सिसिलिया

भाग ८

इंडोनेशियातल्या प्लोरेस बेटावर वैरबो नावाचं गाव आहे. गाव तसं छोटंच, जेमतेम पाच सहा हजार लोकवस्तीचं गाव. तिथली प्रजा, ठेंगणी, बसक्या नाकाची, पिवळसर गोरी, गोल गोल डोळ्यांची! तिथल्या एका उंच टेकडीवर महाकाय, अक्राळ विक्राळ राक्षस 'विजेंडी' चा राजमहाल होता. विजेंडी राक्षस असला तरी स्वभावानं फार मृदू आणि कोमल होता. त्याचा आवाज, अतिशय कर्कश्श, भसाडा होता. गावातल्या लोकांषी संवाद साधावा, मुलांशी खेळावं, अशी त्याची तीव्र इच्छा असे. त्यासाठी तो गावात फेरफटका मारत असे. मात्र, त्याला येताना पाहिलं की, सारे गावकरी आपापल्या घरात जाऊन, खिडक्या-दारं बंद करून घेत असत. 'गावकऱ्यांनो घाबरू नका, मी तुम्हाला काहीही इजा करणार नाही, त्रास देणार नाही. मला तुमच्याशी मैत्री करायची आहे,' विजेंडी म्हणत असे.

थोडा वेळ वाट पाहून, शेवटी निराश होऊन, तो आपल्या महालात परत जात असे. वैरेबो गावात अनेक कुटुंब सुखासमाधानात रहात असत. त्यांची गुजराण शेतीवर होत असे. शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या, ससे पालन हे जोड उद्योगही चालत. बंगा नावाचा एक सुतार, लाकडाची कामं करत असे. त्याचा मुलगा, सून यांचा, एका रोगाच्या साथीत मृत्यू झाला होता. त्यांची मुलगी सिसिलिया मात्र बचावली होती. त्याच गावात 'उतो' नावाचा एक व्यापारी रहात होता. अत्यंत स्वार्थी, लोभी आणि अप्पलपोटा होता तो! सर्वांना फसवून, स्वतःचा फायदा करून घेणं त्याला चांगलं जमे. ऐकायला कमी येत असल्याने 'बहिरा उतो' म्हणूनच त्याला सारे ओळखत.

नेहमीप्रमाणे विजेंडी राक्षस गावात आला. त्याच्या येण्याची सूचना, त्याच्या पावलांच्या आवाजानं गावकऱ्यांना मिळत असे. सारे पटापट आपल्या घरात शिरले, दारं-खिडक्या बंद करून घेतल्या.

'गावकऱ्यांनो, मला का घाबरता? मी जरी अक्राळ विक्राळ असलो, तरी दुष्ट नाहीये. मला तुमच्याशी मैत्री करायची आहे. तुमच्या मुलांशी खेळायचं आहे. त्यांना माझ्या महालात न्यायचं आहे. छान पदार्थ खायला द्यायचे आहेत. महालात एकटा राहून मला कंटाळा येतो. मला तुमच्यासारखं जीवन जगायचं आहे. तुम्ही घरातून बाहेर आलात तर कळेल, मी कुणालाही काही त्रास देणार नाही,' राक्षस म्हणाला.

तो बोलू लागला की, ढगांचा गडगडाट झाल्यासारखा वाटे. गावकरी कानात कापसाचे बोळे घालत आणि तो काय बोलतोय ते ऐकण्याची तसदीही घेत नसत. बहिरा उतो, याच गोष्टीचा गैरफायदा घेत असे. यावेळीही विजेंडीनं गावकऱ्यांची वाट पाहिली. कोणी बाहेर येत नाहीसं दिसल्यावर तो आपल्या महालात निघून गेला. तो गेल्यावर नेहमीप्रमाणे सारे गावकरी शहरातल्या मुख्य रस्त्यावर सारे जमले. चबुतऱ्यावर हातात स्पीकर घेऊन बहिरा उतो उभा राहिला.'ऐका ऐका... गावकऱ्यांनो यावेळी दुष्ट विजेंडी राक्षसानं १०० पोती गहू, १०० पोती तांदूळ, दहा गायी आणि १० बकऱ्या मागितल्या आहेत. नाही दिल्या तर साऱ्यांची घरं उध्वस्त करायला तो कमी करणार नाही,' तो म्हणाला.

सारे गावकरी कुजबुजू लागले. 'हा तर अत्याचार आहे','अजून किती छळणार आहे हा','याला एवढं दिलं, तर आपल्याजवळ काय राहील?','तेव्हा गावकऱ्यांनो परवापर्यंत विजेंडीनं मागितलेल्या साऱ्या गोष्टी या टेकडीच्या तोंडाशी आणून ठेवा. म्हणजे मला त्या घेऊन त्या विजेंडीकडे जाता येईल,' उतो परत म्हणाला. गवकरी उदास झाले. मोठ्या मुष्किलीने त्यांनी १०० पोती गहू जमवले. मात्र, तांदूळ जमवता जमवता त्यांच्या नाकी नऊ आले. पण, गायी आणि बकऱ्या द्यायला कोणी तयार होईना.

'माझ्या मित्रांनो, माझी सिसिलिया कुठे सापडत नाहीये. त्या राक्षसाने तर काही केलं नाही तिला? शोधा, माझ्या काळजाच्या तुकड्याला शोधून काढा?' जिवाच्या आकांताने तो ओरडला. सारे तिला शोधण्यासाठी प्रयत्न करू लागले. बहिऱ्या उतोकडे कोणीच लक्ष दिले नाही. बंगाही तिला शोधू लागला. शोधता शोधता त्याच्या कानावर सिसिलियाचा आवाज पडला.'आजोबा ऽऽ आजोबा ऽऽ मी आपल्या अंगणातल्या पडक्या विहिरीत पडले आहे.' बंगा धावतच पडक्या विहिरीकडे गेला.

शेवटी हो ना करता, फक्त गहू-तांदळाच्या पोत्यांवर भागवून घ्या, म्हणून त्यांनी उतोला विनंती केली. उतोनं तणतणत सगळी पोती गाढवावर लादली आणि टेकडीच्या पायथ्याशी आणून ठेवली.

आता हे नेहमीचंच झालं. महिन्यातून एकदा विजेंडी राक्षस यायचा आणि गावकऱ्यांना डोईजड करून जायचा. असाच एकदा तो आला. सगळे घरात लपले. काहीतरी बडबड करून तो परत गेला.

बंगा सुताराच्या लक्षात आलं, त्याची नात सिसिलिया घरात नाहीये. तो घाबरला. त्यानं खूप शोधाशोध केली पण व्यर्थ! नेहमीपणे बहिरा उतो रस्त्यावर आला. गावकयांना विजेंडी राक्षसाच्या मागण्यांची यादी वाचून दाखवू लागला.

'माझ्या मित्रांनो, माझी सिसिलिया कुठे सापडत नाहीये. त्या राक्षसाने तर काही केलं नाही तिला? शोधा, माझ्या काळजाच्या तुकड्याला शोधून काढा?' जिवाच्या आकांताने तो ओरडला.

सारे तिला शोधण्यासाठी प्रयत्न करू लागले. बहिऱ्या उतोकडे कोणीच लक्ष दिले नाही. बंगाही तिला शोधू लागला. शोधता शोधता त्याच्या कानावर सिसिलियाचा आवाज पडला.'आजोबा ऽऽ आजोबा ऽऽ मी आपल्या अंगणातल्या पडक्या विहिरीत पडले आहे.' बंगा धावतच पडक्या विहिरीकडे गेला. बंगानं सिसिलियाला बाहेर काढलं. साया गावकऱ्यांनी जोरजोरात टाळ्या वाजवल्या. तिच्या डोक्यावरून हात फिरवत बंगानं विचारलं,'तुला काही लागलं तर नाही ना? '

'मी अगदी छान आहे. मला साधा ओरखडा सुद्धा आला नाहीये,' सिसिलिया म्हणाली.

'पण तू आत पडलीस कशी?' गावच्या पाटलांनी विचारलं.

'राक्षस आला म्हणून, सगळे आपापल्या घरात पळाले. मी पण घराकडे यायला निघाले पण, विहिरीत पडले. आजोबा तो राक्षस खूप दयाळू आहे. तो बहिरा उतो खोटं सांगतो. तो राक्षस म्हणतो,'मला घाबरू नका, मी तुमच्याशी दोस्ती करायला आलोय. पुढच्या वेळी येताना मी चांगली जांभळी फुलं घेऊन येईन.' बंगासह गावकऱ्यांनाही धक्का बसला. पण, छोट्या सिसिलियावर कसा विश्वास ठेवायचा? म्हणून, बहिऱ्या उतोनं सांगितल्याप्रमाणे सर्व सामान गोळा केलं. आता राक्षस आला, तेव्हा सिसिलियानं आपल्या घरच्या वरच्या खोलीचं दार उघडं ठेवलं. कानाला स्कार्फ बांधला. सिसिलियाला पाहून राक्षसाला खूप आनंद झाला. त्यानं जांभळी फुलं तिला दिली.'तुला बरं नाही का बाळा? तू कानाला स्कार्फ बांधला आहेस?' त्यानं विचारलं. 'राक्षस दादा, तुम्ही बोलायला लागलात की, आम्हाला कानठळ्या बसतात. तुम्ही अगदी पुटपुटल्यासारखं बोला म्हणजे आम्हाला त्रास होणार नाही.' राक्षस अगदी हळू आवाजात तिच्याशी बोलू लागला. हळूहळू साऱ्या घरांचे खिडक्या-दरवाजे उघडले गेले. गावकरी, लहान मुलं, सारे रस्त्यावर आले, राक्षसाशी बोलू लागले. साऱ्यांची भीती नाहिशी झाली. सिसिलिया, तिच्या मैत्रिणी-मित्र सारेच राक्षसाबरोबर त्याच्या महालात गेले. खूप खेळले, खूप पदार्थ खाल्ले.

बहिऱ्या उतोच्या गाढवावर दगडांची पोती भरून टेकडीच्या पायथ्याशी नेली. दगड पाहून उतो संतापला. गावकऱ्यांनी उतोनं लपवलेली पोती, गायी, बकऱ्या, शेळ्या सारं शोधून गावकऱ्यांना वाटलं. उतो आणि त्याच्या साथीदारांना बेदम मारून गावाबाहेर हाकलून दिलं. बेरोबो गावात आनंदी आनंद पसरला. अशी आमची शहाणी सिसिलिया!

## वारसा

**प्रवीण अविनाश योगी**/+९१ ७५०७४ ९३११२


# सुवर्णदुर्ग

**किती कोट किल्ले उभारूनी छाती।**
**कथा सांगताती अजुनी जुनी ॥**

इतिहासात कोणे एकेकाळी हा देश आपल्या दर्यावर्दीपणाबद्दल प्रसिद्ध होता; पण इ.स. ११०० नंतर भारतीयांचे समुद्राकडचे लक्ष संपूनच गेले होते. सर्व जगभर नौकानयन करणारे भारतीय नाविक आपली ही विद्या विसरले. या काळात सतराव्या शतकात समुद्राला नवे महत्त्व आले. जगाचा इतिहास क्रमाने खलाशी राष्ट्रांच्या इतिहासात रूपांतरीत होताना भारत भूमीच्या नकाशावर ठिपके ठिपके म्हणून पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच येऊन उतरले. त्यांचे नौदल भारताभोवताली समुद्रात फिरत होते. एका नव्या दिशेने अनपेक्षितपणे येऊ घातलेल्या प्रचंड पारतंत्र्याची ही चाहूल होती. आधुनिक भारताशी अनुबंध असणारा, समुद्राचा गंभीरपणे विचार करणारा पहिला भारतीय राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज! त्यांनी उभारलेल्या आरमाराला नव्या खलाशांच्या इतिहासात केवळ भारताच्या दृष्टीने नव्हे तर, सर्व दक्षिण आशियाच्या दृष्टीने एका नव्या जागृतीचे चिन्ह म्हणून विचारात घ्यावे लागेल. अशा काळात आरमार हे राज्याचे एक स्वतंत्र अंग आहे, या जाणिवेने स्वतःचे नाविक दल महाराजांनी उभारले. हे नाविक दल उभारताना कोकणची किनारपट्टी सुरक्षित करण्यासाठी जलदुर्गांच्या उभारणीकडे महाराजांनी अधिक लक्ष दिले. काळाची ती गरज होती. पश्चिम किनाऱ्यावर काही जलदुर्ग नव्याने बांधून आणि काही दुरुस्त करून शिवाजी महाराजांनी किल्ल्यांची साखळी निर्माण केली. ही साखळी निर्माण करण्यामागे महाराजांचे दोन प्रमुख उद्देश होते. एक म्हणजे समुद्रातील शत्रू असलेले सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज यांच्या कारवायांना आळा घालणं आणि दुसरा म्हणजे शत्रूने स्वराज्याच्या भूभागात नाकेबंदी केली तर समुद्रमार्गे निसटण्याची सोय ठेवणं.

हर्णे हे प्राचीनकाळी बंदर म्हणून प्रसिध्द होते. या बंदराच्या रक्षणासाठी वेगवेगळ्या राजवटीत येथे दुर्ग चौकडी बांधण्यात आली. त्यापैकी समुद्रातील बेटावर बांधण्यात आलेला सुवर्णदुर्ग मुख्य किल्ला व त्याचे रक्षण करण्यासाठी बांधण्यात आलेले उपकिल्ले कनकदुर्ग, गोवाकिल्ला व फत्तेगड हे होत. १६८८ मध्ये मोगल सरदार सिद्दी कासीमने सुवर्णदुर्गाला वेढा घातला. सुवर्णदुर्गाचा किल्लेदार अचलोजी मोहिते मोगलांना फितूर झाला. ही गोष्ट कान्होजी आंग्रे या २० वर्षांच्या तरुणाला कळल्यावर त्याने रातोरात गडावरील सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन, किल्लेदाराला कैद केलं. सरळ किल्ल्याबाहेर पडून मोगलांवर हल्ला केला. पण, हा हल्ला साफ फसला आणि कान्होजी आणि त्याचे सहकारी मोघलांच्या कैदेत पडले. कान्होजीने शिताफीने मोघलांच्या कैदेतून सुटका करून घेतली व पोहत सुवर्णदुर्ग गाठला. या घटनेमुळे त्यांच्या सहकाऱ्यांत उत्साह संचारला व त्यांनी पावसाळ्यापर्यंत गड लढवला. मराठ्यांचा हा चिवटपणा पाहून सिद्दीने वेढा उठविला. या घटनेमुळे कान्होजी आंग्रे सुवर्णदुर्गाचा किल्लेदार बनला. 'समुद्रावरील शिवाजी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कान्होजींची कारकीर्द याच सुवर्णदुर्गावर चालू झाली.

सुवर्णदुर्ग किल्ला असलेल्या बेटावर उतरल्यावर वाळूची



पुळण व त्यात पडलेल्या तोफा पाहायला मिळतात. या ठिकाणी पडक्या भिंतीचे अवशेष पाहायला मिळतात. किल्ल्याच्या प्रवेशद्वाराला अधिक संरक्षण देण्यासाठी बांधलेल्या दोन बुरुजांमध्ये किल्ल्याचे प्रवेशद्वार लपवलेले आहे. किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या तटावर मारुतीची मूर्ती आहे. किल्ल्याच्या पायरीवर कासव कोरलेले आहे. प्रवेशद्वारातून किल्ल्यात प्रवेश केल्यावर आतमध्ये देवड्या आहेत. उजव्या बाजूने गडफेरी सुरू केल्यावर उजव्या बाजूला किल्ल्यावर पाणी पुरवठ्यासाठी विहीर खोदलेली पाहायला मिळते. पुढे डाव्या बाजूला दोन उध्वस्त चौथरे आहेत. किल्ल्याच्या टोकाकडील बुरुजाकडे चालत जाताना दारू कोठारांच्या इमारती पाहायला मिळतात. टोकाच्या बुरुजाकडून पुन्हा प्रवेशद्वाराकडे येतांना पाण्याचे टाके आणि त्यापुढे पावसाचे पाणी साठवण्यासाठी बनवलेला तलाव पाहायला मिळतो. त्याच्यापुढे चालत गेल्यावर किल्ल्याच्या तटबंदीत बनवलेला गुप्त(चोर) दरवाजा पाहायला मिळतो.

प्रवेशद्वारापासून तिसऱ्या बुरुजावर शरभ शिल्प पाहायला मिळते. पुढे किल्ल्याच्या टोकाकडील बुरुजाकडे जातांना तटबंदीत शौचकुप पाहायला मिळते. अशा प्रकारे तटबंदीतील अजून दोन शौचकूपं समोरच्या तटबंदीतही पाहायला मिळतात. किल्ल्याच्या या भागातील शेवटच्या बुरुजाखाली एक खोली आहे. जवळच एक कोठार आहे. हा बुरुज पाहून किल्ल्याच्या प्रवेशद्वाराकडे आल्यावर आपली गडफेरी पूर्ण होते. किल्ल्याच्या नैऋत्य टोकावरील बुरुजावरून हर्णेच्या किनाऱ्यांवरील कनदुर्ग, फत्तेगड व गोवा किल्ला हे किल्ले दिसतात. कनकदुर्ग व फत्तेगडाची उभारणी कोणी व केव्हा केली याबाबत मतभेद आहेत. पण, त्यांची निर्मिती शिवकालानंतरची असावी असे बहुतेक तज्ज्ञ मानतात. किल्ल्याच्या सभोवार असणारा खडक समुद्राच्या पातळीत तासून सपाट केलेला आहे व मधल्या उंचवट्यावर किल्ला बांधलेला आहे. खेड, दापोली, हर्णे, दाभोळ, बाणकोट, वेळास या मुलुखात इतिहास घडवणारी, भाविकांनी नतमस्तक व्हावी, अशी निसर्ग समृद्ध, देखणी असंख्य ठिकाणं आहेत. ती तिथं जाऊन पाहायलाच हवी. मुंबईहून दापोलीमार्गे १५ किमीवरील मुरूड हर्णेला जाता येते. हर्णे किनाऱ्यांवरून किल्ल्यावर जाण्यासाठी होड्या मिळतात.

# साप्ताहिक राशिभविष्य

रविवार, दि. ७ सप्टेंबर २०२५ ते शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५

मिलिन्द माधव ठेंगडी/ज्योतिष शास्त्री, ८६००१०५७४६

### मोठे लाभ संभवतात

मेष

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील लाभ स्थानातून सुरू होत आहे. अशात आपला राशिस्वामी मंगळ सहाव्या कर्मस्थानात आहे. विशेषतः युवांच्या संदर्भात हा आठवडा लाभकारक ठरावा. काही मंडळींना या सप्ताहात काही मोठे लाभ मिळू शकतात. कार्यक्षेत्रात आपले मोठे नाव व्हावे, असेही योग संभवतात. कुटुंबात समाधानाचे वातावरण राहील. घरात काही शुभकार्ये ठरण्याची शक्यता असल्यामुळे आपल्या आनंदात भरच पडेल. दरम्यान, काहींना जवळच्या व्यक्तींकडूनच भ्रमनिरास होण्याचे अनुभव येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोणावरही विश्वास टाकताना पुरेपूर खातरजमा करून घेणे फायद्याचे ठरेल.

**शुभ दिनांक - ७, ९, १०, १३.**

### मेहनतीला योग्य फळ

वृषभ

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील दशम स्थानातून सुरू होत आहे. अशात राशिस्वामी शुक्र पराक्रम स्थानात विराजमान आहे. हा आठवडा आपणास एकूणच उत्तम संधी देणारा असून काही लाभदायक क्षण पदरी पडण्याचेही संकेत आहेत. विशेषतः सप्ताहाच्या उत्तरार्धातील ग्रहस्थिती मेहनतीला योग्य फळ दिल्यावाचून राहणार नाही. त्यामुळे तरुण वर्गाला भवितव्य घडविण्यासाठी या काळात अधिकाधिक परिश्रम घ्यायला हवेत. ओळखीतून तसेच वरिष्ठांच्या सहवासातून विशेष लाभ होण्याची शक्यता आहे. आवश्यक तेथे वडीलधाऱ्या मंडळीचा सल्ला अवश्य घ्या. धनवाढीसंबंधी लाभदायक हालचाली घडतील. विवाहेच्छू युवावर्गाला चांगले योग यावेत.

**शुभ दिनांक - ८, ११, १२, १३.**

### वरिष्ठांची मर्जी लाभणार

मिथुन

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील भाग्य स्थानातून सुरू होत आहे. आपला राशिस्वामी बुध पराक्रम स्थानात असून राशिस्थान गुरू विराजमान आहे. या शुभ योगामुळे नोकरीत प्रशंसा, कामाचे कौतुक, वरिष्ठांची मर्जी देणारा हा आठवडा ठरावा. आपली बाजू वरचढ होत राहील. हाताखालच्या सहकाऱ्यांकडून काम काढून घेण्यासाठी कौशल्य आजमावे लागेल. काही मनाविरुद्ध घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून आपल्या कामाची दिशा, झपाटा बदलू न देता आगेकूच करण्यातच हित आहे. त्याचे दूरगामी लाभ मिळतील, हे मात्र निश्चित समजावे. विद्यार्थ्यांना हा काळ अतिशय उत्तम जाऊ शकतो.

**शुभ दिनांक - ७, ९, १२, १३.**

### कामाचे कौतुक होणार

कर्क

या आठवड्याच्या सुरुवातीला आपला राशिस्वामी चंद्र कुंडलीतील अष्टम या पीडादर्शक स्थानातून भ्रमण सुरू करीत आहे. त्यातच सुरुवातीचे दोन दिवस राहू त्याच्यावर हावी असणार आहे. मानसिक त्राग्याचे हे दोन दिवस वगळता उर्वरित सप्ताह विशेषतः नोकरी-व्यवसायातील आर्थिक लाभासाठी उत्तम ठरावा. कामाचे कौतुक, नवीन जबाबदारी, पदोन्नती, पगारवाढ, आकर्षक इन्सेंटिव्ह अशा स्वरूपात लाभ पदरी पडण्याची शक्यता आहे. अधिकाऱ्यांची मर्जी आणि सहकाऱ्यांची साथ लाभणार आहे. अशात घरात काही शुभकार्ये ठरण्याची शक्यता असल्यामुळे आपल्या आनंदात भरच पडेल. आर्थिक आवक वाढण्याचेही संकेत आहे. जुनी अडलेली आवकदेखील मार्गी लागू शकते.

**शुभ दिनांक - ९, १०, ११, १२.**

### कुटुंबात वृद्धी, समाधान

सिंह

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण कुंडलीच्या सप्तम स्थानातून सुरू होत आहे. याचवेळी राशिस्वामी रवी राशीतच धनेश बुधासोबत विराजमान आहे. त्यामुळे हा आठवडा विशेषतः आर्थिक उन्नतिकारक, कुटुंबात वृद्धी व समाधान दर्शविणारा ठरतो. वाढीव पैसे येतील तेव्हा त्याला अधिकचे पाय फुटण्याची शक्यता राहील. मोठी खरेदी, लांबचे प्रवास घडण्याची शक्यता आहे. तरुणांना नोकरीसंदर्भात संधी लाभू शकतात. पूर्वार्धात काहींना कुटुंबात काहीसा तणाव सहन करावा लागू शकतो. उत्तरार्धात तणावाचे हे ढग विरून कुटुंबाची उत्तम साथ मिळू शकेल. काही नावीन्यपूर्ण घडामोडी अचंबित करतील. घरात पाहुण्या मंडळींचा राबता राहील.

**शुभ दिनांक - ९, १०, ११, १३.**

### मानसिक बळ उभारावे लागेल

कन्या

या आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भ्रमण कुंडलीतील सहाव्या कर्म स्थानातून सुरू होत आहे. राशिस्वामी बुध व्यय स्थानात रवीसोबत आहे. एकंदर ग्रहस्थिती पाहता हा आठवडा काहीसा संमिश्र स्वरूपाचा जाऊ शकतो. प्रारंभी राशिस्वामी फारसा अनुकूल नसल्यामुळे तो व्ययातून आपणास खर्चिक प्रसंग अनुभवास आणणारा ठरू शकतो. काही मंडळींना व्यवसायात अतिशय दगदग, धावपळ करावयास लावणारा ठरेल. काही मंडळींना मानसिकदृष्ट्या हतबल करू शकतो. त्यामुळे आपल्या मनातील योजनांना, हाती घेतलेल्या उपक्रमांना चालना देणारे मानसिक बळ आपणास प्रयत्नपूर्वक उभारावे लागेल. सप्ताहाचा उत्तरार्ध मात्र अवश्य सुखद ठरेल.

**शुभ दिनांक - १०, ११, १२, १३.**

### अनिश्चिततचे सावट दूर होणार

तूळ

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील पंचम या शुभ स्थानातून सुरू होत आहे. अशात राशिस्वामी शुक्र दशम स्थानात विराजमान आहे. या योगामुळे आर्थिक आघाडीवर सुबत्ता राहण्याची शक्यता असतानाच अचानक मोठ्या खर्चाचे संकेतही मिळत आहेत. तरुण वर्गाला नोकरी-व्यवसायात उत्तम संधी, पगारवाढ, पदोन्नतीचे, थोडक्यात भाग्योदयाचे योग दर्शवीत आहे. काहींना त्यांच्या जवळच्या मित्रमंडळी वा नातलगांबाबत काळजीजनक वातावरण निर्माण होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. अनिश्चितता व अस्थायी सुखावरील सावट दूर होऊ शकेल. तरुणांना विवाहास पोषक वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.

**शुभ दिनांक - ९, १०, ११, १३.**

### योजना रेंगाळण्याची शक्यता

वृश्चिक

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील चतुर्थ स्थानातून सुरू होत आहे. त्याचवेळी राशिस्वामी मंगळ लाभ स्थानात विराजमान आहे. ही ग्रहस्थिती पाहता कोणतेही पाऊल उचलताना त्याच्या परिणामांची अगोदरच खात्री करून घेण्याची गरज आहे. आपल्या योजना रेंगाळू शकतील. त्या प्रयत्नपूर्वक पूर्णत्वास नेण्याचे प्रयत्न करावे लागतील. महिला वर्गाचे महत्त्वपूर्ण सहाय्य मिळेल. भागीदारीत फसवणूक वा नुकसान संभवू शकते. त्यामुळे सावध असावे. युवा वर्गाला नोकरी-व्यवसायात समाधानकारक संधी मिळाव्यात. या आठवड्याच्या उत्तरार्धात मात्र अपेक्षित घटनाक्रम अनुभवास यावेत. काही कौटुंबिक प्रश्न सुटतील. मुलांची प्रगती व्हावी.

**शुभ दिनांक - ९, १०, ११, १२.**

### धाडसाने पावले उचला

धनू

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील पराक्रम स्थानातून सुरू होत आहे. राशिस्वामी गुरू सप्तमात असून त्याची राशीस्थानावर व चंद्रावरही दृष्टी आहे. ग्रहस्थिती पाहता सुरुवातीचे दोनेक दिवस वगळता हा सप्ताह आपणास उत्तम स्वास्थ्य, मानसिक प्रसन्नता, आर्थिक समाधान, कुटुंबात तसेच नोकरी-व्यवसायात उत्तम संधी दर्शविणारा आहे. त्यामुळे सध्या सावधपणे एखादे नवे धाडस करून पाहण्यास हरकत नाही. सुरुवातीचे दोन दिवस मात्र मनाचा त्रागा करणारे ठरू शकतात. त्या काळात शांतपणे परिस्थितीला सामोरे जाण्याचे धोरण स्वीकारावयास हवे. परिवारातील मतभेद विकोपाला जाणार नाही, याची काळजी घ्या. वाहने सांभाळून चालवा.

**शुभ दिनांक - ९, १०, १२, १३.**

### नोकरी-व्यवसायात उत्तम योग

मकर

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण कुंडलीतील धन स्थानातून सुरू होत आहे तर राशिस्वामी शनी पराक्रम स्थानात विराजमान आहे. अन्य ग्रहस्थिती पाहता नोकरी-व्यवसायात प्रगती, समाजात मानसन्मान वाढणे, प्रतिष्ठा उंचावणे असले योग निर्माण होत आहेत. सरकारी नोकरीत असतील त्यांना निश्चितच सुखावह व काही महत्त्वाच्या नवीन संधी देणारा हा सप्ताह ठरावा. मात्र असे असूनही सुरुवातीचे दोनेक दिवस तरी काहीशी कुरबूर निर्माण होऊ शकते. त्यामुळे समाजकार्य, राजकारण या क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांनी उपयुक्त संधीचा लाभ पदरी पाडून घेताना जरा सावध राहिले पाहिजे. मनासारखी कार्ये घडून येतील. प्रवासाचे योग यावेत.

**शुभ दिनांक - ९, ११, १२, १३.**

### विविध आघाड्यांवर सरशी

कुंभ

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण आपल्याच राशिस्थानातून सुरू होत आहे. राशिस्वामी शनी धन स्थानात आहे. पंचमातून गुरूची शुभदृष्टी लाभली आहे. संपूर्ण ग्रहस्थितीचा विचार करता, सुरुवातीचे दोन दिवस वगळता उर्वरित सप्ताह आपणास निश्चितपणे सुखावह जाईल, असे दिसते. शिक्षण, व्यवसाय, नोकरी अशा विविध आघाड्यांवर सरशी होऊ शकणार आहे. मुलांकडून सुवार्ता कळतील. इच्छुक दाम्पत्यांना संतती योग, शेअर बाजारातील गुंतवणूक, लॉटरी वा तत्सम बाबींतून लाभाचेही योग अनुभवास यावेत. युवा वर्गाचे विवाह योग जुळून येऊ शकतील. विरोधकांवर मात करू शकाल. कोर्टकचेरीच्या कामात यश मिळू शकेल. आरोग्य उत्तम राहील.

**शुभ दिनांक - ९, १०, ११, १३.**

### आर्थिक व्यवहारात सावध

मीन

या आठवड्याच्या प्रारंभी चंद्राचे भ्रमण आपल्या कुंडलीतील व्यय स्थानातून सुरू होत आहे. राशिस्वामी गुरू सुखस्थानात आहे तर आपल्या राशीत सध्या शनी ठाण मांडून बसला आहे. एकंदर स्थिती पाहता सप्ताहाच्या पूर्वार्धात अकारण भांडणे, भाऊबंदकी, विकोपाला जाणारे वाद, आर्थिक व्यवहारात फसगत, व्यवसायात स्पर्धा, वरिष्ठांची अवकृपा वगैरे मनाचा त्रागा करविणाऱ्या घटना अनुभवास येण्याची शक्यता आहे, तर उत्तरार्धात या साऱ्याच्या उलट अनुभव मिळावा. वैयक्तिकदृष्ट्या शुभकारक घटना घडाव्यात. नोकरी-व्यवसायात प्रगतिपथावर राहाल, शत्रूंच्या कारवाया थांबतील. एकूण वातावरण समाधानाचे जाणवेल. मोठ्यांचे मार्गदर्शन लाभेल.

**शुभ दिनांक - ९, १०, ११, १२.**

# गाथा पर्यावरणाची

मिलिंद बेंडाळे

## स्वच्छ पाणी, शौचालयाचे स्वप्न अधुरेच

जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल आपल्याला आठवण करून देतो की निसर्गातून मिळणारे पाणी आणि स्वच्छता सेवा केवळ विकासाचा भाग नाहीत, तर जीवन आणि सन्मानाचा मूलभूत अधिकार आहेत. अब्जावधी लोक अजूनही या सुविधांपासून वंचित आहेत. याबाबत आपण तातडीने पावले न उचलल्यास २०३० पर्यंत प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित पाणी आणि शौचालय पुरवण्याचे स्वप्न अपूर्ण राहील.



वेगाने बदलणाऱ्या हवामानात, स्वच्छ पाणी हे एक मोठे आव्हान आणि एक प्रमुख उपाय दोन्ही आहे. संशोधक आता पाण्याकडे केवळ एक भौतिक वस्तू म्हणून नव्हे, तर आपल्या शहरांना आणि समुदायांना आकार देणाऱ्या सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय आणि आर्थिक शक्तींशी जोडलेली एक प्रणाली म्हणून पाहत आहेत. शहरांच्या जलद वाढीमुळे पाण्याचा प्रवाह अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. कधी पाईप आणि गटारांमधून तर कधी भूजल आणि नद्यांमधून पाणी आपल्या दैनंदिन जीवनाशी खोलवर जोडलेले आहे; परंतु या गुंतागुंतीसह वाढत्या असुरक्षितता आणि धोकेदेखील येतात. जगभरातील शहरे जसे की फ्लिंट, साओ पाउलो, केपटाऊन, मुंबई, दिल्ली, चेन्नई आणि बंगळुरू विविध स्वरूपात गंभीर पाण्याच्या संकटांना तोंड देत आहेत. या संकटांमध्ये पाण्याची कमतरता, प्रदूषण, तुटलेली व्यवस्था, कमकुवत प्रशासन आदी मुद्यांचा समावेश आहे. हवामान बदलामुळे या सर्वांमध्ये वाढ झाली आहे. समुद्राची वाढती पातळी, हिमनद्या वितळणे आणि बदलत्या पावसाच्या पद्धती दर्शवतात की पाणी आपल्या पर्यावरणीय आव्हानांमध्ये केंद्रस्थानी आहे; परंतु पाणी आपल्या उपायांचा पायादेखील असू शकते.

जगभरातील अब्जावधी लोक अजूनही आवश्यक पाणी, स्वच्छता आणि स्वच्छता सेवांशिवाय जगत असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या 'घरगुती पेयजल आणि स्वच्छता' या अहवालातून दिसून आले आहे. त्यामुळे त्यांना आजार आणि खोल सामाजिक बहिष्काराचा धोका निर्माण झाला आहे. युनिसेफच्या संयुक्त देखरेख कार्यक्रमा (जेएमपी) द्वारे प्रकाशित केलेला हा अहवाल २००० ते २०२४ पर्यंत घरगुती पाणीपुरवठा आणि स्वच्छता सेवांमधील प्रगतीवर लक्ष केंद्रित करतो. त्यात विषमतेवर विशेष लक्ष केंद्रित केले गेले आहे. शाश्वत विकास ध्येयांतर्गत सर्वांसाठी सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि स्वच्छता सेवांची उपलब्धता सुनिश्चित करणे हे या अहवालाचे उद्दिष्ट होते.

याच सुमारास ३५४ दशलक्ष लोक उघड्यावर शौचास जातात. उघड्यावर शौचास बसणाऱ्या लोकांची संख्या ४२९ दशलक्षांनी कमी होऊन ३५४ दशलक्ष झाली आहे. ६४ देशांनी मूलभूत स्वच्छतेचा सार्वत्रिक वापर साध्य केला आहे. १.७ अब्ज लोक घरी मूलभूत स्वच्छता सेवांपासून वंचित आहेत. त्यात ६११ दशलक्ष लोकांकडे अशी कोणतीही सुविधा नाही. १.६ अब्ज लोकांना मूलभूत स्वच्छता सेवा मिळाल्या. ग्रामीण भागात व्याप्ती ५२ टक्क्यांवरून ७१ टक्क्यांपर्यंत वाढली आणि शहरी भागात ८६ टक्क्यांवर स्थिर झाली. कमी उत्पन्न असलेल्या देशांमधील लोक, असुरक्षित परिस्थिती, ग्रामीण समुदाय, मुले आणि अल्पसंख्यक वांशिक आणि आदिवासी गटांना सर्वांत जास्त असमानतेचा सामना करावा लागतो. कमी विकसित देशांमधील लोक पिण्याचे पाणी आणि स्वच्छता या मूलभूत सेवांपासून वंचित राहण्याची शक्यता दुप्पट आहे तर मूलभूत स्वच्छता सेवांपासून वंचित राहण्याची शक्यता तिप्पट आहे. यामुळे नागरी वस्त्या, शहरे, निमशहरी परिसर आदी भागांमधील पर्यावरण धोक्यात येत आहे. असुरक्षित परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची व्याप्ती इतर देशांपेक्षा ३८ टक्के कमी आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांसाठी सुधारणा झाल्या आहेत; परंतु ते अजूनही मागे आहेत. २०१५ ते २०२४ दरम्यान सुरक्षितपणे व्यवस्थापित केलेल्या पिण्याच्या पाण्याची व्याप्ती ५० टक्क्यांवरून ६० टक्क्यांपर्यंत वाढली आणि मूलभूत स्वच्छता व्याप्ती ५२ टक्क्यांवरून ७१ टक्क्यांपर्यंत वाढली. याउलट, शहरी भागात पिण्याचे पाणी आणि स्वच्छता व्याप्ती स्थिर राहिली आहे.


७० देशांमध्ये किशोरवयीन मुली आणि महिलांच्या मासिक पाळीच्या आरोग्याविषयीचा डेटा उपलब्ध आहे. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये पुन्हा वापरता येणाऱ्या मासिक पाळीच्या उत्पादनांचा जास्त वापर दिसून आला. पुरेशा साहित्याचा अभाव, खाजगी जागा आणि आरोग्य साहाय्य उपलब्ध नसणे या प्रमुख समस्या आहेत. बहुतेक देशांमध्ये उपलब्ध असलेल्या डेटानुसार, महिला आणि मुली प्रामुख्याने पाणी संकलनासाठी जबाबदार असतात. उप-सहारा आफ्रिका आणि मध्य आणि दक्षिण आशियामध्ये अनेकजण दिवसातून ३० मिनिटांपेक्षा जास्त वेळ पाणी गोळा करण्यात घालवतात. किशोरवयीन मुली (१५-१९ वर्षे) प्रौढ महिलांपेक्षा मासिक पाळीच्या वेळी शाळा, काम आणि सामाजिक उपक्रमांना उपस्थित राहण्याची शक्यता कमी असते. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण जागतिक सरासरीपेक्षा चारपट जास्त आहे. मूलभूत सेवांमध्ये प्रवेश सुधारण्यासाठी या देशांना ७ ते १८ पट वेगाने प्रगती करावी लागेल. ग्रामीण-शहरी, श्रीमंत-गरीब, वांशिक गट आणि अपंगत्वाच्या बाबतीत खोल असमानता आहे. कमी उत्पन्न असलेल्या देशांमधील लोक, असुरक्षित संदर्भ, ग्रामीण समुदाय, मुले आणि अल्पसंख्यक वांशिक आणि आदिवासी गटांना सर्वांत जास्त असमानतेचा सामना करावा लागतो. कमी विकसित देशांमधील लोकांमध्ये इतर देशांच्या तुलनेत पिण्याचे पाणी आणि स्वच्छता सेवांचा अभाव असण्याची शक्यता दुप्पट आहे तर मूलभूत स्वच्छता सेवांचा अभाव असण्याची शक्यता तिप्पट आहे.

या अहवालात डॉ. रुडिगर क्रेच यांनी म्हटले आहे की पाणी, शौचालये आणि स्वच्छता ही विलासिता नसून मूलभूत मानवी हक्क आहेत. आपल्याला सर्वांत असुरक्षित समुदायांपर्यंत त्वरित पोहोचावे लागेल. मुलांना सुरक्षित पाणी आणि स्वच्छता उपलब्ध नसते तेव्हा त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि भविष्य धोक्यात येते. विशेषतः मुलींना पाणी आणण्यात आणि मासिक पाळीत अधिक अडचणी येतात. हीच गती राहिली तर प्रत्येक मुलासाठी सुरक्षित पाणी आणि शौचालयांचे आश्वासन पूर्ण होणार नाही. जागतिक लोकसंख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांसाठी आता विश्वसनीय 'वॉश' डेटा उपलब्ध आहे. शाश्वत विकास उद्दिष्टांच्या शेवटच्या पाच वर्षांच्या जवळ येत असताना, २०३० मध्ये उघड्यावर शौचास जाणे बंद करण्याचे आणि मूलभूत पाणी, स्वच्छता आणि स्वच्छता सेवांना सार्वत्रिक प्रवेश मिळवण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रगतीला वेग देणे आवश्यक आहे. अहवालात दिसून आले आहे की २००० ते २०२४ दरम्यान आणखी एक अब्ज लोकांना 'वॉश' सेवांचा लाभ मिळणार असला, तरी प्रगती असमान राहिली आहे. सर्वांत दुर्लक्षित समुदायांसाठी कृती जलद करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर प्रगती झाली असली, तरी २०३० पर्यंत सार्वत्रिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रगतीचा वेग वाढवणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि 'युनिसेफ'च्या संयुक्त अहवालात भारताला एक प्रमुख उदाहरण म्हणून सादर केले आहे. भारताने सुरक्षित पिण्याच्या पाण्याच्या सेवांमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे, शहरी भागातील पाण्याच्या गुणवत्तेवरील डेटा समाविष्ट केल्याने सुरक्षित व्यवस्थापनाचे अंदाज शक्य झाले आहेत.

असे असले तरी ग्रामीण भागात शाश्वत व्यवस्थापन आणि गुणवत्तेची आव्हाने अजूनही आहेत. भारतात मूलभूत स्वच्छता सेवांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. २०१९ मध्ये भारताचा पहिल्यांदाच या निर्देशकामध्ये समावेश करण्यात आला. त्यामुळे जागतिक व्याप्तीमध्ये मोठी वाढ झाली, तरीही ग्रामीण भागात आणि गरीब समुदायांमध्ये हात धुण्याच्या सुविधा अजूनही दुर्मिळ आहेत. भारतात शहरी विरुद्ध ग्रामीण, श्रीमंत विरुद्ध गरीब आणि अपंगत्व यांच्यानुसार 'वॉश' सेवांमध्ये लक्षणीय फरक आहे. विशेषतः महिला आणि मुली पाणी आणण्यात जास्त वेळ घालवतात. त्यामुळे शिक्षण आणि आरोग्यावर परिणाम होतो. भारताने पिण्याच्या सुरक्षित पाण्याच्या सेवांमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. शहरी भागातील पाण्याच्या गुणवत्तेवरील डेटा समाविष्ट केल्याने सुरक्षित व्यवस्थापनाचे अंदाज शक्य झाले आहेत. तथापि, ग्रामीण भागात शाश्वत व्यवस्थापन आणि गुणवत्तेचे आव्हान अजूनही कायम आहे. उघड्यावर शौचास जाणे लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. ग्रामीण भागातही सुधारणा झाल्या आहेत; परंतु सांडपाणी प्रक्रियेसारख्या सुविधा अजूनही मर्यादित आहे. २०१९ मध्ये पहिल्यांदाच भारताचा या निर्देशकामध्ये समावेश करण्यात आला. त्यात जागतिक व्याप्तीमध्ये मोठी वाढ झाली, तरी ग्रामीण भागात आणि गरीब समुदायांमध्ये हात धुण्याच्या सुविधा अजूनही दुर्मिळ आहेत. त्याचा परिणाम पर्यावरण आणि आरोग्यावर होत आहे.

*(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)*


# रविवारचे महाशब्दकोडे ५१२



*आडवे शब्द:-* 1) बाण सोडण्याचे साधन; कोदंड; धनुष्य, 4) मौल्यवान; दुर्मीळ, 7) मुक्तता, 10) जोराचा श्वासोच्छ्वास, 12) मनसोक्त, 13) कामधेनू, 15) तोडीस तोड, 17) व्यवसाय; कर्तव्य; उपयोग, 19) हाताचा पंजा; जकात, 21) बापूंचे नाव, 23) मोठमोठ्याने (हसणे), 25) शिक्षा, 26) डोंगरी किल्ला, 27) मगज, 28) अंतर्भागी, 29) निर्जीव शरीर, 30) सुटीची परवानगी, 33) धुंडाळणे; चाचपणे; प्रयत्न करणे, 35) कुस्तीच्या खेळासाठी केलेला खळगा, 36) भीडमुरवत; पर्वा; पत्रास, 38) मीठ तयार करण्याची जागा, 40) सूर्योदयी देश, 41) पाळी (खेळाची), 43) हावरटपणा, 44) कमळ, 45) भपकेबाज; तेजस्वी, 47) सध्या, 48) हिंमत; ऊर, 50) निर्दय, 51) राज्य करणारी संस्था, 53) आठवड्यातील एक दिवस, 55) लोण्यासारखा, 57) पुरे; एक वाहन, 58) अरण्य, 60) घुस्सा, 62) न्याय्य, 63) वंद्य, 66) जिम्मेदार, 69) चूळ, 70) समुद्री शिंपितील रत्न, 71) एक बंगाली मिठाई, 73) एक वाहन, 75) हत्ती, 76) संग्रह, 77) आपले सर्वस्व, 80) दोन्ही बाजूंना धार असलेला कोयता, 81) कलागत्या, 84) सावकार, 85) तापट, 88) अतिशय, 89) तात्पर्य, 90) आकर्षक; मोहक, 92) मनधरणी; उपासना, 93) देवळातील अंतर्भाग, 95) शरीराच्या दुखऱ्या भागावर चोळावयाचे स्निग्ध औषध, 97) परिमाण, 98) उंचवटा, 99) ढोपर, 101) ओठ, 103) दरी; खोरे; गुहा, 105) दाट, 107) वास्तव्य, 108) खाटीक, 109) रीत, 111) मऊ आसन, 112) जेवण रुचकर करणारा एक पदार्थ, 113) एक नदी, 114) असंमत, 115) मुळासह, 116) घमेंड.

*उभे शब्द:-* 1) अतिरेक; तीव्रता, 2) अचल; कायम, 3) मासलेदार, 4) विवाद्य, 5) वाकडा, 6) वाहनाला गती देणारा त्याचा एक भाग, 7) सोललेला ताजा हरबरा, 8) डुक्कर, 9) सकस, 10) दबदबा; धास्ती, 11) अर्धांगवायू, 14) साखरेचे चूर्ण, 16) चामखीळ, 18) एक शक्तिशाली जलचर, 20) अतिशयोक्ती करणे, 21) तडकणे; दुभंगणे; तुटणे, 22) मराठीत म्युनिसिपालटी, 24) अभाव, 26) गोलमाल; गोंधळ, 28) देवाणघेवाण, 29) चेहरा; तोंड, 31) ओळख, 32) रात्र, 34) खंदक, 37) मासिक, 39) पूर्णपणे, 42) वसुमती, 45) चढती कमान; वाढ; उत्कर्ष, 46) कौशल्य, 49) काठ, 52) उसाच्या रसाचे दुकान, 54) वर्तन, 56) लाक्षणिक अर्थाने लाच, 58) पक्का, 59) मुलायम, 61) ऊर्जेचा एक स्रोत, 64) हलकट, 65) कर्कश, 67) अमिताभ यांचे पिताजी कवी हरिवंशराय श्रीवास्तव यांनी धारण केलेले प्रसिद्ध उपनाव, 68) बोळवण, 69) एक विषारी साप, 70) अतिशय; थोर; विस्तृत, 72) तऱ्हेवाईक, 74) निर्लज्ज, 76) कुत्रा, 78) मनःपूत; यथेच्छ, 79) पृथ्वी, 82) गडद, 83) निराधार; बंडल; बनावट, 84) ना धड हे ना धड ते, 86) निश्चल दृष्टी, 87) वस्त्रप्रावरण व इतर वस्तू, 91) ढग, 92) नदी, 94) 'विधानसभेसाठी काल मतदान करणारे सगळे लोक ×××× आहेत', 95) तीर्थरूप, 96) पकडून लगेच खाऊन टाकणे, 99) परतंत्रता, 100) शस्त्रप्रहार, 102) मासला, 103) शरीराचा मध्यभाग, 104) रममाण, 106) अभ्राच्छादित, 110) अधोगती. *(उत्तर: पुढील अंकात)*

*मागील शब्दकोड्याचे उत्तर*



AMRITA BHASKAR NANDANWAR 9822568532, 8329510310

## कोणे एके काळी

**स्वाती काळे (कोलारकर)**
swatimak@gmail.com

# भरतमुनी आणि सणासुदीचे दागदागिने



गणपती उत्सवानंतर नवरात्र येते. गुलाबी थंडीमुळे दिवाळीची चाहूल लागते. दिवस कसे भराभरा जातात. पाहुण्याराहुण्यांची लगबग घरीदारी सुरू असते. व्यापारपेठांना सुगीचे दिवस येतात. सराफा बाजार झळाळून उठतो. बायका देहभान विसरून सोनार गल्लीत तासन्तास घालवतात. दागिन्यांवरचं त्यांचं प्रेम घरोघरी चेष्टेचा विषय होतो. खरं तर तसं व्हायला नको कारण सणासुदीला घालण्यात येणाऱ्या दागिन्यांमध्ये आजही प्राचीन संस्कृतीचे वैभवशाली अवशेष सापडतात.

प्रत्येक शतकात स्त्रियांनी वेगवेगळे अलंकार ल्यायले. तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव दागिन्यांवरही पडला. देवींचे अलंकारही त्यानुरूपच घडविले गेले. पण अजूनदेखील आपल्या अतिप्राचीन संस्कृतीतले अलंकार आजच्या स्त्रियांवर भुरळ घालून आहेत. प्रत्येक दागिन्याची गोष्ट आपल्या प्राचीन संस्कृतीच्या मूलस्रोतातून सुरू झाली आहे.

प्राचीन भारतीय संस्कृतीच्या प्रतिभेचा काळ भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात आपल्याला बघायला मिळतो. भरतमुनींचा काळ अंदाजे ख्रिस्त पूर्व ५०० ते इ. स. पू. १०० मानला जातो. या प्रतिभावान ऋषीने नाट्यशास्त्र लिहिले ज्यात त्यांनी अभिनयाचे चार प्रकार सांगितले. आहार्य, आंगिक, वाचिक आणि सात्त्विक असे हे चार प्रकार आहेत. सर्व प्रकारच्या अभिनयात सर्वांत सोपा आणि महत्त्वाचा अभिनय म्हणजे आहार्य अभिनय आहे. आहार्य अभिनयात बाह्य वेशभूषा आणि अलंकारांचा समावेश आहे. अलंकार ल्येणे हा अभिनयाचा प्रकार समजून भरतमुनींनी एवढे बारकाईने अलंकारांचे वर्णन केले आहे की वाचणारा थक्क होऊन जातो. आपल्या देवींना अजूनही आपण या अलंकारांनी सजवतो. स्त्रिया यातील अनेक अलंकार अजूनही हौसेने मिरवतात. त्यामुळे हा प्राचीन स्रोत जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.



भरतमुनींनी पायात घालणाऱ्या पदपत्र नावाच्या दागिन्याचा उल्लेख केलेला आहे. पायांच्या बोटात खटव्यांप्रमाणे अंगुल्या व पायांचे अंगठ्यात तिलक म्हणजे रंगजोडवी असत. आजही जोडवे सौभाग्याचे लेणे समजले जाते.

पायात घालण्याचे तीन दागिने भरतमुनींनी सांगितले आहेत. नूपुर म्हणजे पैंजण जे सगळ्याच बायकांना आजही अतिशय आवडते. किंकिणी म्हणजे तोरड्या असाव्यात आणि बारीक बारीक घुंगरूमणी असणाऱ्या दागिन्यास घंटिका म्हणायचे. आज आपण या दागिन्याला छुमछुम म्हणतो. आवाजानुसार किणकिणी आणि घंटिका अशी नावे देण्यात आली असावीत. घंटिकेतून जास्त खोलवर आवाज येत असावा.

जाल आणि कटक हे सुद्धा पायात बांधायचे दागिने होते. जाल आजच्या चाळांप्रमाणे आणि कटक म्हणजे आपण बाळांना वाळी घालतो तो प्रकार असावा. कमरेला बांधण्याचे कांची, मेखला, रशना आणि कलाप दागिन्यांचे भरतमुनींनी वर्णन केले आहे. कांची हा कंबरपट्टा एकाच साखळीचा असायचा. कलापाला पंचवीस साखळ्या असायच्या. प्रत्येक अलंकारासाठी एक विशिष्ट हेतू असतो. नृत्य करताना फक्त पायातील किणकिणीमधून नाही तर कमरेत बांधलेल्या कलापातून अतिशय अद्भुत आवाज निर्माण व्हायचा.

भरतमुनींनी मुक्तावली म्हणजे मोत्यांच्या एक सरीचे वर्णन केले आहे पण त्याचबरोबर आठ सरींपासून शंभर सरींच्या हारांचीदेखील वर्णने केली आहेत. मुक्तावली ही एकसरी आजही बायका हौशीने सणासुदीला घालतात. व्यालपंक्ती म्हणजे सरींवर सरी ठेवून त्यांचा पीळ करून तयार केलेला दागिना. रत्नावली म्हणजे रत्नांचा एक सर, सूत्रक म्हणजे सोन्याचा गोफ हे सर्व दागिने आजही प्रत्येक घरात सणसमारंभात बायका हौशीने मिरवताना दिसतात. बारीक बारीक मण्यांच्या दागिन्याला भरतमुनींनी मंजिरी असे नाव ठेवले आहे. आजही हा दागिना अतिशय लोकप्रिय आहे. सध्याची आपली ठुशी बारीक बारीक मण्यांनीच बनलेली असते.

नवरात्रीच्या आरत्यांमध्ये देवीच्या अनेक प्राचीन दागिन्यांचे वर्णन येते. आणि हे वर्णन भरतमुनींनी उल्लेख केलेल्या दागिन्यांशी बरेचसे मिळते जुळते आहे. कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या आरतीत एक दागिन्यांचे कडवं आहे.

''इंदू जोडण्यावरी तानिवडे, वरती नागबंदाची फुले
हंसळिया भोवरिया, वरी पदक ल्यायली लेणे
नासिक रत्नबिंब, गळा ल्याइली त्रिदळ पाटी
ऐसी बाळा कोल्हापूरची, महालक्ष्मी गोमटी
इंदू जोडवी, ल्याइली तोडे, सरळ साखळ्या हाती काकणे
ल्याइली नागदोरे, गळा ल्याइली सरी''

आजही बायका ठुशी, गोफ, चंद्रहार, पोहे हार, चपला कंठी, मोहन हार, बोरमाळ, जोंधळी हार, चिंचपेटी, राणी हार, लक्ष्मी हार, नवरत्न हार, तन्मणी, लफ्फा, कोयरी हार, चाफेकळी हार, आंबे हार, जव हार, कोल्हापुरी साज, चपटी चिताक असे वैविध्यपूर्ण हार घालून आपल्या प्राचीन संस्कृतीची समृद्धी वाढवीत आहेत. प्राचीन वेदिक काळात इंद्रच्चंद्र हा एक हजार आठ मोत्यांच्या सरींचा हार होता. मौर्य काळात (इ. स. पूर्व ३२२ ते इ. स. पूर्व १८५) अर्धहार, नक्षत्र माला, शुद्ध हार, रत्नावली, त्रिफळक, तीन पदरी कुंडल माळा असे वेगवेगळ्या प्रकारचे हार भरतमुनींच्या नाट्यशास्त्राची आठवण करून देतात. सातवाहन काळात (इ. स. पूर्व एक ते इ. स. तीन पूर्वार्ध) एकावली हार अतिशय लोकप्रिय होता. या हाराचाही भरतमुनींनी उल्लेख केलेला आहे.

भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात केसांमधून लोंबणाऱ्या मण्यांच्या जाळ्यांचेही लोभस उल्लेख आहेत. याचाच अर्थ, अतिप्राचीन काळापासून केशविन्यासाला फार महत्त्व होतं. चांदीचे आकडे, सोन्याची फुले, मोती, रत्नांच्या माळा केसात माळणं घरातल्या संपन्नतेचा निर्देशांक असायचा.

सातवाहनांच्या आगमनाने महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास समृद्ध झाला. इ. स. पूर्व २३० ते इ. स. २३० अशी चारशे साठ वर्षे राज्य करताना व्यापारी पेठांच्या उत्खननात सापडलेले पुरावे अतिशय महत्त्वपूर्ण ठरतात. तेर येथे सापडलेल्या हस्तीदंती बाहुलीचा केशसंभार सांभाळण्यासाठी मोत्याच्या झालरीचा पट्टा बांधला आहे. नंतरच्या अजिंठाच्या कलाकृतीमध्येही उजव्या खांद्यावर रूळणारी माणिक मोती गुंफलेली नागमोडी वेणी खूपच मनमोहक वाटते. बऱ्याच शिल्पांमध्ये केसांना जाळी लावलेली आहे. या सर्व मनमोहक दागदागिन्यांचा मूलस्रोत भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात अभिनयाच्या प्रकरणात सापडतो ही विलक्षण गोष्ट आहे.

भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात नाव कोरलेल्या अंगठ्या आहेत. शंख कलापी म्हणजे हस्तीदंती बांगड्या आहेत. कटक म्हणजे गोठ, पत्रपूरक खर्जूर म्हणजे जवे आणि अंशोपीतक हे मनगटावर घालण्याचे अलंकार आहेत. अंगद म्हणजे बाजूबंद आहेत. तसेच वलय म्हणजे कड्यासारखे दिसणारे बाजूबंद आहेत. कानातले प्रकार तर किती म्हणून सांगावेत! कर्णिका, पत्रकर्णिका, कर्णवलय, आपेश्रुक, कर्णमुद्रा, दंतपत्रे, कर्णपूर अशा अनेक कर्णकुंडलांची वर्णने वाचून आपण थक्क होतो. स्त्रियांच्या कपाळावर कुंकू त्या काळातदेखील होते आणि भुवयांवर डोक्यावरून फुलांच्या गुच्छाप्रमाणे सोडलेला एक दागिना असायचा. शिखाजाल, खंडपत्र, चुडामणी, मकरिका, मोत्यांची जाळी आणि गवाक्षिका हे डोक्यात घालायचे अलंकारसुद्धा भरतमुनींनी अतिशय बारकाईने सांगितले आहेत. असं म्हणतात की सीतेने स्वतःची खूण म्हणून हनुमानाला पहिल्यांदा भेटल्यावर चुडामणीच दिला होता. आज देखील बायका अंबाड्यात चंद्रफूल, सूर्यफूल, तारा, बिंदी पट्टा, मोत्यांची जाळी असे सुरेख दागिने घालतात. वेदिक काळात चुडामणी, शीर सजल, पिंडपत्र, मुक्ताजल असे डोक्यात खोवायचे दागिने होते. भांगेमध्ये बोर दागिना, पिंपळ पान, बीजवरा असे सुंदर दागिने होते. स्त्रिया कपाळावर आणि गालावर कस्तुरी चंदनाने वेलबुट्टी काढत. त्याला पत्रलेखा असे नाव भरतमुनींनी दिले आहे. आजही गोंदण किंवा टॅटूच्या साहाय्याने बायका वेलबुट्टी काढतात.

भरतमुनींनी दागिन्यांचे चार प्रकार सांगितले आहेत. आवेघ्य, बंधनीय, आक्षेप्य व आरोप्यक. कानाला छिद्र करून घातल्या जाणाऱ्या कुंडलांसारख्या दागिन्यांना आवेघ्य, दंडावर किंवा कमरेला बांधणाऱ्या दागिन्यांना बंधनीय, पायांमध्ये नूपुरे घालतात, थोडा हिसका दिल्यावर ती गळूनही पडतात, अशा दागिन्यांना क्षेप्य आणि वरून घालण्याच्या अलंकारांना आरोप्यक असे चार प्रकार भरतमुनींनी नाट्यशास्त्रात दिले आहेत.

पुरुषांनी घालण्याच्या अलंकारांचे वर्णनही भरत मुनींनी केलेले आहे. प्राचीन काळी पुरुषही डोक्यात चुडामणी घालीत. तो डोक्याचे मध्यभागी घालून त्यावर एक किमती रत्न जोडलेले असायचे. गळ्यात घालायची माळ, हर्षक आणि सूत्र असे तीन प्रकार होते. हर्षक म्हणजे हांसोळीसारखा ताठ वाटोळा हार होता. सूत्र म्हणजे सोन्याचा गोफ. तीन पदरी हारदेखील त्या काळात होता. त्याला देहभूषण असे नाव भरतमुनींनी दिले. बोटातले वळे हे प्राचीन काळापासून अस्तित्वात होते.

फुलांच्या दागिन्यांचेही भरतमुनींनी बारकाईने वर्णन केले आहे. वेष्टित, वितत, संघाल्य, तेपित व प्रलंबित असे फुले गुंफण्याचे पाच प्रकार भरतमुनी सांगतात. नवरात्रात गौरीसमोर माळा वर एकत्रितपणे बांधतात. त्यांना वितत असे म्हणतात. त्याकाळी सुद्धा पुष्पगुच्छ देण्याची पद्धत होती, बरं का. हिरवे गवत, पाने फुलांना गुंडाळून फुलांचे जे गुच्छ करतात त्यांना वेष्टित असे नाव भरतमुनींनी दिले.

भरतमुनींनी नाकात घालण्याचा एकही अलंकार सांगितलेला नाही. प्राचीन काळात नथीला महत्त्व होते का कळत नाही किंवा नथीचा श्लोक गहाळ झाला असावा. चंड मुंड, शुंभ, महिषासुरांचा नि:पात करणारी महिषासुरमर्दिनी नथ घालून रणांगणात उतरत नाही. पण संसारात रममाण झालेल्या पार्वती, अंबा, महालक्ष्मी या देवी मात्र ठसठशीत मोत्यांनी लगडलेल्या नथी ल्येतात. यामुळे नाट्यशास्त्रातून नाकाच्या नथीचा श्लोक गहाळ होण्याची शक्यता जास्त वाटते.

सर्व अलंकारांची वर्णने करून झाल्यावर भरतमुनी म्हणतात की खरे अलंकार सणासमारंभाला घालावेत. पण रंगमंचावरचे दागिने अभ्रक, मेण, वर्ख, रंग या गोष्टींनी तयार करावेत. कारण खऱ्या सोन्याचे, हिरामाणकांचे ओझे रंगमंचावरील कलाकाराला सहन होणार नाही.

नवरात्रात आपण शक्तीची पूजा करतो. मातृत्वाची पूजा करतो. समृद्धीची पूजा करतो. गणपती बरोबर येऊन गेलेली महालक्ष्मी देवी लेकुरवाळी आहे. तिची पूजा म्हणजे सुख समृद्धीची पूजा. आदि स्त्रीशक्ती असुरांचा नायनाट करणारी होती. पण त्याचबरोबर सर्व अलंकार ल्यायलेली लावण्यवतीसुद्धा होती. आजची स्त्रीशक्ती देखील घरातल्या नकारात्मक ऊर्जेला केरसुणीने दूर सारते. पण सणासुदीला हौशीने सर्व दागिने मिरविते. तिचे दागिने फक्त दागिने नाहीत. ते आपल्या प्राचीन संस्कृतीचे वैभवशाली अवशेष आहेत.

## संस्कारांच्या देशा

**डॉ. रमा गोळवलकर**
९४२२११४६२०

## अन्नसंस्कार- ४

# रस विचार

आपण एका अखंड सांस्कृतिक परंपरेचे उत्तराधिकारी आहोत आपल्याला याचा सर्वार्थानं अभिमान वाटायला हवा. त्यासाठी जी काही कारणं आहेत त्यापैकी एक अत्यंत महत्त्वाचं कारण म्हणजे भारतीय दर्शनशास्त्र. भारतीयत्वाला एक भक्कम बैठक देणाऱ्या या शास्त्रशाखेचा विस्तार सर्वव्यापी आहे. त्याच्या एका खांद्यावर आयुर्वेद बसला आहे, तर दुसऱ्यावर सौंदर्यशास्त्र. आयुर्वेदाच्या कडेवर पाकसिद्धांत आहे, तर सौंदर्यशास्त्रानं रससिद्धांताला आपल्या मांडीवर बसवलं आहे. ज्ञानमार्ग असो की भक्तिमार्ग सर्वांचाच ओढा आहे तो जीवन अधिकाधिक अर्थपूर्ण आणि रसरशीत करण्याकडे.

इथे रसरशीत हा शब्द जाणीवपूर्वक योजण्यात आलेला आहे. इथे रसांनी ओतप्रोत असं आयुष्य अपेक्षित आहे. रसभरीत आयुष्य म्हणजे ज्यात जीवनरसाचं ओथंबलेपण आहे. त्यासाठी कारणीभूत असलेली देवता आहे 'श्रीहरी'! हे श्रीविष्णूंचंच एक नामाभिधान. आपण म्हणताना श्रीहरी म्हणतो पण पूर्ण नाव आहे हविर्हरि = यज्ञात अर्पण केलेली आहुती म्हणजे 'हवि' हरणारा तो 'हविर्हरि'!

'हृ' म्हणजे हरण करणे या मूळ धातूपासून सिद्ध झालेला हा शब्द. 'हरति इति हरि:' हरण करणारा, ओढून घेणारा, ग्रहण करणारा तसंच आहुती स्वीकारणारा या अर्थानं देखील वापरतात. पचनाच्या प्रक्रियेत अन्नातून रस शोषून घेण्यात येतो. ते 'सार-किट्ट-विवेचन' अशी संज्ञा आहे अर्थात ज्यात सार आणि किट्ट वेगवेगळं करून साराच्या स्वीकार करत किट्टाचा त्याग केला जातो.

हे कार्य या हरीच्याच आधिपत्याखाली होत असतं. त्या 'हवि'तला अन्नरस वेगळा करून देवतांना पोहचवण्याचं मुख्य काम हरीकडे आहे. साहजिकच जीवनरसानं ओतप्रोत असाही अर्थाचा एक पैलू या 'हरी'ला आहे. ज्याप्रमाणे हरी देवतांना जीवनरस पुरवतो त्याचप्रमाणे त्यानं आमच्या पोटातल्या अन्नातून जीवनरस काढून आम्हाला पुरवावा आणि पुष्ट करावं. म्हणूनच वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे असं सूत्रं मांडलेलं आहे.

आईच्या गर्भाशयात स्थापन झालेला गर्भ ४८व्या दिवसापासून जीवनरसावर पोसला जाऊ लागतो असं आपला आयुर्वेद सांगतो. तर आधुनिक वैद्यकशास्त्र म्हणतं की साधारण ५ व्या आठवड्यात आईच्या गर्भाशयाशी गर्भनाळ जोडली



सोळा भाज्या, सोळा चटण्या, सोळा पक्वान्नांचं भरलेलं ताट महालक्ष्मीच्या नैवेद्यासाठी वाढतात, ते वर्षांतून एकदा तरी षड्रस अन्न पोटात जावं म्हणून

जाते आणि पोषणाला सुरुवात होते. म्हणजे हा 'हरी' अगदी नाळ जोडल्या जाण्यापासून तर शेवटचा श्वास घेईपर्यंत आपल्याला जीवनरस पुरवत असतो. अर्थातच पृथ्वीतत्त्वाच्या जड शरीराच्या जडणघडणीत या अन्नरसाची भूमिका अनन्यसाधारण आहे. अन्नपूर्णा ही पाककला आणि पोषण प्रक्रियेचं प्रतीक आहे तर हरी हा पाचन संस्थेचं. विष्णू ही देवता सर्वत्र संतुलन साधणारी असल्यामुळे साहजिकच त्याच्या अधिकारक्षेत्रात संतुलित आहाराचाही समावेश होतोच.

जिभेचे चोचले पुरवत विविध प्रकारचं खाणं आपण खातच असतो. त्यात खाद्य म्हणजे चावून गिळण्याचं, पेय म्हणजे पिण्याचं, लेह्य म्हणजे चाटून खाण्याचं, चोष्य म्हणजे रस चोखून चोथा फेकून देण्याचं असं चार प्रकारचं अन्न आपण आयुष्यभर चाखतो. हे झालं अन्नाचं स्वरूप (फॉर्म) पण त्याच अन्नात एकूण सहा प्रकारच्या चवी असतात. कडू, गोड, खारट, तिखट, आंबट आणि तुरट या षड्रसांचा समावेश संतुलित प्रमाणात आपल्या रोजच्या आहारात असायलाचं हवा असं भारतीय आहारशास्त्र सांगतं.

षड्रस चिकित्सा हा एका स्वतंत्र विषयच त्यातून विकसित झाला आहे. योग्य प्रमाणात यांचा अंतर्भाव आपल्या रोजच्या जेवणात करण्यावर भर देण्यात आलेला आहे. यापैकी मधुर रस शरीराला बल आणि ऊर्जा देऊ करतो तर आंबट (आम्ल) चवीचे पदार्थ तोंडाला चव आणणारे आणि पाचन शक्ती वाढवणारे असतात. त्यामुळे मन प्रसन्न राहतं. खारट (लवण) पदार्थ शरीरातल्या तरलतेला संतुलित करतात. तिखट (कटू) पदार्थांनी जाठराग्नी पेटतो म्हणजे भूक लागते. पचन सोपं होतं. कडू (तिक्त) पदार्थ रक्ताची शुद्धी करतात आणि पित्तदोषाला शांत करतात. शेवटचा रस आहे तो तुरट. हा रस शरीराच्या आतले आणि बाहेरचे दोन्हीही घाव भरण्यात मदत करतो. रक्तस्राव कमी करण्यात आणि जखमा भरण्यात त्याचा हातखंडा आहे.

कफ, पित्त, वात या तीन दोषांवर आधारित असलेली आपल्या शरीराची प्रकृती कोणत्या रसाच्या सेवनानं स्वस्थ आणि निरोगी राहू शकते याचेही निश्चित असे ठोकताळे आयुर्वेदाचे महर्षी आपल्याला सांगतात. चरक, वाग्भट असोत की शाकंबरी देवी प्रसन्न करून घेणारी विदर्भकन्या लोपामुद्रा असो या सगळ्या ऋषी आणि ऋषिकांनी आपलं ज्ञानभांडार आपल्यासाठी खुलं केलेलं आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कशासोबत काय खाऊ नये याची एक भलीमोठी जंत्रीच ही विद्वान मंडळी आपल्याला देतात. उदाहरणार्थ कारल्याची भाजी आणि दही एकाच जेवणात एकत्र किंवा वेगवेगळे खाऊ नये. उडीदाची डाळ आणि दही एकत्र खाऊ नये. म्हणजे दहीवडा हा पदार्थ वाग्भट ऋषींनी निषिद्ध सांगितलेला आहे. तर फळं आणि दूध एकत्र खाऊ नये. म्हणजे दुधाची साय घालून केलेलं शिकरण, आंब्याचा रस आणि फ्रूटसॅलड आयुर्वेदाला अमान्यच आहे.

भारतीय लोक शाकाहार आणि मांसाहार अशा दोन स्वतंत्र खाद्यपरंपरा पाळणारे आहेत. दोन्ही परंपराचा अंतर्भाव पूजाविधीत होतोच. वैदिक काळात यज्ञीय पशूचा बलिदान विधी करून त्याचं मांस प्रसाद म्हणून खाण्याची पद्धत होती. बळी देण्यासाठी निरूढ पशुबंध नावाच्या विधीचं विस्तृत वर्णनच आहे. तीच प्रथा पुढे उग्रपंथीय शाक्तांनी चालू ठेवली. पण त्यात खड्गानं एकाच वारात दोन तुकडे करून पशुबली देतात. भारताच्या पूर्वेला शक्तिपूजेत मत्स्याहारी पदार्थांचा नैवेद्य दाखवणं अनिवार्य आहे. तर इतर भूभागांत शक्तिपूजेतला मांसाहार हा ज्ञातीविशेषाप्रमाणे निश्चित आहे.

वाफा निघत असलेलं उष्ण अन्न एका विशिष्ट क्रमानं केळी किंवा कर्दळीच्या पानावर वाढून विविक्षित क्रमानं खाण्याची रूढी सर्वच भागांत प्रचलित आहे. पण या सगळ्याचा आधुनिक आहारशास्त्रानं काय उलगडा केला ते जाणून घेऊ या पुढच्या भागात.

## काव्यनाद



### शांतता

जीव गुदमरतोय
हवाहवासा वाटणारा
एकांत नकोसा झालाय
भावभावनांशी
फारकत घेऊन
जगतेय आजची पिढी
या पिढीला नकोशी
झाली आहे
माणसांची गर्दी
माणसांच्या गर्दीत
हरवत चालला आहे
आत्मविश्वास
माणसांचा गर्दीत
माणूस हरवला आहे
माणुसकी हरवली आहे
जगण्याचा नादात

**प्रा. वर्षा विलास कावरे**
९०२१६७३१७८

### मन

गुंतले माझे मन असे तुझ्या ठाई
रात्रंदिन ध्यास सदा वेध तुझा घेई
तुला बघण्यास माझे आसुसले मन
कधी दर्शन देसी हे प्रभो दयाघन
तू असिस रे साऱ्या दुनियेचा त्राता
मी अजाण बालक तू प्रिय माझी माता
तुझ्या चरणाशी माझे लीन झाले मन
माझे अपराध घेसी तुझ्या पोटी सामावून
तुझ्या सगुण रूपाशी मी झाले एकरूप
माझ्या निर्मळ मनासी तू ठेव सुखरूप
रूप निर्विकार तुझे भासे सर्वदा निवांत
माझ्या अशांत मनाला कधी करिसी रे शांत

**अपर्णा सोवळे**
८३०८८९२१२२

### कुशलता

गूढ ज्ञानाचे कुतूहल
होई अंतरी हलचल
विचारांची पानगळ
जाणवे अस्थिरता..

ज्ञान कण भावला
हात लागले गगनाला
क्षण पुढचा मोकळा
जाणवे अस्थिरता..

ओवी समजून घेतली
वाटले ही वाट आपली
क्षणोक्षणी मती गुंतलेली
जाणवे अस्थिरता..

विषय जरी आपलासा
अधिकारच आहे जसा
चिंतनी विषय कोठलासा
जाणवे अस्थिरता..

सोने बघावे सोनाराने
ज्ञान-अज्ञान ते विवेकाने
होती प्रयोग सारे अधिकाराने
जाणून घे ती कुशलता...

**अतुल ठाकरे**
९४२२९१०३४७




### ताटी उघडा ज्ञानदेवा

मुक्ताईच्या करुणाभावा,
ताटी उघडा ज्ञानदेवा ॥धृ॥
आजवरी तुम्ही केली माया
माय पित्यापरी केली छाया
lजच मग कां राग धरीता
थोडी आता दया दाखवा ॥१॥
माय कधी का चोरी पान्हा
करोत बाळे कितीही गुन्हा
घडे सारे अज्ञानाने
विसरुनी तयावरी पाखर घाला ॥२॥
तुम्हीच अशी का पाठ फिरविता
कोण पाजेल अमृत आता
कोण सांगेल मार्ग मुक्तीचा
क्षमा करावी सोडूनी रागा ॥३॥

**मृणालिनी केळकर**
९१७२८८३१४७

### आई

भल्याबुऱ्याची जाण तरीही,
मुलांपुढे का हरते आई
सज्जन, दुर्जन असो कुणीही,
प्रेम सारखे करते आई
जमीन जुमला वाट्याला मग
ज्याचा त्याचा त्याला मिळते
वाटणीला मग बाप उरतो



आणि फक्त ती उरते आई
त्या धगधगत्या उन्हातान्हात,
पदराने सावरते आई
त्या थंडीने कुडकुडल्यावर,
पदराने पांघरते आई
चौ भिंतींच्या संसाराला
उभे थाटणे सोपे नसते
बाप घराचा पाया होतो,
छप्पर होते, वरते आई
हट्ट कधी ना करता आले,
मुलांपुढे ना जगता आले
मारून इच्छा अपुल्या साऱ्या
कामापुरता उरते आई
ईश्वर अल्लाह भगवान ही
आठवते का सांगा तेव्हा
ठेच लागता पायाला मग
डोक्यामध्ये स्मरते आई

**मिलिंद इंगळे**
८४८५८६१६२०

### गाव...

पूर्वीसारखा गाव हल्ली,
गजबजलेला दिसत नाही..
पिंपळाच्या झाडाखाली
दिसतात फक्त आता
चार दोन म्हातारी
सत्तरी ओलांडलेली ...
रस्ताही दिसतोय सामसूम
शेताकडे जाणारा...
घरेही वाटतात बंदिस्त
कारागृहासारखी..
महिलांची, विहिरी-नदीवरील
वर्दळ कधीचीच ओसरलेली...
सगळीकडे जाणवतेय हल्ली
स्मशान शांतता ..
पूर्वीचा गोडवा, जिव्हाळा
अगदीच हद्दपार झालेला...
देशाचं तरुण भविष्यही
गुरफटलंय मोबाईलच्या
अजगरी विळख्यात, कायमचं..
माझा गाव खरंच आता
गाव राहिला नाही...

**दादाराव अवचार**
९७६४३३५०९९



### खुशाल सारे नाचा ..!

कोणासाठी गावी गाणी थरथर कापे वाचा
पायांना या टोचू लागे जखमा देती काचा!

हेलकाव्यात सुटू लागल्या दूर चालल्या नावा,
कुठे कळेना जात आहेत सोडुन सुंदर गावा!

दिसतो भवती गोंगाट आहे! खुशाल सारे नाचा
मराच किंवा एकलकोंडे बिळात घासत टाचा!

विकली शेती कळला नंतर व्यापाऱ्याचा कावा,
ठोकत आहे मृत्यूवर तो जग लुटल्याचा दावा!

शंभर कौरव पडले भारी सज्जनास या पाचा..
सुटका व्हावी अडचण होतो जुनाट हाही साचा!

**शशी त्रिभुवन**
७०६६७६५९२७

### संवाद

संवाद झाला देवाचा सागरा सवे,
दिसले त्यात, परमेश्वराचे रूप नवे
अद्भुत घटनेचा जेव्हा मी साक्षी होतो
जनता जनार्दनात परमेश्वर अभिभूत होतो
देव किती दयाळू आहे आज मला कळले,
मी फक्त दिले कबाड, ते तू परमार्थाकडे
वळवीले!
पर्यावरणाचा कितीतरी करी तू सांभाळ
करूनी तू जुगाड़, दिले मदतीचे आभाळ
आली प्रचीती.. तू मंदिरात नाही...
गरज लोकांच्या तू, फक्त हृदयात राही...
जे आहे पीडित, त्यांना दाविल्या तू वाटा
त्यासाठी घेतो तू आमच्या निर्माल्याचा वाटा.
. .?
असे वाटत होते... कि, मी काहीच करीत
नाही.
पण, माझ्याकडून तु करवलेली मदत मला
कळत नाही?
देवा तुझे, कसे मानू आभार.. हेच कळत
नाही.
कारण, हे सारे करूनही, म्हणतो मी काहीच
करत नाही.
होउनि अमरस्वरूप तू पुलकित झाला
ओजस्वी मन घेवूनी मनोज तू झाला
वाटते तू आहे कैवारी दीन हिनांचा.....
पण, कसा करितो सांभाळ तू आपल्या
प्रपंचाचा
मानले बुआ, तू आहे देवांचा ही देव,
आता मला वाटत नाहि, तुझी कधी भेव
संवादातून सागराच्या लाटा उफाळीत
होत्या,
संपले सारे वाद आताः.. उरला फक्त,
संवाद होता....
करूया संवाद फक्त आपुलकीचा
सोडूनि वाद फक्त मी पणाचा
समाज म्हणजेच मी, असा होता समज
संवादातून सागराच्या दिली तु मला
समज....

**दिनेश सावळकर**
८६०५५३५७५३

### मित्र

एक तू मित्र कर
आरशासारखा....
जो दिसेल फक्त
तुझ्याच सारखा

ना लपवा लपवी
ना फसवणूक ती
असेल तसं दिसेल
स्वच्छ प्रतिबिंब असेल
नाही दुसरा कोणी
तुझ्या सारखा..तरी
तू एक मित्र कर
आपल्या सारखा

हसणे आणि रुसणे
मनातल्या भावना दर्पणात दिसणे
होईल मोकळे आकाश
सर्व बंध सुटतील सावकाश.

मग आनंद ऋतू होवून
बरसेल मना सारखा...
एक मित्र कर
आपल्या सारखा...

**योगीता गडेकर**

## लोकायन

**सुधीर पाठक**
८८८८३९७७२७

# नवीन युतीच्या दिशेने



काही दिवसांपूर्वी नागपूरला पर्सिस्टंटच्या कवी कुलगुरू कालिदास सभागृहात भाजप नेते डॉ. विजय चौथाईवाले यांचे भाषण झाले होते. प्रकाश राजुरकर ट्रस्ट आयोजित त्या कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रश्नोत्तराचाही भाग होता. त्यावेळी एका श्रोत्याने प्रश्न केला होता -''भारत रशिया चीन अशी शक्तीची फेररचना होण्याची शक्यता कितपत दिसते?'' त्यावर नकारार्थी हात लावून चौथाईवाले यांनी हा प्रश्न उडवून लावला होता. पण अवघ्या काही महिन्यांत त्या युतीच्या दिशेने जगाच्या पाठीवर पडघम वाजू लागले आहेत. नव्हे ती युती-शक्तीची फेररचना करण्याच्या दृष्टीने शांघाय परिषद एक मोठा पुरावा सादर करती झाली आहे. प्रश्नकर्त्या व्यक्तीने अपेक्षित केल्याप्रमाणे भारत-रशिया-चीन युती, आघाडी साकारत आहे.

काश्मीर खोऱ्यात पहलगाम येथे अतिरेक्यांनी धर्म विचारून हिंदू पर्यटकांची हत्या केली आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकमधील अतिरेक्यांच्या ठिकाणांवर अतिशय प्रभावी आणि प्रखर असा हल्ला भारताची सीमा न ओलांडता चढविला होता. पाकिस्ताननेही त्याच्या उत्तरात काही भारतीय नागरी वस्त्यांवर हल्ला चढविला. भारतानेही त्यांच्या लष्करी सामर्थ्याला प्रतिबंध घालता येईल अशी उपाययोजना केली. त्यातून भारत-पाक युद्ध सुरू होते की काय अशी स्थिती निर्माण झाली होती. संघर्ष झडला होता, पण भारताचे उत्तर इतके तिखट होते की पाकमधील राजकारणातील अधिकाऱ्यांनी भारताला फोन करून युद्धबंदी करण्याचे आवाहन केले होते. पण तत्पूर्वीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्यामुळे युद्धबंदी झाली अशी घोषणा करून टाकली आणि जागतिक पातळीवर एक नवीन खळबळ सुरू झाली. प्रकरण इथेच थांबले नाही तर भारतामध्ये विरोधकांनी भारत सरकारला त्या विधानासाठी धारेवर धरले आणि तुम्ही अमेरिकेसमोर लोटांगण घातले असाही आरोप केला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तर तुम्ही नाव घेऊन ट्रम्प यांच्या वक्तव्याचा खुलासा करा, असे आवाहनही केले होते. पण अर्थात राजशिष्टाचार तत्त्वांमध्ये असे बसत नाही, त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव न घेताच असे सांगितले की अमेरिकेतील कुणीही भारत आणि पाकिस्तान युद्धबंदीसाठी फोन केले नाहीत.

पुढे पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या संसदेत बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा खोडून काढला. मात्र त्यात कुठेही ट्रम्प साहेबांचे नाव घेतले नव्हते. भारताच्या या भूमिकेमुळे ट्रम्प यांच्या बोलबच्चनपणाला पायबंद बसला होता. त्यांच्या मोठेपणाला जबर धक्का बसला. शांततेचे नोबेल पारितोषिक त्यांना मिळावे अशी जी त्यांची योजना होती त्याची भलावण भारताने केली नाही. तेव्हापासून भारत-अमेरिका संबंधांमध्ये काहीसा तणाव निर्माण झाला होता.

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर पंचवीस टक्के आयातशुल्क लावले आणि ते तिथेच थांबले नाही तर रशियाकडून भारत तेल घेतो आणि युक्रेन विरुद्धच्या युद्धाला भारत जबाबदार आहे असे मत व्यक्त करत अजून पंचवीस टक्के दंड भारतावर लावला. या एकूण ५० टक्के टेरिफमुळे भारतावर मोठे संकट कोसळण्याची शक्यता आहे, पण भारताने स्पष्ट केले की आम्ही दूध उत्पादक आणि शेतकरी यांच्या हिताला बाधा पोहोचू देणार नाही. ही बाधा पोहोचू नये म्हणून वाटेल ते सहन करू, त्यासाठी आम्ही वाटेल ती किंमत मोजायला तयार आहोत आणि अखेर भारतावर पन्नास टक्के टेरिफ लादला गेला. भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम नक्की होणार आहे. भारतातून तयार कपडे, ज्वेलरी, हिरे फार मोठ्या प्रमाणात अमेरिका आयात करते. या उद्योगाला व त्यावर आधारित रोजगारावर टेरिफवाढीचा जबर परिणाम होणे अपेक्षित आहे. भारतीय बाजारपेठेत लागलीच जाहिराती सुरू झाल्या की, ५० टक्के टेरिफ लागल्यामुळे तयार कपड्यांचा मोठा साठा पडून आहे. म्हणून कमी दरामध्ये त्याची विक्री भारतात सुरू झाली आहे. तसेच सेल भारतामध्ये लागले आहे. एरवी तीन ते पाच हजाराच्या किमतीचे ब्रॅण्डेड कपडे ३०० ते ४०० रुपयांत भारतीयांना उपलब्ध होऊ लागलेत असे ते जाहिरात सांगत होते. वास्तविक असे होण्याची काहीही शक्यता नव्हती, कारण टेरिफ लागला आणि साठा जमा झाला असे एक दोन दिवसांत घडत नाही. त्याला काही कालावधी जाऊ द्यावा लागतो.

अमेरिकेच्या या निर्णयाचा परिणाम शेअर बाजारावर नक्की झाला. निर्देशांक खाली आला. अर्थात भारतही फक्त मार खात बसला नव्हता तर त्यांनीही आफ्रिका व एशियन देशांमध्ये नवीन निर्यात बाजारपेठ शोधायला सुरुवात केली. शांघाय परिषदेच्या निमित्ताने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग व रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमिर पुतिन यांची भेट झाली. त्या भेटीची जी चित्रे समोर आली आहेत त्यावरून प्रकाश राजुरकर ट्रस्टच्या कार्यक्रमात त्या अनामिक प्रेक्षकाने विचारलेला प्रश्न परिणामकारक प्रभाव टाकून गेला.

या शांघाय परिषदेमध्ये भाग घेणारे पाकचे पंतप्रधान शाहबाज शरीफ काहीसे एकटे पडलेले दिसत आहेत. या उलट भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संपूर्ण परिषदेच्या केंद्रस्थानी असल्याचे जाणवत होते. एवढेच नव्हे तर परिषदेच्या पहिल्या दिवशी पुतिन यांनी आपल्या गाडीतून मोदी यांना त्यांच्या निवासस्थानी नेले. त्यासाठी जवळजवळ दहा मिनिटे ते स्वतः गाडीमध्ये बसले होते व मोदींची वाट बघत होते. एकूण जगाच्या नवीन फेररचनेसाठी मोदी यांनी प्रयत्न सुरू केले आहेत असे जाणवू लागले.

चीन आणि भारत यांच्यातील तणाव आणि संघर्ष जगाला ज्ञात आहे. त्यामुळे आपल्या भाषणाची सुरुवात करताना सीमेवरील लष्कर दोन्ही बाजूने मागे घेतल्याने शांतता आणि स्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे असे मोदी यांनी सांगितले. इथेच मोदी थांबले नाही तर दहशतवाद हा संपूर्ण जगाला धोका असून त्या विरोधातील जगाच्या लढ्यात चीननेही भारताला साथ द्यावी असे आवाहन केले. मोदी जवळजवळ सात वर्षांच्या काळानंतर चीनला गेले आहेत. मोदींच्या या आवाहनाला प्रतिसाद देताना चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग म्हणाले, मित्र होणे, चांगले शेजारी होणे तसेच ड्रॅगन आणि हत्तीचे सोबत येणे हे अतिशय गरजेचे आहे. हत्ती आणि ड्रॅगन यांच्यातील मैत्री निर्णायक ठरेल. हे देखील त्यांनी ठणकावून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना सुनावले आहे.

धोरणात्मक संवाद वाढवून परस्पर विश्वास मजबूत करणे, सहकार्य व आदानप्रदान वाढवून लोकांसाठी, दोघांसाठी समान फायदे मिळविणे, परस्परांच्या काळजीचा सन्मान करून शांतिपूर्ण सहअस्तित्व पुढे नेणे, बहुपक्षीय सहकार्य मजबूत करून एशिया आणि जगात शांतता आणि समृद्धीसाठी काम करणे या चार मुद्द्यांवर या दोन्ही नेत्यांत जवळजवळ तासभर चर्चा झाली.

अमेरिकेला शह देण्यासाठी रशिया, चीन आणि भारत यात आघाडी होत असल्याचे, युती होत असल्याचे एकूण चित्र या परिषदेनंतर समोर आले आहे. डॉलरला टक्कर देण्यासाठी हे तीनही देश सज्ज झाले आहेत. मोदीजींनी अमेरिकेला टक्कर देण्यासाठी जपानला जाऊन जपानचेही सहकार्य मागितले आहे. अमेरिकन डॉलरला बाजूला सारून ब्रिक्स देशासोबत केवळ भारतीय रुपयात व्यापार करण्याला प्राधान्य देण्याचे धोरण देखील भारताने स्वीकारले आहे.

अमेरिका आणि भारत यांच्या संबंधात तणाव येणे हे नवीन नाही. जोवर पाक समृद्ध राष्ट्र होते, तोवर पाकला अमेरिकेची पहिली पसंती होती. अटलजींच्या काळातही भारताने शांततेसाठी अणुस्फोट केला तेव्हा अमेरिकेने भारतावर निर्बंध लादले होते. भारताशी व्यापार करायचा नाही असे सॅक्शन्स लागले होते, पण त्याही धमकीला भारत झुकला नाही. अखेर काही काळाने अमेरिकेला आपले निर्बंध मागे घ्यावे लागले होते. आता ही टेरिफ वाढ काही काळाने मागे घेतली जाऊ शकते, पण मोदीजींनी अमेरिकेच्या भरवशावर न राहता विश्व पातळीवर नवबंधुत्वासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. भारतीय मालाची आफ्रिकेतून अमेरिकावारी सुरू होण्याची पडताळणीही बघितली जात आहे. त्याच वेळी 'मन की बात'मधून मोदीजींनी स्वदेशीच्या स्वावलंबनाचे हे शस्त्र बनविण्याचे आवाहन भारतीयांना केले आहे. विकसित राष्ट्रांसाठी आत्मनिर्भरता हाच एकमेव उपाय असल्याचे त्यांनी भारतीय नागरिकांना आवर्जून सांगितले आहे.

हे नक्की आहे की पुढील काळ कठीण आहे, पण त्यात आपण कोलमडून पडू अशी अजिबात शक्यता नाही. आपल्या देशासाठी त्याग करण्याचे, काहीतरी करण्याचे आवाहन आपल्या लोकप्रिय नेत्यांनी केले तर भारतीय जनता त्याला भरभरून प्रतिसाद देते हा आपला अनेक वर्षांचा अनुभव आहे.

१९६५ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी आपले तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी भारतीयांना सोमवारी भात न खाण्याचे आवाहन केले होते. त्याला फार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता. त्यावेळी आठवड्यातून एक दिवस म्हणजे सोमवारी खानावळीत देखील भात मिळत नसे. अनेक घरांतून त्यावेळी सोमवारचा उपास धरला गेला होता आणि तो आजही अनेक घरांतून सुरू आहे. वास्तविक भारतामध्ये फार मोठा भाग हा तांदूळ खाणारा किंवा तांदूळ हे त्यांचे मुख्य अन्न आहे असा आहे, पण त्याही ठिकाणी हे सोमवारचे व्रत नागरिकांनी पाळले होते. ईशान्य भारत, दक्षिण भारत हा तर भात खाऊच प्रदेश आहे, त्या तुलनेत मध्य आणि पश्चिम भारतात आणि उत्तर भारतातही काही ठिकाणी गव्हाला जास्त उठाव असतो. ज्या भागात गव्हाला उठाव आहे तिथे तांदूळ न खाणे समजू शकते, पण तांदूळ हे ज्यांचे मुख्य खाद्य आहे, त्यांनी भाताचा त्याग करणे यातून समर्पण आणि त्यागाची वृत्तीच दिसते.

लोकप्रिय नेत्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देणे हे भारतीय स्वभावाचे वैशिष्ट्य आहे. मोदीजींनी गॅसवरील सबसिडी सोडण्याचे आवाहन केले होते, त्यालाही समाजातल्या वरच्या स्तरातील लोकांनी फार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला होता. त्यांनी सोडलेल्या सबसिडीतून जी रक्कम जमा झाली त्यातून उज्ज्वला गॅस योजना राबविली गेली. सबसिडी सोडणाऱ्यांना मोदीजींच्या सहीची प्रमाणपत्रे मिळाली होती, ती आजही अनेक घरांत कायम लावण्यात आलेली आहेत किंवा घराच्या शोकेसमध्ये ती प्रमाणपत्रे ठेवलेली आहेत. त्यासाठी त्याग करण्यात, काहीतरी समर्पण करण्यात भारतीयांना विलक्षण आनंद मिळतो. देशासाठी काहीतरी करण्याची संधी अनेक भारतीय शोधत असतात. त्यामुळेच अमेरिकेच्या टेरिफवाढीला उत्तर द्यायची मानसिकता भारतीयांत निर्माण झाली आहे.

हे खरे आहे की पंतप्रधान मोदी यांनी अमेरिकेशी असलेले संबंध दृढ करण्यासाठी, मजबूत करण्यासाठी दहा वर्षे खूप मेहनत घेतली. ही सर्व मेहनत फक्त एका नोबेल पुरस्कारापायी ट्रम्प वाया घालवीत आहेत. मात्र मोदीजींनी या वेडाचारानेही आपला संयम गमावला नाही. संयम आणि शांतता कायम ठेवत त्यांनी आपला प्रवास सुरू ठेवला आहे.

एका जर्मन वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, टेरिफ कमी करावा म्हणून मोदीजींनी हातात भिक्षापात्र घेतले नाही. या काळात चार वेळा अमेरिकन प्रशासनाने भारताला फोन केला होता, पण भारताने फोनही उचलले नाही. नेत्याचा खंबीरपणा काय असतो याचा अनुभव अमेरिका प्रशासनाला यानिमित्ताने मोदीजींनी दिला आहे. आत्ता आत्ता त्यांनी हा टेरिफ मागे घ्यावा म्हणून प्रशासनाला पत्र दिले आहे. भारताच्या या खंबीरपणाचा परिणाम आता अमेरिकेवरच होऊ लागला आहे. व्हाईट हाऊसचे माजी व्यापार सल्लागार पीटर यांनी रशिया-युक्रेन युद्धाला मोदी- युद्ध संबोधल्यामुळे, त्यांच्यावर अमेरिकेतील विविध गट टीका करू लागले आहेत. ज्यू गटाने तर थेट ट्रम्प यांनाच फटकारले आहे हे अधिकार ट्रम्प यांना देण्यासाठी राष्ट्रीय आणिबाणी लावावी लागली. ती आणिबाणीची घोषणा रद्द करण्याची मागणी डोमेक्रॅटिक पक्षाने केली आहे. शिवाय न्यायालयांनी ट्रम्प यांना असे मनमानी वागता येणार नाही असे सुनावले आहे. हा दबाव अमेरिकेतून वाढत असताना ट्रम्प यांचा विक्षिप्तपणा किती काळ टिकू शकतो हा खरा प्रश्न आहे. या पृष्ठभूमीवर भारत-चीन-रशिया अशी नवीन युती सिद्ध होण्याकडे वाटचाल सुरू झाली आहे. आज जरी चीन भारताशी जुळवून घेत असला, तरीही लाल ड्रॅगन हा विश्वासघातकी आहे हे आपल्याला विसरून चालणार नाही. त्याबाबतची एक काळजी सदैव आपल्याला घ्यावी लागेल. लाल ड्रॅगनच्या कारवायांमुळेच १९६२ साली भारताची भरपूर राजकीय नाचक्की जगात झाली होती. पण आजचा भारत १९६२ चा भारत नाही, तर २०२५ चा भारत आहे. ही बाबही चीन चांगल्या पद्धतीने जाणून आहे. गलवान येथे या नवीन भारताचा अनुभव चीननेही घेतला आहे. अशा स्थितीत नवीन युती साकारत असेल तर ती युती समान पायावर झाली पाहिजे याची दक्षता आपले सरकार घेईलच हा विश्वास आपण बाळगला पाहिजे. ही नवीन युती नवीन जग निर्माण करायला हातभार लागेल अशी आशा करूया.

---

## दुर्ग जिज्ञासा


**प्राची श्रीकांत पालकर**
९८२३०४९१९८

# मांगी-तुंगी



दुर्ग म्हणजे राज्याची संपत्ती! पूर्वी राज्याच्या, राजमार्गांच्या सुरक्षेसाठी किल्ले बांधणे अत्यंत महत्त्वाचे मानले जात असे. उंच उंच डोंगरावर वसलेले गिरीदुर्ग ताब्यात असणे यावर राजाचे आणि राज्याचे सामर्थ्य अवलंबून होते. म्हणून राज्यकर्ते आपले लक्ष त्या प्रदेशातील किल्ल्यांवर केंद्रित करत. जिथे पोहोचणे कठीण आहे, जो दुर्गम आहे, तो दुर्ग! दुर्ग प्रकारात गिरीदुर्ग हा सर्वश्रेष्ठ मानला जातो. राज्याची राजधानी सुरक्षित असावी यासाठी शिवकाळापर्यंत राजधानी किल्ल्यावरच असणे आवश्यक समजले जात असे. किल्ल्यांचे अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या भारत देशात कालांतराने किल्ल्यांवरील वास्तव्य कमी होत गेले. इंग्रजांच्या काळात त्यांनी किल्ल्यांचे, किल्ल्यांवरील वास्तूंचे, मार्गांचे खूप नुकसान केले. विदेशातील उपभोगी संस्कृतीचा भारतात प्रवेश झाला, त्यामुळे मैदानी प्रदेशात वस्ती वाढून किल्ले हे फक्त पर्यटन स्थळे म्हणून पुढे आली. शिवकालीन इतिहास वाचताना पूर्वीचे किल्लेवैभव आजही अनुभवता येते. म्हणून सह्याद्री पर्वतरांगेतील अत्यंत दुर्गम डोंगरी किल्ले, सुळके यांचे ऐतिहासिक महत्त्व अभ्यासून भटकंती करायला हवी.

सह्याद्रीच्या सेलबारी-डोलबारी डोंगररांगेतील सेलबारी डोंगररांगेवर मांगी-तुंगी सुळके आणि न्हावीगड आहे. सेलबारी रांगेतील दुर्गांना तीक्ष्ण सुळके आहेत. या डोंगररांगेत सुरू झालेली मांगी-तुंगी, तांबोळ्या, घाण्यागड, न्हावीगड, गवळण, नांद्या, जिभ्या, शेंदोड, हनुमान, धामण्या वघाई ही



दुर्गम गड शृंखला थेट गुजरातमध्ये संपते. मांगी किल्ल्याची उंची ४३४३ फूट तर तुंगीची उंची ४३३६ फूट आहे. मांगी-तुंगी हे नाशिक जिल्ह्यातील महत्त्वाचे जैन तीर्थक्षेत्र आहे. बागलाण प्रदेशातील मांगी-तुंगी येथे जैन लेणी आहेत. नाशिक-सटाणा मार्गावरील ताहराबाद येथून सात-आठ किलोमीटर अंतरावर मांगी-तुंगी सुळके आहेत. ताहराबादवरून पिंपळनेरला जाताना भिलवाडी मार्ग घ्यावा, पुढे दोन फाटे फुटतात, उजवीकडील रस्ता मांगी-तुंगी डोंगराच्या पायथ्याशी जातो. भिलवाडी हे मांगी-तुंगीच्या पायथ्याचे गाव आहे. गावात जैन गुरू आदिनाथ, पार्श्वनाथ यांची मंदिरे आहेत. भिलवाडी गावात पद्मावती देवीचे शक्तिपीठदेखील आहे. गावात धर्मशाळा आहे. तेथे राहण्याची व्यवस्था होऊ शकते. मांगी-तुंगी सुळक्यावर जाण्यासाठी गावातूनच रस्ता आहे. डोंगर चढण्यासाठी पायऱ्या केल्या आहेत, पायऱ्या चढून आपण एका कमानीजवळ पोहोचतो. कमानीपासून दोन रस्ते जातात, डावीकडचा रस्ता मांगी सुळक्याकडे आणि उजवीकडचा रस्ता तुंगी सुळक्याकडे जातो.

प्रथम डावीकडचा मार्ग घेऊन मांगी सुळक्याकडे निघावे. पायऱ्यांच्या मार्गाने आपण मांगी सुळक्याच्या खाली असलेल्या जैन लेणीजवळ पोहोचतो. हा भाग थोडा ओसाड आहे, खूप झाडी नसल्याने येथे उन्हाच्या आधी जाणे सोयीचे असते. मांगी सुळक्याच्या पोटात असलेल्या गुहांमध्ये भगवान महावीर, पार्श्वनाथ, आदिनाथ आणि जैन धर्मातील इतर तीर्थंकरांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. गुहांच्या बाजूला पाण्याचे टाके आहे. गुहेतील बलभद्राची मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. ही मूर्ती पाठमोरी आहे. बलभद्र म्हणजेच श्रीकृष्णाचे ज्येष्ठ बंधू बलराम, जैन पुराणात बलरामाचा बलभद्र म्हणून उल्लेख आहे. बलभद्र डोंगराकडे तोंड करून तप करण्यास बसले आहे. अशी आख्यायिका आहे की, मांगी-तुंगी सुळक्याच्या मध्ये जी डोंगरसोंड आहे, तेथे बलरामाने श्रीकृष्णावर अग्निसंस्कार केले आणि त्यानंतर बलरामांनी जैन धर्माची दीक्षा घेतली. श्रीकृष्ण व बलराम यांच्या पादुका या डोंगरसोंडेवर आहेत. जवळच एक पाण्याचा कुंड आहे, जो कृष्णकुंड म्हणून प्रसिद्ध आहे. मांगी सुळक्याला प्रदक्षिणा घालण्यासाठी प्रदक्षिणा मार्ग केलेला आहे. या मार्गावर जैन धर्मातील चोवीस तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत.

मांगी शिखरावर सात गुहा असून त्यात जैनशिल्पे कोरली आहेत. एका गुहेत बागुल राजा विरामशाह देव राठोड याची प्रतिमा कोरलेली आहे. प्रतिमेच्या बाजूला त्यांनी या जैन लेण्या खोदल्या अशा आशयाचा शिलालेख आहे. मांगीच्या प्रदक्षिणा मार्गात मागील बाजूस मंगला चंडिका देवीचे प्राचीन शिल्प आहे, हिला मांगी देवी म्हणून या भागात पूजले जाते. येथे आदिवासी बांधवांची डोंगऱ्यादेवाची गुहादेखील आहे. मांगी किल्ल्यावर एकूण १० गुहा आहेत. महावीर गुहेत भगवान महावीरांची पद्मासनस्थित पांढरी मूर्ती आहे. सहाव्या गुहेत परस्वनाथांची मूर्ती आहे. त्याच्या शेजारी आदिनाथांच्या प्रतिमा आहेत. सातव्या गुहेतील मूर्ती चारही दिशांना असून चार भिंतींना लागून आहे. आठव्या गुहेत अनेक मूर्ती व जैन संतांची शिल्पे कोरली आहेत. नवव्या गुहेत भगवान बाहुबली यांचा पुतळा आहे. मांगी किल्ल्यावरील मुख्य मंदिर भगवान महावीरांना समर्पित आहे. पद्मासन स्थितीतील महावीरांची मूर्तीच्या बाजूला अजून काही मूर्ती कोरलेल्या आहेत. पुढील गुहेत सात जैन शिल्पे व १५ ते २० मूर्ती कोरल्या आहेत. एका गुहेत भगवान पार्श्वनाथांची मूर्ती मध्यभागी असून उरलेल्या तिन्ही बाजूला अनेक मूर्ती पाहायला मिळतात. टेकडीच्या भिंतीवर २४ तीर्थंकरांचे शिल्प कोरलेले आहे.

मांगी पाहून झाल्यावर पुन्हा प्रवेशद्वाराकडे येऊन उजवीकडे असलेल्या तुंगी सुळक्याकडे जावे. येथून पायऱ्यांनी १५-२० मिनिटात आपण तुंगी सुळक्याच्या खाली असलेल्या जैन लेण्यांपर्यंत पोहोचतो. तुंगी किल्ल्यावर मांगीपेक्षा कमी गुहा कोरलेल्या आहेत. त्यातही जैन तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत. त्यातील एका गुहेला बुद्ध गुहा म्हणतात. तुंगी सुळक्याच्या भोवतीदेखील प्रदक्षिणा मार्ग केलेला आहे. येथील शिखरावर पाच मंदिरे आहेत. त्यात आठवा तीर्थंकर भगवान चंद्रप्रभू यांच्या दोन लेणी आहेत. येथे रामचंद्र गुहा आहे. त्यात हनुमान, गव, गवक्ष, नील यांच्या प्राचीन मूर्ती आहेत. एका गुहेत तपस्वी संत अवस्थेत रामाचे सेनापती कृतांतवक्र यांचीही मूर्ती आहे. मांगी-तुंगी टेकड्यांमधील मार्गावर शुद्ध आणि बुद्ध मुनींच्या दोन गुहा आहेत. भगवान मुनिसुव्रत नाथांचा मोठा पुतळा येथे पद्मासन मुद्रेत आहे. भगवान बाहुबली व इतर काही मूर्तीही आहेत. पावसाळ्यात मांगी-तुंगीचे सौंदर्य पाहण्यासारखे असते. डोंगराच्या कुशीतून पांढऱ्या शुभ्र जलधारा ओसंडून वाहत असतात. सह्याद्रीचे सौंदर्य अद्वितीय आहे. पावसाळ्यात ते अधिकच खुलते आणि पर्यटकांना आकर्षित करते.

जैन धर्माचे पहिले तीर्थंकर भगवान ऋषभदेव यांची १०८ फूट उंच मूर्ती मांगी येथे साकारण्यात आली आहे. या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा व मस्तकाभिषेक सोहळा २०१६ मध्ये संपन्न झाला. सुमारे ४५०० फूट उंचीवर साकारलेल्या या मूर्तीचे काम १९-२० वर्षे सुरू होते. ही मूर्ती उभारण्यासाठी प्रथम १२० फूट लांबीच्या कापडावर मूर्तीचे चित्र रेखाटले आणि त्यावरून ही मूर्ती घडविण्यात आली. ही मूर्ती घडविण्याआधी अभ्यासकांनी पाली, संस्कृतसह १० भाषांतील धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास केला. त्यानंतर मूर्तीची रचना निश्चित करण्यात आली. या ग्रंथात उल्लेख असलेली अंगुली प्रमाण याचा अभ्यास करून त्याचे फुटात रूपांतर करून या मूर्तीचे परिमाण निश्चित करण्यात आले आहे. आता तर हे जैन धर्मीयांचे जागतिक तीर्थस्थळ झाले आहे. सह्याद्रीतील अत्यंत टणक व कठीण अशा बेसॉल्ट पाषाणात डोंगर कापून तयार केलेली ही मूर्ती, टिकाऊ आणि अप्रतिम आहे. या मूर्तीची नोंद गिनीज बुकमध्ये झाली आहे. हे जैन तीर्थस्थान असल्याने भाविकांची येथे कायम गर्दी असते. पायथ्याच्या आदिनाथ मंदिरात भगवान महावीरांच्या भव्य प्रतिमा आहेत. जैन धर्मात अनेक अशी मंदिरे आहेत जी सिद्ध क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहेत.

साधारणतः लेणी दोन प्रकारच्या असतात, ऐहिक लेणी आणि धार्मिक लेणी. नाणेघाटातील सातवाहनांचे देवकुळ म्हणजे पूर्वजांच्या प्रतिमांचे मंदिर हे एकमेव ऐहिक लेणे म्हणून ज्ञात आहे. इतर सर्व लेणी या धार्मिक प्रकारात मोडतात. बौद्ध, जैन, हिंदू धर्मीयांसाठी त्या त्या काळात या लेणी निर्मिल्या गेल्या. धार्मिक लेणी प्रत्येक धर्माच्या तत्कालीन रुपाचे दर्शन घडवितात, त्यामुळे प्रत्येक धर्माचे आणि संस्कृतीचे दर्शन घडते. दुर्ग, लेणी, पुरातन मंदिरे, ऐतिहासिक वास्तू आपल्या संस्कृतीची धरोहर आहे. लेणी प्राचीन भारतीय कला आणि स्थापत्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना आहे.



---

# शिकायचे, शहाणे व्हायचे की फसायचे?

**विजय पांढरीपांडे**
७६५९०८४५५५

आजकाल असा विचित्र पेच निर्माण होणे सर्वांसाठी स्वाभाविक आहे. कारण सोशल मीडियाद्वारे माहितीचा अवतीभवती इतका पूर आलाय की, निसर्गाच्या भाषेत ही एक प्रकारची ढगफुटीच आहे. माहिती संकलित करण्यासाठी 'क्लाऊड' हा शब्द वापरतात. तो आता सार्थ ठरतो आहे. हातातल्या मोबाईलवर येणाऱ्या कुठल्या बातमीवर विश्वास ठेवायचा अन् कोणते वृत्त, व्हिडीओ फेक मानायचे, याचा निर्णय करणे कठीण. नुकताच प्रसिद्ध अँकर रजत शर्मा यांचा व्हिडीओ प्रसारित झालाय. त्यात भारताने अमेरिकेला टक्कर देण्यासाठी कॉमेट या सर्च इंजिनचा शोध लावलाय. ही अस्सल भारतीय सर्च इंजिन गुगलपेक्षा अधिक प्रभावी, अधिक सुरक्षित असल्याचा दावा केला आहे. शंका आल्याने शोध घेतला असता हे वृत्त बनावट, खोटे असल्याचे कळले. संपूर्ण व्हिडीओ अस्सल वाटत असला वरपांगी, तरी मुळात खोटा आहे.



आजकाल आपल्या देशाचे, सरकारचे, विशिष्ट पक्ष, सरकारचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी, विशिष्ट जाती-धर्माचे स्तोम माजविण्यासाठी अशी खोटी माहिती पसरविण्याचा उद्योग जोमात सुरू आहे. हे एकच कुणी करतो असे नाही. दोन्ही पक्षी, दोन्ही बाजूंनी हे खोट्या माहितीचे, फसव्या दाव्याचे संगणक मायाजाल पसरले जातेय. त्यात आपण कळत-नकळत गुरफटत जातो.

ही एक प्रकारची वर्चस्वाची लढाई आहे. दोन देशात, दोन सरकारात, दोन धर्मात, दोन जाती वर्गात मी श्रेष्ठ, आमचे तेवढे खरे; तुम्ही खोटे, तुम्ही फसवे, लबाड. आमचेच म्हणणे न्याय्य असे ठासून सांगितले जाते. त्यासाठी खोटे पुरावे गोळा करायचे, खोट्या ऑडिओ-व्हिडीओ क्लिप्स तयार करायच्या. आहे त्या डॉक्युमेंट्समध्ये फेरफार करून नवे खोटे नॅरेटिव्ह तयार करून जनमानसात वादळ उठवून गोंधळ माजवायचा, असा प्रकार सुरू आहे. आता तर एआय, एमएल डीप फेक अन- काय काय तंत्रज्ञान आले आहे. हा गोंधळ वाढतच जाणार आहे.

हे मायाजाल युद्ध एका समाजापुरते, एका देशापुरते मर्यादित राहिलेले नाही. ते सर्वव्यापी झाले आहे. अगदी तरुण मुलापासून, कौटुंबिक नात्यापासून तर राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, सरकारी वैधानिक संस्था, आंतरराष्ट्रीय संबंध, युद्ध अशा सर्वच क्षेत्रात हा व्हायरस वेगाने पसरला आहे. पसरतोच आहे. त्याला कंट्रोल करणे कुणाच्याही हातात राहिलेले नाही. याला बळी न पडता सावध राहणे एवढेच आपल्या हातात आहे. अशा शीतयुद्धासाठी विशिष्ट वर्ग, विशिष्ट समाज, विशिष्ट राष्ट्र प्रचंड प्रमाणात पैसा ओतताना दिसतो. हा एक प्रकारचा माफिया झालाय. या भूलभुलय्यामुळे सत्य काय, असत्य काय याचा शोध घेणे कठीण होत जाणार आहे. इतिहास बदलला जाणार आहे. संस्कृतीची पाळंमुळं खोदून विशिष्ट धर्माच्या, विचारसरणीच्या सोयीचे तेवढे आपल्या पुढे ठेवले जाईल. ऐतिहासिक घटनांचे संदर्भ बदलले जातील. वैज्ञानिक संकल्पनांचे अर्थ बदलले जातील. एखादा व्यापारी, उद्योजक, एजंट आपला प्रोडक्ट विकण्यासाठी जशी खोटी फसवी बतावणी करतो अन् आपल्याला जाळ्यात फसवतो, तसलाच हा प्रकार आहे. दुःखाची, चिंतेची बाब ही की, आपण आपला विवेक गहाण ठेवून या महाजालात फसत चाललो आहोत. खोलवर डुबत गटांगळ्या खायला लागलो आहोत. ही त्सुनामी आता विशिष्ट क्षेत्रापुरती मर्यादित राहिली नाही. ती सर्वव्यापी झाली आहे. हे वादळ थांबविणे कुणाच्याही हातात राहिले नाही, अशी विचित्र परिस्थिती निर्माण होते आहे.

हे चुकीचे आहे हे सगळ्यांना माहिती असूनही आपण काहीच करू शकत नाही, हा खरा पेच आहे. आपले जगण्याचे अर्थ, आपल्या निष्ठा, आपल्या श्रद्धा, आपली विचारधारा सगळेच दावणीला लागले आहे या मायाजाळाच्या. हे मोह, हे संमोहन इतके विचित्र आहे की, त्यातून सुटका करून घेणे वाटते तितके सोपे नाही. अगदी शिकले सवरलेले, स्वतःला विद्वान, सुसंस्कृत, शहाणे समजणारेदेखील या मोहजालातून सुटलेले नाहीत. इतकी ही पकड मजबूत अन् विचित्र आहे. पूर्वी आपल्याकडे निःसंग, निर्मोही, निरिच्छ, संन्यस्त असा एक वर्ग होता. या संसाराच्या मायाजालापासून अलिप्त झालेला, अध्यात्म मार्गाला लागलेला. कदाचित तो वर्ग काही करू शकला असता या बाबतीत; पण काळाच्या ओघात तीही जमात नष्ट झाली हळूहळू. त्यांची जागा ढोंगी बाबा, विमानात फिरणारे विश्वगुरू, पंचतारांकित आश्रमातले महाराज यांनी घेतल्यामुळे, तिथेही वेष बदलून हेच नाटक वेगळ्या संहितेसह सुरू आहे. संहिता,नेपथ्य वेगळे, पण खोटे नाटक, मायाजाल तेच, तसेच! आता हळूहळू लोकशाही, स्वातंत्र्य, धर्म, न्याय नीती, राष्ट्रप्रेम, भक्ती, श्रद्धा या संकल्पना, यांच्या व्याख्याही नव्याने बदलत जाणार आहेत; किंबहुना बदलत आहेत. प्रत्येकालाच नव्या कोऱ्या पाटीवर नवा अध्याय लिहावा लागणार आहे. त्यासाठी मात्र आपण सर्वांनी तयार राहायला हवे.